# दत्तवाक् सौरभ



प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने



# दत्तवाक्सौरभ

श्रीसद्‌गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर
यांची प्रवचने

**प्रकाशक**
श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर
समग्र लेखन समिती
श्रीवासुदेव निवास
४२/१७ एरंडवणे, कर्वे रोड, पुणे - ४.

**संपादक**
डॉ. वासुदेव व्यं. देशमुख

**प्रकाशन दिन**
प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज जन्मतिथी (पूर्वसंध्या)
माघ कृ ५ शके १९३२
मंगळवार २२ फेब्रुवारी, २०११

**मुद्रक**
प्रवरा ट्रेडर्स
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे - ५१

**मूल्य रु. ५०/-**

**© सर्व हक्क श्रीवासुदेवनिवास विश्वस्त मंडळ यांचेकडे सुरक्षित**

**श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर**
**समग्र लेखन समिती**
श्रीवासुदेव निवास
४२/१७ एरंडवणे, कर्वे रोड, पुणे - ४.

**प. पू. श्री नारायणकाका ढेकणे महाराज**
(अध्यक्ष) प्रधान विश्वस्त, वासुदेवनिवास, पुणे

**पू. श्री. मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर**
कार्याध्यक्ष

**विश्वस्त श्री. सुभाष दामले**
कोषाध्यक्ष

**सन्माननीय सदस्य**

**पू. डॉ. रा.ल.जोशी, डॉ. वा.व्यं.देशमुख,**
**पू. श्री.शरदराव जोशी, श्री.बाळासाहेब कुलकर्णी,**
**श्रीमती नीलाताई जोशी, श्रीमती सुशीलाताई मोडक,**
**श्रीमती आशाताई धारप, पू.प्र.ना.दीक्षित,**
**विश्वस्त, श्री.श्रीपादराव आघारकर, श्री.कमलाकर देशपांडे**

# प्रास्ताविक निवेदन

**सकल धर्मांमाजी धर्म। स्वरुपी रहाणे हा स्वधर्म**
**हेचि जाणिजे वर्म। साधू लक्षणाचे**

- समर्थ रामदासस्वामी

राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामीमहाराजांचे उक्तीप्रमाणे असे महान साधू शक्तिपातयोग पीठाधीश्वर, राष्ट्रीय पंडित प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर हे या पुण्य पावन नगरीत होऊन गेले. त्यांच्या कृत्ती,प्रेरणा,आणि जीवननिष्ठा आजही सहस्रावधी भाविकांना, साधकांना,विद्वानांना अनुग्रहीतांना आणि शिष्यांना जीवनाचा आधार होऊन राहिले आहेत आणि पुढे ही दीर्घकाळ राहतील.

महाराष्ट्र ही संतांची खाण आहे. हजारो वर्षाची संतांची दिव्य परंपरा या महाराष्ट्राला लाभली आहे. त्याच परंपरेतील एक महान श्रीगणेशदत्तभक्त प.पू.श्रीदत्तमहाराज कवीश्वर आहेत. ज्यांचे वर्णन असे करता येईल -

**अक्रोध वैराग्य जितेंद्रियत्वं।दया क्षमा शांती जनप्रियत्वं।**
**निर्लोभ दाता भय शोकहर्ता । ज्ञानस्य चिन्हं दशलक्षणा।।**

ज्यांना राग नाही, वैराग्य संपन्न जीवन, जितेंद्रिय आहेत, निर्लोभी आहेत, ज्यांच्या ठिकाणी दया आहे, जे क्षमाशील आहेत, अत्यंत शांत आहेत, लोकांच्या मनात त्यांच्याविषयी प्रेम आहे, ज्यांच्याठिकाणी दातृत्व आहे , त्यांना कशाचेही भय वाटत नाही, कशाचाही शोक नाही, ही ज्ञानी

पुरुषाची दहा लक्षणे आहेत.

सर्वसामन्यांना परमार्थाची वाट दाखविणारे, सर्वार्थाने मार्गदर्शन करणारे, जनसामान्यांचे आध्यात्मिक जीवन उन्नत करणारे असे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवनकार्य ईश्वरी प्रेरणेनेच झाले असे दिसते. संतांचे चरित्र हे चित्त शुद्ध करणारे,स्थिर करणारे असे अलौकिक असते.

प.पू.ब्रह्मश्रीदत्तमहाराजांचे बृहत् चरित्र पण सध्या उपलब्ध असलेल्या चरित्रापेक्षा वेगळे असे निर्माण व्हावे, अशी इच्छा निर्माण झाली. मनाने संकल्प केला, पण एवढे मोठे कार्य कसे होणार, त्याची योजना काय करावी इ. विषयाचे चिंतन सुरु झाले. माझ्या मनातील हा चरित्र लेखनाचा विचार महान गुरुभक्त पू.दत्तमहाराजांचे सान्निध्य ज्यांना महाराजांच्या अखेरच्या क्षणापर्यंत लाभले असे अंतरंग शिष्य, पू.दत्तमहाराजांच्या आठवणीने त्या भावविश्वात रमून जातात व तो भाव ज्यांच्या नेत्रातून अश्रुद्वारा प्रकट होतो, असे आमचे डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख यांच्याशी बोललो. त्यांना ही कल्पना अत्यंत आवडली.

'आपण हे कार्य करु या, माझे पूर्ण सहकार्य राहील.' असे सांगीतल्यावर मला फार आनंद झाला. डॉ. देशमुखांप्रमाणेच गुरुभक्त नीलाताई जोशी(बोरिवली), गुरुभक्त डॉ.रा.ल.जोशी (सोलापूर), पंडित शरदराव जोशी (बार्शी), श्रीमती सुशीलाताई मोडक (पुणे) यांच्याशी बोललो, सर्वांनाच ही कल्पना आवडली. मग सर्वांनी एक निवेदन योगतपस्वी प.पू.नारायणकाका ढेकणे महाराज (प्रधान विश्वस्त श्रीवासुदेव निवास) यांना देऊन प्रार्थना केली. पू.काका महाराजांनी याला मान्यता देऊन हे कार्य होण्याची अत्यंत आवश्यकता आहे असे सांगीतले. पू.दत्तमहाराज सर्वांना समजतील असे चरित्र व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

पू.नाराणकाका ढेकणे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली श्रीसद्गुरु **'प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर समग्र चरित्र लेखन समिती'** गुरुवार

दि.५.५.२००५ चैत्र व ३० प.प.श्रीनारायणस्वामी महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी स्थापन झाली. सर्वानुमते या समितीचे कार्याध्यक्षपद पू. श्री मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर यांनी स्वीकारावे असे ठरले. कोषाध्यक्ष म्हणून विश्वस्त श्री. सुभाष दामले यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली. ज्येष्ठ व श्रेष्ठ विद्वान मंडळींचा या समितीत सदस्य म्हणून समावेश केला. संपूर्ण चरित्र संपादनाचे कार्य गुरुभक्त डॉ.वा.व्यं.देशमुख यांनी करावे असे ठरले व डॉक्टरांनी ते मान्य केले.

पू. श्रीनारायणकाका महाराजांनी या चरित्राचे जेवढे खंड होतील तेवढे तयार करा असे सांगून हे वासुदेव निवासाचे अधिकृत प्रकाशन असेल. समितीने पूर्ण पुस्तक तयार करुन श्रीवासुदेव निवासाला द्यावे असे सांगितले व या कार्याची सर्व सूत्रे कार्याध्यक्ष श्री मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर यांचेकडे सुपूर्त केली.

आम्हां सर्वांच्या प्रयत्नांना यश येऊन श्रीदत्तमहाराजांच्या चरित्राचा पहिला खंड ‘मूर्तिमंत भागवत’ २००८ या वर्षी श्रीदत्तमहाराजांच्या पुण्यतिथीच्या पर्वणीत प्रकाशित झाला. आतां दुसरा खंड ‘उपायवनवसंत’ हासुद्धां प्रकाशित होत आहे. यांच्याबरोबरच श्रीदत्तमहाराजांनी श्रीनिम्बार्काचार्यांच्या वेदांतपारिजातसौरभ या ग्रंथाचे भाषांतर व विवरणात्मक वेदांतपारिजातसौरभ या ग्रंथाची त्यांनी मांडलेली भूमिकेत श्रीदत्तमहाराजांनी भारतीय दर्शनांचा समावेशक आढावा घेऊन, सर्व दर्शनांचे सिद्धांत थोडक्यांत मांडलेले आहेत व शेवटी श्रीनिम्बार्काचार्यांच्या जीवन, कार्य आणि तत्त्वज्ञान यांचे संक्षिप्त विवेचन केले आहे. ही भूमिका ‘श्रीनिम्बार्कदर्शन’ या नांवाने आम्ही प्रकाशित करीत आहोंत. डॉ.शैलजा कात्रे पुणे विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या प्रमुख यांची विद्वत्ताप्रचूर प्रस्तावना या ग्रंथाला लाभलेंली आहे.

श्रीदत्तमहाराजांची कांही अप्रकाशित प्रवचने, ज्यांतून त्यांची जीवनदृष्टी आणि तत्त्वज्ञानाचे अभिव्यक्त होते तीही आम्ही आज 'श्रीदत्तवाक्सौरभ' या शीर्षकाखाली प्रकाशित करीत आहोंत. ह्यांतील एक प्रवचन बार्शी येथे श्रीशंकराचार्यांच्या १५००व्या जयंतीनिमित्त (१९८८) झाले होते. ते श्रीवासुदेवनिवासचे विश्वस्त पू.पं.शरद जोशी यांच्या सौजन्याने उपलब्ध झाले आहे. तसेच १९८१च्या पुणे येथील कौशिक व्याख्यानमालेत झालेली श्रीज्ञानदेव व दत्तसंप्रदाय या विषयांवरील प्रवचने श्रीवासुदेवनिवासच्या सौजन्याने उपलब्ध झाली आहेत. दोन प्रवचने बीडचे गुरुभक्त डॉ.दिलीप देशमुख यांच्याकडून मिळाली आहे.पुणे येथे 'अनुग्रह' ह्या विषयावर श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनाच्या ध्वनिमुद्रिकेवरून शेवटचे प्रवचन केले आहे. ह्या सर्वांचे मी प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज समग्र चरित्र समितीतर्फे आणि वैयक्तिकही कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. श्रीदत्तमहाराजांचे विचार आणि उपदेश हे त्यांच्या चरित्राचेच अंगभूत आहेत या भूमिकेतून ही समिति हे वाङ्मय प्रकाशित करीत आहे. ते सर्व भक्त, साधक, अभ्यासक इत्यादींना आवडेल असा विश्वास वाटतो.

ईश्वर सेवा बुद्धीने, अत्यंत त्वरीत गतीने या चरित्राचे मुद्रण डी.टी.पी., छपाई, बायडिंग तसेच चरित्राचे मुखपृष्ठ इ. सर्व कामे श्री.प्रमोद पोटभरे व त्यांचे सहकारी यांनी अत्यंत आत्मीयतेने केले.
त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

तसेच चरित्र ग्रंथात छापलेली छायाचित्रे ज्या गुरुभक्तांनी उपलब्ध करुन दिली या सर्वांनी सद्गुरुंची सेवा या हेतुने हे सहकार्य केले. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी थोडीच आहे.

अशा प्रकारे गेली ७ वर्षे समितीच्या अथक परिश्रमाचे फळ म्हणजे ,श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे जन्मतिथीच्या पूर्वसंध्येला माघ कृष्ण ५ मंगळवार दिनांक २२ फेब्रुवारी,२०११ रोजी श्रीमद्जगद्गुरु शंकराचार्य

प.प.श्रीकृष्णानंदतीर्थ स्वामी महाराज यांचे पवित्र करकमलाद्वारे तसेच योगतपस्वी प.पू.श्रीनारायणकाका ढेकणे महाराज यांचे अध्यक्षतेखाली **'दत्तवाक्सौरभ'** या ग्रंथाचे प्रकाशन पुण्यपावन क्षेत्री श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर द्विवर्षीय जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभ 'भरतनाट्य मंदिरात' संपन्न होत आहे ही एक सौभाग्याची साक्ष आहे.

विशेष म्हणजे संकल्पाप्रमाणे प.पू.,श्रीनारायणकाका ढेकणे महाराजांच्या आशीर्वादाने प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा जन्मशताब्दी महोत्सव आणि प.पू. योगीराज गुळवणीमहाराज यांच्या १२५ व्या जयंती महोत्सव या पावन कालखंडात हे प्रकाशन व्हावे अशी इच्छा होती. हा संकल्प श्रीगणेशदत्तसद्गुरु यांच्याकृपेने संपन्न झाला.

या चरित्र लेखन कार्यात ज्या ज्या भक्तांचे सहकार्य लाभले आहे, त्या सर्वांचा नामोल्लेख विस्तारभयास्तव करणे अशक्य आहे, पण त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे अनुग्रहित, भक्त, शिष्य इतरही जिज्ञासू सज्जनवर्ग यांचेकडून या चरित्र ग्रंथाचे वाचन व चिंतन नित्य घडत राहून त्यांना शाश्वत समाधानाचा लाभ होवो व स्वकर्तव्यतेचे समाधान श्रीवासुदेवनिवास ट्रस्टच्या विश्वस्तांना व चरित्रलेखन समितीला लाभो हीच सद्गुरुचरणी प्रार्थना.

श्रीसद्गुरुचरणरज

नागनाथतनय

**मोरेश्वर नागनाथ जोशी-चऱ्होलीकर**

माघ कृ ५ शके १९३२

मंगळवार २२ फेब्रुवारी, २०११

# अंतरंग


| | |
|---|---|
| प्रस्तावना | १० |
| श्रीज्ञानदेव आणि दत्तसंप्रदाय | १३ |
| बुद्धितत्त्वाचा विकास | २७ |
| बुद्धियोगाचा प्रदाता - गुरुस्वरूप ईश्वर परिपूर्णबुद्धी श्रीज्ञानदेव | ५० |
| अध्यक्षीय समारोप पू. श्रीधुंडामहाराज | ७१ |
| साधकांचे पाथेय | ८० |
| आधुनिक समाजासाठी धर्मशास्त्राची उपयुक्तता | १०६ |
| यदु - अवधूत संवाद | १२३ |
| अनुग्रह | १४२ |

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

# प्रस्तावना

**दत्तं कवीश्वरं वंदे गणेशं मानुषं वरम।**
**प्राप्ता वामनयोगीशाद्दीक्षा वै येन शांभवी।।**

**निगूढतत्त्वं ते ज्ञातं यत्किञ्चिल्लोकदुर्ग्रहम।**
**चेष्टितं ते प्रसादोऽयं प्राक्पुण्यैर्मय्युपस्थितः।।**

द्वि.सा.गुरुचरित्रांतर्गता गुरुस्तुतिः ।।

**'धर्मसंस्थापनेचे नर। ते ते ईश्वरी अवतार'** ह्या समर्थोक्तीला अनुसरून प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराज ह्यांची गणना आम्ही ईश्वरी अवतारांतच करतो. त्यांच्या चरित्रांत परमेश्वरी तत्त्व लोकांना सहजासहजी न कळेल अशा प्रकारे गर्भित असते. त्या अकथित अर्थांचा बोध श्रीगुरु आणि ईश्वर यांच्यावर परम श्रद्धा असणाऱ्यांनाच होतो असे श्वेताश्वतर उपनिषदाचे प्रतिपादन आहे. अशी श्रद्धा आपल्या ठिकाणी उत्पन्न व्हावी यासाठी त्यांच्याच वाणीचे अनुशीलन उपकारक ठरणार आहे. याच उद्देशाने आम्ही श्रीदत्तमहाराजांच्या उपलब्ध प्रवचनांतून ही कांही उद्बोधक पण अप्रकाशित प्रवचने वेंचून वाचकांना सादर करीत आहोंत.

यांतील पहिले प्रवचन **'साधकांचे पाथेय'** हे प्रवचन श्रीमत्भगवत्पूज्यपाद श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या १२००व्या जयंतीनिमित्त (२३-४-१९८८) बार्शी येथे झाले होते. पं.शरद जोशी (विश्वस्त, श्रीवासुदेवनिवास) यांनी प्रा,पापळकर यांच्या साह्याने ह्याचे संपादन करून ते श्रीवासुदेवनिवास या त्रैमासिकांत प्रसिद्ध केले होते. त्यांच्या शब्दांत, "अद्वैत वेदांतावर सर्वस्पर्शी, मार्मिक आणि नेमके मार्गदर्शन यांमधून घडत

आहे. प.पू. श्रीदत्तमहाराजांची अधिकारसंपन्न वाणी मोक्षमार्गाच्या साधकांना 'पाथेय' पाथेय ठरणारी आहे. श्रांतांना शांत करणारे, तृषितांना तृप्त करणारे, प्रयत्नशीलांना प्रेरणा देणारे हे पाथेय आहे. आचार्यांच्या सर्व वाङ्मयाचा मागोवा या एका प्रवचनांत घेतला आहे. भारतीय सद्गुरुपरंपरेंत भगवान श्रीशंकराचार्यांचे स्थान उच्चतम आहे. साध्य-साधना-साधक ही त्रिपुटी उकलून अद्वैताची अनुभूति देणारी 'प्रस्थानत्रयी' साधकांची संजीवनी आहे."

त्याचबरोबर स.प.महाविद्यालय, पुणे येथे कौशिक व्याख्यानमालेच्या १६-१८ डिसेंबर ,१९८१ रोजीं झालेल्या बाविसाव्या ज्ञानसत्रांत **'श्रीज्ञानदेव आणि दत्तसंप्रदाय'** या विषयावर प.पू.दत्तमहाराजांची तीन प्रवचने झाली. भागवतोत्तम ह.भ.प.धुंडामहाराज देगलूरकर यांनी सत्राच्या अध्यक्षस्थान भूषविले होते. ही तीन प्रवचने आणि पू.देगलूरकरमहाराजांचा समारोप यांचा इथे समावेश केला आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्र आणि वाङ्मयाच्या आधारे श्रीदत्तमहाराजांनी भारतीय परंपरेतील बुद्धिवादाचे विवेचन केले आहे. बुद्धीचे स्वरूप, तिच्यांतले दोष, ते दूर करण्याची बुद्धीच्या विकासाची साधने, विकसित आणि पूर्ण बुद्धीचे स्वरूप इत्यादि विषय सोपपत्तिक मांडले आहेत. ह्या सर्व साधनपद्धतीत श्रीज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाची आणि श्रीदत्तसंप्रदायाची कशी एकवाक्यता आहे तेही स्पष्ट केले आहे.

दोन प्रवचने बीड येथे झालेली आहेत. श्रीदत्तमहाराजांचे निस्सीम भक्त डॉ.दिलीप व डॉ.सौ, सुरेखा देशमुख यांच्या सौजन्याने ती आपल्याला उपलब्ध झालेली आहे. आपला वेगाने पाश्चात्यकरणाकडे धांवणाऱ्या समाजाला आपल्या परंपरांचे भान करून देणारा आणि भारतीय धर्मशास्त्रांच्या मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता प्रतिपादन करणारे पहिले प्रवचन आहे. दुसरे प्रवचन हे श्रीमहाराजांच्या श्रीमद्भागवतनिरूपणाचा अंश आहे.

अवधूतस्वरूपी दत्तात्रेयांनी यदूला आपण आपल्या बुद्धीने केलेल्या गुरूंचे ह्या वर्णनांत साधकोपयोगी तथ्ये आणि मार्गदर्शन आहे.

शेवटचे प्रवचन अनुग्रह हे पुणे येथे झाले आहे. ह्या सर्व प्रवचनांतून पुनःपुन्हा येणारा श्रीदत्तमहाराजाचा वैदिक परंपरेतला बुद्धिवादाचा सिद्धांत विचारणीय आहे. पाश्चात्य बुद्धिवाद मानवी बुद्धीच्या मर्यादांवर अधिष्ठित आहे. ऐंद्रिय संनिकर्ष आणि मर्यादित बुद्धी यांवरच सर्व आधुनिक शास्त्रे प्रतिष्ठित आहेत. भारतीय बुद्धिवाद अधिक आशावादी आहे. माणसाला बुद्धीचे सामर्थ्य वाढवतां येते. बुद्धि हेच ज्ञानाचे प्रमाण होऊं शकते, हा श्रीदत्तमहाराजांचा सिद्धांत आहे. कर्म, भक्ति, ज्ञान, योग ह्या सर्व साधनांचे उद्दिष्ट बुद्धीचे सामर्थ्य वाढवत, वाढवत ते अंतिम सत्याच्या जाणिवेला योग्य करणे हेच आहे. भक्ति, साधना तपश्चर्या ह्या सर्वांचे हेच परम साध्य आहे. ह्या सर्व प्रवचनांतून ह्याच पौर्वात्य बुद्धिवादाच्या विविध अंगांचे प्रतिपादन श्रीदत्तमहाराजांनी आपल्या अनुपम, मर्मग्राही आणि परिणामकारक शैलीने केले आहे.

हा तसा छोटासाच पण मौलिक प्रवचनसंग्रह सुविद्य, श्रद्धावंत आणि विवेकशील साधकांना आणि भक्तांना उद्बोधक आणि प्रेरक ठरावा हीच श्रीसद्गुरुचरणी प्रार्थना आहे.

**वासुदेव व्यंकटेश देशमुख**

२२ फेब्रुवारी, २०११

पुणे



भगवान श्रीदत्तात्रेय



श्री ज्ञानेश्वर महाराज

# श्रीज्ञानदेव आणि दत्तसंप्रदाय

## व्याख्यान पहिले - १६.१२.१९८१

### विशालबुद्धी ज्ञानदेव

श्री ज्ञानदेव आणि दत्तसंप्रदाय या विषयाचा विचार तीन दिवसांपर्यंत करावयाचा आहे. ज्ञानदेवांच्याबद्दल एका विशिष्ट दृष्टीने आजचा विचार होईल तो उपाधिप्रधान दृष्टी ठेवून होणार आहे. नंतरचा विचार पूर्णदृष्टीने करावयाचा आहे. बुद्धितत्त्व-या बुद्धितत्त्वाबद्दल प्राचीन कालामध्येआणि आजच्या कालामध्ये विचार करणारी आणि त्याचे प्राधान्य मानणारी विचारी अशी मंडळी पुष्कळ आहेत.

'नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे...' असे व्यास महर्षींबद्दल गीतेच्या आरंभी वर्णन आहे. ज्ञानदेवांच्या बाबतीतही असेच सांगता येईल. भगवान शंकराचार्य महाराजही तसेच होऊन गेले आणि ज्ञानदेवांचे हे विशालबुद्धिस्वरूप आज मांडावयचे आहे.

ज्ञानेश्वर हे 'भगवान विष्णु, निवृत्ति भगवान हर...,' ही दृष्टी बाजूला ठेवून आज केवळ विशाल बुद्धिरूपाने ज्ञानदेवांच्या विषयी प्रतिपादन करायचे आहे. गीतेमध्ये **'निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामा। द्वंद्वैर्विमुक्ता सुखदु:खसंज्ञैर्गच्छन्ति मूढा: पदमव्ययं तत्।'** असे विशाल बुद्धीचे स्वरूप भगवान सांगत आहेत. दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञाचे वर्णन हे विशाल बुद्धीचे स्वरूपवर्णन आहे.

**'अद्वेष्टा सर्वभूतानाम् मैत्र:करुण एव च'** हे बाराव्या अध्यायात भगवत्भक्ताचे वर्णन आलेले आहे, हेसुद्धा विशालबुद्धीचे स्वरूप आहे. चौदाव्या अध्यायातील गुणातीत वर्णन हेही विशाल बुद्धीचेच रूप आहे.

स्थितप्रज्ञता म्हणजे विशालबुद्धी! बुद्धी ही वस्तुत: स्थिर होऊ शकते किंवा नाही हाही एक प्रश्न आहे. बुद्धितत्त्व आणि अंत:करण-तत्त्व म्हणून शास्त्रकारांनी मानलेले आहे. त्रिगुणात्मक बुद्धितत्त्व-सर्वच विश्व त्रिगुणात्मक असल्यामुळे बुद्धीमध्येही त्रिगुण आहेत. तीमध्ये रजोगुण आहे. रजोगुण असल्यानंतर 'चलं हि गुणवृत्तम्...' या सिद्धांताप्रमाणे सर्वच पदार्थ चर आहेत.

बुद्धितत्त्वही चर असणार. मग ती प्रज्ञा स्थित कशी? हा एक प्रश्न आहे तर सृष्टीच्या आरंभी सांख्यदर्शनाप्रमाणे **'सत्त्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृति:'** असे त्यांनी प्रकृतीचे वर्णन केले आहे. म्हणजे हे तिन्ही गुण सम स्थितीमध्येअसू शकतात, हे त्याच्यावरून स्पष्ट होते. प्रकृतिअवस्था म्हणजे तिन्ही गुणांची सम अवस्था आहे. जर त्याच्यामध्ये रजोगुण अधिक असेल तर प्रकृतिअवस्था मूळ अवस्था असणेच शक्य नाही. मात्र, मूळ अवस्था समस्थिती असू शकते. अशी ही समस्थिती, समता, स्थिरता, ही काही विशिष्ट प्रयत्नांनी आणता येणे शक्य आहे. प्रज्ञेचे स्थैर्य होऊ शकते. या दृष्टीने स्थितप्रज्ञ हेही लक्षण भगवंतांनी सांगितलेले आहे.

'चंचलं ही मन: कृष्ण...' अशी अर्जुनाने शंका घेतली आहे; पण मनाचे चांचल्य दूर करून बुद्धितत्त्वामध्ये स्थिरता आणता येईल असे भगवान स्पष्ट करीत आहेत. ही सगळी विशालबुद्धीची लक्षणे मानायला हरकत नाही.

## विचार निर्णय-पद्धती

ज्ञानदेवांनी **'ॐ नमोजी आद्या वेदप्रतिपाद्या जय जय स्वसंवेद्या आत्मरूपा'** असे आरंभी मंगल केलेले आहे. नमस्कारात्मक मंगल केलेले

आहे. आत्मरूपाला नमस्कार केलेला आहे आणि याच ओवीमध्ये विचाराच्या निर्णयाच्या पद्धतीही त्यांनी सुचविल्या आहेत. विचार प्रमाणपुरस्सर करावयाचा आहे.

**अनुमान किंवा तर्क** हे प्रमाण मानले जाते. अनुमानाने ज्ञान होऊ शकते, करून घेता येते. हे प्रमाण सर्वमान्य आहे. त्यानंतर दुसरे **शब्द प्रमाण,** तिसरे **अनुभवप्रमाण**. बुद्धितत्त्व परिपक्व झाल्यानंतर तेच **बुद्धितत्त्व प्रमाण** होऊ शकते. ज्याला शास्त्रकारांनी **आत्मतुष्टी** म्हटली आहे ही आत्मतुष्टीही प्रमाण मानली गेलेली आहे. अनुभवही प्रमाण मानली गेली आहे. आत्मस्वरूपाबद्दल ज्ञानदेवांनी ही तिन्ही प्रमाणे पहिल्या ओवीतच सूचित केली आहेत.

**आद्या** म्हणून संबोधन आहे, म्हणजे सर्वही कार्याचे कारण आहे, आणि हा कार्यकारण विचार मांडणे म्हणजेच अनुमान प्रमाण मांडणे. कोणत्याही वैद्यक किंवा आयुर्वेद शास्त्रामध्ये कार्यकारण भाव हेच अनुमानाचे निदर्शक ठरलेले असते. अमुक लक्षण असल्यानंतर त्यावरून अमुक रोग झाला आहे असे त्या रोगाचे ज्ञान त्या लक्षणावरून अभ्यासकाला कळू शकते. तर हे पहिले प्रमाण सर्व मान्य असे, त्याच्यामध्ये सुचविले असे म्हणता येईल. दुसरे शब्द प्रमाण (वेदप्रतिपाद्या) अनुमान प्रमाण-हे पूर्ण निर्णय करू शकते असे म्हणता येत नाही. हा सगळा विशालबुद्धीचा विकास आहे, विशालबुद्धीचे स्वरूप आहे. अनुमान प्रमाणही बुद्धीमध्ये पाहिजे. शब्दप्रमाणाचा विचारही बुद्धीनेच करता येतो. अनुभव तर (स्वयंवेद्या) बुद्धितत्त्वच आहे. ही जी तीन प्रमाणे ज्ञानदेवांनी सुचविली आहेत त्या तीनही प्रमाणांमध्ये बुद्धितत्त्व आहे, हे स्पष्ट आहे.

बुद्धितत्त्वानेच सर्वही विचार म्हणून आत्मवस्तूचाही विचार करता येतो. व तो या तीनही पद्धतींनी करता येतो. श्रुती, युक्ती आणि अनुभव ही तीनही प्रमाणे म्हणून ज्ञानदेवांनी सुचविली आहेत. याप्रमाणे आत्मवस्तूची

सिद्धता करता येणे शक्य आहे. बुद्धितत्त्वाचे स्वरूप या तीनही प्रमाणांमध्ये अनुस्यूत आहे. अनुमान किंवा शब्द यांचा विचार करून शेवटी स्वयंसिद्ध असे बुद्धितत्त्व आहे; आत्मतत्त्व स्वसंवेद्य आहे; असे प्रतिपादन आहे. म्हणजे ज्ञानदेवांनी बुद्धितत्त्वाला प्राधान्य दिलेले आहे.

आरंभाला तर्क आणि वेद याच विचारांनी बुद्धीची पूर्णता असू शकते. आरंभाला बुद्धितत्त्व हे उपाधिरूप आहे. उपाधिरूपाच्या पुढे आपल्याला जायचे आहे. आत्मतत्त्व सूक्ष्म आहे. या आत्मतत्त्वापर्यंत जाण्याकरिता प्रत्यक्ष प्रमाणाचाही स्वीकार आवश्यक आहे. कारण अनुमानप्रमाण केवळ बुद्धीने करता येत नाही. त्यातील व्याप्ती सिद्ध करण्याकरिता प्रत्यक्षादी इतर प्रमाणांचा अवलंब करावा लागतो आणि त्या सर्व प्रमाणांनी व्यक्तीचे ज्ञान सिद्ध झाल्यानंतर साध्याची अनुभूती होऊ शकते. हे व्याप्तिज्ञान बरोबर आहे की नाही याबद्दलच पुष्कळ वेळा वाद होऊ शकतो. शब्दांनी होणारे निर्णय समजण्यासाठी वक्त्याचा अभिप्राय, वक्त्याचे तात्पर्य काय आहे हे बरोबर समजले गेले पाहिजे. तात्पर्यज्ञान व्यवस्थित यथार्थ झाले तर शब्दबोध यथार्थ होऊ शकतो. त्याच प्रमाणे व्याप्तिज्ञान अनुमानप्रमाणामध्ये यथार्थ असेल तर त्याच्यापासून होणारी अनुभूती, तो निर्णय यथार्थ होय. ते सर्व यथार्थबुद्धीचे काम आहे. सगळ्याही शास्त्रकारांनी बुद्धितत्त्वाला फार महत्त्व दिलेले आहे.

उपनिषदामध्येसुद्धा **'दृश्यते अग्र्यया बुद्ध्या'** असे प्रतिपादन आहे. ही जी एक सूक्ष्म बुद्धी आहे, त्या बुद्धीला आत्मा दृश्य आहे, हे कळू शकते. म्हणजे त्या ठिकाणी आत्मवस्तूपर्यंत जाणारी बुद्धी आहे हे मान्य केले. जे खरे बुद्धिमान आहेत, ज्यांनी बुद्धितत्त्व पूर्ण विकसित केलेले आहे. ज्यांनी पूर्णता संपादन केलेली आहे - त्यांना कोणताच अविषय नाही. 'न खलु कश्चित् धीमतां अविषयो नाम' असे कवी कुलगुरूंचे म्हणणे आहे. सांख्यदर्शनात बुद्धितत्त्वाचे महत्त्व फार मोठे मानले आहे.

**सर्वम् प्रति उपभोगं पुरुषस्य साधयति बुद्धिः ।**
**सैव च विशिनष्टि पुनः प्रधानपुरुषान्तरं सूक्ष्मम् ।।**

भोग किंवा अपवर्ग हे दोन्ही पदार्थ जगात आहेत. भोग किंवा अपवर्ग याचे वेगवेगळे अधिकारी असतील. पण भोगालासुद्धा बुद्धीची आवश्यकता आहे. 'सर्व उपभोगम् पुरुषस्य बुद्धि साधयती,' बुद्धितत्त्व नसेल तर उपभोग व्यवस्थित होऊ शकत नाही. शरीरमेव आत्मा, हा शरीरात्मवाद घेतला तरीसुद्धा शरीरापलीकडे काही नाही, पाठीमागे नाही पुढे नाही, असे म्हटले तर शरीराचे संरक्षण कसेही येन केन प्रकारेण वाटेल त्या दृष्टीने करायचे ठरवावे लागेल. तरीसुद्धा त्याला 'युक्ताहार विहार...' हाच एक मार्ग आहे. या शरीरात्मवादामध्येही इतर काही अर्थवाद आहेत. शरीराचे संगोपन होणे इष्ट आहे. शरीरच आत्मा आहे असे ज्ञान आवश्यक आहे. त्याकरितासुद्धा बुद्धी विशाल करून तिचे अवलंबन करणे आवश्यक आहे असे भगवंत सांगतात. कोणतीही प्रमाणे मानायची नाहीत. प्रत्यक्षाशिवाय प्रमाण नाही. मग प्रमेय नाहीच नाही. कारण प्रमाण नाही तर प्रमेय नाही. तरीसुद्धा ह्यावेळेला हे सगळे स्वीकारण्यासाठीही बुद्धीची आवश्यकता आहे.

'सर्वम् उपभोगम् बुद्धिः साधयती' हा एक सिद्धांतच आहे. त्याच्याही पलीकडे अपवर्गास बुद्धीची अत्यंत जरुरी आहे. 'प्रधानपुरुषांतरम् सूक्ष्मं' प्रधान व पुरुष यामधील भेद बुद्धीमुळे समजून येतो. पण ती बुद्धी मात्र बनवायची कशी, तयार कशी करायची, तिला पूर्णता कशी आणायची हा एक विचार आहे. त्यालासुद्धा बुद्धीचे साहाय्य घेतले पाहिजे. साधक अवस्थेमध्येसुद्धा बुद्धी पाहिजे आणि साध्य पूर्णत्वाला नेण्यास, कार्य पूर्णत्वाला नेण्यास बुद्धीची तयारी पाहिजे. 'जेवी हिरेनी हिरा चिरीजे, तेवी मनेची मन धरिजे' असे एकनाथ महाराजांनी सांगितले आहे. हेच बुद्धितत्त्व त्याची अपूर्णावस्था जाणून त्याला पूर्णावस्थेस नेण्यासही कारणीभूत आहे. म्हणून 'उद्धरेत् आत्मना आत्मानम्' यामध्ये भगवंतांनी हेच सांगितले आहे.

येथे आत्मा शब्दाचा अर्थ बुद्धी असा आहे.

बुद्धीच आपली बंधू आहे, बुद्धीच आपला शत्रू आहे हेही भगवंत सांगतात. **'जितात्मन: प्रशांतस्य परमात्मा समाहित:'** इथे बुद्धी अनुकूल आहे. **'अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत्...'** अनात्मा जर असेल तर ती बुद्धी त्याला शत्रू आहे. अनात्मा याचा अर्थ आत्मा नाही असे नाही. या ठिकाणी 'न' याचा अर्थ अल्पार्थाने घ्यायला पाहिजे. म्हणजे अल्पआत्मा अल्पबुद्धी जर असेल तर ती शत्रू आहे. विशालबुद्धी झाली तर हाच आत्मा त्याला अनुकूल आहे. तर याप्रमाणे बुद्धितत्त्वाचे स्वरूप सर्व शास्त्रकारांनी, मान्य केले आहे - सर्वांनी बुद्धीचे प्राधान्य मान्य केले आहे. बुद्धीशिवाय भोगही नाही, बुद्धीशिवाय अपवर्गही नाही हेसुद्धा मान्य केलेले आहे.

विशाखादत्ताच्या विख्यात मुद्राराक्षस नाटकामध्ये प्रसंग आणला आहे. अनेकजण चंद्रगुप्ताचा पक्ष सोडून गेले. चाणक्याला ही गोष्ट समजली. भयभीत होऊन अधीरतेने शिष्यमंडळी सांगू लागली. आपल्याकडची बरीच मंडळी शत्रुपक्षाला जाऊन मिळू लागली आहेत. आता आपले व्हायचे कसे? त्यावेळी चाणक्याने उत्तर दिले, **'ये याता किमपि प्रधार्य हृदये पूर्वंगता एव ते'** जे गेलेले आहेत ते पूर्वीच मनामध्येविचार आणून पूर्वीच गेले आहेत. त्यांचा आमचा संबंध नाही. शिल्लक राहिलेले त्यांनासुद्धा जाऊन माझा निरोप सांगा, की त्यांनासुद्धा जायचे असेल तर खुशाल जाण्यास हरकत नाही. आपले व्हायचे कसे, हा बहुसंख्याने होणारा निर्णय नाही. शतसैन्याहून समर्थ अशी माझी बुद्धी मला सोडून गेली नाही म्हणजे पुरे. ह्यात व्यावहारिक दृष्टीने

**एका केवलमेव साधनविधौ सेनाशतेभ्योऽधिका ।**
**नन्दोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तु मा गान्मम ॥**

बुद्धीचे महत्त्व मान्य केले आहे. चाणक्याला बुद्धीचा महिमा माहीत झाला आहे.

## बुद्धीची विशालता

बुद्धी विशाल कशी करायची हाच मोठा प्रश्न आहे. बुद्धीची विशालता म्हणजे पूर्णता. पूर्णतत्त्वाशी त्या बुद्धीचा संबंध आल्यानंतर ती परिपूर्ण होते अल्पात्मा आता संपलेला आहे. विशालआत्मा म्हणजे विशालबुद्धी झालेली आहे. विशालबुद्धी म्हणजे परिपूर्णता. **'बहूनां जन्मनां अन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते। वासुदेवः सर्वमति स महात्मा सुदुर्लभः।'** (भ.गीता ७:१२) भंगवंतांनी त्याला मोठा आत्मा म्हटलेले आहे. हे ज्याला समजले तोच विशालबुद्धी होय. त्या विशाल बुद्धीचा पूर्णतत्त्वाशी संबंध असल्यामुळे ते बुद्धितत्त्व पूर्ण रूपामध्ये आहे हा मुख्य सिद्धांत आहे.

'वेदप्रतिपाद्य आत्मतत्त्व...' ज्ञानदेव सांगत आहेत. आरंभाला अनुमानतत्त्व सुचविलेले आहे. आत्मवस्तूचे अनुमान करायला हरकत नाही असे ते म्हणतात. ज्याला चिकित्सा म्हणतो, चर्चा समजतो, मनन समजतो, हे मनन अनुमानात्मक आहे. एकाने केलेले ते मनन किंवा सुविद्य चर्चा म्हणून सांख्यदर्शनामध्ये सांगितले. प्रेमाने समानशील तत्त्वविद विद्वानाशी केलेले मनन तीही चर्चा. त्यांनी त्याला मनन म्हटलेले आहे. तर हीच चिकित्सा किंवा श्रद्धा. 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' असे भगवान सांगतात. परंतु श्रद्धा बुद्धीचेच एक स्वरूप आहे. चिकित्सा किंवा मनन, तर्क हेही बुद्धीचेच स्वरूप आहे. ही दोनही स्वरूपे एकाच बुद्धितत्त्वाची पूर्णता करून विकास होत जातो. तर ही जी परिपूर्णता आहे, ती बुद्धीची परिपूर्णता ज्ञानदेवांच्या आरंभीच्या ओवीमध्ये दिसून येते. आरंभाचीच ओवी विशाल असून परिपूर्ण अवस्थेपर्यंत गेलेली आहे.

## दोषनिवृत्तीची विचार साधना

परिपूर्ण स्वरूपापर्यंत जाऊ शकणारी बुद्धी हीसुद्धा आपल्याला पूर्ण बनविली पाहिजे. शास्त्रसिद्धांताप्रमाणे वस्तुतः सर्वच पूर्ण आहे. **'पूर्णात् पूर्णमुदच्यते'** हाच सिद्धांत आहे. **'पूर्णमेवावशिष्यते'** म्हणजे आरंभाला

सर्व पूर्णच आहे आणि त्यापासून पूर्णच झालेले आहे. हाही सिद्धांत आहे. म्हणजे उत्क्रांतिवाद उपनिषदामध्ये नाही असे दिसते. पूर्णच आरंभाला पूर्ण आहे. परिपूर्णापासून विश्व झाले आहे. हे आपल्याला कळून येत नाही, कारण बुद्धी पूर्ण झालेली नाही. त्यासाठी विचार करायचा आहे आणि विचाराने बुद्धीचे संशोधन करायचे आहे. बुद्धीमध्येअसणारे दोष ते जाण्याकरिता विचार ही साधना आहे. **'अज्ञान, अश्रद्धा व संशय....'** हे तीन मोठे दोष भगवंतांनी दाखविलेले आहेत. तर हे जे दोष आहेत, ते दोष जाण्याकरिता 'विचार' ही साधना आहे. चिकित्सा, विचार व मनन ही सर्व प्रमुख साधने त्या दोषनिवृत्तीकरिता आहेत.

स्वयं बुद्धितत्त्व प्रमाणभूत आहे. मन हे प्रमाण आहे. दर्शनकारांनी किंवा सांख्यकारांनी मनाला इंद्रियामध्ये घेतलेले आहे. स्वत:चे बुद्धितत्त्व मनरूप, इंद्रियरूप असल्यामुळे त्याच्यापासून ज्ञान होते. **यथार्थ ज्ञानाचे जे साधन, तेच प्रमाण आहे.** प्रमाणाशिवाय ज्ञान होणार नाही. विचार हे ज्ञानाचे साधन होऊ शकत नाही. यथार्थ ज्ञानाचे साधन म्हणून प्रमाण सांगितले आहे. व्यवहारात शास्त्रामध्ये त्या प्रमाणाशिवाय ज्ञान होणार नाही. विचार हे प्रमाण होऊ शकत नाही. निरनिराळे विचार येतात. पूर्वपक्ष आहे. सिद्धांत पक्ष आहे. हे सर्व ऊहापोहात्मक जे विचार आहेत, ते प्रमाणाला उपकारक आहेत. प्रमाणाला उपकारक म्हणजे ज्या बुद्धितत्त्वाच्या योगाने, प्रमाणाने ज्ञान व्हावयाचे त्या ज्ञानाला प्रतिबंध असणारे जे दोष आहेत ते दोष सर्व दुरुस्त करण्याच्या दृष्टीने त्यांचा उपयोग होऊ शकतो. या दृष्टीने विचारशास्त्र हेसुद्धा उपयोगी आहे, असे दर्शनकार म्हणतात. सर्व शास्त्रे विचारशास्त्रेच आहेत. **मीमांसा शब्दाचा अर्थ विचारच आहे.** कर्ममीमांसा असो, ब्रह्ममीमांसा असो, विचारच आहे. विचारांचा उपयोग दोषनिवृत्तीसाठी असतो. निर्दोष चित्तवृत्ती झाली नाही, तोपर्यंत ज्ञान होऊ शकत नाही.

## संशय, संभावना आणि निश्चयात्मक बुद्धी

संशय हा बुद्धीमधील दोष आहे तथापि संशय हा विचाराला प्रवर्तक आहे. संशयाशिवाय विचार होऊ शकत नाही. वस्तू संदिग्ध नसेल, प्रत्यक्ष असेल, तर त्याच्याकरिता विचार करण्याची प्रवृत्ती कशाला होईल? तसेच ब्रह्ममीमांसा शास्त्र कशाला केले असे तुम्ही म्हणाल. ब्रह्म मोठे आहे, आत्मा मोठा आहे. सर्वांना अवगत असलेला आत्मा संदिग्ध नाही तर त्याचा विचार कशास करायचा असे आपणास वाटेल. याचा अर्थ संशय असेल तरच विचाराची प्रवृत्ती होते. संशय हे कारण आहे. मात्र, निरंतर केवळ संशयात्मा असणे उपयोगाचे नाही.

संशयाचा पुढचा निर्णय होण्याआधी चित्ताची जी अवस्था आहे, तिला संभावना म्हणतात. संभावना म्हणजे ईश्वर आहे किंवा नाही, संशय आहे, अशा समस्थितीमध्येअसताना निर्णयाची आशा नाही. ईश्वर असणे शक्य आहे, किंवा नसणे शक्य आहे. **एका पक्षाची जी उत्कटता, तिला, बुद्धीच्या या अवस्थेला, संभावना असे शास्त्रकार म्हणातात.** म्हणजे संशयाच्या पलीकडील अशी वरची भूमिका आहे. निर्णयास महत्त्व आले. हे काही अन्य विचाराने निश्चित झाले तर ईश्वर आहे, नाहीतर ईश्वर नाही; बहुतेक नाही म्हणजे संशयाच्या पलीकडे गेले. बहुतेक नाही हेच सिद्ध झाले तर ईश्वर नाही हा निर्णय होईल. हा निर्णय करणाऱ्यास बुद्धिमान म्हणायला हरकत नाही. तसेच ईश्वर आहे असे निर्णय करणारा हाही बुद्धिमान; म्हणजे **'बुद्धिः स्यात निश्चयात्मिका.'**

संशयाच्या पलीकडे गेलेली विचारांच्या वरची अवस्था ती बुद्धीची अवस्था. त्यालाच बुद्धितत्त्व असे शास्त्रकारांनी मानले आहे. रावण म्हणा किंवा दुर्योधन म्हणा हेसुद्धा बुद्धिमान आहेत असे म्हणायला हरकत नाही. त्यांचा एक निर्णय ठरलेला आहे. एकच सांगणार की युद्ध . पुष्कळ प्रतिपादन केले, धाक दाखविला, भीती दाखविली, सर्व केले. पितामह, प्रपितामह

येऊन गेले पण युद्धाशिवाय आणि एका सुईच्या अग्रावर राहणारी भूमीसुद्धा मिळणार नाही. हा दुर्योधनाचा निर्णय आहे. त्याची निश्चयात्मक बुद्धी आहे. त्यात संशय नाही. विचाराप्रमाणे, निर्णयाप्रमाणे कार्याला सुरुवात केली. ही निश्चयात्मक बुद्धी आहे. रावणाचासुद्धा असाच निश्चय आहे. त्याला विभीषणाने सांगितले की, 'अरे, दुसऱ्याची स्त्री, एका ऋषिकुमाराची स्त्री घेऊन आलास तू. तुला काय म्हणायचे?' तेव्हा त्याने सांगितले की 'आम्ही राक्षस आहोत.' एवढे त्याने मान्य केले खरे, 'आम्हाला परस्त्री कोणतीही नाही. सगळ्या स्त्रिया आमच्याच' असे उत्तर दिले. रावणाची ही निश्चयात्मक बुद्धी - नंतर बिभीषणाने ठरविले की याची संगत सोडावी; इथे राहण्यात काही अर्थ नाही.

निश्चय कोणताही असो. कोणता निश्चय करावयाचा, कोणता नाही, कोणता निश्चय विघातक आहे, कोणता समाजास चांगला आहे, हा विचार बुद्धीने करायचा आहे. त्याचा निर्णय करणारे महाभाग आहेत. त्यांचे कार्य चालू आहे. हे जे निश्चयात्मक बुद्धितत्त्व आहे, हे बुद्धितत्त्व जितके विशाल बनवता येईल तितके बनविले पाहिजे. हे ज्ञानदेवांच्या पहिल्या ओवीतच दिसून येते. तर्काचाही विचार आहे. वेदप्रमाणाचाही विचार आहे आणि पूर्णावस्थेला पोचलेल्या बुद्धीचाही तीमध्येविचार आहे.

## चांगदेव आणि ज्ञानदेव

चांगदेवांची बुद्धी आणि ज्ञानेश्वर महाराजांची बुद्धी - या बुद्धीचा उपाधिप्रधान दृष्टीने विचार उद्‌बोधक ठरेल. चांगदेव मोठे अधिकारी, प्रयोगशास्त्र, योगशास्त्र, मंत्रशास्त्र ही मोठी शास्त्रे. **वेदान्तशास्त्र हेही प्रयोग शास्त्र आहे. परंतु त्याचे प्रयोग कठीण आहेत.** चांगदेवांनी अभ्यास केलेला आणि त्या शास्त्रांमध्येआपल्या बुद्धीचा विकास करून घेतलेला. आता, बुद्धीचा बुद्धितत्त्वाचा विकास झाला हे कसे समजायचे? शास्त्रकारांनी बुद्धी विकसनशील मानली आहे. मानसिक शक्तीचा, बुद्धितत्त्वाचा विकास

म्हणजेच सर्व सिद्धी आहेत. चांगदेवांनी बुद्धिशक्तीचा विकास करून घेतला. तो कितीतरी मोठा आहे. त्यांनी मृत्यूला थांबविले आहे. आयुर्मर्यादा ठरलेली असते असे आपण मानतो. जास्तीतजास्त आयुष्याची मर्यादा ठरलेली आहे. त्यास कोणतेही प्रतिबंधक औषध, उपाय नाही. भौतिकदृष्ट्या आपल्याला ती दिसत नाही त्या आयुष्याची मर्यादा योगशास्त्राच्या प्रयोगाने वाढवून चांगदेवांनी आयुमर्यादा चौदाशे वर्षे केली, असे आपण ऐकतो. १०० वर्षांचे आयुष्य १४ पट वाढविले हा बुद्धीचाच विकास. लोकांमध्येअशा प्रकारची शक्ती कोठे दिसत नाही म्हणून ही त्यांनी काहीतरी लोकोत्तर शक्ती संपादन केली असे मान्य करण्यास हरकत नाही.

'ज्ञानदेवांकडून आपण काहीतरी उपदेश ग्रहण करावा, काही ज्ञान ग्रहण करावे. असे ज्ञान आपल्याला मिळाले पाहिजे. आपल्याजवळ योगसाधना भरपूर आहे.' परंतु अद्यापि ज्ञानाला हे उपयुक्त आहे की नाही या गोंधळात चांगदेव आहेत. ज्ञानेश्वर महाराजांजवळ जाऊन जे त्यांच्याजवळ आहे ते आपण त्यांच्यापासून समजून घेतले पाहिजे म्हणजे आपल्या बुद्धीतील अपूर्णता दूर केली पाहिजे, अशी जाणीव त्यांना झाली आहे.

अद्यापि आपली पूर्ण बुद्धी झालेली नाही हे कळल्यानंतर पत्र लिहायला बसले. पत्र लिहिताना पहिल्या प्रथम बुद्धीमध्ये संशय दोष निर्माण झाला तो मायना काय लिहायचा! त्या ज्ञानदेवांना नमस्कार लिहावा की आशीर्वाद लिहावा, हा एक प्रश्न निर्माण झाला. नमस्कार लिहिला तर काय हरकत आहे? त्यांना ज्ञानी समजून त्यांच्याकडून ज्ञान समजून घ्यायचे आहे. आत्मज्ञान समजून घ्यायचे आहे. त्यांना गरू मानून त्यांच्याकडे जायचे आहे. तर नमस्कार करायला काय हरकत आहे? नमस्कार हा पदार्थच आहे. साष्टांग नमस्कार केला, हात जोडले तरी नमस्कारच मानला जातो. ते बहिरंग आहे. साधना ही ज्ञानाकरिता सांगितली आहे. प्रणिपातसुद्धा एखादे वेळेला आभासात्मक असू शकेल. स्वार्थ बुद्धीने प्रणिपात केला जातो.

शंभर वेळा प्रणिपात केलेला आहे. हात जोडणे, मस्तक टेकणे, हा केवळ नमस्कार पदार्थ नाही. **'मत्तस्त्वं उत्कृष्टः त्वत्त अहं अपकृष्टः'** ही वृत्ती हाच खरा नमस्कार आहे. तो व्यक्त करण्याकरिता ही साधना आहे.

मनामध्ये ज्ञानदेव आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत ही वृत्ती निर्माण झाली तर नमस्कार लिहायला काय हरकत आहे? एक वाक्य लिहायचे. पण नाही. तो एक अभिमान म्हणाख किंवा संशय म्हणा, उत्पन्न झाला. ते माझ्यापेक्षा लहान आहेत. लहानांना नमस्कार कसा लिहायचा? हा एक प्रश्न. मग आशीर्वाद लिहायचा. म्हणजे **बुद्धी निर्णयात्मक झाल्याशिवाय पूर्ण होत नाही**. नमस्कार लिहिणे गैर वाटले तर आशीर्वाद लिहायचा होता. पण आशीर्वाद कसा? त्यांचे ज्ञान आपल्याला मिळवायचे आहे. ते ज्ञानी, श्रेष्ठ म्हणून त्यांच्याकडे जायचे आहे. एकदा असे वाटते, एकदा तसे वाटते. अशा तऱ्हेने शेवटी कोराच कागद पाठवून दिला ! शिष्याने आणून दिला. कोरा कागद निवृत्तीनाथांच्या हातात आला. मुक्ताबाई म्हणाल्या की, 'चौदाशे वर्षे राहून चांगदेव अद्यापि कोराच राहिला !'

ज्ञानदेवांनी उत्तर लिहायला सुरुवात केली. सुरुवात झाली. म्हणजे पूर्ण बुद्धी ज्यांची आहे त्यांच्या मनामध्ये संशय वगैरे प्रतिबंधक दोष बिलकूल नसतात. व्यावहारिक चातुर्य सहज असते. त्यांनी लगेच सुरुवात केली. चांगदेवांना 'स्वस्ति श्रीवटेशु जो लपोनी जगदाभासु....' वटेश्वर चांगदेव हे त्यांचे नाव होते. 'वटेश्वर चांगदेव तुमचे स्वस्ती असो.' लहान समजत असलात तरी लहानांनी मोठ्या माणसाचे कल्याण असो म्हणायला हरकत नाही. जर मोठे समजत असलात तरी मोठ्याने लहानाचे कल्याण चिंतीत राहावे. दोन्हीही चांगलेच आहे. लहान समजा अथवा मोठे समजा, जो शब्दप्रयोग ज्ञानेश्वर महाराजांनी केला आहे, जे चातुर्य ज्ञानदेवांनी व्यक्त केले आहे ते त्यांच्या परिपूर्ण बुद्धीचे द्योतक आहे. त्यांनी आत्मस्वरूपाचे प्रतिपादन केलेले आहे. **'जो लपोनी जगदाभासू...'** वटेश्वर चांगदेव

यांना आत्मरूप मानून ज्ञानदेवांनी लिहायला सुरुवात केली आहे.

व्यवहाराच्या दृष्टीने एक विचार आहे. आत्मदृष्टीने दुसरा विचार आहे. त्यामध्ये चांगदेवांना लगेच उत्तर गेले.चांगदेवांची बुद्धी आणि ज्ञानदेवांची बुद्धी कशी आहे हे येथे स्पष्ट होते. चांगदेवांच्याकडे ज्ञानदेव आत्मरूपाने पाहतात. आद्या शब्दाचे हे स्पष्टीकरण आहे. जगदाभासाला कारण असणारे, जे आच्छादित झाल्यामुळे जगदाभास दिसतो, असे चांगदेव, आत्मस्वरूप आहेत, ही ज्ञानदेवांची बुद्धी. आणि चांगदेव लिहायला बसल्यानंतर ज्ञानेश्वर लहान आहेत, ही चांगदेवांची बुद्धी. न्याय शास्त्रामध्ये परत्वआणि अपरत्वहे गुण मानलेले आहेत. पर म्हणजे ज्येष्ठ आणि अपर म्हणजे कनिष्ठ. ज्या शरीराला कालाचा संबंध अधिक झालेला आहे त्या शरीरास परत्वआहे. ते सापेक्ष आहे. याठिकाणी लक्ष्मणापेक्षा राम पर आहे. रामापेक्षा लक्ष्मण अपर आहे. दशरथापेक्षा राम अपर, कालाचा संबंध कमी. हे परत्व आणि अपरत्व ज्येष्ठ व कनिष्ठ असे आहे. चांगदेवांची बुद्धी शरीरापर्यंतच आहे. असे म्हणायला हरकत नाही. परत्व, अपरत्व त्यांच्या बुद्धीमध्ये उत्पन्न झाले आहे. ज्ञानेश्वर अपर आहेत, कनिष्ठ आहेत.कनिष्ठत्व शरीराचा गुण आहे. मृत्यूलासुद्धा प्रतिबंध करण्याची शक्ती चांगदेवांच्या बुद्धितत्त्वामध्ये उत्पन्न झालेली आहे. परंतु अद्यापि पूर्णता मात्र नाही.

**भाष्यकाराते वाट पुसतु**

ज्ञानेश्वरांची बुद्धी अशी आहे की 'स्वस्ति श्रीवटेशु' वटेश्वर म्हणजे चांगदेव - ज्येष्ठ कनिष्ठ भाव नाही, द्वंद्वातीत अवस्था आहे. **द्वंद्वातीत अवस्था होणे हीच परिपूर्ण विशाल बुद्धी आहे** आणि आचार्यांनीसुद्धा हेच तत्त्वज्ञान मांडले आहे. आत्मा अमूर्त झाला. आच्छादित झाला म्हणून जगदाभास होत आहे. आत्मतत्त्व प्रगट झाले तर जगदाभास नाहीसा होतो. हा आचार्यांचा सिद्धांत श्री ज्ञानेश्वर महाराजांनी या ठिकाणी मांडलेला आहे. भाष्यकारांचे सिद्धांत म्हणजे भाष्यकारांनी नवीन थोडेच मांडले आहेत? जगदाभास हा

शब्द त्यांनी वापरला असला तरी सत्य वा असत्य काही सांगता येत नाही. एवढाच त्याचा अभिप्राय आहे. मिथ्या हा शब्द प्रयोग वेदान्तशास्त्रामध्ये पारिभाषिक शब्द आहे. त्याची परिभाषा समजून घेऊन आक्षेप घेतला पाहिजे. मिथ्या शब्दार्थ म्हणजे जग नाही असे नाही. जग आहे हे सर्वच मान्य करतात, ते सिद्ध कशाला करायचे? जग नाही असा सिद्धांत सिद्ध होईल तर सर्वच जगाच्या विरुद्ध सिद्ध होईल. त्यामुळे तेही कोणाला पटणार नाही. त्यांना सत्य किंवा असत्य निर्णय करता येत नाही असेच ते म्हणतात. मिथ्या शब्दाचा पारिभाषिक अर्थ असा आहे. सत्य किंवा असत्य निर्णय होत नाही एवढाच त्याचा अर्थ आहे. असा जो जगदाभास आहे तो आत्मा अमूर्त झाल्यामुळे जगदाभास दिसतो आहे. ज्ञानेश्वर महाराज सांगतात की भाष्यकारांनी हेच सांगितले आहे. भगवंतांनीसुद्धा गीतेमध्ये हेच सांगितले आहे. 'अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जन्तव:' अज्ञान हा आवरण करणारा पदार्थ आहे.

बुद्धितत्त्वाचे परिपूर्ण स्वरूप कोणते आहे, याचा विचार उद्या करायचा आहे.

*****

# बुद्धितत्त्वाचा विकास

## व्याख्यान दुसरे - १७.१२.८१

प्राचार्य महोदय, आणि विद्याप्रेमी जिज्ञासू श्रोतृवृंद - ज्ञानदेवांची विशाल बुद्धी अथवा परिपूर्ण बुद्धी यासंबंधी थोडासा विचार काल झालेला आहे. आज बुद्धितत्त्वाच्या विकासाचा विचार करावयाचा आहे. असे ज्ञानदेवाचे म्हणणे आहे;

**''म्हणोनि थोरपण पऱ्हांचि सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।**
**जै जगा धाकुटें होईजे । तैं जवळीक माझी ॥''**

बुद्धी विशाल केव्हा होते, कशी विशाल होते, आणि बुद्धीची ही पूर्णता कोणत्या साधनांनी होते हे या ओवीतच दाखविलेले आहे - बद्धितत्त्व पूर्णतत्त्व होऊ शकते हे दर्शनकारांना मान्य आहे. ज्ञानदेवांनी परतत्त्व स्पर्श सांगितला आहे. वाणीसंबंधी विचार करीत असताना वाणीचा परतत्त्व स्पर्श म्हणजे बुद्धीचा परतत्त्व स्पर्श झाल्याशिवाय वाणीचा परतत्त्व स्पर्श शक्यच नाही किंवा ही वाणीसुद्धा त्याच बुद्धितत्त्वाचे एक रूपांतर आहे असे म्हणायला हरकत नाही. तर बुद्धितत्त्वाचा अशा पूर्णतत्त्वाशी संबंध ज्यावेळी होईल त्यावेळेलाच त्याची पूर्णता झाली असे यथार्थत्वाने म्हणता येते. खऱ्या अर्थाने ती विशालबुद्धी झालेली आहे आणि ती पूर्णता होण्याकरिता ही साधने ज्ञानदेवांनी सुचविली आहेत.

**'थोरपण पऱ्हांचि सांडीजे'** म्हणतात. थोरपणा आलेला आहे. मिळालेला आहे. **' सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते'** असे सुभाषित आहे. हे

सुभाषित खरोखर वर्णनात्मक आहे का केवळ अतिशयोक्ती रूप आहे त्याचा विचार करण्याचे कारण नाही. परंतु जे बुद्धितत्त्व आहे त्या बुद्धितत्त्वामुळेच थोरपण प्राप्त होते, बुद्धीचे ते फळ आहे. म्हणून मोठे मोठे बुद्धिसंपन्न असे महात्मे विश्वामध्ये होऊन गेलेले आहेत. त्यांची कीर्ती अद्यापी कितीही काळ गेला तरी कायम आहे. तुकाराममहाराजांचे उदाहरण घेण्यासारखे आहे. केवळ त्यांच्या बुद्धीला परतत्त्व स्पर्श झाला, त्यांनी बुद्धीमध्ये पूर्णता संपादन केली, त्यामुळे त्यांना थोरपणा आला.

व्यावहारिक दृष्टीनेही थोरपणा बुद्धीच्या योगानेच प्राप्त होतो. विशेष अभ्यास करून त्या त्या विषयामध्ये विशेष ज्ञान संपादन करणारी जी बुद्धी आहे त्या बुद्धीमुळे थोरपणा प्राप्त होतो. पण ही पूर्णता नव्हे. थोरपणा निराळा आणि पूर्णता निराळी. योगशास्त्र हे प्रत्यक्ष प्रयोगशास्त्र आहे. त्यामध्ये ज्या चांगदेवांनी आपली बुद्धी परिपूर्ण केली, सर्व सिद्धी मिळविल्या, त्यांना आपली अपूर्णता दूर करण्याकरिता ज्ञानदेवांकडे जावे लागले. तर बुद्धीची पूर्णता हा विषय निराळा आहे. पूर्णत्वाचे गुण निराळे आहेत. थोरपणा जो उत्पन्न झालेला आहे हाही वेगळा आहे. जिज्ञासू मंडळी असतात. भिन्नभिन्न विषयांमध्ये जिज्ञासा असू शकते. ती जिज्ञासा पूर्ण करणारी बुद्धी असू शकते, त्यांचा त्या विषयाचा अभ्यास झालेला आहे, तपश्चर्या झालेली आहे. **अभ्यास म्हणजे तपश्चर्याच आहे**. हा अभ्यास करून त्या विषयाची मर्मग्राहिता त्या बुद्धीमध्ये निर्माण झाली म्हणून यथार्थ मार्गदर्शन करण्याची शक्ती त्या बुद्धीमध्ये आहे. अशी बुद्धी थोर समजली जाते. जिज्ञासूची जिज्ञासा पूर्ण करण्याची शक्ती त्या बुद्धीमध्ये आहे. पूर्णता मिळविण्याकरिता त्या बुद्धीलाही अभ्यास करायला हवा.

## स्वयंपूर्ण ईश्वरतत्त्व

स्वयंपूर्ण अशा प्रकारचे एक ईश्वरतत्त्व दर्शनकारांनी मानले आहे. ते सिद्ध आहे. सिद्ध होत आहे, प्रमाणांनी सिद्ध होणार आहे. दर्शनकारांनी

त्यांच्या कल्पनेने सांगितले आहे असे नाही. स्वयंपरिपूर्ण अशा प्रकारचे असणारे एक ईश्वरतत्त्व आणि त्या ईश्वरतत्त्वाबद्दल आस्तिक्य बुद्धी हा भारताचा स्थायीभाव आहे. **'ओम् नमोजी आद्या'** ज्ञानदेव म्हणत आहेत. **'नमो आदिरूपा ओंकार स्वरूपा विश्वाचिया रूपा पांडुरंगा'** तुकाराम महाराज आदिरूपा म्हणून सांगतात. ते जे परिपूर्ण तत्त्व आहे ते सर्वाद्य आहे, सर्वही शक्ती त्याच्यामध्येआहे. पूर्णता आहे. तेच विश्वरूप झालेले आहे. असे तुकाराममहाराज सांगतात. 'पूर्णात् पूर्णमुदच्यते' हे जे काही उपनिषदामध्ये प्रतिपादन केले आहे त्याचे स्पष्टीकरण ज्ञानदेव, तुकाराममहाराज वगैरे आपल्या वाङ्‌मयातून करतात. ते जे पूर्णतत्त्व आहे त्या तत्त्वाशी आपल्या बुद्धीचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केल्यानंतर बुद्धीमध्ये पूर्णता उत्पन्न होते. जी स्थितप्रज्ञावस्था, भगवान सांगत आहेत, ती अवस्था परिपूर्ण बुद्धीची आहे. पूर्णात स्थैर्य निर्माण झाले. मनामधील चांचल्य दूर करून अस्थिरबुद्धी स्थिर करता येते. बुद्धीमधील स्थिरता परिपूर्ण तत्त्वाच्या चिंतनाने किंवा त्याच्या स्पर्शाने, संबधाने उत्पन्न होते.

ईश्वरतत्त्व स्वयंपूर्ण अशा प्रकारचे आहे. ईश्वरतत्त्वाबद्दल वाद कोठेही नाही. सर्वही वादी ईश्वर मानणारे आहेत. उदयनाचार्यांचा कुसुमांजली नावाचा ग्रंथ ईश्वरसिद्धीकरिता त्यांनी केलेला आहे. केवळ अनुमान प्रधान सगळे युक्तिवाद त्यामध्ये मांडलेले आहेत. ईश्वर सर्वच मानणारे आहेत ही आश्चर्याची गोष्ट आहे. उदयानाचार्यांचे प्रतिपादन असे आहे. ईश्वर स्वरूप प्रत्येकाचे वेगवेगळे आहे. ईश्वर कोणी नाही असे म्हणत नाही. प्रत्येक दर्शनकारांचे ईश्वर त्यांनी सांगितले आहेत. चार्वाक हे दर्शनकार, राजा म्हणा, पंतप्रधान म्हणा, राष्ट्रपती म्हणा तो त्यांचा ईश्वर आहे. **ईश्वर नाही असे कोणीही म्हणत नाहीत**. ईश्वराचे अस्तित्व कोणालाही अमान्य नाही. कोणत्याही बुद्धीने ईश्वर अमान्य केलेला नाही. ईश्वरस्वरूप मात्र भिन्न भिन्न आहे. आता त्या ईश्वराचे दर्शन शक्य करणारी पूर्ण शक्ती भिन्न

असू शकते काय? हा मोठा विचारणीय प्रश्न आहे.

ईश्वर किंवा पूर्ण शक्ती जी आहे ती म्हणजे चार्वाकांचे राष्ट्रपती अनेक असणे चांगले आहे काय? एकाने आज एक वटहुकूम काढला, उद्या दुसऱ्याने काढला म्हणजे सगळा गोंधळ होऊन जाणार, सर्वोच्च शक्ती जी आहे ती पूर्ण शक्ती प्राय: एकच मानावी लागते. बाकीच्या सगळ्या शक्ती ज्या अपूर्ण आहेत त्या सगळ्या शक्ती म्हणजे बुद्धिशक्तीच मानल्या गेलेल्या आहेत. विविध बुद्धिशक्ती आहेत. त्या त्या बुद्धिशक्तीमध्ये आणखी अपूर्णता आहे. परंतु परिपूर्ण असणारी ईश्वरशक्ती ही एकच आहे. प्रत्यक्ष दर्शनकारांचे जे ईश्वररूप आहे ते भिन्न भिन्न आहे किंवा आपल्या प्राचीन ऋषींनी किंवा दर्शनशास्त्रांनी, उपासनाशास्त्रांनीसुद्धा ईश्वराची स्वरूपे अनेक मानलेली आहेत. **'यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धया चिंतुमिच्छति'** असे ईश्वराच्या **उपासनामार्गामध्ये पूर्ण स्वातंत्र्य** दिलेले आहे.

ज्याच्या त्याच्या इच्छेवर उपासना अवलंबून आहे. उपासनाशास्त्रांमध्ये काही विशेष प्रतिबंध नाही. तसेच कर्मयोगामध्येही, ज्ञानयोगामध्येही नियम आहेत. आरंभाला ज्ञान होईपर्यंत तरी नियमाने राहावे लागते. ज्ञानोत्तर त्याला नियमाची अपेक्षा नाही. तो नियमातीत झालेला आहे. त्यांच्या नियमाचे, नियम उल्लंघनाचे विचार आपल्याला प्रस्तुत नाहीत. उपासनाशास्त्रामध्ये उपासकाच्या बुद्धीला भगवंतांनी स्वातंत्र्य दिलेले दिसत आहे. कोणतेही स्वरूप घ्यायला हरकत नाही. आकार कोणताही घ्या, निराकार घ्या, सगुण घ्या, निर्गुण घ्या, कोणत्याही स्वरूपाची उपासना उपासक करू शकतो. हे आता उपासकाचे इच्छेवर ईश्वररूप उपास्यरूप,भगवंताच्या सांगण्याप्रमाणे, जरी ठरविले तरी प्रत्येकाची बुद्धी वेगवेगळी आहे. अपूर्णता भिन्नतेचे लक्षण आहे. **पूर्णतेमध्ये भिन्नता नाही.** पूर्ण शक्ती एकच मानली पाहिजे. आणि ती तशी असते. नाहीतर अगदी अव्यवस्था होईल. तर पूर्णशक्तीमध्ये भिन्नता नाही. अपूर्णता ज्या ठिकाणी

आहे तेथे मात्र भिन्नता आहे. अशा अपूर्णशक्तीच्या आधीन जर उपास्य स्वरूप मानायचे झाले तर ते मानायला हरकत नाही असे भगवान म्हणतात. तर उपास्यरूप अशा ईश्वराची स्वरूपे अनेक होणारी आहेत. मात्र, **ही अनेक स्वरूपे पूर्ण अशा ईश्वराची आहेत.**

ईश्वर शक्ती पूर्ण आहे; स्वयंपूर्ण आहे. आणि हे स्वयंपूर्ण ईश्वर स्वरूप आहे. ते ईश्वराचे अस्तित्व ज्ञानदेवांनी आरंभालाच सांगितले आहे. अनुमान प्रमाण आहे. वेदप्रमाण आहे. शिवाय बुद्धी पूर्ण झाल्यानंतर बुद्धी हेही स्वतंत्र प्रमाण आहे. **स्वसंवेद्य** असे **आत्मतत्त्व** ह्याच्याकरिता वेद किंवा अनुमानाची अपेक्षा नाही. श्रवण किंवा मनन ह्या ज्या दोन विचार भूमिका आहेत. या विचार भूमिकेपर्यंत प्रमाणांचे साहाय्य लागते. श्रवणाने आणि मननाने विचार परिपूर्ण होऊन, निर्णय झाल्यावर त्या भूमिकेमध्ये आपले चित्त प्रविष्ट झाले म्हणजे त्यामधील विचार संपलेला आहे; निर्णय होऊन गेलेला आहे. परंतु अद्यापि त्याचे ज्ञान नाही, साक्षात्कार नाही. संदेह वगैरे बुद्धीमध्ये असलेले दोष दूर झालेले आहेत. अश्रद्धा दूर झालेली आहे. अज्ञान पुष्कळ दूर झालेले आहे. पण अशा स्थितीमध्ये त्या तत्त्वाचा केवळ परोक्ष निर्णय झालेला आहे, पण परोक्ष निर्णयसुद्धा आपल्या उपयोगी आहेत.

परोक्ष ज्ञान विशिष्ट कार्याला उपयोगी पडत असते. आत्म वस्तूचा व्यवहारात साक्षातकार असो वा नसो, **'नैनं छिदन्ति-शस्त्राणि नैनं दहति पावक:'** गीतेतील हे आत्मस्वरूपाबद्दलचे वर्णन म्हणत म्हणत अनेक क्रांतिकारी लोक आनंदाने फासावर चढले. भगवद्गीतेमध्येआत्मस्वरूप हे अविनाशी असे सांगितले आहे. हे क्रांतिकारकांचे परोक्ष ज्ञान. त्यांना प्रत्यक्ष आत्मज्ञान झालेले आहे काय? पण परोक्ष ज्ञान तेव्हा इतके दृढ झालेले होते त्यामुळे त्यांना फासावर चढताना थोडाही क्लेश झालेला नाही अशी काही उदाहरणे आपण ऐकतो. ते परोक्ष ज्ञान करून देणारेसुद्धा बुद्धिमान होत.

अनेक बुद्धी अपूर्ण बुद्धी आहेत. परिपूर्ण बुद्धीही जगामध्ये आहे.

जे संत महात्मे आहेत, त्यांची बुद्धी परिपूर्ण आहे. ती बुद्धी मात्र एकरूप आहे. पण त्यांनी वेगवेगळा उपदेश केलेला आहे, हा एक प्रश्न उपस्थित झाला आहे. आणि मोठमोठे ऋषी म्हणजे ज्ञानी महात्मे यांना आपल्या बुद्धीचा उपयोग असा का करावा? चार्वाकदर्शन हे बृहस्पतींनी सांगितले असे म्हणतात. देवगुरू बृहस्पतींनी ज्या चार्वाक दर्शनाचा पुरस्कार केला त्यास लोकायत म्हणून नाव पडलेले आहे. लोकांमध्ये त्याचा प्रसार झालेला आहे. तरी या दर्शनाचा पुरस्कार बृहस्पती देवगुरूंनी करावा म्हणजे काय? बुद्ध हा एक अवतार मानलेला आहे.

दशावतारापैकी ईश्वराचा अवतार आहे आणि बुद्धाने सर्वच एकंदर कर्मकांड, वेदभाग अप्रमाण मानले आहे. प्रामाण्यावर त्यांनी आघात केलेला आहे. हे कसे काय? हा एक प्रश्न उपस्थित आहे.

अनेक बुद्धी म्हणजे जग आहे. सर्वांची बुद्धी सम नाही. कारण त्यामधील अपूर्णता. ही अपूर्णता दूर करून त्या बुद्धीमध्ये साम्य निर्माण करायचे, पूर्णता निर्माण करायची आहे. हे कार्य करण्याकरिता भिन्न भिन्न उपाय करावे लागतात. धर्माचा उपदेश करणारे श्रीकृष्ण धर्माकरिता अवतार घेऊन आले. धर्माचा पुरस्कार केला. आणखी अर्जुनालासुद्धा कर्मयोग त्याचा धर्म आहे, असे स्पष्ट सांगून, समजावून देऊन बुद्धीतील त्याचे अज्ञान दूर केले, त्याला कर्तव्य कर्माला प्रवृत्त केले. इतका धर्माचा पुरस्कार करणारे श्रीकृष्ण कर्णाबरोबर युद्ध करण्याच्या वेळेला मात्र ते अर्जुनाला सांगत आहेत की त्याला आताच्या आता ठार मारा. हातात शस्त्र नाही, पृथ्वीमध्ये त्याच्या रथाचे चाक गेलेले आहे, ते तो काढायला लागलेला आहे. तो थांब म्हणत आहे. धर्माचा विचार इथे करायचा नाही. धर्माबद्दल विचार करणारी जी श्रीकृष्णांची बुद्धी आहे त्या बुद्धीने अशा प्रकारचा निर्णय घेतला.

द्रोणाचार्य रागावलेले आहेत. दुर्योधन बोलल्यामुळे अतिशय राग आलेला आहे. पांडवांचा विनाश होण्याची वेळ आली आहे. द्रोणाचार्यांनी

युद्ध बंद केले नाही तर पांडव वाचणार नाहीत अशी परिस्थिती आहे. अशा वेळेला कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे भीमाने कौरवांच्या सैन्यातला अश्वत्थामा नावाचा हत्ती मारलेला आहे आणि अश्वत्थामा मेला म्हणून वार्ता पसरविली आहे, तिकडे द्रोणाचार्यांच्या कानांवर ही बातमी गेली. त्यांचा एकुलता एक मुलगा गेला. त्यांना हे खरे वाटेना. पण त्यांचा विश्वास धर्मराजांवर. धर्मराजांची भेट घ्यायची म्हणाले. धर्मराजाने जर सांगितले की, 'अश्वत्थामा मेला', तर मी शस्त्रसंन्यास करीन. म्हणजे पांडव वाचणार. धर्मराजाला श्रीकृष्णाने विचारले. 'काय सांगणार?' 'जे खरे आहे ते सांगणार, अश्वत्थामा नावाचा हत्ती मारला गेला' हे धर्मराजाचे उत्तर. भगवान् म्हणाले, ''मग इथे युद्ध कशाला करायला आलास तू ? अपूर्ण बुद्धीचे जोपर्यंत व्यवहार चाललेले आहेत, तोपर्यंत अर्थशास्त्र निराळे, धर्मशास्त्र निराळे. '**अर्थशास्त्राद्धि बलवद् धर्मशास्त्र मिति स्थिति**' सगळे उच्च नीच भाव, प्रबल, दुर्बल भाव सगळे अपूर्ण बुद्धीला आवश्यक आहेत. तर त्याला भगवानांनी सांगितले की तू पूर्ण सत्य पालन करू शकतोस काय? सत्याचे पालन करावयाचे होते तर बारा वर्षांचा वनवास संपवून आलास कशाला परत? तेथेच राहिला असतास तर काय हरकत होती? म्हणजे तुला राज्य पाहिजे आहे. प्रतिस्पर्धी कसे आहेत, त्यांची बुद्धी कशी आहे. त्यादृष्टीने त्या बुद्धीने तुला उत्तर दिले पाहिजे आणि इतकी सत्यनिष्ठता तुझ्या बुद्धीमध्ये नाही.''

''कोणत्याही काळामध्ये, कोणत्याही देशामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये सत्य सोडायचे नाही. तो सत्याचा चांगला आग्रह आहे. निःसंशय योग्य आग्रह आहे परंतु तो तुला करता येणार नाही. योगशास्त्रकारांनी ह्या बुद्धीची एकंदर परिस्थिती पाहून अल्पव्रत आणि महाव्रत असे व्रताचे दोन भाग केले आहेत. अहिंसा सत्य वगैरे व्रते आहेत. ही महान व्रते आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये, कोणत्याही कालामध्ये, कोणत्याही देशामध्ये मी सत्यच बोलणार हे महाव्रत आहे. पण हे व्रत तुला पाळता येणार नाही.''

अशी क्षमता नाही म्हणून त्यांना अल्पव्रतेही सांगितली आहेत. 'निदान मंदिरामध्ये गेल्यानंतर तरी मी खोटे बोलणार नाही. हरकत नाही.' सुरुवात होऊ दे. वाणीला हे व्रत पाळण्याकरिता त्या वाणीमध्ये, बुद्धीमध्ये तितकी क्षमता पूर्ण नसल्यामुळे ती क्षमता येण्याकरिता म्हणून अल्पव्रतच योग्य असे सांगितले आहे. अल्पव्रताच्या अभ्यासाने हळूहळू क्षमता वाढते. हा उपदेश त्यांना करावा लागतो. म्हणजे शास्त्रदृष्टीने तत्त्वदृष्टीने, ते चूक आहे. पण ह्या वेळेला हा व्यवहार केवळ बौद्धिक व्यवहार आहे.

सत्य आणि अनृत हे संबंध मिसळून व्यवहार चाललेला आहे. व्यवहारामध्ये केवळ सत्य नाही आहे. **केवळ सत्याकडे ज्या बुद्धीला जायचे आहे त्या बुद्धीला प्रदीर्घ प्रयत्न हवेत.** इतके प्रयत्न करून ती बुद्धी खरी सत्यनिष्ठ बनते. ते सत्य असे आहे की त्यांच्या वाणीमधून जे निघेल ते सत्यच होते. त्यांच्या बुद्धीमध्ये जे आलेले आहे. ते सत्यच असते. असत्य येणेच शक्य नाही. इतकी बुद्धीची क्षमता, सामर्थ्य त्यांचे वाढलेले आहे. तर अशी परिपूर्ण ईश्वरशक्ती आहे त्या ईश्वरशक्ती असलेल्या बुद्धीने जर हा उपदेश केला तर, जो व्यवहार चालू आहे त्या व्यवहारामध्ये सत्य आणि अनृत दोन्हींचे मिश्रण आहे हे विचार करणारांना समजून येते. आता सत्य किती आणि अनृत किती हे पाहिले पाहिजे.

व्यवहारात सत्य आणि अनृत या दोन्हींचे मिश्रण आहे. अशा व्यवहारात आसुरी प्रकृती प्रबळ झाली तर सगळ्या विश्वावरच आपत्ती येईल. या आपत्तीचे निवारण व्हावे त्याकरिता संमोहनाचे बुद्धावताराचे प्रयोजन व्यास महर्षींनी दाखविले आहे. दैत्यांची असुरी प्रकृती. त्या आसुरी प्रकृतीमध्ये सगळी शक्ती केंद्रित झाली तर दैवी प्रकृतीस कोठेच वाव राहणार नाही. धैर्यालाही काही मर्यादा आहे. प्रल्हादाचे धैर्य हे लोकोत्तर धैर्य आहे. त्याला परिपूर्ण शक्तीचा आश्रय होता. त्यामुळे प्रत्यक्ष पिता जरी प्राणावर उठला आहे तरीसुद्धा त्याची बुद्धी आणि धैर्य संपन्न राहिलेले आहे. ईश्वरतत्त्वाशी

बुद्धीचा जो संबंध जोडलेला आहे तो स्वत: त्याने जोडला, असे तो म्हणत नाही. ईश्वराचे इच्छेने हे झालेले आहे, असेच तो म्हणतो. प्रत्यक्ष पिता प्राणावर उठला असताना कोणत्या मुलाचे धैर्य असे अविचल राहाणे शक्य आहे? पण असे लोकोत्तर धैर्यसंपन्न महात्मे थोडे असतात. तेव्हा जास्तीत जास्त दैवी प्रकृतीचे अनुकरण करणारी जी बुद्धी आहे त्या बुद्धीला आधार मिळाला पाहिजे. जर सर्वत्र आसुरी प्रकृती निर्माण झाली आणि तिने पुन्हा वेदप्रामाण्याचा आश्रय करून अधिक बलशाली होण्याचा प्रयत्न केला तर सर्वही विश्वाची घडी विस्कटून जाईल. ते टाळण्यासाठी त्यांना या मार्गापासून बाजूला करणे आवश्यक आहे. हेच बुद्धांनी केले. असुरांच्या बुद्धीमध्ये मोह निर्माण झाला, की हे सगळे अप्रमाण आहे.

या अर्थवादाचा पुरस्कार जो चार्वाकदर्शनकारांनी केला तो ह्याकरिता केला. आमच्या रोजच्या पूजेच्या, संकल्पाच्या वेळेला आम्हाला स्मरण व्हायला हवे. 'बौद्धावतारे' असा रोज उल्लेख आहे. रोज स्मरण आहे. पूजन नाही. पूजनीय म्हणून बुद्धाचा स्वीकार प्राचीन शास्त्रकारांनी केला नाही. स्मरण आहे. आदरणीय आहे. आदर आहे. तथापि पूजा नाही.

याप्रमाणे जी अपूर्ण बुद्धीची एकंदर व्यवस्था लावायची आहे आणि ही व्यवस्था लावण्याचे काम पूर्ण शक्तीच करू शकते. ही पूर्णशक्ती ईश्वरशक्ती आहे, त्या ईश्वरशक्तीकडून हे काम अहर्निश चालू आहे. त्या ईश्वरबुद्धीमध्ये असलेले जे संस्कार आहेत, त्याला अनुसरून सृष्टी निर्माण झाली. ईश्वरतत्त्व पूर्णतत्त्व आहे पण त्यालासुद्धा काल, कर्म, हेही साहाय्याला आहेत, असे शास्त्रकारांनी सांगितले आहे. शक्ती ही सत्त्व, रज, तम अशी त्रिगुणात्मक आहे. हे तीन पदार्थ मानलेले आहेत. घडलेली कर्मे आहेत. प्रलय झालेला आहे. नवी सृष्टी करायची आहे. तथापि प्रलयच होत नाहीत असे सांगणारेही दर्शनकार आहेत. आहे हे असेच कायम आहे. पुष्कळ दर्शनकारांच्या तर्काने सृष्टिप्रलयाची सिद्धी होऊ शकते. आणि प्रलयानंतर

पुन्हा नवीन सृष्टी करायची तर ही सृष्टी कशी झाली, त्याला मूळतत्त्व कोणते आहे याची व्यवस्था लावावयची! असे प्रश्न आहेत.

## कालतत्त्व

पूर्ण असे एक ईश्वरतत्त्व आहे. काल नावाचे आणखी एक तत्त्व सांगितले आहे. कालाचे स्वरूप वेगवेगळ्या दर्शनकारांनी वेगवेगळे मांडलेले आहे. काळाचे लक्षण बनविताना न्यायशास्त्रकारांनी अतीतादि शब्द व्यवहार हेच कालाचे लक्षण म्हणून दिलेले आहे. वर्तमानकाळ, भूतकाळ, भविष्यकाळ हा जो शब्दव्यवहार चालू आहे, हा शब्दव्यवहार हाच कालतत्त्वाचा रक्षणकर्ता आहे. त्याला कारण होणारा असा पदार्थ म्हणजे काल आहे. एवढेच त्याचे लक्षण बनविले आहे. आणखी काही काही लक्षणे आहेत. परत्व-अपरत्वाला कारण काल आहे. हा ज्येष्ठ वा कनिष्ठ कशावरून ठरविणार तुम्ही ? ज्याला जास्त काळाचा संपर्क आहे. चार पावसाळे तुझ्यापेक्षा जास्त गेलेले आहेत. ह्याचा अर्थ काय? तर ह्या शरीराशी कालतत्त्वाचा संबंध अधिक झालेला आहे. ते पर म्हणजे ज्येष्ठ शरीर आहे. ज्या शरीराला कालाचा संबंध कमी झालेला आहे तो अपर, हा कनिष्ठ. सापेक्ष विचार आहे. आपण काल (१६.१२.८२) परअपराचा संबंध पाहिला. तर हे परत्व-अपरत्व, ज्येष्ठत्व-कनिष्ठत्व हे कालामुळे निर्माण झालेले आहे. त्यावरून कालतत्त्वाची सिद्धी त्यांनी केली. कालतत्त्व आपल्याला दिसू शकत नाही. काळाचे विवेचन करीत असताना सर्व क्रियेला काल असे त्यांनी म्हटलेले आहे. सेकंद काटा फिरतो आहे. त्या काट्याचे कार्य झाल्यानंतर त्याला काल असे नाव दिलेले आहे. त्या क्रियेला सेकंद असे नाव आहे. त्यानंतर मिनिट काटा आहे. तासाचा काटा आहे. त्यांच्या त्यांच्या क्रिया आहेत. ह्या क्रियेलाच शास्त्रकारांनी कालामध्ये घेतलेले आहे. म्हणजे एक तास, एक दिवस, एक मास हा काल आहे. या सर्व सूर्यादिकांच्या क्रिया, त्या त्या कार्यालाच कालरूपत्त्व देऊन व्यवहारामध्ये त्याचा उल्लेख केला जातो. तर हे कालतत्त्व,

हे कालरूप परमेश्वराचेच आहे. कालाच्या योगाने सृष्टी रचना झाली. प्रत्येकामध्ये काल वेगवेगळा येत आहे. सत्त्वगुणाच्या उत्कर्षाचा काल आहे. रजोगुणाच्या उत्कर्षाचा काल आहे. तमोगुणाच्या उत्कर्षाचा काल आहे. असे हे कालतत्त्व.

भारतीय युद्धाच्या आरंभी मोठा प्रसंग निर्माण झाला होता. अर्जुनासारखा मोठा योद्धा आहे. परंतु त्यानेही 'न योत्स्ये' असे हातपाय गाळले आहेत. आता अर्जुन युद्ध करू शकत नाही. पांडवा त्याच्याशिवाय दुसरा कोणी नाही. पांडव जरी बारा वर्षे (जवळजवळ तेरा) जागेवर नव्हते तरीही सात अक्षौहिणी सैन्य जमा झाले होते. दुर्योधनाच्या ताब्यामध्ये तेरा वर्षे सगळी राजसत्ता आहे. अकरा अक्षौहिणी सैन्य आहे त्याचप्रमाणे सबंध खजिना आहे. निरंकुश सत्ता असल्यामुळे अगदी पहिल्या दिवसापासून युद्धाची तयारी केलेली आहे. सगळे सैन्य जवळ आहे. पांडव तेरा वर्षांनंतर आले. त्यांना सत्य पाळायचे होते. धर्मराजाने बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास कबूल केला आहे. भीमाला व द्रौपदीला फार वाईट वाटायचे. धर्मराजाला सगळे वारंवार बोलायचे. पण त्याने सांगितले की, 'मी काही धर्माचे आचरण ऐहिक फलाकरिता करीत नाही. त्याला सर्वजण म्हणायचे की', तुमच्या धर्माचा काय उपयोग झाला? अशा तऱ्हेचे प्रश्न सर्व काळात उपस्थित होतात. धर्माचे आचरण करून मनुष्याला काहीही फळ मिळत नाही. अधर्माने वागण्याने उन्नती झालेली दिसते. आजही आम्हाला हाच प्रश्न जाणवतो. त्या वेळेलासुद्धा द्रौपदीने हाच प्रश्न वारंवार धर्मराजाला केलेला आहे. 'काय तुमच्या धर्माचा उपयोग झाला?' मोठा राजसूय यज्ञ केला आणि शेवटी असा वनवास पदरात पडला ! हेच का राजसूय यज्ञाचे फळ आहे ? 'सर्व यज्ञांमध्ये श्रेष्ठ राजसूय यज्ञ आणि तो करून तुम्हाला बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास.' कौरवांनी अज्ञातवासाची अट इतकी भयंकर घातली होती की त्या एक वर्षांमध्ये पांडव जर प्रगट झाले

अगर त्यांना कौरवांनी शोधून काढले तर पुन्हा बारा वर्षे वनवास, म्हणजे जन्मभर पांडवांची वनवासातच राहण्याची व्यवस्था दुर्योधनादी बुद्धिवाद्यांनी करून ठेवली होती.

## असंमोहा बुद्धी

बुद्धीचा विनियोग कसा केला जाईल सांगता येत नाही. पांडवांकडेही बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या परिपूर्ण शक्तीचे साहाय्य आहे. लोकमहेश्वर म्हणून ईश्वराचे स्वरूप सांगितले आहे. धर्मानुसार जीवन करणारी ही एक ईश्वरशक्ती आहे. ईश्वराचे हे स्वरूप कसे आहे हे भगवंतांनी गीतेच्या दहाव्या अध्यायामध्ये सुस्पष्ट सांगितले आहे. 'बुद्धिर्ज्ञानमसंमोह:' बुद्धी असंमोहा म्हणून सांगितले आहे. तो बुद्धीचा गुण आहे. कोणतेही प्राप्तकर्तव्य करण्याच्या वेळेला, परिस्थिती कशीही असली तरी ती बुद्धी विकाररहित राहून शांतपणाने विचार करू शकते. निर्णय घेऊ शकते, आणि कार्यकारी ठरते. धर्मराजाचे वनामध्ये असतानाचे उदाहरण आहे. धर्मराजाला तहान लागली. भीमसेन पाणी शोधण्याकरिता गेला. मोठा तलाव दिसला. त्यालाही तहान लागली होतीच. पाणी प्यायला जाणार तोच समोर एक मोठा धिप्पाड पुरुष उभा आहे. त्या यक्षपुरुषाने सांगितले, ''भीमा, हा माझा तलाव आहे. माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि नंतर पाणी पी.'' तेव्हा भीम काही विचाराच्या अवस्थेत नव्हता. तो म्हणाला, 'पाण्यावर काय सत्ता असते काय? पाणी सर्वांचे आहे.' आणि पाणी प्यायला आणि गतप्राण झाला. नंतर येणाऱ्या अर्जुन, नकुल, सहदेव यांचीही सर्वांची अवस्था तशीच झाली आहे. नंतर धर्मराज आलेले आहेत. धर्मराजाने सर्व पाहिले. आपले चारही बंधू गतप्राण झालेले आहेत. यक्षाने सांगितले, ''धर्मराजा, तुझ्या बंधूंची अवस्था काय झाली आहे हे तुझ्या दृष्टीसमोर आहे. तेव्हा माझ्या प्रश्नांची उत्तरे दिल्याशिवाय तुला पाणी पिता येणार नाही. पाणी प्यायलास तर अशी अवस्था होईल.'' धर्मराज म्हणाले, ''बरे आहे, देतो प्रश्नांची उत्तरे.'' यक्ष प्रश्न विचारतो

आहे आणि धर्मराजाने उत्तरे द्यायची आहेत. ही नुसती कल्पना करण्यासारखी गोष्ट आहे. चार प्रिय बंधू, पुढचे आपले भावी आधारस्तंभ, भीमार्जुनासारखे बंधू सगळे गेलेले आहेत. पुढची आशा संपली आहे. बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास भोगून पुढे जायचे आहे. आपल्याला राज्य करायचे आहे. आता काही आशा उरलेली नाही. अशी निराशामय परिस्थिती उत्पन्न झाली असतानासुद्धा धर्माची बुद्धी अविचल आहे. यक्षाने जे काही प्रश्न विचारलेले आहेत त्या प्रश्नांची मोठी समर्पक उत्तरे धर्मराजाने दिलेली आहेत. ही जी बुद्धीची पूर्णता जवळ जवळ संपादन करीत आणली आहे. त्यामुळे बुद्धीमध्ये मोह उत्पन्नच होत नाही ! प्रतापगडावरून खाली अफजलखानाला भेटायला जायचे आहे. काय अवस्था होईल याचा काही नेम नाही. तरी राजेसाहेबांनी सांगितले आहे की, 'आलो तर, आहेच. नाही जर आलो तर हा मुलगा आहे. तो राज्य करील.' असे सगळे व्यवस्थितपणे सांगून जणू काही प्रवासाला निघालेले आहेत.

हा जो असंमोह आहे, हा बुद्धीचा फार मोठा गुण आहे. व्यवहारामध्येअशा दैवी गुणांची अपेक्षा आहे. पारमार्थिक दृष्टीने आपले जीवन व्यवस्थितपणे चालावे, आपली बुद्धी ईश्वरतत्त्वपूर्णत्वापर्यंत जावी असे वाटत असेल तर त्याकरिता असंमोहाची आवश्यकता आहे. याप्रमाणे आपले बुद्धितत्त्व निर्मोह ठेवणे, याकरिता धर्मराजाचे प्रयत्न चालू आहेत. व्यवहारी दृष्टीने धर्मराजा स्पष्ट बोलला नाही. त्यामुळे सगळे विचित्र झाले. धर्मराजाला बुद्धी नव्हती असे आपण सगळे वाचतो व त्याबद्दलचे आपले मत प्रदर्शित करतो. परंतु त्याची बुद्धी स्थिर होती. यक्ष प्रसन्न झालेला आहे. आता दुसरी परीक्षा, यक्षाने सांगितले की, 'तू माझ्या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेस व मी प्रसन्न झालो आहे, तरी या तुझ्या चार बंधूंपैकी कोणतातरी एक बंधू जिवंत होणे शक्य आहे. कोणता बंधू जिवंत व्हावा असे तुला वाटते?' धर्मराजाने सांगितले की, 'नकुलला जिवंत करा.' यक्ष हसला. म्हणाला,

'तुला राज्य करायचे आहे. राज्याला ह्या मुलाचा काय उपयोग आहे? अर्जुन किंवा भीमाला जिवंत करा असे सांग मला. नकुलाला जिवंत करण्यात तुझा उद्देश काय?' धर्मराज म्हणाले, ''मला दोन माता आहेत. त्यापैकी एक माझी माता आहे कुंती, दुसरी माता माद्री. तिने सहगमन केलेले आहे. तेव्हा त्याही मातेचा एक मुलगा जिवंत असताना तिलाही समाधान मिळेल आणि मी एक माझ्या मातेचा आहे. ही जी बुद्धी आहे, 'अशी बुद्धी मिळण्याकरिता मी धर्माचरण करतो,' असे धर्मराजाने द्रौपदीला आणि भीमाला उत्तर दिले आहे.

## निर्दोष बुद्धी

**धर्माचे फळ म्हणजे काही अर्थ आणि काम एवढेच मर्यादित नाही. फलप्राप्ती हा उद्देश नाही.** खरे धर्मज्ञ आणि महात्मे आपल्या बुद्धितत्त्वाला निर्दोष बनविण्यासाठी नित्य प्रयत्नशील असतात. ते महात्मे धर्माचे आचरण विशिष्ट फलाकरिता करीत नाहीत. निष्काम कर्मयोग जो ते सांगत आहेत, त्याचाच लोकमान्यांनी पुरस्कार केलला आहे. धर्माचे काहीतरी फळ आमच्या पदरात पडावे अशी इच्छा निर्माण झाली की बुद्धी सदोष झाली आहे असे समजावे. फलाभिलाषा उत्पन्न झाली आहे म्हणजे बुद्धीमध्ये दोष उत्पन्न झाले आहेत. 'हा धर्म वाणिज्य झाला,' असे धर्मराजांनी स्पष्ट सांगितले आहे. हे धर्माचरण नाही, व्यापार झाला. इतका धर्म मी केला, इतके फळ मला मिळाले पाहिजे, ही बुद्धी निर्माण झाली म्हणजे बुद्धीमध्ये दोष उत्पन्न झाला. आसुरी प्रकृती आणि दैवी प्रकृती यानुसार विवेचन करीत असताना हेच पाहायला पाहिजे. हिरण्यकश्यपू आणि त्याचा मुलगा प्रल्हाद, रावण आणि त्याचा भाऊ विभीषण या दोघांमध्ये फरक काय आहे? दोघेही असुर आहेत. प्रल्हाद भक्त ठरलेला आहे आणि हिरण्यकश्यपू शत्रू ठरलेला आहे. हा हिरण्यकश्यपू तसा मोठा तत्त्वज्ञ पुरुष आहे. त्याने तपश्चर्या केली. रावणसुद्धा संध्या करीत होता असे म्हणतात. म्हणजे श्रद्धा होती.

हिरण्यकश्यपूने तपश्चर्या करायची ठरविली आहे. आपल्याला विशिष्ट शक्ती मिळवावयाची आहे. लोकोत्तर शक्ती, सर्व सत्ता आपल्या ताब्यामध्ये यावी हे फळ मिळण्याकरिता त्याने तप केले. तथापि त्याची प्रेरणा, प्रवृत्ती आसुरी होती. ब्रह्मदेव प्रसन्न झाले. आसुरी वृत्ती किंवा अशा प्रकारची अपूर्ण बुद्धी असा हा बुद्धीचा प्रकार आहे. त्या बुद्धीमध्ये श्रद्धा आहे पण ती कार्यापुरती आहे. त्यांनी विचार करून ठरविलेले आहे. कालही अनंत आहे आणि आत्माही संपणारा नाही आहे. शरीर गेले तरी काल आणि आत्मा नित्य असल्यामुळे, "माझे उद्दिष्ट सिद्ध झाले पाहिजे." हा एक त्याच्या बुद्धीतील विशेष आहे. म्हणून त्यांनी तप केले. ब्रह्मदेवाचा प्रसाद संपादन केला. प्रसाद संपादन करीत असताना काहीतरी विशिष्ट फल मिळावे असे त्याचे उद्दिष्ट आहे. हे फळ म्हणजे आपला विनाश, मृत्यू न येणे. तथापि हे काही आपल्या ताब्यामध्ये नाही, स्वाधीन नाही हे हिरण्यकश्यपूस मान्य आहे. जी विशिष्ट सत्ता मिळवायला पाहिजे ती आपण काही मिळवू शकत नाही म्हणून मृत्यू चुकविणे हेही आपल्या हातामध्ये नाही असे हिरण्यकश्यपू जाणतो. बुद्धीची शक्ती मोठी आहे. काल अनंत आहे. आत्मा अमर आहे हे सगळे खरे आहे. परंतु बुद्धीच्या शक्तीच्या आत हे बसत नाही, येत नाही. मृत्यू टाळला पाहिजे किंवा विशिष्ट काही निर्माण करून पाहिजे असलेले इष्ट फळ घेतले पाहिजे. एक परिपूर्ण शक्ती उत्पत्तीही करू शकते आणि ती विनाशही थांबवू शकते हे त्याला मान्य आहे म्हणून त्याने, 'मला मृत्यू येऊ नये अशा प्रकारच्या सर्व सिद्धी पाहिजेत, सगळी सत्ता पाहिजे,' असा वर मागून घेतला.

चमत्कार असा आहे की सर्वही बुद्धीमध्ये म्हणजे सर्वांच्या अंत:करणामध्ये उत्पत्ती आणि नाश यांच्यासंबंधी ईश्वराची सत्ता, शक्ती मान्य आहे. आपण स्वतंत्र निर्माण करू शकत नाही किंवा विनाशही थांबवू शकत नाही. तेव्हा उत्पत्ती करायची झाली तर ईश्वरच करेल किंवा नाश

थांबवायचा झाला तर ईश्वरच थांबवेल. म्हणजे उत्पत्ती आणि नाश करायचा अथवा थांबवायचा झाला तर ईश्वरच करेल. दुसरे कोणी करू शकत नाही. उत्पत्ती आणि नाश ईश्वराधीन आहे, एवढीच आमची बुद्धी आहे. पण संरक्षण हे मात्र आमच्या प्रयत्नांनी होऊ शकते हा एक आमच्या बुद्धीचा आग्रह आहे. पहारेकरी ठेवले म्हणजे संरक्षण झाले. अवधान ठेवले म्हणजे संरक्षण झाले. म्हणजे संरक्षण माझे मी करू शकतो. फक्त उत्पत्ती आणि नाश एवढे ईश्वराच्या आधीन आहे. महात्म्यांच्या बुद्धीला मात्र असे वाटत नाही. पूर्णशक्तीशी ज्या बुद्धीचा संबंध झालेला आहे. त्या महात्म्यांच्या बुद्धीला, संरक्षणही ईश्वरच करतो, संरक्षण करणारी शक्ती ईश्वरच आहे असे निश्चयाने वाटते. तो जीव मातेच्या गर्भामध्ये असताना माता संरक्षण करते? माता मोठी आहे, चांगली आहे, वात्सल्यमूर्ती आहे. सगळे बरोबर आहे. अद्यापि मूल समोर आहे काय? बाहेर आल्यानंतर कितीही कष्ट पडले तरी तिच्या त्या वात्सल्य बुद्धीने तिला ते कष्ट काहीच वाटणार नाहीत हे खरे. परंतु ज्या वेळेला अपत्य समोरसुद्धा नाही आहे अशा वेळेला त्या गर्भाचे संरक्षण माता करते, हे कसे? त्या अपत्याच्या संरक्षणाची योजना करणारा जो आहे तो ईश्वर हे तर्कावरून शास्त्रकारांनी मान्य केलेले आहे. त्या बरोबर स्वतःच्या बुद्धीचा अनुभवही आहे. उत्पत्ती, संरक्षण आणि नाश सर्वही-संरक्षणशक्तीही आमच्यात नाही आणि आम्ही संरक्षणही करू शकत नाही यावरून ईश्वराचे अस्तित्व सिद्ध होत आहे. सद्गुरू श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज यांनी युवाशिक्षेच्या आरंभी हाच तर्क मांडला आहे.

**दृष्टे स्वस्याप्यनीशत्वे सुखादेः पारतंत्र्यतः ।**
**न सर्वज्ञेश इत्युक्तिर्माता वंध्या ममेतिवत ।। युवशिक्षा ४।।**

आपण असमर्थ आहोत हे प्रत्येक वेळा आपल्या अनुभवाला येत आहे. व्यक्ती असो वा समष्टी म्हणजे बुद्धी असो, किंवा बुद्धीचा समुदाय

असो तरी सामर्थ्य नाही, ते दिसतही नाही, आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळून कितीतरी दिवस झाले आहेत. पूर्वी आपल्याला म्हणता तरी येत होते की परक्यांची बुद्धी आहे. ते जेते आहेत. आपण परतंत्र आहोत हे सांगता येत होते. आता तसे राहिले नाही. या परिस्थितीमध्ये अनेक बुद्धी असून त्या सगळ्या बुद्धीकडून शेवटी काय निर्णय? संरक्षण करण्याचे सामर्थ्य आपल्या बुद्धीमध्ये आहे. मात्र, एकाच्या बुद्धीमध्ये नाही सर्वांच्या बुद्धीमध्ये मिळून आहे! तर कोठे आहे? हा प्रश्न आपल्या समोर उपस्थित होत आहे. परंतु सुखदु:ख हे परतंत्र आहे. हे यावरून सिद्ध होते. आम्ही सगळे अपूर्ण बुद्धीचे लोक. एक असो किंवा अनेक मिळून कार्य करणारे असो. तरीसुद्धा सुख-दु:ख आमच्या ताब्यामध्ये नाही. दु:ख निवृत्तीही आमच्या ताब्यामध्ये नाही. सुखप्राप्तीही आमच्या ताब्यामध्ये नाही. हे बुद्धीने मान्य करून घ्यायचे ही गोष्ट निराळी आहे. निरनिराळे प्रयोग करून आपण पाहतो. त्या प्रयोगांतून निष्पन्न असे काहीही होत नाही. अशी वस्तुस्थिती असताना कोणीतरी वेगळा आहे हे मान्य का करू नये? आमच्या बुद्धीला ते का पटत नाही? सुखदु:ख हे पर-तंत्र आहे हे सिद्ध झालेले आहे. आमच्या ताब्यामध्ये काही नाही आहे असे सिद्ध झाले तर त्या पराची सिद्धी आमच्या बुद्धीने मान्य का करू नये? नियामक कोणी नाही अशी भूमिका असेल तर मग तुमच्या बुद्धीने तुम्ही सर्व नियंत्रण का करू शकत नाही? बुद्धीने सगळे होऊ शकत नाही, बुद्धी सगळे करू शकत नाही. तेव्हा स्वत:चे अनीशत्व अगदी अनुभवाला येत असून ईश्वर कोणीही नाही असे मानणे म्हणजे 'मम माता वंध्या' असे होईल?

ज्यांची बुद्धी पूर्णतेच्या मार्गाला लागलेली आहे, परिपूर्ण झाली आहे. त्यांच्या बुद्धीला पूर्णशक्ती मान्य आहे. त्या पूर्ण शक्तीचा अनुभव आलेला आहे. त्यामुळे त्यांच्या बुद्धीमध्ये कोणतीही भीती नाही. हा पहिला गुण शास्त्रकारांनी दैवी प्रकृतीचा सांगितला आहे. निर्भयता आहे. कोणतीही

चिंता नाही आहे. भीती वाटत नाही. प्रल्हादजींना काही भीती वाटली नाही कारण देहाचा नाश फार तर हा पिता करू शकेल. हिरण्यकश्यपूने तपश्चर्या केली आहे आणि फळ पदरात पडण्याबरोबर मात्र तो म्हणू लागला की, 'मी तपश्चर्या केली म्हणून ईश्वराने मला वर दिला.' कृतघ्नता हा त्याचा स्थायीभाव काय आहे, तो दिसून आला. फलाची अभिलाषा बुद्धीमध्ये उत्पन्न झाली. कोणताही धर्म अथवा आचरण करताना फलाची इच्छा उत्पन्न झाल्याबरोबर ते फळ पदरात पडेपर्यंत बुद्धीमध्ये जी कृतज्ञता होती ती कृतज्ञता गेली. फळ मिळाले आणि त्याबद्दल जो आदर आहे, तो आदर मात्र गेला. 'तपश्चर्या मी केली म्हणून मला फळ दिलेले आहे. ईश्वर तरी काय फुकट फळ देतो काय? दुसऱ्या कोणाला नाही दिले त्याने? माझ्या तपाचे फळ मला मिळालेले आहे. म्हणजे स्वत: मीच माझा ईश्वर आहे.' या वृत्तीमुळे हिरण्यकश्यपूची प्रकृती आसुरी ठरलेली आहे. म्हणून प्रल्हाद भक्त ठरला आणि हिरण्यकश्यपू शत्रू ठरला असे आहे. हिरण्यकश्यपूनेसुद्धा तपश्चर्या केली होती, पण त्याने नुसती तपश्चर्या केली. बुद्धीचा स्वार्थी भाव गेलेला नाही आहे. तो तसाच राहिलेला आहे. ईश्वराकडून आपल्याला काहीतरी मिळण्याकरिता त्याने तत्कालिक उपाय केलेला आहे. तो मिळाल्यानंतर त्या ईश्वराबद्दल काही कृतज्ञत्व नाही. ईश्वर मानण्याची आता काही आवश्यकता त्या बुद्धीला वाटली नाही म्हणून ती बुद्धी बाजूला पडली.

## ईश्वरस्वरूप आणि गुरुस्वरूप दत्तात्रेय

बुद्धीला पूर्णत्व देणारी ईशशक्ती आहे हेच दत्तात्रेयांचे स्वरूप आहे. ज्ञानदेवांनी दत्तात्रेयावर एक अभंग दिलेला आहे. ज्ञानदेवांची परिपूर्ण बुद्धी झालेली आहे, त्यांच्या बुद्धीचा सर्व देवतांशी संबंध आहे. याचा अर्थ एकतत्त्व सर्वत्र आहे हे ज्ञानदेवांनी जाणले आहे. एखाद्याची श्रद्धा एखाद्या उपास्याबद्दल आहे, त्या आकाराबद्दल आहे. अशी श्रद्धा असू दे. अशी उपासना करू दे. उपासनेविषयी अशी मोकळीक आहे. पण तत्त्व एकच आहे. हे श्रीज्ञानदेवांच्या

बुद्धीला पटल्यामुळे नाथ संप्रदाय असला काय किंवा कोणताही संप्रदाय असला काय निश्चयात्मक बुद्धी, स्थिर बुद्धी एकच आहे. बाकीच्या बुद्धी अस्थिर. भिन्न भिन्न विचार, आज एक उद्या एक, असा कोणताही विचार स्थिर राहत नाही.

दत्तात्रेय संप्रदाय हा ईश्वररूप आहे आणि गुरुस्वरूपही आहे. योगशास्त्रकारांनी ईश्वराला गुरू असे म्हटले आहे, गुरुत्वशक्ती, मार्गदर्शन करणारी शक्ती चिरंतन पाहिजे आहे. कारण मार्गदर्शन हे विशिष्ट कालापर्यंतच हवे आहे असे नाही. किती तरी काळ गेला आहे. जात आहे, आणि जाणार आहे. प्रत्येकाच्या बुद्धीत सुधारणा करायची आहे. ती बुद्धी सिद्ध करण्याकरिता सर्व कालामध्ये ईश्वरत्त्व आहे, त्यास कालमर्यादा नाही आहे. **'स एव पूर्वेषामपि गुरुः कालेन अनवच्छेदात्'** असा योगसूत्रकारांचा अभिप्राय आहे.

आमच्या या आयुष्यामध्ये जेवढे होईल तेवढेच होणार. पुढे काही नाही, मागे काही नाही. इतकी आमची बुद्धी संकुचित झालेली आहे. त्या आमच्या बुद्धीला कालत्रयातीत देहत्रयातीत ही अवस्था कोठे मान्य आहे? एक व्यवहार दिसतो आहे. त्यामध्ये सूक्ष्मतत्त्व आहे याचीही कल्पना आपल्याला नाही आहे. परंतु योगशास्त्रासारखे प्रयोगशास्त्र आहे. या शास्त्रीय विचाराने सुसंस्कृत झालेल्या बुद्धीला या देहत्रयाची कल्पना येऊ शकते व त्याची सुधारणा त्याला करता येते. दत्तात्रेय स्वरूप हे ईश्वररूपच आहे. परिपूर्ण शक्तीचे स्वरूप आहे, आणि त्याचबरोबर गुरुस्वरूपही आहे आणि ईश्वरच सर्वांचा आदी गुरू आहे. मार्गदर्शन, उपदेश हे गुरूचे काम. त्याला प्रत्येकाची बुद्धी, शक्ती पाहता आली पाहिजे. त्याशिवाय उपदेश करून उपयोग नाही. सुधारणा करायची झाली तर कोणता रोग झाला, कोणत्या अवस्थेपर्यंत पोचला आहे. प्राथमिक अवस्था आहे, की शेवटीची अवस्था आहे. औषध देणाऱ्याला हे जाणता आले पाहिजे. सर्वही बुद्धीशी जिचा

संबंध आहे, अशी एक समष्टिबुद्धी, परिपूर्णबुद्धी, परिपूर्ण शक्ती आहे. तीच दत्तात्रेयस्वरूप आहे असे शास्त्रकार व्यास महर्षींनी सांगितले आहे. त्या दत्तात्रेयांशी ज्ञानदेवांचा संबंध आहेच आहे. दत्तात्रेयांचे स्वरूप आज जरी आपल्यापुढे त्रिमूर्ती षड्भुज असे असले तरी त्यांची वेगवेगळी सोळा स्वरूपे शास्त्रकारांनी सांगितली आहेत.

आंबेजोगाईला दासोपंत म्हणून मोठे दत्तभक्त होऊन गेले. त्यांच्यामध्ये दत्तात्रेयांचे सोळा अवतार सांगितले आहेत. आज आपल्याला श्रीपाद श्रीवल्लभ, नृसिंहसरस्वती एवढे दोनच अवतार माहीत आहेत. दासोपंतांच्या संप्रदायामध्ये सोळा अवतारांच्या जयंत्या चालू आहेत. ते अवतार भिन्न भिन्न स्वरूपे धारण करून सर्व ठिकाणी संचार करीत आहेत. अनेक जीवात्मे आहेत व त्या जीवात्म्यांच्या बुद्धीची व्यवस्था लावायची आहे. जगत्कार्य करायचे आहे. संपूर्ण जगाची व्यवस्था लावणाऱ्या बुद्धीची व्यवस्था अगोदर लागली पाहिजे. बुद्धीच जर परस्पर अव्यवस्थित उत्पन्न झाली आणि परस्पर संघर्ष निर्माण झाला तर कोणत्या बुद्धीने कसे कार्य होऊ शकेल? ही बुद्धीची व्यवस्था, व्यापकना, बुद्धीची परिपूर्णता, बुद्धीचा विकास, या सर्वांचा विचार करण्याकरिता हे दत्तात्रेयांचे स्वरूप आहे. ईश्वरस्वरूप आणि गुरुस्वरूप त्याकरिता आलेले आहे.

ईश्वर, गुरू, आत्मा तीन भेद आहेत. हे जे काही परिपूर्ण दत्तात्रेय स्वरूप आहे हे सगळे ईश्वरी स्वरूप दत्तात्रेय आहे असे टेंबेस्वामी महाराजांनी 'द्विसाहस्री' या ग्रंथामध्ये सांगितले आहे?

**श्रीवैष्णवैशगाणेशसौर्यशावत्यादि रुपधृक।**
**दत्तात्रेयोऽस्त्वजोऽनंतो सदामे हृदि सद्गुरुः** ।। द्वि.सा.गुरुस्तुती १ ।।

दत्तात्रेयांचे वैष्णवरूप आहे, शैवरूप आहे. शाक्त्यरूप आहे. सौररूप आहे. शिवाय अनेक रूप धारण करणारा एक दत्तस्वरूप म्हणजे परिपूर्ण एक ईश्वर स्वरूप आहे. ही एकात्मभावना ज्या बुद्धीमध्ये उत्पन्न झाली ती

परिपूर्ण बुद्धी होय. ''अनेक ईश्वर आहेत. कोणाची उपासना करायची? वैदिक धर्मात काहीही एक नाही. साधने किती सांगितली आहेत. देवता किती सांगितल्या आहेत.'' ह्या आमच्या सगळ्या शंका आमच्या अपरिपूर्ण बुद्धीच्या शंका आहेत. परिपूर्ण बुद्धी नि:शंक असते. तिला एकतत्त्व अनेक रूप होऊन दिसते. याप्रमाणे दत्तात्रेय सद्गुरुस्वरूप आहेत. मार्गदर्शक आहेत. म्हणून दत्तात्रेय स्वरूपाला कालमर्यादा नाही.

कंसाचा नाश झाला. सबंध उलाढाली झाल्या. कृष्णाचे निजधामाला निर्याण झाले. राम अवतार संपलेला आहे. दत्तात्रेय अवतार मात्र संपणारा नाही आहे. कारण बुद्धीची सुधारणा करायची आहे. जीवांची बुद्धी परिपूर्ण बनवायची आहे. हे कार्य काय मर्यादित आहे? **एखाद्याचा नाश केला तो निरोध केलेला आहे, प्रलय नाही.** प्रलयाच्या वेळेलासुद्धा बुद्धीची परिपूर्णता होऊ शकत नाही. कार्य स्थगित झालेले आहे. फक्त कर्मशक्ती, त्या शक्तीचा विकास थांबलेला आहे. प्रलयाने काही सुधारणा होत नाही. तर ही सुधारणा सगळ्यांची करायची आहे. बुद्धीमध्ये व्यवस्था लावायची आहे. तिला परिपूर्ण करायची आहे. हे कार्य अनंतकाळ चालू आहे. ते अनंतकाळ राहणार आहे. असा एक निर्णय श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांनी त्याबद्दल दिलेला आहे. स्वामीमहाराजांची परिपूर्ण बुद्धी आहे. त्या परिपूर्ण बुद्धीने दिलेला हा निर्णय आहे.

दत्तात्रेयांच्या स्वरूपाशी संबंध एकत्व दृष्टीने व्हावयाचा आहे. अनेकत्व दृष्टीने आकाररूप जरी घेतले तरी त्या रूपाशी संबंध आहे. त्या ज्ञानदेवांचे सगळेच आपल्याला माहीत आहे काय? सगळेच संशोधन करताना सगळे समजून येते असे नाही. संशोधन करताना उलाढाली होतात. याप्रमाणे ज्ञानदेवांचा दत्तात्रेयांचा संबंध म्हणजे आत्मरूपाला त्यांनी नमन केलेले आहे. ते एक आत्मतत्त्व आहे हे त्यांनी आरंभाला सांगितले आहे. त्या आत्मतत्त्वापर्यंत संबंध होणारी बुद्धी परिपूर्णबुद्धी! ही बुद्धी होण्याकरिता

त्यांनी सांगितलेली साधने-**थोरपण पऱ्हा सांडीजे । एथ उत्पत्ती आघवी विसरिजे । जै जगा धाकुटे होईजे । तै जवळीक माझी ॥** कोणत्या वेळी ज्ञानाचा आविष्कार करायचा, कोठे करायचा, कसा करायचा, कोठे करायचा नाही. या संदर्भात संयम सांगितला आहे, सगळेच ग्राहक नसतात. तर ज्ञान सोडून द्यावे असे ज्ञानेश्वरांनी कधीच म्हटले नाही. पण जे ज्ञान आहे, बुद्धीमध्ये उत्पन्न झालेले ते ज्ञान कोणत्या वेळी व्यक्त करायचे? त्याचा उपयोग कोणत्या वेळेला करायचा, कसा करायचा, या संदर्भात संयम दाखविला आहे. ज्ञानेश्वर महाराज, **जैं जगा धाकुटे होईजे** हे दुसरे साधन सांगत आहेत. त्या ज्ञानाचे हे फळ आहे. बुद्धीने ग्रहण केलेले ज्ञान आणि त्या ज्ञानाचे हे फळ. म्हणजे यथार्थ ज्ञान झाल्यानंतर जितेंद्रियत्व आलेच पाहिजे. इंद्रियाचा संयम होणे हे ज्ञानाचे मुख्य फळ त्यांनी सांगितले आहे. तर हे होणे म्हणजे, 'जैं जगा धाकुटे होईजे'. संयम आहे आणि त्याप्रमाणे अहंकारादी विकार, सगळे दोष दूर झालेले आहेत. परिपूर्ण बुद्धी झालेली आहे म्हणून जी बुद्धी परिपूर्ण झाली आहे त्यांच्या बुद्धीचे प्रमाण अनुभूतिप्रमाण मानले जाते.

अशा तऱ्हेने शास्त्रकारांनी दत्तात्रेयांची भिन्न भिन्न स्वरूपे सांगितली आहेत. एकच दत्तात्रेयस्वरूप नाही. द्विभुज अवतार आहे. चतुर्भुज अवतार आहे. षड्भुज अवतार आहे. ते जाणण्याची शक्ती परिपूर्ण बुद्धीमध्ये आहे. त्या दृष्टीने ज्ञानदेवांचा दत्तात्रेयांशी संबंध आहे असे म्हणायला हरकत नाही. आणि दत्तात्रेय हा अवतार नित्य आहे, त्याला कालाचे बंधन नाही हे ईश्वराने धारण केलेले दत्तात्रेयस्वरूप आहे त्याला कालमर्यादा नाही आहे. चांगदेवासारखे योगीपुरुष १४०० वर्षे राहू शकतात. हा बुद्धिवाद आहे. बुद्धीचे प्राधान्य आहे. बुद्धीने काहीही करता येणे शक्य आहे. असलेले आयुष्य कमीही करता येईल. कमी असलेले आयुष्य वाढविता येईल. आमच्या बुद्धीला जे असंभवनीय वाटते ते त्या बुद्धीत निश्चय, श्रद्धा उत्पन्न झाली

त्या बुद्धीला अशक्य नाही. अशा पूर्ण बुद्धीच्या पूर्ण शक्तीशी संबंध असलेल्या बुद्धीच्या दृष्टीने ज्ञानदेवांनी दत्तात्रेयांचा अभंग लिहिला आहे. दत्तात्रेयांचा आणि त्यांचा संबंध आला आहे असे स्पष्ट दिसते.

**दत्तात्रेय योगी**

**पैल मेरूच्या शिखरी । एक योगी निराकारी ।**
**मुद्रा लावूनि खेचरी । ब्रह्मपदी बैसला ॥ १ ॥**
**तेणे सांडियेंली माया । त्यजियेली कंथाकाया**
**मन गेले विलया । ब्रह्मानंदा माझारी ॥२॥**
**अनुहतध्वनि नाद । तो पावला परमपद**
**उन्मनी तुर्या विनोदे । छंदे छंदे डोलतुसे ॥३॥**
**ज्ञानगोदावरीच्या तीरी । स्नान केले पांचाळेश्वरी।**
**ज्ञानदेवाच्या अंतरी । दत्तात्रेय योगिया ॥४॥**

- श्री ज्ञानदेव

याप्रमाणे एक स्वयंपूर्ण शक्ती ईश्वरशक्ती आहे. आणि त्या शक्तीशी त्यांचा संबंध नित्य आलेला आहे. हा यावा असे ज्यांना वाटते, त्या ईश्वर तत्त्वाची उपासना करणारे आणि आपल्या बुद्धीचा विकास करून घ्यावा असे वाटणारे अशा प्रकारे भगवद्भक्त हे त्या मार्गाने जात आहेत.

दत्तात्रेयांचा संप्रदाय, ज्ञानेश्वरांचा संप्रदाय, संप्रदाय पदार्थ म्हणजे काय? याबाबत उद्या विचार करायचा आहे. दत्त संप्रदायामध्ये काय काय विशेष आहे, हा जो ईश्वरसंप्रदाय आहे तो ईश्वरसंप्रदाय उपकारक आहे का अपकारक आहे याचा विचार उद्याच्या प्रवचनात करायचा आहे.

# बुद्धियोगाचा प्रदाता - गुरुस्वरूप ईश्वर परिपूर्णबुद्धी श्रीज्ञानदेव

## व्याख्यान तिसरे १८.१२.८१

ज्ञानदेव आणि दत्त संप्रदाय-पहिल्या व्याख्यानामध्ये बुद्धितत्त्वाचे प्राधान्य मानून ज्ञानदेवांच्या विशाल बुद्धीविषयी काही विवेचन झाले. काल दत्त संप्रदायाच्या विवेचनामध्ये दत्तात्रेयांचे ईश्वरस्वरूप व गुरुस्वरूप पाहिले. बुद्धी ही अपूर्ण आहे. पण तिचा पूर्णतत्त्वाशी संबंध आल्यानंतर तीही पूर्ण होऊ शकते. असे एक पूर्णतत्त्व जगामध्ये आहे, ते कायम आहे, कालातीत आहे, गुरुस्वरूप आहे. सर्वनियामक आहे. अशा पूर्ण तत्त्वाविषयी विवेचन सुरू झालेले आहे.

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।**
**सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥**

भगवद्गीता ५:२९॥

ईश्वरतत्त्वाचे, पूर्णतत्त्वाचे ज्ञान झाल्यानंतर त्याचे फळ येथे सांगितले आहे. आणि त्याचे स्वरूप हेही या श्लोकातून दाखविले आहे. ईश्वरत्त्वाचे ज्ञान झाल्यानंतर शांती हे त्याचे फळ दाखवीत आहेत. बुद्धीची तूष्णीम् अवस्था होणे, त्या बुद्धीला स्थिरता प्राप्त होणे, वृत्तीशून्य अवस्था होणे

यालाच शांती असे शंकराचार्य म्हणातात. वृत्तीची शांती होणे, वृत्तीचा निरोध होणे याच्यामध्ये पुष्कळ सुख आहे. शांती सुखाला म्हणतात. सुख म्हणजे शांती असे आपण समजतो. हे शांतीचे विशिष्ट स्वरूप आचार्य सांगत आहेत. हे फळ **'ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति'** असे भगवान स्वत: सांगतात.

भगवान हेच स्वत: गुरू आहेत असे पतंजली महर्षींनी सांगितले आहे. ईश्वररूप आणि गुरुस्वरूप, नियामक स्वरूप, नियामक शक्तीचे वर्णन उपनिषदात केलेले आहे. नियामक शक्ती पृथ्वीमध्ये आहे, जलामध्ये आहे. तेजामध्ये आहे. चंद्रामध्ये आहे. सूर्यामध्ये आहे. सर्व जीवांमध्ये अंतर्यामी सर्वांचे नियमन करणारी शक्ती आहे. परंतु त्या त्या जीवांना त्याचे ज्ञान मात्र नाही. त्यांच्या अंतर्यामी ते आहे. ईश्वरस्वरूप व गुरुस्वरूप तेच आहे. ते सर्वांनाही मार्गदर्शन करते असे उपनिषदात प्रतिपादिले आहे प्रत्यक्षात सर्व बुद्धीची व्यवस्था ही बुद्धीच्या द्वाराने होते. पण प्रत्यक्ष बुद्धितत्त्वाची व्यवस्था करणारे असे एक स्वतंत्र तत्त्व आहे आणि ते बुद्धीनेच जाणले जाते. या पूर्णतत्त्वाचे ज्ञान हे ज्या वेळेला होईल त्यावेळीच शांती प्राप्त होते. चित्ताची शांती होते. वृत्ति शून्य होते. गुरुस्वरूपाचे वर्णन भगवंतांनी केलेलेआहे. अर्जुनाला भगवान सांगत आहेत.

**इमं विवस्तते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।**
**विवस्वान् मनवे प्राहमनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्** ।।भ.गीत.४:१ ।।

हा योग पूर्वी मी विवस्वताला-सूर्याला सांगितला. तो काळाच्या ओघात नष्ट झाला. तुला मी आता सांगणार आहे. हे ज्यावेळेला भगवंत सांगायला लागले, त्यावेळेला अर्जुनाला शंका येणे साहजिकच आहे. बुद्धीनेच आपण विचार करणार. तथापि आपली बुद्धीसुद्धा मर्यादित आहे. आणि पूर्ण बुद्धी अद्याप मिळालेली नाही. तोपर्यंत बुद्धीची मर्यादा आहे. अर्जुनाने विचारले की तुमचा जन्म अलीकडचा आहे. वसुदेवाचे पुत्र तुम्ही आहात. सूर्याचा

जन्म कितीतरी पूर्वीचा आहे आणि त्याला तुम्ही उपदेश केला. हे कसे शक्य आहे? शंका साहजिकच आहे. यावर भगवन्तांनी पुढे उत्तर दिले आहे.

**बहूनि मे व्यतीरतानि जन्मानि तव चार्जुन।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप॥**
**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्।**
**प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया॥**

भगवान म्हणतात, तुझ्या बुद्धीच्या पलीकडचे आहे. पण हे मी केलेले आहे. अर्जुनास भगवन्तानी गुरुस्वरूप दाखविले असून ईश्वरच गुरू आहे हेही प्रतिपादन केलेले आहे. भगवंतांच्या अशा प्रकारच्या प्रतिपादनावरून एखाद्या वेळेला आमच्या बुद्धीला वाटते की गीता सांगणारे वेगवेगळे आहेत की काय? या ठिकाणी हा अहम् पदार्थ आहे. मीच उपदेश केला आहे असे भगवान सांगतात. हा भगवान कोणी निराळा आहे आणि निर्माता दुसराच कोणीतरी आहे. म्हणजे गीता सांगणारे दोन-तीन आहेत की काय? असे वाटते. **गीता सांगणारे तीन नसतील, ऐकणारे मात्र तीन आहेत,** हे निश्चित आहे. अशा प्रकारचा संदेह निर्माण होणे साहजिकच आहे. ईश्वरभावामधून श्रीकृष्णाने गीताज्ञानाचा उपदेश केलेला आहे. प्रथम ईश्वररूपही दाखविले आहे. गीता सगळी झालेली आहे. युद्ध झाले. विजय मिळाला. सगळे झाले आणि अर्जुनाने पुन: विचारले की, तुम्ही आणखी एकदा गीता सांगितली तर बरे होईल. 'त्यावर भगवंत म्हणाले की, ती गीता आता मलासुद्धा सांगता येणे शक्य नाही.' काही तरी करून अनुवाद करून पुन्हा सांगितली आहे. तर ईश्वरभावसंपन्न होऊन त्या रूपामध्ये मूळ गीताज्ञानाचा उपदेश झालेला आहे. नियामक शक्ती कशी आहे? नियामकत्व लोकमहेश्वरत्व काय आहे हेही भगवन्तांनी दाखविले आहे. ईश्वराचे दर्शन, ईश्वराचे ज्ञान झाले म्हणजे शांती हे फळ मिळते.

ईश्वराचे ज्ञान करून घ्यावयाचे तर गुरुस्वरूपाची उपासना केली पाहिजे. गुरुस्वरूपामध्ये भगवान उपदेश करतात. **दत्त स्वरूपामध्ये ईश्वर आणि गुरू या दोघांचाही समन्वय आहे**. नियामक अशी ईश्वरशक्ती आहे. या शक्तीचे प्रतिपादन करताना महाभारतातील एका प्रसंगामध्ये व्यासांनी लिहिल ेआहे

कर्ण व अर्जुन यांचे पहिल्यापासून वैर आहे. अर्जुनाला मारण्याकरिता कर्णाने इंद्राकडून एक शक्ती मागून घेतली. इंद्राने ती दिलेली आहे. एकदाच त्या शक्तीचा प्रयोग करता येईल, असे त्याने सांगितले आहे. आता कर्णाजवळ ते आयुध आहे. कर्णार्जुनांचा संग्राम काही झालेला नाही असे नाही. त्यांचे युद्ध झालेले आहे. पुनः सायंकाळच्या वेळेला दुर्योधनाने विचारले - 'तुझ्या जवळ शक्ती असताना अर्जुन समोर आला असताना तू का टाकली नाहीस?' कर्ण म्हणाला 'विसरलो,' म्हणजे याचा अर्थ काय? म्हणजे विस्मरण-हे जें नियामकत्व आहे ही ईश्वरी शक्ती आहे. **'मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च'** ही ती शक्ती आहे. याचे दिग्दर्शन व्यासांनी त्या वेळेला केलेले आहे.

**नियामक शक्तीचे ज्ञान**

अशा रीतीने सर्वांच्या ठिकाणी अंतर्यामी रूपाने नियामक शक्ती आहे. गुरुस्वरूपाचे तसेच ईश्वरस्वरूपाचे ज्ञान करून देण्याचे सामर्थ्यही याच नियामक शक्तीचे आहे. आपण गुरू आहोत व ईश्वरही आहोत हे भगवन्तानी दाखवून दिले आहे. **'ददामि ते बुद्धियोगं'** येथेही याचेच दर्शन आहे. भगवंतांनी गुरुस्वरूपाचे प्रतिपादन केले आहे. ईश्वररूपाचे ज्ञान होणे व विशाल वा पूर्ण बुद्धी होणे याचे गमक ते सांगत आहेत.

**'बहूनां जन्मनां अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते ।**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।।'**

भ.गीता ७:१९।।

**'वासुदेवः सर्वमिति'** असे ज्ञान झाले म्हणजे तो महात्मा झाला. आता त्याच्या बुद्धीला पूर्णता आलेली आहे. हे ज्ञान कसे व्हायचे? किती जन्म लागतील याची संख्या भगवंतांनी निश्चित केली नाही. बहूनां एवढेच भगवन्त सांगतात.

या ज्ञानप्राप्तीसाठी हजारो वर्षे तपश्चर्या करावी लागते. मात्र, ध्रुवाला अवघ्या पाच-सहा महिन्यांमध्येच दर्शन झाले आहे. असे ध्रुवचरित्रात शुकाचार्यांनी सांगितले आहे. त्याच्या बुद्धीचा तो अधिकार आहे किंवा त्याला मार्गदर्शन करणाऱ्या गुरूचा तो अधिकार आहे. त्या गुरूची ती शक्ती आहे. मार्गदर्शक बुद्धीचा अधिकार असेल तर एकाच जन्मामध्येही ज्ञान होऊ शकते. ध्रुवाच्या चरित्राचा विचार केला तर पाच-सहा महिन्यांमध्येच सर्वही साधन मार्गाची सिद्धी झालेली दिसते. ही सिद्धी कशी झाली हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. ध्रुव घराच्या बाहेर पडलेला आहे. आईने त्याला जाण्यास सांगितले आहे. वय अत्यंत लहान तरीही त्याचा निश्चय झालेला आहे. ईश्वराचे दर्शन झाल्यानंतरच परत जायचे आणि काय मागायचे तेही ईश्वराजवळ मागायचे, हाही एक निश्चय झालेला आहे. आईचेच तसे सांगणे होते.

बाहेर पडल्यानंतर नारदांनी परीक्षा केली. बुद्धीची परीक्षा केल्याशिवाय ज्ञानदान करणे योग्य नाही. कोणतेही ज्ञान असो, व्यावहारिक ज्ञान जरी असले तरी परीक्षा करूनच ज्ञान दिले जाते. नाहीतर देणाऱ्याचा कालापव्यय म्हणा, श्रम म्हणा, याचा उपयोग नाही. अश्वत्थाम्याला ब्रह्मास्त्र विद्या द्रोणाचार्यांनीसुद्धा दिली नाही. कर्णालाच दिली नाही असे नाही, अश्वत्थाम्यालासुद्धा दिली नाही. अश्वत्थाम्याला ब्रह्मास्त्राचे ज्ञान अर्धवट होते. प्रयोग करण्याचे ज्ञान त्याला आहे. उपसंहार करण्याचे ज्ञान त्याला नाही आहे. आणि याला कारण म्हणजे ब्रह्मचर्यादी जी काही त्याला साधने लागतात, त्यामध्ये न्यूनता असली पाहिजे असे काही काही ठिकाणी सांगितले

आहे. आपल्या मुलालासुद्धा पूर्ण विद्या द्रोणाचार्यांनी दिली नाही. त्याला पूर्ण विद्या मिळाली नाही, याचे कारण म्हणजे त्याच्या बुद्धीमध्ये ज्ञानग्रहण करण्याचे सामर्थ्य नाही.

अर्धी विद्या मिळालेली असतानासुद्धा शेवटी त्याने काय केले हे आपल्याला माहीत आहेच. भारतीय युद्ध संपले आणि त्याच्या बुद्धीतून अभिनिवेश उत्पन्न झाला. सहा ऋषींपैकी एक होणारा अश्वत्थामा पण त्याच्याही बुद्धीमध्ये अभिनिवेश उत्पन्न झाला आहे. पक्षपात इतका निर्माण झाला की त्या दुर्योधनाच्या पक्षाभिनिवेशाने पांडवांचे राहिलेले सर्व सैन्य अश्वात्थाम्याने मारून टाकलेच. त्या द्रोपदीची पाचही मुले मारून टाकलेली आहेत. आपली पाचही मुले मारली गेली तरी त्या द्रौपदीने अश्वत्थाम्याला जीवदान द्या म्हणून सांगितले आहे; ही द्रौपदीची बुद्धी आहे. अश्वत्थाम्याची बुद्धी व द्रौपदीची बुद्धी यांची परीक्षाच त्या वेळेला झाली.

द्रौपदीने जो निर्णय दिलेला असेल त्याप्रमाणे अश्वत्थाम्याला शिक्षा करावयाची असे सर्वानुमते ठरले होते. परंतु तिने सांगितले की त्याला जीवदान द्या. याचे कारण ती अर्जुनाला सांगत आहे. "सरहस्यो धनुर्वेद: सविसर्गोपसंयम: । अस्त्रग्रामश्च भवता शिक्षितो यदुनुग्रहात्॥ स एष भगवान् द्रोण: प्रजारूपेण वर्तते" ज्या गुरुपासून तुम्हाला सर्व विद्या मिळाली त्या गुरूंचा तो मुलगा आहे. द्रौपदीच्या अंत:करणात अद्यापि वात्सल्य भाव आहे. ती सांगते आहे. मा रोदीदस्य जननी गौतमी पतिदेवता । यथाहं मृतवत्साऽर्ता रोदिम्यश्रुमुखी मुहु: ॥ श्रीमद्‌भागवत १.७.४७॥ 'याची माता अद्यापि जिवंत आहे. पुत्रशोकाचे दु:ख मला जसे झाले तसे तिला होऊ नये.' शोकाच्या वेळेलाही हे विचार द्रौपदीच्या अंत:करणातमध्ये आहे. **आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन । सुखं वा यदि वा दु:खं स योगी परमो मत: ॥** भ.गीता ६:३२॥ आत्मौपम्य बुद्धीचे हे महत्त्व आहे.

द्रौपदीच्या आत्मौपम्य बुद्धीचे विचार एका बाजूला आणि

अश्वत्थाम्याचे विचार एका बाजूला. या द्रौपदीच्या विचारामुळे धर्मराज, श्रीकृष्ण यांनीसुद्धा द्रौपदीची प्रशंसा केली आहे. कौतुक केले आहे. यातून अश्वत्थाम्याला जीवदान मिळाले. तरीसुद्धा जाता जाता पांडवाचा एक वंशांकुर राहिला आहे - उत्तरेच्या पोटात अभिमन्यूचा गर्भ राहिला आहे - हा वंशसुद्धा शिल्लक ठेवायचा नाही अशी त्या अश्वत्थाम्याची विलक्षण विपरीत बुद्धी झालेली आहे. ती पराकोटीला गेलेली आहे. त्या गर्भाचा नाश करण्याचा प्रयत्न ब्रह्मास्त्राचा वापर करून केलेला आहे. म्हणजे ब्रह्मास्त्र विद्या कोणाला द्यावी किंवा न द्यावी हा विचार विद्या देतेवेळी द्रोणाचार्यांनी करायला हवा होता. शिष्याचा अधिकार पाहून ज्ञान द्यायचे, नाही तर त्याचा परिणाम विलक्षण होतो.

अश्वत्थाम्याने ब्रह्मास्त्राचा वापर उत्तरेचा गर्भनाश व्हावा म्हणून केला तथापि त्याच्या बुद्धीचा काही परिणाम झाला नाही. ही गोष्ट वेगळी आहे. नियामक ईश्वरशक्ती ही ब्रह्मास्त्रापेक्षा मोठी आहे. भगवंतांनी-श्रीकृष्णांनी उत्तरेला दिलासा दिलेला आहे. 'बाई, काही घाबरू नकोस. तुझ्या गर्भाचे संरक्षण होईल. तुझा गर्भ सुरक्षित राहील.' ते इतके विलक्षण ब्रह्मास्त्र असले तरीसुद्धा ही जी पूर्णशक्ती-नियामक शक्ती आहे, तिचे सामर्थ्य आहे आणि त्या शक्तीची इच्छा आहे की त्या गर्भाचे संरक्षण झाले पाहिजे. **'विषमपि अमृतं भवेत् केवलमीश्वरेच्छया'** असे त्या नियामक शक्तीचे सामर्थ्य आहे. ब्रह्मास्त्राचा प्रयोग होऊन गेलेला आहे. सर्व काही होऊन गेलेले आहे. तरी सुद्धा त्या गर्भामध्ये प्रवेश करून ब्रह्मास्त्राला भगवंतांनी शांत केले आहे.

### सर्व नियामक शक्तीचे वात्सल्य

वस्तुतः ईश्वरला क्लेश नाही.कर्म नाही, कर्मफल नाही, काही नाही.

**'क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः'** योगसूत्र १:२४॥

असे ईश्वराचे वर्णन योगसूत्रात आहे. असे असूनही भगवंताने गर्भात जाण्याचे कारण काय? या ईश्वर स्वरूपाचे महत्त्व या ठिकाणी भगवान सांगत आहेत. आपल्यावर जो उपकार करीत असेल तर त्याच्यावर उपकार करावयाचा असे झाले तर भक्तियोगाला काही महत्त्व राहणारच नाही. ईश्वराची अशी इच्छा असेल की भक्ताने प्रत्युपकार केला तरच मी त्याच्या उपयोगी पडेन. मग भक्तियोग कसा होणार ? ईश्वराला प्रत्युपकाराची अपेक्षा नाही. ईश्वराचे अनंत गुण प्रतिपादन केले आहेत, त्यात वात्सल्य हा एक गुण आहे. **सुहृदः सर्व भूतानां** प्रत्युपकार -निरपेक्षता यात भक्तियोगाचे सूत्र आहे. शास्त्रकारांनी **'आश्रितजनदोषेषु गुणत्व बुद्धिः'** अशी वात्सल्याची व्याख्या केलेली आहे. जो आपला आश्रित आहे, ज्याच्या मनात भक्तिभाव अपरंपार भरलेला आहे त्याचे दोष भगवंताला दिसतच नाहीत. फक्त गुण दिसतात. भक्ताच्या दोषांच्या जागीही त्याला गुणच दिसतात. दोष जाणवतच नाहीत.

अर्थातच दोषाला गुण समजणे म्हणजे भ्रांती झाली. त्याकरिता शास्त्रकारांनी वात्सल्याची दुसरी व्याख्या केलेली आहे. **तद्दोष-अदर्शनं वा ।** त्याला आश्रित जनांचे दोष दिसतच नाहीत. त्यांच्या अन्तःकरणामध्ये प्रेम किती आहे एवढेच भगवंताला दिसते. त्यामुळे कोणतीही शक्ती मोठी असली तरी त्या सर्व शक्तीचे नियमन करणारी ही भगवंताची शक्ती कशी आहे याचे अनुभव भक्तांना येत आहेत. भगवंताने उत्तरेच्या गर्भामध्येराहून त्या बालकाचे संरक्षण केले. केवळ त्या पांडवांची भक्ती पाहिली. प्रेम पाहिले. त्यांची विशाल बुद्धी पाहिली. त्या बुद्धीचे कौतुक केलेले आहे. त्या विशुद्ध बुद्धीकरिता भगवंताने त्याग करून दाखविला आहे.

नियामक शक्तीचा दोन्ही प्रकारचा अनुभव येतो. ब्रह्मास्त्रासारखा प्रयोग झाला असतानासुद्धा त्याचे नियमनही केले गेले आणि ते शांतही झाले आहे. अश्वत्थाम्याने पुढे शस्त्रसंन्यास घेतला असे म्हणतात. तो

तसेच करीत राहिला असता तर सगळेच संपले असते. पुढे त्याला सद्बुद्धी झाली म्हणतात. यासाठी काहीतरी एक नियामक शक्ती संरक्षणाकरिता योजिली गेली. त्या बालकाचे संरक्षण झाले आहे. भगवंताने स्वत:च गर्भामध्ये प्रवेश करून आणखी सर्व योजना केली. तोही जीवात्मा मोठा असला पाहिजे. ज्याला काही कारण नाही, कर्म नाही, काहीच नाही - असा परमेश्वरसुद्धा त्या बालकाबरोबर गर्भामध्ये नऊ महिने निवास करतो आहे, त्या जीवात्म्याचे पुण्य कितीतरी मोठे असले पाहिजे. ईश्वराच्या नियामक शक्तीचा हा एक प्रकार आहे.

दुसरा प्रकार अर्जुनाच्या संदर्भातला. भारतीय युद्धाच्या वेळेला अर्जुनाची बुद्धी शोकमोहावृत झालेली आहे. त्यामुळे त्याला काही सुचेनासे झाले आहे. धर्मकर्तव्य त्याला विरुद्ध वाटू लागले. धर्म चुकीचा आहे. क्षत्रियांचा कठोर धर्म बरोबर नाही. हे सर्व बोलून गेला आहे. आपल्या बुद्धीप्रमाणे त्याने कारण मीमांसा केली आहे. अर्जुनासारखा योद्धा युद्धातून निवृत्त होत आहे म्हणजे मोठी चिंता आहे. म्हणजे या युद्धात पांडवांना विजय मिळणार नाही असे झाले. केवळ व्यावहारिक दृष्टीने विचार केला तर युद्ध जिंकायचे तर मोठा योद्धा नाहीतर मोठा अतिरथी, महारथी पाहिजे, किंवा सैन्याची संख्या तरी जास्त पाहिजे. तथापि शास्त्रदृष्टीने याला काही महत्त्व नाही. मारुतीराय रावणाच्या लंकेमध्ये एकटेच गेले होते. राक्षसांच्या राजधानीमध्ये गेले होते. तेथे कोण होते त्यांच्या बरोबर? **'बुद्धिमतां वरिष्ठः'** असे मारुतीरायांचे वर्णन आहे. त्या बुद्धीमध्ये सगळी शक्ती आली आहे. अभय, निर्भयता हे परिपूर्ण बुद्धीचे गमक आहे. मारुतीराय एकटे गेलेले आहेत. तेथे जाऊन सर्वही कार्य केलेले आहे. सीतेचा शोध लावलेला आहे. तिचे समाधान केले आहे. तिला आश्वासन दिलेले आहे. रावणाच्या सभेमध्ये आपला परिचय करून देऊन त्याची कानउघाडणी करून मारुतीराय परत आलेले आहेत. हे त्यांच्या पूर्णबुद्धीचे वैशिष्ट्य आहे. बुद्धिशक्ती असे

विशिष्ट कार्य करू शकते - जर ती बुद्धी ईश्वरतत्त्वाशी संबंधित असेल तर!

ईश्वरतत्त्वशी संबंध येऊन ज्या बुद्धीमध्ये पूर्णता येते तेथे अन्य साहाय्याची अपेक्षा नाही. **'क्रियासिद्धिर्हि भवति महतां नोपकरणे.'** संख्येमध्ये बल असते असे नाही. पांडवांचे सात अक्षौहिणी सैन्य, अर्जुनासारखा मोठा अतिरथी योद्धा. देवलोकामध्ये जाऊन सर्व देवांच्यापासून अस्त्रविद्या संपादन केलेली आहे. अर्जुन मोठा जिज्ञासू आहे. प्रयत्न आहेत, बुद्धिमत्ता चांगली आहे. सर्व काही ग्रहण केलेले आहे. असा हा एकटा, समर्थ राहिला असता तरी चिंता नव्हती. अर्जुनाने आपले सामर्थ्य पूर्वी दाखविले होते. अज्ञातवासात विराटराजाच्या दरबारी बृहन्नडेच्या वेषात असतानासुद्धा त्याने कौरवांच्या सगळ्या सेनापतींचा पराभव केला. भीष्माचार्य, द्रोणाचार्य यांनी दुर्योधनाला सांगितले, 'हा अर्जुन आहे. आपण आता परत जाऊ या.' असा सल्ला दिल्यामुळे कौरवांना परत जावे लागले. भीष्म, द्रोण, कृपाचार्य, अश्वत्थामा, कर्ण असे मोठे वीर होते. त्या सर्वांचा अर्जुनाने पराभव केलेला आहे. तोच अर्जुन आता त्याची बुद्धी हतबल झालेली आहे, युद्ध करू शकत नाही असे म्हणून बसून राहिला आहे. अशा वेळेला भगवंतांनी गीताज्ञानाचा उपदेश सुरू केला आहे.

### भगवन्ताचे लोकमहेश्वर विश्वरूप

युद्ध करू शकत नाही हा निर्णय अर्जुनाने आपल्या मनाने, बुद्धीने घेतला असला तरी त्याच्या बुद्धीमध्ये अभिनिवेश नव्हता. दुसऱ्यांचे बरोबर नाही. माझे एकट्याचेच बरोबर आहे. ही बुद्धी म्हणजे अभिनिवेश. 'सर्व कांतं आत्मीयं पश्यति' ही एक बुद्धी. 'आत्मीयं एवं कांतं पश्यति' हीही एक बुद्धी. अर्जुनाच्या बुद्धीमध्ये हा अभिनिवेश नव्हता. त्याची बुद्धी संप्रदायप्रविष्ट बुद्धी होती. **'अनुवृत्त बुद्धिः संप्रदायः'** अशी व्याख्या आहे. उत्तम माता आहे, पिता आहे, आचार्य आहेत. अर्जुनाची स्वतःची बुद्धीही चांगली आहे. पण अशाही बुद्धीमध्ये मोठा दोष निर्माण झाला आहे. देवांपासून

मंत्रविद्या मिळालेली. पार्थाशिवाय दुसरा धनुर्धर नाही असा लौकिक. अशी परिस्थिती असतानासुद्धा बुद्धिबल गेल्याबरोबर सगळाच मोठा प्रसंग निर्माण झाला आहे. अर्जुनाला शब्दप्रमाणाचा उपदेश झाला. धर्मशास्त्राचा व्यावहारिक दृष्टीचा उपदेश केला, ' युद्ध करणार नाहीस. ही काही तुझी दया नाही. सर्व लोक अर्जुन भीतीने पळून गेला असे म्हणतील. तुझ्या दयेकडे कोणाचे लक्ष जाणार नाही.' हे सर्व व्यावहारिक दृष्टीने त्याला सांगितले. शेवटी विश्वरूप दर्शन झाल्यानंतर मात्र तो घाबरला आहे. "कोण आहात आपण, महाराज?" असे त्याने विचारले. त्यावेळी अर्जुनाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे भगवंतांनी दिली आहेत.

**कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धो लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः।**
**ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः।**

॥भ.गीता ११:३३॥

भगवान सांगतात -' मी काल आहे. सर्व लोकांचा संहार करण्याचा माझा संकल्प होऊन गेलेला आहे. युद्ध सोडून जायचे तर तू जा. तू जाऊ शकतोस. एक अर्जुन गेला म्हणून हे राहू शकतील अशी समजूत करून घेऊ नकोस. युद्धातून गेले म्हणजे हिंसा होणार नाही आणि पुण्य मिळेल असे वाटत असेल परंतु तुला काही लाभणार नाही. स्वधर्मत्याग केल्यामुळे तुला पापच लागणार आहे. आणि हे सर्व नाहीसे होणार आहेत हे ठरलेलेच आहे.' अशी ईश्वराची नियामक शक्ती.

अर्जुनासारखा, मोठा योद्धा त्याच्या बुद्धीमध्ये दोष उत्पन्न झाला. युद्ध करणार नाही असे तो म्हणतो आहे. तरीसुद्धा संकल्प होऊन गेलेला आहे. हा त्या पूर्णशक्तीचाच संकल्प आहे. त्या सर्व नियामक शक्तीच्या संकल्पामुळे युद्ध होऊन सर्वांचा विनाश झाला. आणि त्याच नियामक शक्तीच्या संकल्पामुळे उत्तरेच्या गर्भाचे रक्षण झाले - अशी दोनही प्रकारची उदाहरणे दिसून येत आहेत. ईश्वराचे दर्शन, ईश्वराचे ज्ञान सर्वलोकमहेश्वरम्

या रूपाने व्हायला पाहिजे तरच आपल्या मार्गावरून आपण जाऊ शकू.

भगवंताने विश्वरूप दाखविल्यामुळे अर्जुनाची बुद्धी ताळ्यावर आली आहे, विश्वरूप दर्शन का झाले याचे कारण कृपा ! एवढा मोठा योद्धा असूनसुद्धा ते रूप पाहिल्यावर घाबरून गेलेला आहे, त्याला पाहवेना ते विराट स्वरूप. **'दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम्'**, म्हणून भगवंतांनी साधन दिले. अशी अवस्था करूनसुद्धा बुद्धीमधील असलेल्या दोषामुळे, आणि मुळामध्ये अधिकार आलेला नसल्याने, अर्जुन घाबरून गेला आहे. **'द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम'** अशी, आधी जिज्ञासा व्यक्त केली आणि नंतर भयभीत होऊन आपले पहिले रूप मला दाखवा असे अर्जुन म्हणू लागला. विश्वरूप दर्शनासाठी आवश्यक असणारी बुद्धीची पूर्णता अर्जुनाजवळ नव्हती. ती बुद्धीची योग्यता होण्याकरिता त्याला कितीतरी प्रयत्न करायला पाहिजेत. **'बहूनां जन्मतां अन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते'** असे भगवंतांनीच सांगितले आहे. मग विश्वरूपदर्शन योग्यता नसताना कसे झाले, असा प्रश्न उपस्थित होतो. ईश्वराची कृपा हे त्याचे उत्तर आहे. 'मी प्रसन्न झाल्यामुळे माझ्या प्रसादाने तुला हे रूप दिसले आहे.' असे भगवान म्हणतात.

**'मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात्'**, भ.गीता ११:४७॥

शिष्यावर अनुग्रह करायची इच्छा आहे. त्याचे कल्याण व्हावे अशी इच्छा आहे. शिष्याची शक्ती नसताना स्वतःची अनुग्रह बुद्धी वापरून भगवंताने त्याला विश्वरूप दर्शन दिले आहे. बुद्धीची पूर्णता होऊन विश्वरूपदर्शनाची योग्यता येण्याकरिता कितीतरी प्रयत्न केले पाहिजेत हे आपल्याला दिसून येत आहे.

### कर्ता भोक्ता ईश्वर

भगवंताने अर्जुनाला **लोकमहेश्वर** हे आपले स्वरूप दाखविले आहे. आणि **'भोक्तारं यज्ञतपसां'** असेही सांगितले आहे. यात सगळा

कर्मयोग आलेला आहे. स्वतंत्र वैशिष्ट्यामुळे कर्मयोगात मानसिक उपासनेलाही स्थान आहे. यज्ञतपादी अनेक कामे आहेत. त्याचा भोक्ता ईश्वर आहे. अर्थात कर्ताही ईश्वरच आहे. कर्त्याशिवाय भोक्ता कसा येईल? कर्ता एक आणि भोक्ता वेगळा असे झाले तर सर्व अव्यवस्थाच होईल. कोणी कर्म करणार नाही. आपण कर्म करायचे आणि फळ दुसऱ्याने घ्यायचे ही आपत्ती आहे. बौद्धांनी सर्व क्षणिक मानले. सर्व म्हणजे आत्मासुद्धा. सर्वं क्षणिकं क्षणिकं प्रत्येक क्षणाला आत्मा बदलला. अहं, अहं, प्रत्येक वेळेला निराळा झाला म्हणजे एका अहंने कर्म करायचे दुसऱ्या अहंने भोगायचे. ही आपत्तीच आहे कोणी तरी एक स्थिर असला पाहिजे. अहंला तरी क्षणिक म्हणू नये. क्षणिकत्व सिद्ध होत नाही हा विचार मोठा आहे. भोक्ता ईश्वर आहे आणि कर्ताही ईश्वरच आहे. बुद्धीचे कर्तृत्व आहे, जीवाचे कर्तुत्व आहे. तथापि बुद्धीला प्रवर्तक अशी वेगळी शक्ती आहे. **'यो बुद्धेः परतस्तु सः'** भ.गीता ३:४२॥ बुद्धीच्याही पलीकडे एक श्रेष्ठ तत्त्व आहे. आणि सर्वही बुद्धीमध्ये त्याचा संबंध आहे. सर्व भूतांच्या बुद्धीमध्ये संबंध असलेले हे एक तत्त्व आहे. या सर्व बुद्धी-समष्टीला प्रेरणा त्या तत्त्वापासून मिळते आहे. अर्थात कर्तृत्त्व, बुद्धी यांना प्रवर्तक अशी शक्ती आहे हा एक विचार उत्पन्न झाला म्हणजे भोक्ता तो आहे. कर्ताही वस्तुत: तोच आहे. बुद्धितत्त्व आपण आपल्याकडे घेतल्यामुळे 'मी करतो' असे आपण समजतो. परंतु हे सर्वही कर्तृत्व ईश्वराचेच आहे. ही ईश्वरार्पण बुद्धी ज्या वेळेला निर्माण होईल त्या वेळेला सर्वही कर्म शुद्ध होते. पाप-पुण्य हा विभाग संपून जातो. हे एक ज्ञान आहे.

ईश्वराचे लोकमहेश्वर स्वरूप अशा प्रकारचे आहे. सर्व कर्मयोग त्यामध्येच अंतर्भूत होतो. बुद्धीच्या बलाने सर्व कर्म व्हायचे. बुद्धीच्या नियंत्रणाखाली सर्व इंद्रिये आहेत. देह आहे. बुद्धीच्या निर्णयामुळे बाकीची सगळी कार्ये होतात. हेही ज्ञान झाले पाहिजे.

आणि तिसरे ज्ञान म्हणजे, 'सुहृदः सर्वभूतानां' या ईश्वराच्या लोकमहेश्वर स्वरूपाचे ज्ञान, हे लोकमहेश्वर स्वरूप सर्वांना प्रेरक स्वरूप आहे. नियामक स्वरूप आहे. त्याचे ज्ञान कसे व्हायचे? त्याची कृपा व्हायची कशी? हे जे लोकमहेश्वर स्वरूप आहे ते भक्तियोगाला अत्यंत उपकारक असे स्वरूप आहे. कोणीही असो ज्याच्या अंत:करणामध्ये प्रेम आहे, भाव आहे, भावासक्ती आहे त्या सर्वही भूतांचा तो सुहृद आहे. परमात्मा स्वत:च उपकारी आहे. भक्ताकडून सर्वही साधने करवून घेणाराही आहे. भगवंताने अर्जुनाला स्वत:च आपण होऊन विश्वरूप दाखविले आहे. **'त्वमेव सर्वं मम देव देवः'** ही भावना बुद्धीमध्ये उत्पन्न होते ती यामुळेच. साधन आणि साधनांना लागणारी बुद्धी यांच्यामध्ये येणारी विघ्ने आहेत, प्रतिबंध आहे. त्यांचा निरास करणे ही सगळी कार्ये त्या एका परमात्मशक्तीच्या द्वारा चालू आहेत. 'सर्वही तोच आहे.' अशी बुद्धी साधकाची, भक्ताची ज्या वेळेला होईल त्या वेळेला त्याची बुद्धी परिपूर्ण बुद्धी झाली असे समजायला हरकत नाही.

प्रल्हादाला त्याच्या गुरुजींनी विचारले की तुला हरीचे भजन करायला कोणी सांगितले? त्याने उत्तर दिले की 'हे कोणी सांगून होत नाही. मी भजन करीत नाही. माझ्या बुद्धीला प्रेरणा करणारा जो चक्रपाणी आहे त्याच्या इच्छेने माझ्याकडून भजन होते. मी करीत नाही.' म्हणजे ही ईश्वरार्पण बुद्धी साधन करताना आपोआप निर्माण झाली आहे. ईश्वरानेच सर्व केलेले आहे. भजन तोच करीत आहे ही बुद्धीची परिपूर्णता. ईश्वराशी त्या ज्या बुद्धीचा संबंध आलेला आहे ती बुद्धी पूर्ण होते.

### पूर्णबुद्धीचे दर्शन

पूर्ण बुद्धी कशी असते, पूर्ण ईश्वर शक्तीचा संबंध आल्यावर बुद्धीची पूर्णता कशी होते, याचा गेले दोन दिवस आपण विचार केला. आज पू. धुंडामहाराजांच्या रूपाने पूर्णतत्त्वाशी संबंध असलेल्या पूर्ण बुद्धीचे प्रत्यक्षच

दर्शन होत आहे. यावत् जीव अखंड पूर्णतत्त्वाशी संबंध ज्या बुद्धीचा आहे ती बुद्धी कशी असू शकते, याचे धुंडामहाराज हे प्रात्यक्षिकच आहे. आज सभेला ते अध्यक्ष म्हणून आहेत. हा मोठा भाग्याचा योग आहे.

या भारतभूमीत मोठी मोठी पंडित मंडळी होऊन गेली. यात तर्कशास्त्रातील पंडित आहेत. वेदान्त शास्त्रातील पंडित आहेत, त्यांची स्वतंत्र अशी बुद्धी झालेली आहे. त्या बुद्धीमध्ये पूर्णता येण्याकरिता जो गुण आवश्यक आहे, ज्या पूर्णतत्त्वाशी, ईश्वरतत्त्वाशी संबंध आवश्यक आहे तो या प्रत्येक पंडिताच्या बुद्धीत दिसतो.

तर्कशास्त्रामध्ये गदाधर भट्टाचार्य हे मोठे प्रसिद्ध पंडित होऊन गेले. त्यांचा संप्रदाय सबंध भारतात आहे. न्यायशास्त्रात त्यांचेच ग्रंथ पढविले जातात. न्यायशास्त्रातील नवीन कठीण पदवी त्यांनी निर्माण केली. ती कशाने मिळाली, हे आपल्या ग्रंथात शेवटी त्यांनी सांगितले आहे.

**गिरीन्द्रदुहितुर्नमत् सुरवरावतंसी भवत्**
**पदांबुजरज:कृपाकलिततीक्ष्णधीसंपदा।**
**गदाधर-विनिर्मिता कठिण-तर्कदुर्गाटवी...**
**नवीनपदवी मुदं वितनुतां सदा धीपदा...**

सुरवर नित्य जिला नमस्कार करीत आहेत, त्या गिरींद्र दुहितेच्या पदकमलाच्या रज:कणांची कृपा माझ्यावर झाली. म्हणून मला ही तीक्ष्ण बुद्धिसंपदा मिळाली. अशी गदाधरांची धारणा आहे.

दुसरे न्यायपंडित जग़दीश यांचे ग्रंथही अभ्यासाला आहेत. त्यांचीही धारणा अशीच आहे. त्यांच्याही अंन्त:करणामध्ये परतत्त्वाबद्दल अत्यंत प्रेम आहे. शिवाय त्यांनी तर्ककर्कश बुद्धीही मिळविलेली आहे.

याच्याही पलीकडे आपण विचार केला तर मधुसूदन सरस्वतींचे स्मरण होते. मधुसूदन सरस्वती सभेत आले म्हणजे इतर सर्व मोठे पंडित घाबरत असत. अद्वैतसिद्धी ग्रंथ त्यांनी केला. त्याच्या आरंभीच त्यांनी

बुद्धी, श्रद्धा या विषयी लिहिले आहे.श्रद्धा आणि चिकित्सा यांचा समन्वय मधुसूदनांच्या ठिकाणी आहे. शास्त्र वाङ्.मयाचा अभ्यास पूर्ण केला आहे. काव्याचा अभ्यासही झाला आहे. अत्यंत प्रयत्नांनी अद्वैतसिद्धी केली असे ते म्हणतात.

**श्रद्धधानेन मुनिना मधुसूदनेन।**
**संग्रह्य शास्त्रनिचयं रचितानियत्ना**
**बोधाय वादि विजयाय च सत्वराणाम्**
**अद्वैतसिद्धिरियमस्तु मुदे बुधानाम् ।**

अद्वैतसिद्धी ग्रंथ रचनेचे फल काय आहे हे मधुसूदन सरस्वती सांगताहेत. बोध आपल्याला व्हावा अशी इच्छा करणारी माणसे आहेत. बुद्धीच्या अनेक तऱ्हा आहेत. लोकांमध्ये आपण आणखी बुद्धिमान ठरावे, यशस्वी ठरावे, सर्वांना निरुत्तर आपल्याला करता यावे - या इच्छेनेही अनेक लोक येतात. त्यांना या अद्वैतसिद्धीचा उपकार होतो. त्याच प्रमाणे ज्यांना खरा यथार्थ बोध करून घ्यावा, असे वाटते त्यांनाही अद्वैतसिद्धी उपकारक आहे. यात बुद्धीची योग्यता कशी असते हे मधुसूदन सरस्वतींनी दाखविले आहे.

मधुसूदन सरस्वतींनी अनेक ग्रंथ लिहिले. आक्षेपांचे खंडण केले, तरीसुद्धा काहींचे समाधान झाले नाही. त्यांचे आक्षेप पुन: पुन्हा येऊ लागले. त्या सर्वांना अखेरचे उत्तर लिहून ठेवले. इत:पर उत्तर देण्याची आवश्यकता नाही असे म्हणून स्वस्थ राहिले. बुद्धीचा असा उत्कर्ष संपादन करणाऱ्या मधुसूदन सरस्वतींची बुद्धी बुद्धीला पूर्णता देणाऱ्या पूर्णतत्त्वाशी संबंधित होती . ते सांगत :

**वंशीविभूषितकरान्नवनीरदाभात् पीताम्बरादरुणबिंबफलाधरोष्ठात्।**
**पूर्णेन्दुसुन्दरमुखादरविन्दनेत्रात् कृष्णात्परं किमपि तत्त्वमहं न जाने।।**

भगवद्गीतेवर मधुसूदन सरस्वतींचीही टीका आहे. ती टीका लिहीत

असताना एके ठिकाणी त्यांनी असा उल्लेख केला आहे. 'गीतेवर व्याख्या भाष्यकारांनीही (आद्य शंकराचार्यांनी) केलेली आहे. आणि मीही केलेली आहे. मीही गीतेचा व्याख्याता आहे आणि भाष्यकारही व्याख्याते आहेत. पण त्यांची माझी बरोबरी मात्र नाही. तुलेमध्ये एका बाजूला सोने व एका बाजूला गुंज घातलेली आहे. म्हणजे गुंज आणि सोने यांची बरोबरी झाली का? माझी सामान्य बुद्धी आहे' इतकी 'शाब्दे परे च निष्णात' अशी त्यांची परिपूर्ण बुद्धी आहे. शिवाय बुद्धीचा पूर्णतत्त्वाशी संबंधही आहे. पुन: विनीत भावही आहे. आचार्यांबद्दल अत्यंत आदरभाव आहे. '**थोरपण पऱ्हा सांडिजे। जे जगा धाकुटे होईजे।**' असे ज्ञानदेव म्हणतात त्या उक्तीनुसार मधुसूदन सरस्वतींचा हा बुद्धीचा उत्कर्ष आहे.

याप्रमाणे अनेक उदाहरणे सांगता येतील. बुद्धीमध्ये परिपूर्णता येण्याकरिता अनेक मंडळी बाह्य प्रयत्न करीत असतात. परंतु बुद्धीचा परतत्त्वाशी संबंध जोडण्यामुळे ईश्वराच्या कृपेने बुद्धीमध्ये काही न्यूनता राहिली असल्यास ती दूर होऊन बुद्धीची परिपूर्णता होते.

**सर्वगामी श्रीदत्तात्रेय**

श्रीदत्तात्रेयांच्या अवतारासंबंधी सद्‌गरु वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी श्रीदत्तात्रेयांची दिनचर्या एका ठिकाणी लिहून ठेविली आहे. कालमर्यादा या अवताराला नाही हे एक वैशिष्ट्य सांगितले. त्याचप्रमाणे श्रीदत्तात्रेय सर्वांचे गुरू आहेत. देवही त्यांचे शिष्य आहेत. दैत्यही-प्रल्हादासारखे, शिष्य आहेत. परशुरामांनाही त्यांनी उपदेश केला आहे. वसिष्ठासारखी मोठी मोठी तपस्वी सिद्ध मंडळीही त्यांच्याकडे येत आहेत. सगळ्यांना उपदेश केला आहे. श्रीदत्तात्रेय हे सर्वगुरुस्वरूप असल्याने त्याही दृष्टीने त्यांचे महत्त्व वर्णन केलेले आहे. सर्वही जीवांच्या बुद्धीची सुधारणा करण्याकरिता कार्य अखंड चालले आहे. ते कसे चालले आहे हे दाखविण्याकरिता त्यांची थोडी दिनचर्या दिलेली आहे.

**यस्यास्ति माहुरे निद्रा निवासः सह्यपर्वते ।**
**प्रातःस्नानं च गंगायां ध्यानं गंधर्वपत्तने ॥१॥**
**कुरुक्षेत्रे चाचमनं धूतपापेश्वरे तथा ।**
**विभूतिधारणं प्रातःसंध्या च करहाटके ॥२॥**
**कोल्हापूरेऽस्य भिक्षा च पांचलेऽपि च भोजनम्।**
**तिलको विठ्ठलपुरे तुंगापानं दिने दिने ॥३॥**
**पुराणश्रवणं यस्य नरनारायणाश्रमे।**
**विश्रामो रैवते सायंसंध्या पश्चिमसागरे ॥४॥**

ईश्वराचे गुरु स्वरूप योगिराज श्रीदत्तात्रेयांचा संचार प्रतिदिनी रोज आसेतुहिमाचल चालू आहे. त्यामुळे अनेक सद्भक्तांना मार्गदर्शनाचा लाभही होत आहे. अहर्निश चालू असणाऱ्या चित्तवृत्तींचा पूर्ण निरोध करता येणे हे कार्य श्रीदत्तात्रेयासारख्या महाविभूतींच्या सत्यसंकल्पानेच सहज साध्य होणारे आहे.

स्वतः सर्व निरीक्षण करायचे. कोण कोण साधन करीत आहे. कोणत्या साधकाच्या बुद्धीला प्रतिबंध झालेला आहे. त्यांच्या बुद्धीमध्ये सुधारणा कशी करायची आहे हे सर्व प्रत्यक्ष पाहण्याकरिता स्वतःचा सर्वत्र संचार आहे हे या श्रीदत्तात्रेयांच्या अवताराचे वैशिष्ट्य श्रीवासुदेवानंद सरस्वती महाराजांनी स्पष्ट केले आहे.

प्रयत्नाने बुद्धी परिपूर्ण होऊ शकते. परंतु त्या बुद्धीशी ईश्वरतत्त्वाचा संबंध जोडला गेला पाहिजे. त्याच्याकरिता योग्य मार्गदर्शक सद्गुरु मिळाले तर ते हा संबंध जोडून देऊ शकतात.

### बुद्धीविकासाची परिसीमा

पूर्ण बुद्धी विशालबुद्धी कशी असते, कशी होते हे भवत्पूज्यपाद श्रीशंकराचार्यांच्या चरित्रातील बालपणातील एक गोष्ट आहे, तीवरून स्पष्ट होईल. ही गोष्ट अनेकांना किंबहुना सर्वांना माहीत आहे. तरीही ती पुनः पुनः

वारंवार सांगावीशी वाटते. परिचित वस्तू जरी असली तरी अमर्याद प्रीती असेल तर ती वस्तू पुनः पुनः पाहिली तरी नवीन वाटते. भगवान श्रीकृष्ण द्वारेकेमध्ये आले आणि सगळी मंडळी श्रीकृष्णांना पाहायला आली. रोज श्रीकृष्ण जातात येतात मग सगळे काय पाहण्यासाठी आले आहेत? याला अनुलक्षून माघकवी म्हणतात :

**दिदृक्षमाणाः प्रतिरथ्यमेयर्मुरारिमारादनघं जनौघाः ।**
**अनेकशः संस्तुतमप्यनल्पा नवं नवं प्रीतरहो करोति....!**

असो. आचार्यांच्या बालपणातील कथा आहे. आचार्य तीन-चार वर्षांचे होते, कालटी या गावी राहणारे. जवळच पूर्णा नदी वाहते आहे. तीरावर एक देवीचे मंदिर आहे. आचार्यांचे पिताजी शिवगुरू हे रोज देवीची पूजा करण्याकरिता जात. रोज पूजा करून दुधाचा नेवैद्य दाखवायचे आणि परत आल्यावर मुलाला दूध आणून द्यायचे. मुलांनी आपले ते दूध घ्यायचे. एके दिवशी पिताजींना कामासाठी बाहेरगावी जाण्याचा प्रसंग आला. त्यांनी मुलाला सांगितले की बाळ, उद्या जाऊन तू जगदंबेची पूजा करून ये. आचार्यांना आनंद झाला. पिताजीबरोबर हेही एखादेवेळी जात असतील. पूजा पाहिलीही असेल. आईने पूजासामुग्री तयार करून दिलेली आहे. सगळे पूजा साहित्य घेऊन बालबुद्धीला अनुसरून अत्यंत शुद्ध अन्तःकरणाने बालशंकराने पूजा केली आहे - ज्ञान मिळाल्यानंतरसुद्धा बालबुद्धीने राहावे असे **'बाल्येन तिष्ठासेत्'** असे वचन आहे. देवीला स्नान घातले. अंग पुसले. हळदीकुंकू लावले. फुलांची माळ घातली. नीरांजन, उदबत्ती लावून ठेवलेली आहे. नेवैद्याचा दुधाचा प्याला पुढे ठेवलेला आणि प्रार्थना सुरू झाली - 'आईसाहेब दूध प्या आता.' अन्तःकरणात ईश्वरभावना आहे. त्यामुळे विलक्षण भावासक्ती, विलक्षण प्रेम आहे. साक्षात जगन्माताच या ठिकाणी आहे अशी बालशंकराची भावना आहे. नामदेवही असेच होते. ते म्हणतात, पंढरीची मूर्ती घडविली नाही. बसविली नाही. तो साक्षात पांडुरंग

आहे. त्याप्रमाणे साक्षात जगन्माता या ठिकाणी आहे अशा भावनेने आचार्य सांगताहेत -

आई, दूध प्या. पण दूध कसे घेणार आणि कोण घेणार? पाच मिनिटे झाली. दहा मिनिटे झाली. काही नाही. शेवटी आचार्य म्हणाले, माझ्या 'हातून चूक झाली असेल. मी अज्ञानी आहे. मला पूजाविधी माहिती नाही. पिताजींच्या आज्ञेमुळे मी आलो, त्यांना आज सवड नव्हती. एकदा चूक झाली म्हटल्यानंतर आपण माता आहात. मातेचा स्वभाव असा नसतो. चूक झाली म्हणून काय झाले? हे वात्सल्याला शोभणार नाही.' असे म्हणत बाल शंकर रडायला लागले. शेवटी बराच वेळ झाल्यानंतर जगन्माता प्रगट झाली. 'काय झाले बाळ? दूध प्यायचे म्हणतोस का? बरं घेते दूध' असे म्हणून दूधाचा प्याला घेऊन संबंध दूध पिऊन टाकले. बाल शंकराने ते पाहिले आणि तो जास्तच रडायला लागला. जगदंबा म्हणाली, 'अरे तू सांगितल्यामुळे सगळे दूध घेतले. मग आता रडायचे कारण काय?' त्यावर आचार्य बोलू लागले, 'आई, इतकं रडून उपाशी राहून सगळं दूध तुम्ही पिऊन टाकले. मी आजपर्यंत समजत होतो की माझी आई फार प्रेमळ आहे. तिचे माझ्यावर फार प्रेम आहे. रोज पिताजी पूजा करून यायचे व मला दूध द्यायचे. माझी आई सगळे दूध न पिता माझ्याकरिता थोडे तरी दूध मुद्दाम शिल्लक ठेवते आणि मला देते. आणि आज इतकं अर्धा तास रडून उपाशी राहूनही सगळं दूध तुम्ही पिऊन टाकले.' यावर काय उत्तर देणार जगदंबा? बालबुद्धी ती. काय सांगणार यावर? शेवटी जगन्मातेने बालशंकराला मांडीवर घेतले. आपल्या स्तनांतील दूध त्याला पाजलेले आहे. या दिव्य स्तन्यपानाने आचार्य तृप्त झाले. ते दूध नसून प्रत्यक्ष दिव्य ज्ञान उत्पन्न झालेले आहे. आचार्यांनी वर्णन केले आहे.

**तव स्तन्यं मन्ये धरणिधरकन्ये हृदयत:**
**पय: पारावार: परिवहति सारस्वतमिव।**
**दयावत्या दत्तं द्रविडशिशुरास्वाद्य तव यत्।**
**कवीनां प्रौढानामजनि कमनीय: कवयिता ॥**

आई हे तुझे स्तन्य म्हणजे दिव्य ज्ञान आहे. या दिव्य ज्ञानाच्या बलाने हा एक द्रविड बालक क्रांतदर्शी मोठ्या कवींनाही कमनीय ठरलेला आहे.

पूर्णता बुद्धीमध्ये उत्पन्न झालेली आहे. ही ईश्वराची कृपा आहे. आपले काही नाही. हा शेवटचा बुद्धिविकास आहे. आणि तोच खरा आहे. सर्वही संतांचे प्रयत्न यासाठीच चाललेले आहेत. बुद्धिविकासाला विशालबुद्धी होण्याला कारण म्हणजे जे सर्वही कर्तृत्व त्या ईश्वरशक्तीचा परिणाम आहे ही जाणीव अन्त:करणामध्ये आहे.

******

# अध्यक्षीय समारोप
# पू. श्रीधुंडामहाराज

*(पूजनीय श्रीदत्तमहाराजांच्या व्याख्यानमालेचा समारोप महाभागवत श्रीधुंडामहाराज देगलूरकर यांच्या अध्यक्षतेने झाला. श्रीधुंडामहाराजांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संप्रदाय अद्वैत यावर प्रत्ययकारी भाष्य केले.)*

पूज्य श्रेष्ठ श्रीदत्तमहाराजांचे महत्त्वाच्या विषयावर संरक्षित सुसंस्कृत विद्वत्ताप्रचुर अनुभूत असे विचार आपण ऐकलेले आहेत. पक्वान्नाचे जेवण झाल्यानंतर, आकंठ तृप्त होईपर्यंत, ढेकर येईपर्यंत जेवण झाल्यानंतर आपण वाढावे काय अशा अडचणीत मी सापडलो आहे. वेळ झालेलाच आहे. मी जास्त बोलू इच्छीत नाही. बोलण्याचे कारणही नाही. आपल्या महाराष्ट्रीय जेवणाची पद्धत आपल्याला माहीत आहेच की पक्वान्नाचे जेवण झाले तरी मागाहून ताकभात वाढायला सांगावा लागतो. त्याप्रमाणे वाढणारा आणतो. तो ऐच्छिक असतो. त्याचा आग्रह कोणी करीत नाही आणि कोणी नाही घेतला तरी वाढणाऱ्याला राग येत नाही. घेतला तर चांगलेच आहे. तर मी आपला दोनच मिनिटे वेळ घेईन, जास्त वेळ घेणार नाही.

**संप्रदाय**

ज्ञानेश्वर महाराज आणि दत्तसंप्रदाय असा विषय आहे. संप्रदाय या शब्दातून महत्त्वाचा अर्थ निघतो - सम्यक्प्रदान. आपल्याला त्याच्याकडून काहीतरी प्राप्त होणे त्याला संप्रदाय म्हटले जाते. अनेक संप्रदाय आहेत. संप्रदायाला विद्वानात, समाजात, भाविकांत मूल्य आहे. म्हणून आपल्याही विचाराला संप्रदाय हे रूढ नाव ठेवण्याची पद्धत रूढ झाली आहे. परंतु असे किती संप्रदाय आहेत याचा ऊहापोह मी करू इच्छीत नाही. करण्याचे कारण नाही. आपल्याला ते माहीतच आहे.

त्यांना संप्रदाय म्हणावे की म्हणू नये हा वादग्रस्त प्रश्न आहे. त्यांनी मला काही दिले आहे का? त्यांनी काही प्रदान केले आहे का? केले असेल तर सम्यक् आहे का? सम्यक् या शब्दाचा अर्थ काय की जे बाधित पाहिजे संदिग्ध पाहिजे, जे अज्ञात असले पाहिजे. पण लक्षात ठेवा मला कळले पाहिजे. जगतात असे काही पदार्थ आहेत. अज्ञात आहेत पण प्रयोजनशून्य आहेत. कावळ्याला दात किती? मोजून करायचे काय? अज्ञात आहे, प्रयोजनरहित आहे. उपयोग नाही. भूक लागली की जेवायचे सर्वांना कळते. त्याच्याकरिता सांगण्याचे कारण नाही. अज्ञात पण प्रयोजनवत पाहिजे. ते मला न कळले पाहिजे पण कळण्याची गरज पाहिजे हे लक्षात ठेवा.

रोग्याला औषध कळत नाही पण त्याला गरज आहे. ते कळते वैद्याला. पण गरज आहे रोग्याला. नवीन शब्द वापरू का? 'विकेंद्रीकरण' गरज आणि ज्ञान हे जेव्हा भिन्न केंद्रात जातात तेव्हा ते बाधक असते. वैद्याच्या केंद्रात ज्ञान आहे व रोग्याच्या केंद्रात गरज आहे. ज्याला गरज आहे त्याला ज्ञान नाही. ते वैद्याजवळ असते. त्याला गरज नसते. त्याचे पोट दुखत नसते असे विकेंद्रीकरण जेव्हा होते, तेव्हा काय व्हावे लागते तर वैद्याचे ज्ञान व रोग्याची गरज एका केंद्रात यावे लागते. सगळ्याच गोष्टीचे विकेंद्रीकरण होणे बरे नाही, असे मला वाटते. सत्तेचे व्हावे न व्हावे हा मोठा राजकीय प्रश्न आहे, मी त्यात पडत नाही. पण घराघरांमध्ये, बाप-मुलगा, भाऊ-भाऊ, मित्र-मित्र यांच्यात विकेंद्रकीरण होऊ नये असे मला वाटते. गुरुशिष्य एककेंद्री राहावेत अशी सर्वांची भावना आहे. असो. तेव्हा काय व्हावे लागते, वैद्य तरी रोग्याकडे आला पाहिजे नाहीतर रोगी तरी वैद्याकडे गेला पाहिजे. आम्हाला ज्याची गरज आहे जीवनात. आताच आपण साधन काय किंवा साध्य काय हे ऐकले. 'ज्ञात्वा मन:शांती' हिची सर्वांना गरज आहे. पण ज्ञान नाही. संसारात शांतीची गरज आहे पण

ज्ञात्वा नव्हे भोक्त्वा-भोगात शांती आहे. गीता सांगते - त्यागात शांती आहे. संसारात भोगान् लब्ध्वा. एका भोगलब्धतेने तृप्ती होत नाही. असा तो विषय आहे. याकरिता संप्रदायाची गरज आहे. जे आपल्याला हवे आहे, ज्याची जीवनात गरज आहे. नव्हे, खरी गरज आहे. जीवनातील जीवनत्व ज्यावर अवलंबून आहे. जीवनाचे जे अंतिम साध्य आहे. नव्हे जीवनाचे जे मूल्य आहे. तत्त्वज्ञान म्हणजे काय? जीवनाचे अंतिम आणि शाश्वत मूल्य जाणणे हे जाणणारी बुद्धी आहे. गीतेत अनेक वेळेला बुद्धी या शब्दाचा अर्थ अनेक अर्थाने अनेक वेळेला केला जातो. म्हणजे बुद्धीचे महत्त्व संसारातही आहे आणि परमार्थात तर अधिक आहे. हे लक्षात ठेवा.

भावना म्हणजे एक प्रकारची सुसंस्कृत बुद्धी. भावना बुद्धीला सोडून नाही. बुद्धीचेच हे एक स्वरूप आहे. बुद्धी सुसंस्कृत होणे आवश्यक आहे. वृत्तिशून्य अवस्था - ज्याला निर्विकल्प अवस्था म्हणतो याचा उल्लेख दत्तमहाराजांनी आपल्या व्याख्यानात केला आहेच. वृत्तिशून्य म्हणजे काय? वृत्तीचा लय नाही, वृत्तीचा नाश नाही, वृत्तीचा बाध, वेदान्तशास्त्रात लय, नाश आणि बाध यांच्या वेगवेगळ्या व्याख्या आहेत. लय नाशामध्ये प्रतियोगी कारण असते. हे शास्त्र मी येथे सांगू नये. माझा अधिकार नाही. न्यायशास्त्राच्या अशा प्रक्रिया आहेत. वृत्ती ही एक वेगळी स्वरूपस्थिती आहे. वृत्ती परमात्मस्वरूपात वेगळी नाहीच आहे. मी वृत्तीचा लय करतो म्हटले की वृत्ती मानली जाते त्या वृत्तीचे स्वरूप मानावेच लागते. बाध करतानादेखील आद्य स्वरूप मानावेच लागते. नाही असे नाही. परंतु वास्तवरूपाने मानण्याचा अधिकार नाही आहे. तेव्हा वृत्तीशून्य स्थिती होण्याकरितादेखील वृत्ती नष्ट करणे, टाकणे, तेवढ्याने वृत्ती शून्य होत नाही. वृत्ती सूक्ष्म सूक्ष्म करीत करीत शून्यत्वाला प्राप्त होते आहे. त्या प्रकारची वृत्ती म्हणजेच बुद्धी.

वृत्ती आणि बुद्धी हे शब्द वेगळे आहेत. पण त्यांत भेद नाही. थोडासा प्रकार केला तर वेगळा पण स्वरूप वेगळे नाही आहे. तो बुद्धीचाच एक भाग आहे. तेव्हा बुद्धी जितकी जितकी सूक्ष्म करीत जाल तितकी तितकी ती वृत्ती शून्यत्वाला प्राप्त होते. लहानपणी मुलाला पेपरमिंटची गोळी दिली जाते. ती गोळी तो खात असतो मुलगा. गोळी फोडली तर तिची गोडी मिळणार नाही. गोडी मिळते खाता खाता. तिचे रंग बदलत जातात. बदलत असताना ती हळूहळू लहान होत जाते. सगळ्यांचेच लहानपणचे अनुभव आहेत. बहुधा सगळ्यांचेच असावेत असे वाटते. शेवटी तिचें आकार, रंग, वेगवेगळे बदलत शेवटी ती जिरून जाते, एकरूप होते. तसेच वृत्तीचे आहे. एकेका कोषापासून, एकेका उपाधीपासून, एकेका विषयापासून त्या वृत्तीला विचाराने सूक्ष्म बनवीत बनवीत वृत्तीचा लय होतो हे तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे कार्य आहे. ज्ञानेश्वरांनी हेच सांगितले. श्री दत्तात्रेयांनीही हेच कथन केले.

**ज्ञानेश्वर, दत्तात्रेय आणि अद्वैत**

दोन संप्रदाय वेगळे आहेत असे मानायला मी तयार नाही. कारण ज्ञानेश्वरमहाराज अद्वैती होते. दत्तात्रेयांचे तत्त्वाज्ञान अद्वैत आहे. अद्वैत दोन आहेत म्हणणे म्हणजे ते द्वैतच झाले ना? त्याचा अद्वैत वेगळा आणि याचा अद्वैत वेगळा म्हणजे याला काय म्हणणार आपण? ज्याचे पर्यवसान द्वैतात होते त्याला अद्वैत म्हणणे म्हणजे शब्दांची विटंबना करणे आहे. अद्वैत म्हणजे एकमेवाद्वितीयम् ! जिथे द्वैताचा बाध आहे. अशी जी स्थिती आहे तीच अद्वैतस्थिती खरी आहे. मधुसूदनांनी एके ठिकाणी म्हटले आहे की त्यांना एकाने विचारले, 'अद्वैत सिद्ध करता का?अद्वैत सिद्ध करावे लागते का?' त्यांनी सरळ सांगितले की, जे सिद्ध केले जाते त्यात अद्वैत नसते. सिद्ध केले जाते ते सिद्ध, साध्य, साधन या द्वैतात सापडते. अद्वैत सिद्धच आहे. फक्त आम्ही वर आलेल्या द्वैताचा आभास दूर करतो.

विचाराने. तेवढ्याकरिता आमच्या उपपत्ती आहेत. युक्ती आहेत. तर्क आहेत. आणि प्रमाण आहेत. गुरूदेखील तेच करतात. दोघांचेही तत्त्वज्ञान एकच.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या अभंगातून दत्तात्रेयांचे वर्णन आहे.

**पैलमेरुच्या शिखरी । एक योगी निराकारी ।**
**मुद्रा लावुनि खेचरी । ब्रह्मपदी बैसला ॥१॥**
**तेणे सांडियेली माया । त्यजियेली कंथाकाया ।**
**मन गेले विलयां। ब्रह्मानंदा माझारी ॥२॥**
**अनुहतध्वनि नाद । तो पावला परमपद।**
**उन्मनी तुर्या विनोदे। छंदे छंदे डोलतुसे ॥३॥**
**ज्ञान गोदावरीच्या तीरी । स्नान केले पांचाळेश्वरी ।**
**ज्ञानदेवांचे अंतरी । दत्तात्रेय योगीया ॥४॥**

अशा रूपाने वर्णन केले आहे. एकनाथांचा तर आमचा दत्तसंप्रदायच होता. त्यांनी आपल्या ग्रंथातून सांगितले आहे. दत्तात्रेय दत्तात्रेय म्हणजे काय? जिथे तीन गुणांचा योग्य समन्वय झाला. समन्वय तेव्हाच होतो. त्याचाच होतो ज्याचे ते अधिष्ठान, उपादान, उपाधी आहे. त्याच्यात वेदान्ताचा सिद्धांत आहे. समन्वय म्हणा, लय म्हणा, बाध म्हणा, हा कार्याचा कारणात होतो. व्यवहारामध्ये आपल्या ठिकाणी तीनही गुण आहेत म्हणून सगळे काही दत्तात्रेय होत नाहीत. सर्व गुण रज, तम, सत्त्व या तीन भावांनी मोहीत आहेत. सगळे गुण सगळ्यांच्या ठिकाणी आहेत. पण समन्वय नाही. समन्वय तिथेच होतो त्याचे जे अधिष्ठान आहे त्यात. म्हणून स्वत: ब्रह्मा, विष्णू, शिव हे आपापल्या बाह्य रूपांचा परित्याग करून एक रूपाने अवतरले, त्यांनी सांगितले आमचा एकच संबंध आहे ; बाहेरची ही उपाधी सोडा, रंग सोडा.

जसा सूर्याच्या तेजात सगळ्या रंगांचा समन्वय असतो असे विज्ञान सांगते. सगळे रंग सूर्याच्या एका तेजात एकरूप असतात. तसे एका परमात्म स्वरूपामध्ये गुण आणि गुणमय भाव या सर्वांचे ऐक्य राहाते आणि ते ऐक्य तेथेच होते. जरी अनेक नद्या असल्या तरी त्यांचा समन्वय सागरातच होतो. इतरत्र होत नाही. त्याप्रमाणे सर्व गुणांचा समन्वय सर्व गुणातीत असणारा परमात्मा त्याच्या ठिकाणी होतो. म्हणून गीतेमध्ये गुणरहित शब्द वापरला नाही. गुणातीत शब्द वापरला. गुणरहित वेगळा व गुणातीत वेगळा. परमात्माही गुणातीत आहे. ज्ञानी पुरुषही गुणातीत आहेत. हे केव्हा दिसते? गुणात राहूनच गुणातीत होता येते हे सर्वच संतांनी आपल्याला शिकविले. शेवटी आपल्यालाही गुणातीत व्हावसं वाटतं.

मनुष्य जर विचार करू लागला तर शेवटी काही वेळेला त्याला तमोगुणाचा कंटाळा येतो. बहुतेक येतो असे मला वाटते. क्रोधी अत्यंत क्रोधी, जमदग्नी जरी असला तरी पण त्याला आपल्या तमोगुणांचा कधीतरी कंटाळा येतो. काही वेळेला रजोगुणाचा कंटाळा येतो. याचा विस्तार करण्यासाठी मी आपला जास्त वेळ घेऊ इच्छित नाही. काही वेळेला सत्त्वगुणाचाही कंटाळा येतो. मी असा काय बसलो आहे वेड्यासारखा? कुटुंब काय म्हणते आहे? तिकिटे अजून आणली नाहीत सिनेमाची? मी असे बसणे योग्य आहे का? याचा अर्थ असा की कोणीही त्रिगुणातीत होतो असे समजू नका. कारण कोणता ना कोणता एक गुण बाधित झाला की त्याची जागा दुसरा गुण पकडतो. पटकावतो. शेवटी आपण कोणत्या ना कोणत्या गुणातच असतो. बाकीचे गुण पाठराखीपणा करीत असतात. कारण केव्हा न केव्हा त्यांनाही पुढे यायचे आहे. एखाद्या मंचावर एखादा वेषधारी कार्यकारी कार्य करीत असताना मध्ये जरी गेला तरी तो लोप होऊ शकत नाही, कारण दुसऱ्या प्रवेशात त्याला यावेच लागते.

आपला हा गुणांचा बाजार आहे. पण आपल्याला कंटाळा येतो त्याअर्थी ते बाधक आहेत, म्हणूनच कंटाळा येतो. परंतु ती बाधकता दूर करण्याच्या साधनांचे ज्ञान, आणि त्या बाधकतेचे प्रमाणजन्य ज्ञान आपल्या जवळ नसल्याने आपण पुन्हापुन्हा त्याला कवटाळीत असतो. आपल्यालादेखील आपण गुणातीत व्हावे असेच वाटत असते. अव्यवहार्य बोध आपल्याला व्हावा, अकर्मप्राप्त बोध आपल्याला व्हावा, त्या भूमिकेत आपणही असावे आपणही स्थितप्रज्ञ असावे, गुणातीत असावे असे विचारी मनाला वाटते. पण ते साधण्याकरिता जे साधन करायचे ते साधन योग्य प्रमाणात सम्यक्‌रूपाने प्रमाणरूपाने ज्यांच्याकडून मिळते त्याला संप्रदाय म्हणतात. तो संप्रदाय दत्तात्रेयांनी रूढ केला आहे, नव्हे अनादीच आहे. जो त्यांनी प्रकट केला तोच संप्रदाय सर्व साधुसंतांनी आपापल्या रूपाने प्रगट केला. कोणत्याही संप्रदायाचे स्वरूप सांगितले तरी आरंभ 'नारायणम् पद्‌मनाभम्' इथून तरी असेल नाहीतर, 'आदिनाथ गुरू सकळ सिद्धाचा,' इथून तरी असेल. दत्तात्रेयाच्या रूपात या दोघांचा समावेश आहे. सर्वांच्या समुच्चयरूपाने तो अवतार आहे.

सर्व संप्रदायांचा उगम जिथून होतो आहे तीच एक स्वरूपस्थिती, की ज्या स्वरूपस्थितीमध्ये त्रिगुणाची साम्यावस्था आपल्याला अनुभवाला येते आणि जी स्वरूपस्थिती ज्याच्याद्वारे शब्दाने प्रगट होते, त्याला संप्रदाय असे म्हणतात. असा संप्रदाय एकच असतो. कदाचित नामभेद जरी असला तरी त्यात तात्पर्यभेद, प्रयोजनभेद, साधनभेद नसतो. तीच साधने सर्व साधुसंतांनी सांगितली आहेत. त्या साधनांत भेद नाही आहे. शेवटी सर्वांनी हेच सांगितले की 'बुद्ध्या विशुद्धया युक्त्या' खरा संप्रदाय साध्याला मूल्य देतो. साधनात त्याचा आग्रह नसतो. कारण साध्याविषयी पूर्ण निश्चिती झाली आणि जर जिज्ञासा निर्माण झाली तर कोणतेही साधन केल्याशिवाय साधक राहातच नाहीत.

दत्तात्रेयांची एक कथा आहे. एका गृहस्थाला, भक्ताला वाटले की दत्तात्रेयांचे आपल्याला एकदा दर्शन व्हावे, भेट व्हावी. त्याने एका सत्पुरुषाला विचारले की महाराज दत्तात्रेयांची माझी भेट कशी होणार? सांगितले त्याला म्हणाले "तुला खरी जिज्ञासा आहे का? ते कोल्हापूरला दुपारी येत असतात. दर्शनाला, तू तिथे जा." "पण ते मला ओळखू कसे येतील ?" काही नाही. एक लिंबाची डहाळी हातात घेऊन दरवाज्यात उभा राहा आणि कोणालाही विचार येणाऱ्या-जाणाऱ्यास, 'का हो ही डहाळी कशाची आहे ?' तो म्हणेल, 'लिंबाची'. तू म्हण, 'लिंबाची नाही आंब्याची.' 'मूर्ख आहेस' म्हणाला तर 'जा' म्हणावं. आणि जर कोणी तू आंब्याची म्हणाला असता, 'बरं, आंब्याची' म्हणाले तर तेच दत्तात्रेय असं समज. त्याप्रमाणे तो उभा राहिला. ही कथा चांगल्या श्रेष्ठांच्या मुखाने ऐकलेली आहे. त्याने पाहिले. येणाऱ्या-जाणाऱ्यास विचारले " का हो हे कशाचं डहाळं आहे?" "अरे, लिंबाचं आहे," नाही हो आंब्याचं आहे. "मूर्ख कुठला ! ब्रह्मदेवदेखील आंब्याचं करू शकत नाही." वादाला सुरुवात झाली. बरं नमस्कार. पुढे असे जो तो भेटतो त्याला त्याने सांगितले. शेवटी त्याचे भाग्य म्हणा, संतांची कृपा म्हणा, दत्तात्रेयांची स्वारी आली. त्यांनाही विचारले. कोणत्या रूपात, वेशात होते कोण जाणे! "महाराज, हे डहाळं कशाचं आहे?" "अरे लिंबाचं." "नाही आंब्याचे," बरं आंब्याचे आहे. कवणे विषयी चित्ता आग्रहो नाही त्यांनी सांगितले, "तू आंब्याची म्हटलं म्हणून काही बदल होत नाही. मी लिंबाचे म्हटले म्हणून लिंबाचे होत नाही. अनादि सिद्ध आहे. तुझ्या माझ्या म्हणण्याने त्यात काही बदल होत नाही."

तत्त्वज्ञान तेच असते. ते कोणाच्या आग्रही वृत्तीने, कोणाच्या आक्षेपाने, कोणाच्या बुद्धिचातुर्याने, कोणाच्या शंका-समाधानाने, कोणाच्या खंडण-मंडणाने ते तत्त्वज्ञान बदलत नसते. जे बदलत असते ते तत्त्वाचे

अज्ञान तरी ठरेल नाहीतर अतत्त्वाचे ज्ञान तरी ठरेल. काहीतरी ठरेल. तेव्हा असे न बदलणारे तत्त्वज्ञान जे महात्मे सांगतात त्यांचाच एक विशिष्ट संप्रदाय तयार होतो. डोळे झाकून त्यांच्यामागे जावे. विचार तर करावाच करावा. पण ते भ्रमप्रमादादीदोषरहित आहेत. स्वार्थरहित, लोभरहित आहेत. जगत्कल्याण हेच त्यांचे ध्येय आहे. त्यामुळे ते आपल्याला पटवून देतात. अशा भावनेने त्यांची कास धरावी. त्यांच्याकडून जीवनाचे अंतिम व शाश्वत मूल्य ओळखावे एवढीच माझी एक सद्भावना आहे. आपण श्रीदत्तमहाराज कवीश्वरांच्या मुखाने श्रेष्ठ तत्त्वज्ञान ऐकले आहे. मी काही अधिक बोलू शकत नाही. त्यांचा शिष्य प्रशिष्यदेखील शोभण्यासाखा नाही. मी माझी योग्यता ओळखून आहे. पण एवढचं समाधान आहे. आनंद वाटतो '**मला सज्जनी आपुला म्हणितला.**' त्यांनी मला आपला म्हटलं यात मला समाधान आलं! माझं सर्वस्व आलं. मी आपला अधिक वेळ घेतला याबद्दल मी आपणा सर्वांची क्षमा मागतो आणि मला चार शब्द इथे बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी श्री. प्राचार्यांचे आभार मानतो आणि माझे चार शब्द समाप्त करतो.

*****

# साधकांचे पाथेय


॥श्री॥

॥सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म॥


**वक्तारमासाद्य यमेव नित्या सरस्वती स्वार्थमन्वितासीत्।**
**निरस्तदुस्तर्ककलंकपंका नमामि तं शंकरमर्चितांघ्रिम्।**

अंबरीषवरद भगवान श्रीहरीच्या प्रेरणेने आज या ठिकाणी आचार्य जयंती उत्सव सुरू झालेला आहे. भगवान शंकराचार्यांचा जन्म बाराशे वर्षांपूर्वी झाला असा एक कालनिर्णय प्रकार आहे. त्याला अनुसरून हा बाराशे वर्षांनंतरचा जयंती उत्सव ठिकठिकाणी साजरा केला जातो आहे. प्रतिवर्षी आचार्यजयंतीचा उत्सव दक्षिण प्रांतामध्ये विशेष प्रकाराने होत असतो. संपूर्ण जगाला मार्गदर्शन करणारी व्यक्ती विभूतीरूप भगवत्पाद आहेत. त्यांचा त्याग, ज्ञान, संकल्पशक्ती हे सर्वच पाहण्यासारखे आहे. अल्पवयामध्ये संपूर्ण उपनिषदांचा अभिप्राय त्यांनी जगापुढे मांडलेला आहे. भगवद्गीता उपनिषदांचाच सारांश म्हणून भगवंतांनी सांगितली. त्या भगवद्गीतेवरही आचार्यांचे भाष्य आहे. भगवद्गीता उपनिषदांवर भाष्य लिहिले. वेदव्यास महर्षींनी उपनिषद्वाक्यांचा अर्थ सांगण्याकरिता सूत्ररचना केली. त्या सूत्रांवरही भगवत्पाद आचार्यांचे भाष्य झालेले आहे.

'**ज्ञानमार्ग** म्हणजे काय?' त्याची साधने काय आहेत? कोणाचे ते ज्ञान आहे? त्याचे फल काय आहे? त्याला विरोध संभवनीय आहे किंवा नाही? असे अनेक विचार आचार्यांनी सूत्रभाष्यामध्ये दाखविलेले आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये परंपरेने चालत आलेले श्रुतीप्रमाणे हे मुख्य प्रमाणच



आद्य शंकराचार्य



प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

आहे. या श्रुतीप्रमाणांचे, श्रुतिपरंपरांचे अर्थ कसे करावे याबद्दलही वाद आहे. ते श्रुतिवाक्यांचे आणि उपनिषद्‍वाक्यांचे अर्थ एकत्रित केले, व्यवस्थित केले हा एक प्रकार सूत्रकारांनी दाखविला आहे. आचार्यांनीही दाखविला. त्या श्रुतिवाक्यांचे स्पष्टीकरण केले. त्यानंतर दुसरा प्रकार, तर्कप्रमाण ज्याला म्हणतात तो युक्तिवाद आहे. तर्क हे स्वतंत्र प्रमाण नाही. पण त्या तर्काला अनुसरूनही विचार केलेला आहे. प्रमाणशास्त्र ज्याला म्हणतात ते तर्कशास्त्र स्वतंत्र आहे. त्या प्रमाणशास्त्राला अनुसरूनही विचार केलेला आहे. श्रुतिवाक्याचा कोणता अर्थ योग्य आहे किंवा नाही हे दाखवून दिले. शेवटचे प्रमाण म्हणजे अनुभवात्मक प्रमाण. हे सर्वसाधारण नाही. विद्वानांचा, ज्ञानी महात्म्यांचा अनुभव हा एकरूपच असतो एवढेच प्राचीन तत्त्वज्ञ सांगतात.

**कृष्णो भोगी शुकस्त्यागी नृपौ जनकराघवौ।**
**वसिष्ठः कर्मनिरतः सर्वे ते ज्ञानिनः समाः।**

बाह्य आचार, बाह्यक्रिया कदाचित वेगळ्या दिसत असतील परंतु ज्ञान या दृष्टीने सर्वांचे सारखेच आहे. ते सर्वांना अवगत होणार नाही. उपनिषदांचा अर्थ काय आहे ते सांगण्यासाठी वरील तीनही विचारांचा अनुभव घेऊन आचार्यांनी सिद्धांत मांडले आहेत. उपनिषदातील सिद्धांत आचार्यांनी स्वतंत्रपणे आपल्या बुद्धीने केलेलेच नाहीत. स्वतंत्र बुद्धिवादाला भारतामध्ये विशेष महत्त्व नाही. **'श्रुतिमतस्तर्कोऽनुसंधीयताम्'** असे आचार्यांनीच सांगितले आहे. स्वतंत्र तर्काला त्याची योग्यताच नाही. तर्क थांबत नाही. तो अप्रतिष्ठित तर्क आहे. या दृष्टीने केवळ तर्काने निर्णय होणे अशक्य आहे.

**श्रोतव्यः श्रुतिवाक्येभ्यः मन्तव्यश्च उपपत्तिभिः।**
**आत्मा च सततं ध्येयः एते दर्शनहेतवः॥**

**आत्मदर्शन** होणे हे मुख्य साध्य आहे. साक्षात्कार हा बुद्धीने, मनाने

आत्मस्वरूपाचा होतो. शब्दांनी साक्षात्कार होतो असाही एक विचार आहे. त्या परमात्मतत्त्वाचा साक्षात्कार होऊ शकतो आणि त्या साक्षात्काराची साधने आचार्यांनी सांगितलेली आहेत. **साधनाध्याय** म्हणून स्वतंत्र अध्याय ब्रह्मसूत्रामध्ये आहे. कोणकोणती साधने आहेत हे त्यांनी सांगितलेले आहे. तर, **उपनिषद्वाक्यांनी परमात्मतत्त्वाचे प्रतिपादन केलेले आहे.** हा सिद्धांत आचार्यांचा आहे. इतरही काही सिद्धांत उपनिषदांनी सिद्ध होतात असे इतर वाद्यांचे मत आहे. परंतु जे प्रमाण म्हणून आहे, त्या प्रमाणाचा प्रतिपाद्य विषय परमात्मा आहे असे वेदान्त सांगतो. त्या परमात्म्यालाच परब्रह्म म्हणतात. त्याचेच प्रतिपादन उपनिषदात आहे. तेथे सृष्टीचाही विचार केलेला आहे, पण तो प्रासंगिक आहे. आत्मतत्त्वाचे प्रतिपादन करणे, आत्मतत्त्वाचा विचार करणे याकरिता आरंभाला सृष्टिविचार आलेला आहे. अध्यारोप-अपवाद न्याय त्यांनी त्याचकरिता मांडलेला आहे. सृष्टीची रचना कशी झाली हे सांगून, विलय कसा होतो ते सांगितले आहे. सर्वही उपनिषदांचा प्रतिपाद्य विषय परमात्मा आहे. हा सिद्धांत आचार्यांनी मांडलेला आहे. एक अद्वितीय आत्मतत्त्व आहे. इतर जे काही दृश्य आहे त्या दृश्याची व्यवस्थाही त्यांनी लावलेली आहे. उपनिषदांमध्ये सांगितल्याप्रमाणे द्वितीय काहीच नाही. **एकं, एव, अद्वितीयं** अशा तीन शब्दांनी अद्वैतसिद्धांत सांगितलेला आहे. सजातीय कोणी नाही, विजातीय कोणी नाही, स्वगत भेद नाही. सर्वभेदरहित अशा प्रकारचे एक तत्त्व जगामध्ये आहे. हा सिद्धांत अनुभवाला येण्याकरिता इतर जे दृश्य आहे किंवा दिसते आहे त्या दृश्याचे स्पष्टीकरणार्थ दोन भाग सांगितले आहेत. जग आहे आणि जगाला पाहणारा जीवात्मा आहे. दृश्य आणि द्रष्टा हे द्वैत जर अनुभवाने सिद्ध होणारे आहे, प्रमाणाने सिद्ध होणारे आहे, तर अद्वैत कसे होऊ शकते त्यासाठी त्यांनी विचार केलेला आहे.

जगत् कोठून उत्पन्न झाले, कसे उत्पन्न झाले त्याचा विचार **उपनिषत्प्रमाणाला** धरून केलेला आहे. केवळ आपल्या बुद्धीने, कल्पनेने किंवा इतर काही अशा प्रकारांनी जगाचा विचार त्यांच्यापुढे नाही. मुख्य प्रमाण हे श्रुतिप्रमाण आहे. त्या श्रुतिप्रमाणाबद्दल काही असंभावना किंवा ब्रह्माचे, परमात्म्याचे निरूपण करताना परब्रह्म, परमात्मा आहे किंवा नाही एक संदेह आहे ना! वेदान्त शास्त्र म्हणजे परमात्म्याचा विचार करणारे शास्त्र आहे. हे पूर्ण शास्त्र आचार्यांनी सांगितले. त्यांच्या पूर्वीही ग्रंथ निर्माण झालेले होते. आचार्यांनी त्या शास्त्राची मांडणी व्यवस्थित करून दिली आणि श्रुतिवाक्यांचा, उपनिषद्वाक्यांचा अर्थ कसा करावा ती पद्धतीही त्यांनी सांगून ठेवलेली आहे.

वाक्यांचा अर्थ कसा करावा याबद्दल स्वतंत्र **वाक्यशास्त्र** म्हणून, दर्शनांमध्ये **मीमांसाशास्त्र** ज्याला म्हणतात, ते झाले. **पदशास्त्र** हे **व्याकरणशास्त्र** झाले. परंतु संपूर्ण वाक्याचा विचार कसा केला पाहिजे म्हणजे तो बरोबर होऊ शकेल याच्याकरिता स्वतंत्र **मीमांसापद्धती जैमिनी महर्षींनी दाखवून दिली**. त्याच पद्धतीचे अवलंबन आचार्यांनी वेदान्तवाक्यांचा अर्थ करताना केलेले आहे. वेदान्तशास्त्र वाक्यशास्त्रच आहे. मीमांसाशास्त्रसुद्धा वाक्यशास्त्रच आहे. वेदवाक्यांचा अर्थ कसा करावयाचा? शब्द हे प्रमाण असले तरी शब्दांचा, वाक्यांचा कसा अर्थ केला म्हणजे योग्य ठरेल, पूर्वापर त्याला काही विरोध होणार नाही हा सगळा विचार त्या वाक्यशास्त्राच्या पद्धतीमध्ये त्यांनी दाखविलेला आहे. तीच पद्धती वेदान्तवाक्यांचा विचार करताना त्यांनी घेतलेली आहे.

वाक्यशास्त्राचा आधार घेऊन **प्रमाणशास्त्र म्हणून जे आहे ते न्यायशास्त्र आहे**. **'प्रमाणैरर्थपरीक्षणं न्यायः।'** प्रमाणे जी आहेत त्यांनी अर्थपरीक्षण करावयाचे, कोणता अर्थ योग्य आहे, कोणता अयोग्य आहे ते ठरवावयाचे. एकंदर, पदार्थ विचार करण्याकरिता जे प्रमाणशास्त्र ते

न्यायशास्त्र. त्याचाही आश्रय आचार्यांनी काही ठिकाणी घेतलेला आहे. अनुमानशास्त्राची मांडणी न्यायशास्त्रकारांनी फार उत्तम रीतीने केलेली आहे.

सद्‍हेतू कोणता, हेत्वाभास कोणता, त्याने कोणकोणते दोष होतात, प्रतिबंध म्हणजे, अनुमिति-ज्ञान उत्पन्न होऊ न देणारे प्रतिबंधक कोणते दोष आहेत? विचार करताना विचारात कोणकोणते दोष निर्माण होणे शक्य आहे? कोणत्या दोषामुळे तो विचार चुकीचा ठरवायचा? इत्यादी सगळे विचार आपल्या न्यायशास्त्रकारांनी मांडून ठेवले आहेत. त्याही पद्धतीचा अवलंब आपल्या आचार्यांनी श्रुतीचा अर्थ योग्य रीतीने लावण्याकरिता केलेला आहे. परंतु न्यायशास्त्रकारांनी ईश्वराच्या सिद्धीकरिता अगोदर अनुमान प्रमाणाचे अवलंबन केलेले आहे. परंतु न्यायशास्त्राप्रमाणे तर्कपद्धतीवर त्यांनी जास्तीत जास्त भर दिलेला नाही. **केवळ तर्काला त्यांनी मानलेले नाही**. तर्कशास्त्रकारांनी म्हणजे न्यायशास्त्रकारांनी ईश्वराच्या सिद्धीकरिता अगोदर अनुमान प्रमाणाचे अवलंबन केलेले आहे. गंगेशोपाध्याय हे प्रसिद्ध नैयायिक होऊन गेले. खरी न्यायपद्धती त्यांच्यापासून सुरू झाली. त्यांनी सद्‍हेतू, हेत्वाभास इत्यादी पुष्कळ विवेचन केले आणि '**अनेन जगन् निर्मातृ पुरुषधौरेयसिद्धिः**' असा उपक्रम केलेला आहे. 'जगन्निर्माता जो पुरुषधौरेय, परमात्मा आहे त्याची सिद्धी अनुमानाने होऊ शकते' असा उपक्रम करून ईश्वरानुमान मांडलेले आहे. उदयनाचार्यांनी कुसुमांजली वगैरे ग्रंथामध्ये अनुमानाने ईश्वराची सिद्धी केलेली आहे आणि अनुमानाने सिद्धी झाल्यानंतर त्यांनी श्रुतिप्रमाणाचा उल्लेख केलेला आहे. म्हणजे नैयायिकांचा मुख्य भर अनुमान प्रमाणावर, तर्कावर आहे. तर्काने सिद्ध होणारा ईश्वर शब्दप्रमाणाने सिद्ध होऊ शकतो, म्हणजे त्यांनी त्याला (शब्दप्रमाणाला) थोडेसे गौणत्व दाखविलेले आहे. मुख्य प्रमाण त्यांनी अनुमानप्रमाण मानलेले आहे. हे मात्र आचार्यांनी मान्य केलेले नाही. अनुमानप्रमाणाने ईश्वराची सिद्धी होऊ शकणार नाही

असा त्यांचा सिद्धांत आहे. तर जागाचा विचार करण्याकरता या प्रमाणांचा आश्रय करावा लागतो. परमात्मस्वरूप जे आहे त्याकरिता **(श्रुतीशिवाय) दुसरे प्रमाणच नाही**. अतींद्रिय, सूक्ष्म आहे तो परमात्मा. त्या करता प्रत्यक्षाचा उपयोग होऊ शकत नाही. मन किंवा बुद्धी यालाही प्रत्यक्ष प्रमाण मानतात. इंद्रियांनी अर्थाचे जे ज्ञान होते त्याला प्रत्यक्ष ज्ञान म्हणतात. त्या प्रत्यक्ष ज्ञानाची साधने म्हणजे सगळी इंद्रिये. नैयायिकांनी त्या एकंदर इंद्रियामध्ये मनाचाही अंतर्भाव केल्याने मनानेसुद्धा प्रत्यक्ष ज्ञान होऊ शकते. त्यांच्या दृष्टीने आत्मा सगुण आहे. सुखदु:खादी जे आत्म्याचे धर्म आहेत त्याचे ज्ञान बाह्य इंद्रियांनी होऊ शकत नाही. म्हणून मनाची सिद्धीसुद्धा अनुमानप्रमाणाने होऊ शकते. श्रुतिप्रमाणाने तर आहेच. **'सर्वं मन एव'** असे सांगितलेले आहे. म्हणून सुखदु:खादी ज्ञान सर्वांना होत असते. 'अहं सो सुखी', 'अहं सो दु:खी' या ज्ञानाचे साधन कोणते तरी असले पाहिजे. साधनावाचून ज्ञान होऊ शकत नाही. सुखदु:खादिकांचे ज्ञान करून देणारे साधन मन नावाचा एक पदार्थ सिद्ध होऊ शकतो. तर अशी अनुमानप्रमाणाने मनाची सिद्धी त्यांनी मांडलेली आहे. तर मन हे एक प्रत्यक्ष प्रमाणापैकी आहे. त्याला बुद्धीही म्हणतात. अंत:करणाच्या वेगवेगळ्या अवस्थांवरून मन किंवा बुद्धी असे नाव त्यांनी दिलेले आहे. चित्त असे नाव आहे. वेदान्तशास्त्रामध्ये अहंकार असे नाव आहे. परमात्म्याच्या दर्शनाचे, आत्मदर्शनाचे साधन शब्दप्रमाण होऊ शकत नाही. शब्द प्रमाणाने परोक्ष ज्ञान होऊ शकते. शब्दाचा स्वभावच आहे परोक्ष ज्ञान करून देण्याचा. तेव्हा शब्द प्रमाणाने सिद्ध केलेले जे काही परमात्मस्वरूप त्याचे ज्ञान करून घेण्याकरता अनुमानप्रमाणाचा उपयोग साहाय्यभूत करून घ्यावा लागतो. त्याला मनन असे म्हणतात. मननामध्ये अनुमानानेच सर्व काही करावयाचे आहे. त्या अनुमान प्रमाणाच्या साहाय्याने श्रुतिप्रमाणसिद्ध अशा प्रकारचे जे आत्मतत्त्व आहे त्याचे प्रत्यक्ष ज्ञान होऊ

शकते. त्याला इतर साधनमार्ग आवश्यक नाही.

केवळ अनुमानाने गती उत्पन्न झाली अशी पुष्कळ मंडळी आहेत. उत्तम तार्किक विचार मांडणारी मंडळी आहेत. शास्त्रकार आहेत, सगळे आहेत. परंतु त्यांचे सगळेच विचार तर्काधिष्ठित असल्यामुळे त्यांच्या विरुद्धही तर्क सांगता येणे शक्य आहे. त्यामुळे त्यांचे तर्कसिद्ध विचार स्थिरतेने मांडता येत नाहीत. म्हणून श्रुतिसिद्ध असलेले आत्मतत्त्व अनुमानप्रमाणाचे साहाय्य घेऊन, मनाने जाणून घ्यावयाचे, बुद्धीने त्याचे प्रत्यक्ष ज्ञान करून घ्यावयाचे आहे. घेताना मात्र निव्वळ बुद्धिवाद म्हणून जो येतो तो शास्त्रकारांना मान्य नाही. आचार्यांनासुद्धा तो मान्य नाही.

सांख्यांनी तर बुद्धीचे वर्णन करून ठेवलेले आहे. बुद्धी ही सर्व कार्य करणारी आहे असे ते म्हणतात. **'सर्वं प्रति उपभोगं यस्मात् पुरुषस्य साधयति बुद्धिः सैव च विशिनष्टि पुनः प्रधानपुरुषान्तरं सूक्ष्मम्'** बुद्धी ही भोग आणि अपवर्ग दोहोंचाही साधन आहे असे सांख्यशास्त्रकार सांगतात. बुद्धी सर्व भोगाला साधन आहे. इंद्रियांना मिळणारा भोग मनाच्या साधनाशिवाय मिळू शकत नाही. केवळ इंद्रिय भोगप्रधानक नाही. मन हे साहाय्यकारी आहे. इंद्रियांनी नुसते पदार्थच ज्ञात करून दिलेले आहेत. परंतु पदार्थ ग्राह्य आहेत किंवा नाहीत, परिणामी हितकारक आहेत किंवा नाहीत हा सगळा भाग बुद्धीला करावयाला लावायचा. म्हणून खरी भोगदायक ही बुद्धी आहे. अपवर्गदायकही बुद्धी आहे असा त्यांचा सिद्धांत आहे. **'प्रधानपुरुषान्तरं सूक्ष्मं विशिनष्टि,** 'प्रधान आणि पुरुष यांच्यात जे अंतर आहे ते बुद्धीलाच कळून येण्यासारखे आहे. तो भेद बुद्धीला कळला तर आत्मा कसा आहे, उदासीन कसा आहे इत्यादी आत्मस्वरूप सांख्यकारांनी फार उत्तम मांडले आहे. अगदी वेदान्ताला अनुरूप अशा प्रकारचे ते आहे. परंतु काही भेद मतभेद त्यांचे आहेत. तर बुद्धीनेच प्रधान आणि पुरुष याचा भेद दाखविला जातो. भोग शब्दाची

**'सुखदु:खमन्यतर साक्षात्कार: भोग:'** अशी न्यायशास्त्रकारांनी व्याख्या केलेली आहे. सुखाचा, दु:खाचा साक्षात्कार, अनुभव यालाच भोग असे नाव आहे. हा भोग मनाच्या द्वारांनी अगदी पूर्ण होऊ शकतो. म्हणून भोगसाधकही बुद्धी आहे, अपवर्गसाधकही बुद्धी आहे याबद्दल प्राचीन शास्त्रकारात दुमत नाही.

परंतु शब्दार्थ निर्णयाकरिता बुद्धीचा वापर आम्हाला करावयाचा आहे. शब्द चांगले ऐकले पाहिजेत. वाक्यार्थांचा विचार करण्याकरिता बुद्धीची जरुरी आहे. सगळी विचारशास्त्रे किंवा दर्शने बुद्धीमधून निर्माण झाली आहेत. वेदान्तशास्त्र हेसुद्धा विचारशास्त्र आहे. ते काही प्रमाणशास्त्र नाही. शास्त्रांनी दाखविलेले जे विचार आहेत. त्या विचारांचा उपयोग बुद्धीमध्ये असलेले दोष दूर करण्याकरिता आहेत. म्हणून विचारशास्त्राचा उपयोग आहे. अनेक प्रकारचे दोष बुद्धीमध्ये असतात. **असंभावना** दोष मोठा दोष आहे. प्रमाणही नाही आणि प्रमेयही नाही, बुद्धीला मान्य होत नाही येथून तयारी आहे. प्रमाणाची संभावना उत्पन्न करणे, ती उत्पन्न झाल्यानंतर प्रमेयाची संभावना उत्पन्न करणे म्हणजे दोन्ही संभावना निर्माण झाल्यानंतर पुढचा विचार आहे. प्रत्यक्ष अनुभवाला पुष्कळ अवकाश आहे. त्याला साहाय्य बुद्धीचे आहे. शब्दप्रमाणांनी नुसते दाखवून दिले आहे, तर शब्दप्रमाणांनी दाखविलेले जे प्रमेय आहे त्या प्रमेयाचे अस्तित्व सिद्ध करण्याकरिता अनुमान प्रमाणाचे साहाय्य मान्य केलेले आहे. म्हणजे बुद्धीचे साहाय्य मान्य केलेले आहे. त्या बुद्धीने विचार करून बुद्धीमध्ये असणारे जे दोष आहेत ते विचारशास्त्रांनी दूर करावयाचे. इतकी तयारी झाल्यावर त्या बुद्धीतील सगळे दोष दूर झाले. बुद्धी निर्दोष झाली. त्या बुद्धीने अत्यंत सूक्ष्म अशा प्रकारचे आत्मतत्त्व म्हणजे परमात्मा तत्त्व त्याचा साक्षात्कार होतो. तर हे जे ज्ञान करून घ्यावयाचे आहे त्यासाठी बुद्धीचे साहाय्य पाहिजे असे त्यांनी (आचार्यांनी) मान्य केलेले आहे. ते

बुद्धिसाहाय्य म्हणजे निर्दोष बुद्धी **'शास्त्राचार्य उपदेश संस्कृत मनः आत्मदर्शने करणम्'** शास्त्र आणि आचार्य यांनी सांगितल्यामुळे संस्कृत झालेले मन किंवा बुद्धी ही आत्मप्रत्यक्षाला साधन आहे. संस्कार शब्दाचा अर्थसुद्धा **'संस्कारो हि नाम दोषापनयनं गुणाधानं च'** असा आचार्यांनी दाखविलेला आहे. आरशावर मळ साचलेला आहे, आरशामध्ये प्रतिबिंब दिसू शकत नाही, तर मळ दूर केला पाहिजे. स्वच्छ आरशामध्ये प्रतिबिंब दिसू शकते. तर बुद्धिरूप दर्पणामध्ये दोषरूप मळ जो आहे तो दूर केला पाहिजे. स्वच्छ आरशामध्ये प्रतिबिंब दिसू शकते. तर बुद्धिरूप दर्पणामध्ये दोषरूप मळ जो आहे तो दूर केला पाहिजे. तो दूर करण्याकरिता या सगळ्या विचारांचा उपयोग आहे.

शास्त्रामध्ये सांगितलेले सगळे जे विचार आहेत ते प्रत्यक्षज्ञान उत्पन्न करू शकत नाहीत. **ज्ञानाचे साधन प्रमाणहे आहे.** प्रमाणांनीच ज्ञान व्हावयाचे. विचार हे प्रमाणरूप नाही. प्रमाणरूप मन किंवा बुद्धी आहे. ती बुद्धी शुद्ध करण्याकरिता सगळ्या विचारांचा उपयोग होईल. वेदान्तशास्त्राचा विचारात्मक सगळा जो भाग आहे त्यांचा उपयोग आमच्या मनातील दोष दूर करणे हा आहे. **अश्रद्धा** हा पहिला दोष आहे. त्याचप्रमाणे **अज्ञान** हा दोष आहे. ज्ञानच नसेल तर ज्ञानासाठी काही श्रवण करावे लागते, मनन करावे लागते. **संशयात्मक अंतःकरणवृत्ती** हाही दोष आहे. प्रत्येक पदार्थाबद्दल संदेह निर्माण झाला म्हणजे ज्ञान थांबले. हेही असू शकेल. तेही असू शकेल. उपनिषदांमध्ये द्वैतही सांगितले असण्याची शक्यता आहे, अद्वैतही सांगितले असण्याची शक्यता आहे. निर्णय कोणताच होत नाही. हे बरोबर आहे आणि तेही बरोबर आहे. हे आहे आणि तेही आहे. अशी संदेहात्मक स्थिती असताना निर्णय थांबलेला असतो. दर्शन काहीच होत नाही. कदाचित ज्ञान झाले व विचार जर बरोबर झाले नाहीत तर त्या विचारांनी बुद्धीमध्ये निर्माण होणारे ज्ञान हे भ्रान्त्यात्मक किंवा अप्रमाण

ज्ञान उत्पन्न होण्याचा संभव आहे. म्हणून त्या विचारांचेही परिशीलन केले पाहिजे. त्या विचारांचे परिशीलन होण्याकरिता त्या बुद्धीला प्रेरक अशी परमात्मशक्ती आहे. त्या परमात्मशक्तीची उपासनाही करावी लागते. **प्रयोगात्मक** जे **योगशास्त्र** आहे त्यामध्ये प्रयोगच सांगितलेले आहेत. ते प्रयोग सिद्ध होण्याकरिता त्या ईश्वराचे प्रणिधानन आवश्यक आहे, असे योगशास्त्रकार सांगतात. प्रयत्नवादी शास्त्र आहे ते. प्रयत्नांनी सगळे काही करता येणे शक्य आहे. अनेक प्रकारच्या सिद्धी ज्या त्यांनी दाखविल्या त्या सगळ्या सिद्धी म्हणजे **मानसविकासशक्ती** आहेत. शारीरिक सिद्धी आहेत, मानसिक सिद्धी आहेत. मारुतीरायांनी लंकेला जाताना एकदम मोठे रूप धारण केले. महाभारतात कथा आहे. भीमाची आणि मारुतीची भेट झाली. त्यावेळी भीम म्हणाला की, "तुम्ही लंकेला जाताना जे रूप धारण केले होते ते दाखवा." त्यावर ते म्हणाले की, "ते रूप तू पाहू शकणार नाहीस. तुझ्यामध्ये पाहण्याचे सामर्थ्य नाही." त्यानंतर मारुतीने जे रूप वाढविले ते त्याला पाहता येईना. त्यानंतर भीमाने ते कमी करण्याची विनंती केली. तेव्हा हा शक्तिविकास आहे. लंकेमध्ये पोहचल्यानंतर लगेच त्यांनी लहान रूप धारण केले. तेथे एवढा देह घेऊन उपयोग नव्हता. राक्षसांनी लगेच ओळखले असते. सीतेचा शोध घ्यावयाचा होता. तर या ज्या सगळ्या शक्तिविशेषरूप सिद्धी आहेत त्या ऐश्वर्य म्हणजे मानसिक शक्तिविकास म्हणूनच योगशास्त्रकारांनी मानलेल्या आहेत. म्हणजे आमच्या मनाची किंवा बुद्धीची शक्ती विकसित होणे शक्य आहे. हा प्राचीन बुद्धिवाद आहे. असंभवनीय कोणतीही गोष्ट बुद्धीला नाही. '**न कश्चित् खलु धीमतां अविषयो नाम**' असे कविकुलगुरूंनी सांगून ठेवलेले आहे. जो धीमान् आहे, खरी बुद्धी आहे, संस्कृत बुद्धी आहे त्याला कोणताच अविषय नाही. विज्ञानवादाचा कोणताही विषय असला तरी अविषय नाही. मार्गदर्शक जे असतील, श्रेष्ठ पुरुष, ज्ञानसंपन्न, आत्मदर्शन झालेले त्यांची

कृपा, मार्गदर्शन यांची जरुरी आहे. ईश्वरकृपेची जरुरी आहे. ज्या बुद्धीने सगळे समजावून घ्यावयाचे आहे ती बुद्धी संस्कृत झाली पाहिजे. दोषापनयन झाले पाहिजे, हे गुणाधान आणि दोषापनयन करताना आमच्या मनाला जर वाटले की आमच्यामध्ये दोष काहीच नाहीत, आमची बुद्धी चांगलीच आहे, अहंकारामुळे अशीच कल्पना झाली तर दोष असताना दोष सांगणार कोण? निरसनाचे उपाय तरी कोण सांगणार? आणि हा ऐकण्याच्या अवस्थेमध्ये तरी कुठे आहे? अर्जुनाची आरंभाला स्थिती अशीच झाली. संपूर्ण सैन्य पाहिल्याबरोबर त्याच्या मनावर परिणाम झाला. अहंकारग्रस्तबुद्धी होती त्याची. माझ्या बुद्धीला असे वाटते की हे युद्ध मी करू नये. माझ्याकडून हे काय होणार आहे वगैरे सगळा निर्णयच देऊन टाकला. श्रीकृष्ण स्वस्थ बसले होते. आणि मग शेवटी निरूपण केल्यानंतर अर्जुनाचे सांगितले, ''मी धर्मसंमूढचेत: झालो आहे.''

**कार्पण्यदोषोपहत: स्वभाव: पृच्छामि त्वां धर्मसमूढचेत:।**
**यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ।।**

'प्रेय नको श्रेय पाहिजे. ते माझे श्रेय निश्चित कोणते आहे ते तुम्हालाच माहीत आहे. ते तुम्ही मला सांगा.' अशी अहंकाररहित त्याची बुद्धी जेव्हा झाली, धर्मसंमूढ आपण कसे आहोत हे त्याला जेव्हा कळले, मार्गदर्शक आपणच आहात अशी श्रद्धा त्याच्या ठिकाणी उत्पन्न झाली आणि अहंकाररहित होऊन प्रश्न विचारला तेव्हा गीताज्ञानाला, उपदेशाला प्रारंभ झालेला आहे. तोपर्यंत नाही.

तर बुद्धीमध्ये उत्पन्न झालेले दोष दूर करण्याकरिता आचार्यांनी सगळे सिद्धांत सांगितलेले आहेत. हे सिद्धांत स्पष्टरूपाने त्यांनी मांडलेले आहेत. **सद्गुरूंच्या ठिकाणी, ईश्वराच्या ठिकाणी भक्ती पाहिजे**. बुद्धीला प्रेरणा करणारी शक्ती आहे ती. सद्गुरू आणि ईश्वर एकरूपच आहेत.

प्रत्यक्ष मार्गदर्शन आपल्या स्वरूपाने. प्रत्यक्ष स्वरूप हाही एक अवतार आहे. ईश्वराचे प्रत्यक्ष अवतार सांगितलेले आहेत.

**एकंदर शब्दप्रमाण म्हणून जे आहे ते वेदप्रमाण**. त्या शब्दप्रमाणाचा अर्थ स्पष्ट करताना पुराणादिकांची रचना वेदव्यासमहर्षींनी करून ठेवलेली आहे. स्मृतिकारांनीही अनेक स्मृतिग्रंथ करून ठेवलेले आहेत. धर्मशास्त्राच्या निर्णयाकरिता स्मृतिग्रंथ आहेत. वेदांमध्ये कर्मकांडात्मक जो भाग आहे त्या भागाचे स्पष्टीकरण करण्याकरिता विचार पाहिजे होते. ते सगळे ऋषी तत्त्वदर्शी असल्यामुळे त्यांच्या मनामध्ये संदेह नाही. प्रमाणाबद्दल असंभावना इत्यादी दोष कोणतेही नाहीत. त्यामुळे, त्यांना जे तत्त्वदर्शन झालेले आहे, त्या तत्त्वदर्शनावरून त्यांनी जे स्मृतिग्रंथ केलेले आहेत, त्या स्मृतिग्रंथांनी कर्मकांडाचा सिद्धांत काय आहे, अर्थ काय आहे, तो आपल्या लक्षात येतो. त्यानंतर पुराणांची रचनासुद्धा वेदव्यास ऋषींनी केलेली आहे. उपनिषदांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी गीता सांगितली. गीताग्रंथ निर्माण झाला. वेदव्यासांनी सर्व संकलन करून ठेवले आहे, म्हणून आपणास ते माहीत आहेत. आता तर ते ज्ञान जे सांगितले ते भगवंताचे शब्दसुद्धा ऐकण्याचे वैज्ञानिकांचे प्रयत्न सुरू आहेत. होईलही, काही हरकत नाही. एकंदर जिज्ञासाबुद्धीने प्रयत्न केला असता तो सफल होऊ शकतो. जिज्ञासा अंत:करणामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. ती जिज्ञासा वाढविण्याचे कार्य शास्त्रकारांनी करून ठेवलेले आहे. बुद्धी कितीही दूर जाणारी असली तरी त्या बुद्धीला मार्गदर्शन करणारे हे ग्रंथ मोठमोठ्या लोकांचे आहेत. तर सगळ्या विचारांचे समालोचन झाले पाहिजे. त्याचप्रमाणे बुद्धीमध्ये क्षमता निर्माण झाली पाहिजे. आपल्याला कळलेच नाही तर सगळे सिद्धांत अपरिचित वाटतात ना !

अर्थ आणि काम या दोनच पुरुषार्थांबद्दल अलीकडे विचाराची प्रवृत्ती जास्तीतजास्त वाढत चालली आहे. धर्म हा पुरुषार्थ एका बाजूला राहिला.

ज्या धर्माने बुद्धी शुद्ध व्हावयाची, त्या बुद्धीचा उपयोग अर्थशास्त्र, कामशास्त्र यांच्यामध्ये करता येणे शक्य आहे. अर्थकामशास्त्राचे खरे साध्य काय हेसुद्धा समजून घेतले पाहिजे. वात्स्यायानाने कामशास्त्र लिहिले आहे. तेव्हा कामशास्त्राचा मुख्य प्रतिपाद्यविषय काय आहे, त्या कामशास्त्राला कुठपर्यंत जावयाचे आहे ते समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शास्त्रीय दृष्टीने जे विचार मांडलेले आहेत ते समजून घेण्याकरिता अंत:करणामध्ये जिज्ञासा नाही, श्रद्धा नाही, काही नाही. ते अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

वेदान्तशास्त्रावरचे ग्रंथ लिहिणारे प्राय: संन्यासी महात्मे आहेत. फार थोडे, अपय्यादीक्षित, वाचस्पतिमिश्र अशी इतर मंडळी आहेत. ती विद्यानंदामध्ये निमग्न झालेली संन्याशाप्रमाणेच आहेत. विद्यानंदामध्ये निमग्न झाल्यामुळे बाह्यविषयांचा संबंधच नाही. वेदान्तशास्त्राचा विचार करणे किंवा ऐकणे यालाही कालमर्यादा घालून दिलेली आहे.

**आसुप्तेः आमृतेः कालं नयेत वेदान्तचिन्तया।**
**दद्यान् नावसरं किंचित् कामादीनां मनागपि।।**

सकाळी उठल्यापासून झोप लागेपर्यंत आणि शेवटचा श्वास असेपर्यंत विचार चालू आहे. जीव कोण आहे? जगत् काय आहे? जगत्कर्ता कोण आहे? त्याची शक्ती काय आहे? हे सर्व समजून घेण्याकरिता विचार चाललेले आहेत. ते विचार शेवटपर्यंत चालू असावेत हा मुख्य विषय आचार्यांनी सांगितला. प्रयत्नांनी त्याचा विनियोग होणार आहे. आणि मुख्य म्हणजे, '**दद्यान्नावसरं किंचित् कामदीनां मनागपि.**' मनामध्ये कामादिक विचार होऊ नयेत. वेदान्तविचाराला प्रतिबंधक विकार होऊ नयेत म्हणजे निर्दोष बुद्धी झाली पाहिजे. त्या निर्दोष बुद्धीने विचार झाला पाहिजे. हाही विचार आचार्यांनी करून ठेवलेला आहे. ज्ञान उत्पन्न झाले पाहिजे. ज्ञान म्हणजे काय आहे ते सांगण्याकरिता भगवद्गीतेच्या तेराव्या

अध्यायात, '**अमानित्व, अहिंसा क्षान्तिरार्जवम्**' हे गुण सांगून '**एतत् ज्ञामिति प्रोक्तं**' असे सांगितले आहे. ज्ञानाचा हा सगळा विकास आहे. अमानित्व, अहिंसा, क्षांति, आर्जवम् हे सगळे गुण आहेत ते बुद्धीमध्ये निर्माण झाले पाहिजेत. म्हणजेच ज्ञान होते. ज्ञान, ज्ञान म्हणजे वेगळे असे काही नाही. हे सगळे गुण ज्ञानी माणसाला नैसर्गिक असतात. त्याला साधन म्हणून प्रयत्न करावा लागत नाही. सुरेश्वराचार्यांनी एके ठिकाणी सांगितलेले आहे.

**उत्पन्नात्मावबोधस्य ह्यद्वेष्ट्रत्वादयो गुणाः।**
**अयत्नतो भवन्त्यस्य न तु साधनरूपिणः॥**

तेव्हा जे संन्यासी महात्मे आहेत त्यांनी आपल्या बुद्धीची शुद्धी करून घेतलेली आहे. विचारश्रवणाकरिता अधिकार कोणाचा हे सांगताना त्यांनी विवेकवैराग्यादी साधनचतुष्टयसंपत्ती सांगितलेली आहे. अथ, म्हणजे साधनचतुष्टयसंपत्ती निर्माण झाल्यानंतर ब्रह्मजिज्ञासा म्हणजे ब्रह्मज्ञानाचा विचार करावयास सुरुवात करावी असे आचार्यांनी सांगितलेले आहे. वेदान्तशास्त्रश्रवणाला आरंभ साधनचतुष्टयसंपत्तीनंतर होऊ शकतो. त्याशिवाय श्रवणाचा अधिकार नाही. कारण **त्या विचाराचे फल साधनचतुष्टयाशिवाय आपल्या पदरात पडू शकत नाही**. वेदान्तशास्त्र आपण ऐकतो. चांगले आहे. बुद्धीला पटतही असेल. ऐकून घेतल्यानंतर विषयही समजत असतील. परंतु जोपर्यंत बुद्धीमध्ये विकार उत्पन्न होत आहेत, **जोपर्यंत विचारप्रतिबंधात्मक दोष बुद्धीमध्ये आहेत तोपर्यंत झालेले ज्ञान शब्दज्ञानाच्या पलीकडे जात नाही**. परोक्षज्ञानाच्या पलीकडे बुद्धी जात नाही. परोक्षज्ञानामध्ये, ते कुठपर्यंत प्राप्त झालेले आहे, निःसंदिग्ध आहे किंवा नाही असा एक विचारणीय प्रश्न आहे. पण परोक्षज्ञानाच्या पलीकडे बुद्धी जात नाही.

**अपरोक्ष ज्ञान** झाल्यावर मात्र ज्या काही सप्तभूमिका वसिष्ठ महर्षींनी

सांगितल्या आहेत त्यामधील चतुर्थभूमिकेमधील ज्ञान उत्पन्न होते. आत्मसाक्षात्कार होतो. असंग मी आहे, अकर्ता मी आहे, निर्विकार मी आहे, सच्चिदानंदस्वरूप मी आहे असे **'नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाव: अहं'** असे ज्ञान होते. हे अपरोक्ष किंवा प्रत्यक्ष ज्ञान. प्रत्यक्ष ज्ञान झाल्यावर पुढची पाचवी, सहावी, सातवी ज्ञानाची भूमिका का सांगितली आहे? तर ज्ञान दृढ होण्याकरिता. **'तत्त्वज्ञान, मनोनाश: वासनाक्षय:'** या तिघांचा अभ्यास तत्त्वज्ञानानंतरही चालू ठेवला पाहिजे. आत्मसमाधी स्थिर राहू शकत नाही. आत्मसमाधीतून त्याचे मन नेहमी बाहेर येते संसाराकडे. व्युत्थानदशा त्याला येते. त्या व्युत्थानदशेमध्येसुद्धा पूर्वविषयांचे संस्कार होऊ नयेत, वासना निर्माण होऊ नयेत म्हणून वासनाक्षयाचा अभ्यास हा निरनिराळ्या प्रकारांनी झाला पाहिजे. योगाभ्यासाच्या साहाय्यानेही वासनाक्षय होऊ शकतो. प्राणायामाच्या साहाय्यानेही वासनाक्षय होऊ शकतो. तर चवथ्या भूमिकेवर ज्ञान झालेले असताना पाचव्या किंवा सहाव्या भूमिकेवर **'परतो व्युत्थान'** सांगितलेले आहे व सातव्या भूमिकेपर्यंत तत्त्वज्ञानाचा अभ्यास चालू पाहिजे. अपरोक्ष ज्ञान झाल्यानंतरही ते दृढ होण्याकरिता पुढील भूमिकेपर्यंत अभ्यास चालू असला पाहिजे. सप्तम भूमिकेपर्यंत गेल्यानंतर मात्र व्युत्थान नाही. तो परमात्मस्वरूप होऊन गेला आहे. देहपात होईपर्यंत देह राहणार आहे. पुढे तो ब्रह्मस्वरूप होतो, उपदेशपंचकामध्ये या सर्व साधनांचा उपदेश आचार्यांनी करून ठेवलेला आहे.

**वेदो नित्यमधीयतां तदुदितं कर्म स्वनुष्ठीयताम् ।**
**तेनेशस्य विधीयतामपचिति: काम्ये मतिस्त्यज्यताम् ।।**

आपण कसकसे पुढे जावयाचे तो सगळा विचार त्यांनी करून ठेवलेला आहे.

**आत्मेच्छा व्यवसीयतां निजगृहात्तूर्णं विनिर्गम्यताम्।**
**सङ्गः सत्सु विधीयतां भगवतो भक्तिर्दृढाऽऽधीयताम्।।**

आणि या मार्गाने क्रमाक्रमाने जाताना **'वासुदेवः सर्वम्'** हा साक्षात्कार शेवटी त्याला होतो.

**बहूनां जन्मनां अंते ज्ञातवान् मां प्रपद्यते।**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः।।**

त्याचा आत्मा, बुद्धी ही विशाल झालेली आहेत. बुद्धिदोष दूर झाल्यानंतर आत्मस्वरूपाची ओळख करून घेण्याची योग्यता, ती विशाल बुद्धी ज्याला आहे तो महात्मा **'वासुदेवः सर्वम्'** अशी अवस्था प्राप्त करून घेतो. अहं गेला. सर्व हे वासुदेवमय आहे. **'ईशावास्यमिदम्'** संपूर्ण ईश्वराने आच्छादित झाले. ईश्वरस्वरूपाशिवाय दुसरे काहीच नाही. त्याला काही विचार नाही. विचाराची परिसीमा गाठलेली आहे. बुद्धी निर्दोष झाली. निर्दोष झालेली बुद्धी स्थिर झाली. स्थिर झालेल्या बुद्धीने ध्यानाचा अभ्यास सुरू झाला. ध्यानाचा परिपाक होता होता ध्यानाच्या शेवटी समाधिस्थिती प्राप्त झाली आणि त्या समाधिस्थितीतून साक्षात्कार त्याला मिळालेला आहे. साक्षात्कार दृढ राखण्याकरिता पुढेही अभ्यास चालूच आहे. त्याला एकच व्यसन लागलेले असते. आत्मानंदात निमग्न राहण्याने त्याची वृत्ती बाहेर येत नाही. म्हणून निरंतर तो त्या समाधिस्थितीमध्ये राहू शकतो. ही योग्यता प्राप्त करून घेण्याला पुष्कळ काळ लागणार आहे. त्या अद्वैत ज्ञानाचे काय महत्त्व आहे, व्यावहारिक दृष्टीनेसुद्धा, तेदेखील विचार करण्यासारखे आहे. पारमार्थिक दृष्टीने आत्मानुभव प्राप्त होऊन जन्ममृत्यूची परंपरा निवृत्त होणे हे जे फल आहे, त्याला पुष्कळ अवकाश आहे. ईश्वराची उपासना करून हे झाले पाहिजे. कालिदासाने एका नाटकामध्ये आरंभाला एक श्लोक सांगितलेला आहे.

भगवान शंकराचे वर्णन त्यांनी केलेले आहे.

**एकैश्वर्ये स्थितोऽपि प्रणत बहुफले यः स्वयं कृत्तिवासः।**

संपूर्ण नियामक शक्ती आहे. तो त्याला वाटेल ते देण्याचे सामर्थ्य आहे. असा जो शंकर आहे तो कृत्तिवासः आहे. एक व्याघ्राजिन पांघरून बसलेला आहे. कशाकडेही त्याची आसक्ती नाही. त्याग आहे. नंतर कालिदासाने त्या शंकराचा संयम दाखविलेला आहे.

**कांतासंमिश्रदेहोऽपि अविषयो मनसां यः परस्तात् यतीनां।**

कांतासंमिश्र देह आहे. अर्धनारीनटेश्वर म्हणतात ना! 'शरीराच्या अर्ध्या भागातच त्याची कांता आहे. इतका अनुराग दुसरा कोणी दाखवू शकणार नाही. त्याचा अर्धा भाग हा कांतेला दिलेला आहे. इतके सान्निध्य असले तरी 'अविषयो मनसा परस्तात् यतीनां' असे म्हणतात. ज्यांचे मन निर्विषय झाले आहे, जे संयमी महात्मे आहेत त्यांचा अग्रगण्य आहे भगवान शंकर, तो संयमाचे द्योतक आहे. आणि

**अष्टाभिर्यस्य कृत्स्नं जगदपि तनुभिर्बिभ्रतो नाभिमानः।**

भगवान शंकर जगाचे संरक्षण करणारे आहेत. पृथ्वी, जल, तेज, वायू, आकाश त्याचप्रमाणे सूर्य, चंद्र आणि सोमयाजी या आठ तनूंनी संपूर्ण जगाचे रक्षण करण्याचे कार्य भगवान् शंकर करीत आहेत. असे असताना 'नाभिमानः', त्यांना अभिमान नाही. कर्तव्य आहे. जीवांचे संरक्षण करणे ईश्वराचे कर्तव्य आहे. त्या विश्वाचे संरक्षण करीत असताना अभिमान नाही. निरंहकार वृत्तीने राहण्यासाठी त्याग पाहिजे, संयम पाहिजे. अशा प्रकारे वर्णन करून कालिदास सांगतात-

**सन्मार्गाऽऽलोचनाय व्यपनयतु वस्तामसीं वृत्तिमीशः१**

आम्हाला सन्मार्ग कळावा, आलोचन करता यावे यासाठी त्या परमेश्वराने आमची बुद्धी शुद्ध करावी. ईश्वराचे गुण मांडलेले आहेत. तशा गुणांनी बुद्धी युक्त झाल्यावर सन्मार्गाचे आलोचन होऊ शकते.

आचरण तर पुढेच आहे. आचरणाला किती वेळ लागेल ते सांगता येत नाही. आलोचन घडता घडता मध्येच कुठली तरी संगती घडली तर तिकडेच मन पुन्हा जाणार आहे. तर सन्मार्गा आलोचन करण्याकरिता ईश्वराचा प्रसाद पाहिजे. आमची बुद्धी शुद्ध करावी अशी प्रार्थना कविकुलगुरू करीत आहेत.

वेदान्तशास्त्रावर लिहिणारे सगळे महात्मे संन्यासी आहेत. त्या संन्याशांनी साधनचतुष्टय प्राप्त करून घेतलेले आहे. त्यांची संध्यासुद्धा तीच आहे. आत्मचिंतन, ब्रह्मचिंतन त्यांना करावयाचे आहे. उपनिषदांमध्ये सांगितलेले अध्यारोप, अपवाद काय काय झालेले आहेत त्याचे चिंतन करावयाचे आहे. परमेश्वरापासून जग कसे निर्माण झाले, त्याच्यामध्ये ते कसे विलीन होते, एकमेवाद्वितीय परमात्मा कसा आहे हे अखंड चिंतन त्यांचे कर्तव्यकर्म आहे. तर बुद्धी शुद्ध करण्याकरिता संन्यासाश्रम आहे. वाटेल त्याने संन्यास घ्यावा असे आचार्यांनी कोठेही सांगितलेले नाही. **वैराग्य जोपर्यंत नाही तोपर्यंत संन्यासाचा अधिकार नाही**. वाटेल त्यांनी संन्यास घ्यावा अशी आज्ञा बौद्धांनी दिली असे सांगतात. सगळा घोटाळाच होऊन गेला. आचार्य हे संन्यासाचे पुरस्कर्ते आहेत व कर्मयोगाच्या विरुद्ध आहेत अशा गैरसमजुती निर्माण झाल्या. आचार्यांनी जे जे सिद्धांत मांडले ते उपपत्तियुक्त आहेत. जे तार्किक, बुद्धिमान होऊन गेले त्यांनी आचार्यांचे म्हणणे किती सयुक्तिक आहे ते आपापल्या ग्रंथामध्ये लिहून ठेवलेले आहे.

## आचार्यांचा कर्मयोग

अद्वैतज्ञानापेक्षा अद्वैतज्ञानाचे फल आपल्या जीवनात उतरले पाहिजे. अद्वैतज्ञानाने द्वैतमूलक विकार शांत झाले पाहिजेत. उपदेशपंचकामध्ये संन्याशांना सांगितलेले आहे. **'भिक्षौषधं भुज्यताम्, क्षुद्व्याधिश्च चिकित्स्यताम्। क्षुधा** ही व्याधी अशी वृत्ती संन्याशाने ठेवली पाहिजे.

ती व्याधी दूर करण्याकरिता भिक्षा हे औषध म्हणून सेवन करावे. **'स्वाद्वन्नं न तु याच्यतां विधिवशात् प्राप्ते तु संतुष्यताम्.'** तर याप्रमाणे महात्म्यांनी विशेष विचार करून, मनन करून ग्रंथ लिहिलेले आहेत. वेदान्तशास्त्रामध्ये हे पाथेय वाटेल तितके आपल्याकरिता तयार आहे. ते आपण पाहायचे आहे. त्यासाठी जिज्ञासा तीव्र असेल तर त्यानेच कार्य होणे शक्य आहे. ती जिज्ञासा उत्पन्न होण्याकरिता सर्व कर्मांचा उपयोग आहे. बुद्धी शुद्ध झाल्यानंतर ईश्वराची उपासना व सद्गुरूंचे मार्गदर्शन, ज्ञानी महात्म्यांच्या कृपेने लाभते. **'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया, उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनः तत्त्वदर्शिनः।'** असे भगवान श्रीकृष्ण सांगतात. तत्त्वदर्शी जे पुरुष आहेत ते उपदेश करतात. म्हणजे प्रणिपात पाहिजे. निरहंकार वृत्ती पाहिजे. परिप्रश्नही करायला हरकत नाही. चिकित्सा अवश्य करावी. त्याला उत्तर देण्याचे सामर्थ्य **'शाब्दे परे च निष्णात'** असल्याने ते शब्दरूपानेही सांगू शकतात. **शब्दरूपाने ज्याला ज्ञान होऊ शकत नाही तो सेवाधर्माने ज्ञान मिळवू शकतो**. तत्त्वदर्शी पुरुषांच्या संकल्प शक्तीनेसुद्धा ज्ञान होऊ शकते अशी उदाहरणे आहेत. तर अशा पद्धतींनी सूक्ष्म असे आत्मज्ञान होऊ शकते, कृतार्थता होते, जन्ममृत्युनिवृत्ती; सर्वकामनिवृत्ती होऊन मोक्ष प्राप्त होऊ शकतो. **आत्यंतिक दुःखनिवृत्ती हा मोक्षाचा अर्थ आहे**. ती कोणाला नको आहे? या संस्कृतीमधले असोत, त्या संस्कृतीमधले असोत, कोणालाही दुःख प्रवृत्ती नको आहे! मोक्ष जो आहे, तो आपल्याला मिळावा हे निश्चित झाले पाहिजे. आचार्यांनी सांगितले आहे, **'आत्मेच्छा व्यवसीयताम्'** आत्मस्वरूप मला मिळाले पाहिजे अशी तीव्र इच्छा मनामध्ये निर्माण झाली तर वेळ लागत नाही. आत्मेच्छा असते पण ती तीव्र नसते. संसारही व्हावा, थोडेसे हेही व्हावे, सुटीच्या दिवशी थोडासा वेदान्त ऐकावा. बरे वाटणे एवढेच त्याचे फल आहे. खरे फल प्राप्त होत नाही.

तर एकंदरीत बुद्धी निर्दोष, निश्चित केली पाहिजे. निश्चित बुद्धीमध्ये एकाग्रता वाढत गेली पाहिजे. एकाग्रता झाली पाहिजे म्हणजे संसारासंबंधी कोणतेही विषय मनामध्ये येणार नाहीत. संन्यासाश्रम उपयुक्त आहे, शास्त्रामध्ये सांगितलेला आहे. पण कर्मयोग आचार्यांनी डावललेला नाही. **कर्मयोग अवश्य केलाच पाहिजे.**

## आचार्यांचा मायावाद

**मायावाद** जो आचार्यांनी मांडला त्याबद्दल आक्षेप घेतला जातो. त्या मायेचे तीन प्रकार सांगितलेले आहेत. माया नाहीच हा पहिला प्रकार. उच्च ज्याची भूमिका आहे त्याच्या बुद्धीमध्ये माया नाही. मायाकार्य नाही. सुख नाही, दुःख नाही. द्वद्वातीत अवस्थेला तो पोहोचलेला आहे. दुसरा त्याच्या खालचा प्रकार म्हणजे माया **अनिर्वचनीय** आहे, म्हणजे माया कशी आहे ते सांगता येत नाही. सत्यही म्हणता येत नाही, असत्यही म्हणता येत नाही. शब्दांनी सांगता येत नाही. **'सत् चेन्न, बाध्यते.'** तर्काने त्यांनी सिद्ध केलेले आहे. मायेला सत्य म्हणावे तर बाधित होते आहे. **'असत्यं न प्रतीयते'**; असत् पदार्थ आहे. सशशृंगासारखा म्हणावे तर प्रतीती येते आहे. माया किंवा मायाकार जगत् आहे. मायेला सत् म्हणता येत नाही, असत् म्हणता येत नाही. म्हणून **'बाध्यते, प्रतीयत अतः सदपि नास्ति, असदपि नास्ति'** याचा अर्थ मिथ्या आहे. **मिथ्या** म्हणजे जग नाही असा अर्थ नाही. तो आम्ही आमच्या कल्पनेने लावलेला अर्थ आहे. मिथ्या हा शास्त्रीय शब्द आहे, पारिभाषिक शब्द आहे. मिथ्या म्हणजे सदपि नास्ति, असदपि नाही. केवळ भासणारे आहे, टिकणारे नाही. या अर्थाने मिथ्यात्वप्रचीती आचार्यांनी सांगितली. मिथ्यात्वाने जगताची प्रचीती येण्यासाठी अधिकार असावा लागतो. म्हणून अनिर्वचनीय आहे. व्यावहारिक तर्काने विचार केला तरी अनिवर्चनीय आहे. असा एक मायेचा प्रकार आचार्यांनी सांगितलेला आहे. संसारामध्ये

आसक्त झालेले जे जीव आहेत, ज्यांना वेदान्तविचार ऐकण्याचीसुद्धा योग्यता नाही, उपनिषद्विचार ऐकला तरी कळत नाही त्यांच्या दृष्टीने जगद्व्यवहार सत्य आहे. **'नेया माया त्रिभिर्बोधैः श्रौतैर्यौक्तिकैर्लौकिकैः'** श्रौतबोध ज्यांना झाला त्यांच्या दृष्टीने माया नाहीच. यौक्तिक बोध ज्यांना झाला त्या संसारी जीवांच्या दृष्टीने सगळे काही दुःखरूपच आहे. खरे मानून चालावयाचे आहे. पण निर्माण करणारा कोणीतरी आहे. त्याची आज्ञा जशी आहे ते कर्तव्यकर्म केले पाहिजे. कर्तव्यकर्म करीत असताना कशी बुद्धी ठेवली पाहिजे ते गीतेच्याद्वारे भगवंतांनी सांगून ठेवलेले आहे. तेच कर्म नैष्कर्म्य साधन कसे होते, **'योगः कर्मसु कौशलम'** हे दाखवून दिलेले आहे. **अकर्ता आत्मा आहे हा बोध करून घ्यावयाचा आहे अशी भूमिका आचार्यांनी घेतलेली आहे**. मोठमोठे इतर शास्त्रकार जे आहेत ते आत्मा कर्ता आहे असे मानून बसलेले आहेत. ती भूमिका घेतल्यावर ज्ञानानंतर कर्म केलेच पाहिजे असा निर्णय मांडावा लागतो. कर्ता आत्मा आहे असे मानल्यावर लोकांची वृत्ती कर्म सोडण्याकडे होऊ लागली तर कर्म केले पाहिजे असा सिद्धांत लोकसंग्रहाकरिता आचार्यांच्या पूर्वीच्या वृत्तिकार बौधायनांनी मांडलेला आहे. ज्ञानकर्मसमुच्चय लोकांसाठी मांडावा लागतो. अकर्तात्म बोध झाल्यानंतर **'कुर्वन्नपि न लिप्यते'** बाह्यदृष्टीने तो करतो आहे असे दिसते.

**यस्य नाहंकृतोभावो बुद्धिर्यस्य न लिप्यते**
**हत्वापि सं इमान्लोकान न हन्ति न निबध्यते ।।**

असे सांगितले आहे. अहंकार निघून गेला पाहिजे म्हणजे, ती बुद्धी अहंकारमुक्त झाली पाहिजे. म्हणजे त्या बुद्धीद्वारा होणाऱ्या कर्माला कर्मत्व राहात नाही, बंधभाव नाही. कर्ममार्गाची व्यवस्था आचार्यांचे गीताभाष्य पाहिले म्हणजे आपणास कळून येईल. कोणताही मार्ग त्यांनी सोडलेला नाही.

## आचार्यांचा भक्तिमार्ग

भक्तिमार्गात तर त्यांनी सर्व देवतांची स्तोत्रे रचलेली आहेत.

**सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम्।**
**सामुद्रोहि तरंग: क्वचन समुद्रो न तारंग:।।**

भक्तीमध्ये निमग्न झाल्यामुळे आचार्य सांगतात. भेद नाही म्हणाले तरीसुद्धा आपल्या भूमिकेवरून **'तवाहं'**, मी आपला आहे एवढी माझी समजूत शेवटपर्यंत राहावी अशी त्यांनी प्रार्थना केली आहे. भक्तिमार्ग, उपासनामार्ग यांची व्यवस्था त्यांनी लावून दिलेली आहे.

**यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चितुमिच्छति।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्।।**

हे जे भगवंतांनी सांगितलेले आहे त्या उपासनामार्गामध्ये पुष्कळ स्वातंत्र्य दिलेले आहे. जी तनू आवडेल ती तुम्ही घ्या. अनेक तनू आहेत, अनेक रूपे आहेत. कोणत्याही मार्गाने जाऊन तुम्ही मला येऊन मिळा हे उपासनामार्गाचे स्वातंत्र्य आचार्यांनी दाखवून दिलेले आहे. ज्ञानमार्ग आहे, योग आहे. उपासना आहे. त्यांच्या साहाय्याने बुद्धी निर्दोष करावयाची आहे. त्या बुद्धीच्या साहाय्याने श्रवण, मनन करणे, स्वत: शक्य असेल तर करणे किंवा जी विद्वान मंडळी असतील, त्यांच्या मदतीने श्रवणमनन करणे आवश्यक आहे. शब्दप्रमाणाला अनुसरणारी बुद्धी असेल तर आत्मज्ञान होऊ शकते, परमात्मदर्शन होऊ शकते, कृतार्थता प्राप्त होते, हे आचार्यांच्या सिद्धांतातून मांडले आहे. त्या सिद्धांतांचे श्रवण झाले पाहिजे. श्रवणानंतर ज्ञानाची भूमिका आहे. त्यासाठी ग्रंथ आहेत. मननात्मक ग्रंथ आहेत. संस्कृत ग्रंथ आहेत, प्राकृत ग्रंथ आहेत, संतांनी लिहिलेले ग्रंथ आहेत. संस्कृत ग्रंथही तसे आहेत. त्यांची परिभाषा कळत नाही. कठीण आहेत. तसा अभ्यासच राहिलेला नाही. इच्छा असेल तर संस्कृत घ्यावे असा राज्यशासनाने निर्णय करून टाकलेला आहे. कोणाला इच्छा होणार?

विद्यार्थ्यांच्या इच्छेवर आजपर्यंत अभ्यास कोणीही सोपविलेला नाही. तसे योग्य होणार नाही. कोणते अध्ययन योग्य आहे त्याबाबत विद्वानांनी निर्णय घ्यावयाचा असतो.

**यस्य देवे परा भक्तिः तथा देवे तथा गुरौ।**
**तस्यैतेऽ कथिता अर्थाः प्रकाशन्ते महात्मनः॥**

'तस्य एते अकथितापि अर्थाः', असे म्हटलेले आहे.

शास्त्रामध्ये सांगितलेले जे सिद्धांत आहेत ते आपल्या बुद्धीतून निर्माण होणे हे ईश्वरशक्तीच्या जागृतीचे लक्षण आहे.

शुद्ध बुद्धीचे लक्षण पूज्यपाद शंकराचार्यांच्या चरित्रामध्ये दिसून येते. लहान वय होते आचार्यांचे. तीन चार वर्षांचे असेल. आचार्यांचे पिताजी देवीच्या मंदिरात रोज जाऊन पूजा करून यायचे. एके दिवशी त्यांना कोठे बाहेरगावी जाण्याचा प्रसंग आला. त्यांनी त्यांना सांगितले, "बाळ, उद्या तू जाऊन पूजा करून ये. मी गावाला जाणार आहे." आनंद झाला बाल आचार्यांना. आईने सगळी पूजासामग्री तयार करून दिली. पूजासाहित्य घेऊन ते देवीच्या मंदिरात गेले. देवीची पूजा करताहेत. देवीच्या मूर्तीला भक्तिशास्त्रात अवतार मानलेले आहे. **अर्चावतार** म्हणतात. सिद्ध पुरुषांनी स्थापन केलेल्या मूर्ती असतात. म्हणून त्यांना अवतार म्हटलेले आहे. साक्षात भगवती या ठिकाणी आहे ही बालबुद्धी आहे. ज्ञान प्राप्त झाल्यानंतरसुद्धा **'पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्'** असे शास्त्रकारांनी सांगितलेले आहे. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर बालकबुद्धीने राहावे असे म्हणतात. रागद्वेषरहित बुद्धी असावी आपली. पूजा समाप्त झालेली आहे. देवीला माळ घातलेली आहे. निरांजन लावलेले आहे. दुधाची वाटी पुढे ठेवलेली आहे. "घ्या, आईसाहेब दूध घ्या आपण." अशी प्रार्थना चालू आहे. आता आई कसे दूध घेणार? 'कृपाळूपणे अल्प धारिष्ट्य पाहे.' बराच वेळ झाला. 'बालानां रोदनं बलम्.' शेवटी रडायला लागले,

"माझे पिताजी तुझी पूजा करतात. मला काही ज्ञान नाही. काही चूक झाली म्हणून दूध घेत नाहीस का?" असे रडायला लागल्यानंतर जगदंबा प्रगट झाली. तिने दुधाची वाटी घेतली, सगळे दूध पिऊन टाकले. ते त्यांनी पाहिल्यानंतर जास्तीच रडायला लागले. जगदंबेने विचारले,

"बाळ, तुझ्या सांगण्याप्रमाणे मी दूध प्यायले. आता रडण्याचे कारण काय?"

आचार्य सांगतात, "रोज पिताजी पूजा करून यायचे, मला दूध प्यायला द्यायचे. असे वाटायचे, माझी आई किती दयाळू आहे. मला रोज दूध प्यायला देते. आज इतका रडलो आणि तू सगळेच दूध पिऊन मला थोडेसुद्धा शिल्लक ठेवले नाही!"

काय करणार जगदंबा? मग त्या बालकाची बुद्धी पाहून, आपल्या स्तनातील दूध काढून त्या बालकाला, भगवत्पूज्यपाद आचार्यांना प्यायला दिले. आचार्यांनी सांगितले आहे.

**तव स्तन्यं भन्ये धरणीधरकन्ये हृदयत:**
**पय: पारावर: परिवहति सारस्वतमिव।**
**दयावत्या दत्तं द्रविडशिशुरास्वाद्य तव यत्**
**कवीनां प्रौढानां अजनिकमनीय: कवयित:।।** सौदर्यलहरी.

"माते, आपले स्तन्य हे दूध नाही. आज सारस्वतज्ञान प्यायला मिळाले. त्यामुळे जगामध्ये आज जे क्रांतदर्शी आहेत त्यांना मान्य ठरलो. हा दुधाचा प्रभाव आहे.

ही बालबुद्धी लहान वयापासूनच आचार्यांची आहे. तशी बुद्धी ज्ञानी महात्म्यांची, साधकांची असते. नैसर्गिक साधने असतात, असे स्थितप्रज्ञाच्या लक्षणावर विवरण करताना सांगितले आहे. स्थितप्रज्ञाला, कामनिवृत्ति, **'दु:खेष्वनुद्विग्नमन:, सुखेषु विगतस्पृह:'** असा प्रयास मुद्दाम करावा लागत नाही. निसर्गत:च ते असते. तरी ही इतरांनी साधने आहेत-

असे मानून त्याकरिता प्रयत्न करावयाचा आहे. आचार्यांची भक्तीही तशीच आहे. तशी भक्ती आपल्या अंत:करणामध्ये उत्पन्न व्हावी, जगन्मातेने आपल्यावर कृपा करावी अशी तळमळ उत्पन्न झाली पाहिजे. त्या दृष्टीने प्रयत्न करण्याकरिता या गोष्टीचा उल्लेख आचार्यांच्या चरित्रामध्ये आलेला आहे.

भगवान आचार्यांचीच ही भारतभूमी आहे. भारतभूमीमध्येच त्यांनी संचार केलेला आहे. परदेशातील लोकांना उपदेश करण्याकरिता ते गेलेले नाहीत. ते लोक आज भारतात येऊन ज्ञान मिळविण्याची इच्छा करतात. भारताचे हे वैशिष्ट्य आहे. **ज्ञान देण्याकरिता जायचे नाही**. ज्ञान देण्याकरिता महात्मा आपणहून येतो आहे. परीक्षित राजा शुकाचार्यांकडे गेलेला नाही. त्यांनी आपला अधिकार सिद्ध केला. पूर्ण भक्ती अंत:करणामध्ये धारण केली. पूर्वजन्माचेही त्याचे सुकृत होते. शेवटी नाममात्र आयुष्य शिल्लक राहिलेले असताना साक्षात भगवान शुकाचार्यांनी परीक्षिताला भागवत सांगितले आणि त्याला कृतार्थ केले. तेव्हा भारतीयांच्यामध्ये **ज्ञानप्रसाद मुख्य नाही. आपल्याला ज्ञान मिळविण्याकरिता योग्यता मिळवायची आहे**. ज्ञान प्राप्त करण्याकरिता बुद्धी तयार करावयाची आहे. असा बुद्धिवाद भारताचा आहे. त्यासाठी वेगवेगळी साधने शास्त्रे सांगतात. आपल्या बुद्धीतील दोष दूर करण्याकरिता आणि गुणाधान करण्याकरिता प्रयत्न करावयाचा आहे. आचार्यांचे सिद्धांत समजून घ्यावयाचे आहेत. आपल्या अशा संस्कृत बुद्धीने जे जे समानशील असतील त्यांच्याशी चर्चा करणे, जे श्रद्धेने ऐकणारे असतील त्यांना सांगणे हा एक आनंद आहे. हा आनंदाचा ठेवा आपल्यासाठी ठेवलेला आहे, पूज्य आचार्यांनी; अनेक संतांनीसुद्धा तो ठेवलेला आहे. **'भाष्यकाराते वाट पुसतु'** असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. त्यांनी सिद्धांतांचे प्रतिपादन आपल्या मराठी ग्रंथातून करून ठेवले आहे. तेही समजून घेणे आवश्यक

आहे. ते समजून घेतल्यामुळे आपल्या बुद्धीमध्ये प्रकाश उत्पन्न होणार आहे. आचार्यांचे सिद्धांत समजून घेण्याकरिता संतांच्या मराठी ग्रंथांचा उपयोग होणार आहे. तेव्हा साधनमार्गामध्ये जे असतील त्यांच्यासाठी सगळे सांगून ठेवलेले आहे. जीवनमार्गात हे पाथेय आपणाबरोबर आहे. आचार्यांच्या मूळ ग्रंथाचे समालोचन करणे महत्त्वाचे आहे. भाष्यग्रंथ म्हणजे **'भाष्यं प्रसन्नं गंभीरं'** वाचस्पतिमिश्र म्हणतात भाष्य प्रसन्न आहे, समजून येण्यासारखे आहे, पण गंभीर आहे. त्यातील गांभीर्य समजून घेण्याकरिता तप केले पाहिजे. प्रयत्न हे एक तपच आहे. सर्वांच्या प्रयत्नाने, आचार्यग्रंथांच्या मननाने, त्याचा अभिप्राय काय आहे हे समजून आले तर उपकारक ठरणार आहे. खरा अभिप्राय समजून घेऊन आनंद होईल आणि इतरांना आनंद देण्याचे कार्य करता येईल. आपल्या भारताचे जे भाग्य आहे त्या भाग्याचा सर्वांना अनुभव घेता येईल. ज्यांना जिज्ञासा असेल त्यांच्याद्वारा हा अभ्यास होत राहावा. अंबरिषवरदांनी त्यांना प्रेरणा करून त्यांच्या बुद्धीमध्ये भगवत्पूज्यपाद शंकराचार्यांच्या सिद्धांताचा प्रकाश करून सर्वांची इच्छा पूर्ण करावी एवढी प्रार्थना आहे.

**अंबरिषवरदश्रीभगवान् की जय।**

"श्री गुरूगणेश प्रसीद"

# आधुनिक समाजासाठी धर्मशास्त्राची उपयुक्तता

*प.पू. श्रीमत् दत्तमहाराज कवीश्वरांचे बीड येथे आयोजित केलेल्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमानंतरचे मार्गदर्शन -*

महाभारतामध्ये-धर्माविषयी गीतेमध्ये अर्जूनाला उपदेश केलेला आहे. खर तत्वज्ञान काय आहे? धर्म म्हणजे काय? भक्तीयोग काय आहे? -हे सगळ पुढं आहे.

अर्जूनही काही कमी अधिकारी नव्हता ईश्वरभक्ती आहे. सद्गुरूंची सेवाही त्यांनी केलेली आहे. पराक्रमी आहे; पण ऐन युद्धाच्या वेळेला त्याची बुद्धी, गोंधळून गेली -

"हिंसा होणार माझ्या हातून ! - त्या पेक्षा आपण युद्ध सोडून निघून जावं." कर्तव्यकर्म जे करायचे आहे, ते कर्तव्यकर्म नको असं त्याला वाटतं म्हणून भगवंतांनी उपदेश केलेला आहे. हिंसा अहिंसेचा विचार हा पुष्कळ मोठा आहे. शास्त्रकारांनी सांगितलय.

एखाद्यानी खून केला. त्याला न्यायाधीशाने फाशीची शिक्षा दिली म्हणजे न्यायाधिशाने खून केला असं म्हणायचं का? हिंसाच झाली ती! पण ती बुद्धीपूर्वक नाही. कर्तव्य म्हणून न्यायदेवतेचं जे कर्तव्य आहे, दुसऱ्याची हिंसा करणारा, त्याला काही दंड देणं, हा अधिकार आहे. स्वत:च्या बुद्धीनं तो काही हिंसा करत नाही न्यायाधीश !

तर ही आपल्याला बुद्धी दिली आहे ईश्वराने. त्या बुद्धीनं करायचयं

या बद्दल वाद नाही. 'बुद्धीवान नको' असं कुणीही म्हणत नाही. बुद्धी स्वाधीन आहे. आणखी मोक्ष म्हणा - परमार्थही, बुद्धीनीच करता येतो. पण ती बुद्धी चांगली संस्कारयुक्त झाली पाहिजे एवढचं. मोठे मोठे महर्षी, मोठे संत महात्मे -

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि॥** १६.२४॥

हा उपदेश आहे अर्जुनाला - 'शास्त्र हे प्रमाण आहे. शास्त्रानी जी आज्ञा केलेली आहे त्याप्रमाणे तू कर्तव्यकर्म केलं. पाहिजे, तर तुझं कल्याण होईल.' हा उपदेश अर्जुनाला केला आहे. 'मी सांगतो' - असं म्हणत नाहीत, तर त्या शास्त्राप्रमाणे संस्कार आपल्या बुद्धीवर झाले पाहिजेत.

'कसं वागावं?' कोणाचं कर्म योग्य आहे? 'कोणाचं अयोग्य आहे?' - हा सगळा निर्णय शास्त्ररूपानं, वेदरूपानं, परमेश्वरानं करून ठेवला आहे ते फक्त भारतामधेच आहे. भारतामधे बदलणारी घटना नवीन स्वराज्य मिळाल्यानंतर झाली आहे. परदेशात आहे म्हणून त्याप्रमाणे नक्कल केली गेली आहे. भारतीय जे काही आहे, अनेक काळापासून मोठे मोठे वैदिक ऋषी उत्तम वेदशास्त्राचं ज्ञान संपादन करून आपली बुद्धी चांगली बनवून, मग लोकांचं हित काय आहे हे सांगत असत. पुष्कळ ऋषी झाले. अनेक स्मृती आपल्यामधे आहेत. मनु आहे, पृथु आहे, पराशर आहे. पुष्कळ ऋषी अभ्यास संपादन करून, तपःश्चर्या करून त्याप्रमाणे वेळोवेळी मार्गदर्शन करताहेत. तर, ही जी काही आपली **आचारसंस्कृती** आहे, केवळ विचाराला फारसं महत्व नाही. त्यांत आचाराला महत्व आहे. विचाराप्रमाणे आचार पाहिजे आणि **आचार आचरणात आणणं म्हणजेच तपःश्चर्या!**

सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती महाराजांच चरित्र म्हणजे उद्बोधन आहे.

लहानपणापासून वेदांनी, शास्त्रांनी सांगितल्याप्रमाणे आचरण करायचं. एकादशीच्या दिवशी झोपायच नाही. शांत चाललंय. उपवास म्हणजे देवाच्या जवळ जायचंय. त्यावेळी झोपायचं नाही. जागरण करायचयं! त्यांच्या चरित्रात दिलयं. ते बसून रहायचे. काहीतरी नामस्मरण देवाचं करीत. शेंडीला एक दोरी बांधायची अन् ती खुंटीला बांधायची. पेंग आली की, लगेच झटका बसायचा. झोप जायची. आता शेंडीच कुणाची नाही, तर झटका कुठला? पण एक प्रतीक आहे. चिन्ह आहे, कोणाची संस्कृती आहे हे दाखविणारी काही चिन्हं आहेत. शास्त्राप्रमाणे वर्तन करायचयं! झोपेवर निग्रह आहे - आहारावर निग्रह आहे. पवित्र आहार पाहिजे. पवित्र आचार पहिजे. पवित्रपणा ! हा शास्त्राशिवाय समजत नाही. उत्तम फूल आहे. त्याचा वास घेतल्यानंतर देवाला घालता येत नाही. काय हरकत आहे? चालत नाही. वास घेतला म्हणून काय झाल? ते पवित्र राहीलं नाही!

**स्वच्छता निराळी आणि पवित्रता निराळी.** वस्त्र स्वच्छ झालं. भांडी स्वच्छ झाली. हे डोळ्यांनी दिसू शकतं पण पवित्र किंवा अपवित्र हे बुद्धीनं ठरविता येत नाही. कसं वागणं म्हणजे कोणचं पवित्र मन आहे?

रावणाला बिभीषणानी सांगितलं, 'बाबा ! ही परस्त्री आहे, दुसऱ्याची स्त्री आणली आहेस.' त्याच्या बायकोनं मंदोदरीनं सांगितलं, तो म्हणाला, 'परस्त्री आम्हाला कोणतीच नाही, सर्व स्त्रिया आम्ही आणू शकतो.'

ही जर संस्कृती राहिली असती भारतात तर काय झालं असतं! आम्हाला कोणाच्याही स्त्रिया सगळ्या सारख्याच झाल्या असत्या. म्हणून बिभीषणानी त्याची संगत सोडून दिली. रामचंद्रानीही प्रतिज्ञा केलेली आहे की, अशा संस्कृतीचे जे जे लोक आहेत त्यांना जिवंत ठेवायचं नाही. हे आसुरी संस्कृतीचे लोक ऋषीमंडळींना मारायला लागले. त्याचं हनन करायला लागले. अरण्यात जाऊन रहाणारे ऋषी ,

**सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिददुःख भाग् भवेत ।।**

या भावनेनं आणखी तपःश्चर्या करणारे, त्यांनाही मारणारे हे लोक! म्हणून कुणीही अशा प्रकारचे विचार करणारा, माणसाला विरोध करणारा. 'राक्षस जिवंत ठेवायचा नाही!' बिभीषण शरण आला आकाशमार्गाने, 'मी रावणाचा भाऊ आहे, राक्षस आहे'. त्याला आश्रय दिलेला आहे. राक्षस असून त्यांत ही काही चांगले विचार, चांगले संस्कार, काही मंडळीत असतात. नाही असं नाही !

परंतू आमच्या संस्कृतीमधे अर्जुन, 'जो हिंसा - अहिंसा करत बसला होता,' त्याला हे उत्तर दिलेलं आहे. हिंसा अहिंसा बुद्धिनं ठरविता येणार नाही. जो काही अशा प्रकारचा दुसऱ्याला पीडा देणार आहे, आणि अत्यंत दुर्विचार ज्याच्या मनामधे आहेत, ज्याची संस्कृतीच तशा प्रकारची आहे. त्याला शासन केलं आहे. म्हणून त्याचा मोह जाळून, त्याच्या बुद्धीतला मोह दूर करून त्याच्याकडूनच लढाई करविली. सर्व जे काही विरोधी-धर्मविरोधी लोक होते त्यांचा नाश करविला आहे. आणि धर्मराजाला राजा केलं आहे. त्यात धर्मराज म्हणजे आपला आतेभाऊ आहे म्हणून तो राजा झाला पाहिजे असं बिल्कुल नाही. धर्मराज धर्मनिष्ठ आहे. धर्माकरता प्राण गेला तरी हरकत नाही पण, धर्मसंरक्षण केलं पाहिजे. ही बुद्धि ठेवणारा राजा पाहिजे. तर धर्माचं संरक्षण होतं.

महिषासुरमर्दिनीचं वाहन म्हणजे सिंह आहे. सिंह हे धर्माचं रूप आहे. धर्मानीच सिंहाचं रूप धारण केलेलं आहे. त्या सिंहाच्या आश्रयानीच महिषासुरमर्दिनीनं महिषासुराचा नाश केला आहे.

कुठं दया करायची? कशी दया करायची? केव्हा करायची? किंवा करायची नाही, 'शासन करायचं,' हे सगळ बुद्धीला समजण्याकरतां

शास्त्रसंस्कार बुद्धीमध्ये पाहीजेत. ते संस्कार बुद्धीमधे असल्यानंतर बुद्धीला मोह होत नाही. मोठे मोठे राजे वगैरे ते सगळेही ज्ञान संपादन करत. शास्त्रज्ञान, राजनीती सगळी समजली पाहिजे ना? राजनीती समजल्याशिवाय त्याप्रमाणे राजकारण कसं कळणार? त्यात स्वार्थ येणारच, स्वार्थ नको म्हणून कायदा करून उपयोग होत नाही. स्वार्थाकडे माणसाची बुद्धि जाणारच. स्वभाव आहे, मोहविकार आहेत. त्यांचे नियमन करायला पाहिजे. पापभीरुता मनामध्ये उत्पन्न झाली पाहिजे तर राज्य व्यवस्थित चालू राहील. केवळ कायद्याने राज्य चांगलं ठेवता येणार नाही. त्याचा अनुभव पुष्कळ स्वराज्य मिळाल्यानंतर म्हणा, या अलिकडच्या आठ दहा वर्षात, पुष्कळ मिळाला आहे. निष्कारण लोक नाहीसे होत आहेत. मारले जात आहेत.

राजनीतीचं ज्ञान नाही. अभ्यास नाही. केवळ जे काही आपण केलेली घटना, त्याच्यावरच आणखी बोट ठेऊन वागायचं. 'हे नको,' 'ते नको,' 'हे करू नको', 'ते करू नको' करायला तरी कोणी सांगितलं ? पूर्वीची आमची सगळी राजनीती तयार असताना त्याचा अभ्यास नसल्यामुळे-संस्कृत भाषेमध्ये आहे, अभ्यास नाही, त्यामुळे ते सोडून दिलं. परदेशामध्ये जशी राजनीती त्याला अनुसरून ही राजनीतीची घटना तयार केली. त्याच्यामध्ये कितीतरी दोष आहेत. दोष दिसायला लागले म्हणजे बदलायचं. बदलली जाणारी घटना, आमची नाही.

आज कितीतरी लक्षावधी वर्षे झाली, वेदशास्त्राची परंपरा आज अखंड भारतामध्ये चालू आहे. भगवद्गीता होऊनसुद्धा पुष्कळ वर्षे झाली. आजही भगवद्गीतेवरती श्रद्धा ठेवणारी मंडळी लहान लहान मुलं सुद्धा पंधरावा अध्याय , काहीतरी, म्हणत आहेत. वाङ्मय उत्तम आहे. वाणीची शुद्धी होत आहे. तर हा सगळा अभ्यास करून जी बुद्धि तयार झालेली आहे तो बुद्धिवाद भारताला मान्य आहे. त्या बुद्धिवादानं कुणाचंही नुकसान केलं

जाणार नाही किंवा जास्ती कुणालाही सवलतही दिली जाणार नाही. अपराधी मनुष्य असून त्याला सवलत मागायची म्हणजे काय? राजनीतीचं ज्ञान नसल्याकारणाने स्वार्थ बुद्धीमधे उत्पन्न होतो आणि स्वार्थाकरता राष्ट्राची सुद्धा पुष्कळ हानी होते. त्याकरता ते सबंध ज्ञान मिळवलं पाहिजे, संत महात्म्यांच्या ग्रंथावरून सुद्धा ते ज्ञान आपल्याला मिळतं -

**'भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे''**...

ज्ञानेश्वर महाराजांनी, हा जो उपदेश त्यांनी केलेला आहे तो राष्ट्राला कितीतरी उपयोगी आहे. सगळ्यांनी परस्परांच्या बरोबर मैत्री करावी, प्रेम करावं. हे जे सांगताहेत ते राष्ट्राच्या कल्याणाकरताचं आहे. सौहार्द भाव जर राष्ट्रामधे निर्माण झाला तर दुसरा कोणताही शत्रू येत नाही. पण तो सौहार्द भाव निर्माणच होत नाही कारण बुद्धीमधे मोहादिक विकार आहेत. 'स्वार्थ' बुद्धीमध्ये बसल्याकारणाने आपला पक्ष किंवा आपल्याला अनुकूल असलेले लोक तेवढे आपले आणि आपल्याशी विरूद्ध विचार असलेले लोक निराळे ... राष्ट्र एक असलं तरी सुद्धा ? 'एक राष्ट्र' ही कल्पनाच आमच्या मनामधे नाही. त्यामुळे आणखी बुद्धीवरती चांगले संस्कार नसल्याकारणाने 'राष्ट्राचं खर कल्याण कोणत' - 'हित कशाला म्हणायचं!' याची काही कल्पनाच नाही. त्यामुळे पुष्कळ विरोध. कितीतरी अशा प्रकारचे प्रसंग निर्माण होत आहेत. पण ईश्वराला आपण शरण जायचं आहे. सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करणारी शक्ती म्हणजे ईश्वरशक्ती आहे हे संतांचं अनुभवाचं सांगणं आहे. ईश्वराचं अस्तित्व सर्वांनी मान्य केलं पाहिजे. भारतात ज्यांचा जन्म झालेला आहे त्यांचं हे कर्तव्य आहे. ईश्वराची भक्ती सर्वांच्या मनामध्ये निर्माण व्हावी याकरता सर्व संत महात्मे प्रयत्न करत आहेत. त्यांचे प्रयत्न चालू आहेत. त्यांचे ग्रंथ त्यांनी या करतांच लिहीले आहेत. ईश्वरशक्ती कशी आहे हे सर्वांपुढे त्यांनी मांडले आहे.

मराठवाडा म्हणा-विदर्भ प्रांत वगैरे याच्यामधे सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती महाराजांचा संचार अधिक झालेला आहे. ते कोणत्याही वाहनात कधी बसलेले नाहीत. आसेतुहिमाचल त्यांचा संचार झाला पण पायानीच. सगळी तीर्थयात्रा वगैरे. या प्रांतामधे जास्तीत जास्त त्यांचा संचार झालेला आहे. कारण काय की त्यांना अशा प्रकारची संस्कृत बुद्धि दिसली. शास्त्र संस्कार, शास्त्र-ज्ञानाचे संस्कार ज्या बुद्धीवर झाले आहेत अशी बुद्धीची परंपरा त्यांना पसंत होती. कल्याणकारक आहे. समाजाचं कल्याण आहे. राष्ट्राचं कल्याण आहे.

बापुजी अणे जे होते, लोकनायक अणे, प्रसिद्ध, आणखी लोकमान्यांचे बरोबरीचे अनुयायी, गांधीजींचे बरोबर होते पण त्यांनी हे मांडलं, 'आम्हाला तुमच्या महाराष्ट्रात यायचं नाही. आमची संस्कृती वेगळी आहे.' हा जो त्यांनी अवाजवी हट्ट घेतला होता तो काही पूर्ण झाला नाही. आमचा स्वतंत्र प्रांत झाला पाहिजे. प्रांत वेगळे व्हायला लागले होते म्हणून त्यांनी हे मांडले.

'आमची संस्कृती वेगळी राहील. तुमच्यात आम्हाला मिसळायचे नाही, तुमचा बुद्धीवाद निराळा आहे, संत महात्म्यांचा बुद्धिवाद निराळा आहे, तो आमच्या बुद्धीला पटतो' म्हणून विदर्भ विभाग निराळा झाला. त्यांना पाहीजे होतं त्यांनी आपोआप सांगीतलं. त्यातलीच काही मंडळी फुटली म्हणा, फितूर झाली, कुणाला बळी पडली, मंत्रीपद मिळतंय म्हणून, परंतू ही जी बुद्धी आहे ती आपली बुद्धी चांगली ठेवली पाहीजे. 'संस्कार' बुद्धीमधे चांगले झाले पाहीजेत. ती बुद्धीच आपल्याबरोबर येणार आहे ना? मृत्यूनंतर हे इथलं काहीही भौतिक - जरी आपण भौतिक दृष्टीनं पुष्कळ संग्रह केला, काही केले तरी, ते बरोबर काहीच येणार नाही. स्वतःचा देह सुद्धा इथंच रहातो. ईश्वराने दिलेली बुद्धी, मन, ते बरोबरच येतं. दुसऱ्या जन्मामधे. या जन्मामधे चांगले संस्कार, ईश्वरभक्ती निर्माण

झालेली आहे. चांगलं धर्माचरण झालेले आहे. तसेच संस्कार झालेली बुद्धी घेऊन दुसऱ्या जन्मामध्ये आपण गेलो की, तसेच पूर्वसंस्कार वाढत जाणार. यानंतर ईश्वराचा साक्षात्कार, आत्मसाक्षात्कार, परमात्म्याचा; तोही आपल्याला दिसेल.

एका जन्मापुरता, केवळ इहलोकापुरता, एका जन्मापुरता विचार करून भागणार नाही. केवळ अर्थ आणि काम एवढेच दोन पुरुषार्थ आहेत. अर्थ-कामाकरताच प्रयत्न करूनही काही पूर्णता नाही. कल्याण नाही. परदेशातल्या लोकांना धर्माची काही विशेष भावना नाही. संस्कार नाही. मोक्ष पुरुषार्थ तर त्यांच्यापर्यंत नाहीच. अर्थ आणि काम हे दोन पुरुषार्थ डोळ्यासमोर ठेऊन प्रयत्न चाललेला आहे. त्यामुळे तिकडच्या ज्या ज्या काही सुधारणा म्हणून आम्ही समजतो आणि तशा सुधारणा इथ झाल्या पाहिजेत असं आपल्याला वाटतं. सध्या स्त्रीमुक्तीचाही पुष्कळ प्रयत्न चाललेला आहे. स्त्रियांना पारतंत्र्य दिलेलं आहे. भारतामध्ये असे काही विचार मांडत आहेत. काही काही पुरुषमुक्तीचाही प्रयत्न करत आहेत.

पण स्त्रियांना स्वातंत्र्य दिलं नाही म्हणजे काय दिलं नाही ? 'मनू' आद्य समाजशास्त्रज्ञ; प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ म्हणून, हिटलरला सुद्धा मनूच्या बद्दल आदर होता म्हणतात; हा मोठा समाजशास्त्रज्ञ! त्यांनी लिहून ठेवलंलं आहे.

**अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत्।**
**शौचे धर्मेऽअन्नपक्त्यां च पारिणात्यस्य वेक्षणे** (मनुस्मृति ९-११)

स्त्रियांची कर्मे, कर्तव्ये कोणती हे मनूंनी सांगितलं आहे. मोठा समाजशास्त्रज्ञ आहे. पहिल कर्तव्य म्हणजे, 'जमाखर्च स्त्रियांनी ठेवावा'... हे मान्य आहे कुणाला? स्त्रियांनी कधी हे वाचलय? आणि त्याकरता प्रयत्न केला आहे काय? स्वयंपाकाच काम - चूल आणि मूल आमच्याकडे

दिलेले आहे म्हणतात. आणखी पुरुषांनी वाटेल तसं फिरावं; पण पुरुषांनी आपल्या स्वत:च्या जवळ पैसा ठेवायचा नाही. मनुराजा सांगतो ! अर्थशास्त्रज्ञ स्त्री पाहिजे. हा एक पहिला उपदेश आहे.

शुचिता-पवित्रपणा, ही स्त्रियांच्या वरती जबाबदारी टाकली पवित्रपणाची ! काया, वाचा, मनाने त्यांनी पवित्र राहीले पाहिजे.

धर्माचरण - आपले कुलधर्म, कुलाचार सगळे आणखी कोणते चालत आलेले आहेत? आपल्या घराण्यामध्ये काय काय होतं? कोणता कुलदेव आहे ? काय आहे? हे सगळ त्यांनी लक्षात ठेवावं.

अन्नपक्त्यांच ! - 'अन्नपाक' म्हणजे स्वयंपाक. स्त्रियांनी करावा हे लिहून ठेवलेलं आहे. काय कारण आहे ? मनूंनी मुद्दाम सांगितलं आहे, पण का सांगितल आहे ? याचा विचार केलात? स्त्रियांना मुद्दाम घरात ठेवावं हा मनुराजाचा उद्देश नाही. असं कसं असेल? कारण असं आहे, उपनिषदामधे वर्णन आहे पवित्रपणाने, धर्मशील बुद्धीनं राहणारी पतिव्रता स्त्री तिच्या हातून जर स्वयंपाक झाला, आणि ते जर अन्न त्या पुरुषाच्या उदरामधे गेलं तर त्यानी त्याचं मन तयार होतं म्हणजे घरामधे असलेले पती म्हणा - पतीचे आप्तबांधव म्हणा - मूलबाळ म्हणा - या सर्वांचे मन तयार करण्याच कार्य हे पत्नीचं! स्त्रीनं करायचं आहे. त्याकरता तिच्या हातून स्वयंपाक झाला पाहिजे हा त्याचा उद्देश आहे. सात्त्विक अंश जो आहे अन्नाचा, अगदी श्रेष्ठ, अंश, त्यापासून मन तयार होतं सर्वांची मनं ही तयार करण्याकरता कायदासुद्धा अपुरा आहे. राष्ट्रपतीचा वटहुकूम सुद्धा अपुरा आहे. हे आपण पहात आहोतच. एकेक प्रांत स्वतंत्र व्हायला पहात आहेत. काही कायदा करू शकत नाही. स्वातंत्र्य मिळूनही त्याचा उपयोग नाही. पूर्वी स्वातंत्र्य नसताना ते कोणीही वर डोकेसुद्धा काढत नव्हते.

काही करावं ! काहीतरी राजकारणामधे थोडसं धैर्य पाहीजे. ते नाही. तर ही मन तयार करायची आहेत. सर्वही राष्ट्रातल्या पुरुषांची मनं पवित्र

चांगली झाली पाहीजेत. कुंतीनं उपदेश केलेला आहे आपल्या मुलांना - 'तुम्ही असे भित्रेपणानं बसू नका. चांगलं नाही !' द्रौपदीनं उपदेश केलेला आहे. तर त्याकरता अन्नपाक स्त्रियांनी केला पाहिजे. हा आग्रह आहे. राजाची समाज समाजधुरीणांची, योध्यांची, मुत्सद्यांची, धर्माधिकाऱ्यांची मने स्त्रियांनी शिजवलेल्या अन्नापासून झाली पाहिजेत.

घरामधे जुने नवे कपडे, धान्य, भांडी आहेत त्याच्यावर लक्ष ठेवायची जबाबदारी स्त्रियांची आहे. तर अन्नपाक त्यांनी करावा हे सांगितलं आहे. तर त्याचा उद्देश हा आहे. सर्वांच्या मनामधे आणखी काहीतरी स्वत:च्या संस्कृतीबद्दल अभिमान निर्माण झाला पाहिजे. अफझलखानाचा इतिहास पुस्तकात छापायचा नाही. अफझलखानाला मारलं ते छापायचं नाही म्हणतात! स्वराज्य मिळाल्यानंतर हे कायदे निघायला लागले. आणि महंमद पैगंबराचा एक धडा घातला तो काढून टाका म्हणून म्हटल तर जाळून टाकला त्यांनी हे काय! त्याला काय म्हणायच? कशा करता?

इतिहास जो घडलेला आहे तो छापायचा नाही. शिवाजी महाराजांची त्यात कीर्ति होती म्हणून! शिवाजी राजाची कीर्ती झाली हे तुम्हाला कोणाला पसंत नसेल पण केलेलं आहे त्यांनी! करून दाखवले आहे त्यांनी. तानाजीसारखे वीर राष्ट्रभक्त निर्माण केलेले आहेत, की ज्या तानाजींच्या घरी लग्न असलेलं असताना त्यांना निरोप आला असता की, 'कोंडाणा किल्ला सर करायचा आहे,' लग्न थांबविले त्यांनी ! आणि लढाई करता तानाजी गेले. लढाई म्हणजे कुठं काही ट्रिपला जायचे नाही! सगळी व्यवस्था कोणी यानी-त्यांनी उचलायची? जय मिळतो का विजय मिळतो, जिवंत रहातो किंवा नाही ! अशी स्थिती असताना मुलाचं लग्न ठेवून गेले तानाजी !

ही राष्ट्रभक्ती मनामधे असणारी मनं तयार पाहीजेत. तेव्हा होतं ! ही मनं तयार करण्याकरता हे सांगितलेलं आहे. स्त्रियांच्या कडून शुचिता -

पवित्रपणाने, आणि प्रेमळपणाने. दुपारच्या वेळी कुणीही विद्यार्थी घरामध्ये माधुकरी मागण्याकरता आला; ही माता ज्ञाती आहे. 'माझाही बाळ आणखी कुठंतरी असा गुरुकुलामधे शिक्षण घेतो आहे. तो ही गेलेला असेल या वेळेला मागायला.'

अशा प्रेमाने मनातून त्याला अन्न देते आहे. हे पवित्र मनाने, प्रेमाने तयार केलेला स्वयंपाक - ईश्वराला नैवेद्य दाखविलेला आहे पवित्रपणाने ज्यांनी सेवन केलेला आहे - त्यांचीच मनं तयार होतात. नाहीतर बुद्धिवाद तिकडचा येतोच आहे. आणि तोच बुद्धीवाद चांगला आहे. आमचा बरोबर नाही असंच वाटतं.

विश्वहिंदू परिषदेसारखी संस्था कार्य करते आहे. चाललेलं आहे. पण त्याला सुद्धा अशी सगळी सहाय्यता पाहीजे. मनाची तयारी पाहीजे. ही मनं एकत्र झाल्यानंतर कोणी जगामधे भांडलं तरी पाहू शकणार नाही. त्याकरता आपलही कल्याण व्हायला पाहिजे. केवळ आपण अगदी सगळाच त्याग करावा असा उद्देश नाही. पण आपलंसुद्धा मन पवित्र होऊन ईश्वराकडं लागलं पाहिजे.

तुकाराम महाराज किंवा नामदेव यांच्याजवळ संपत्ती नव्हती पण पांडुरंग साक्षात होता. केव्हाही गेलं तरी बोलायचे. वेळ आलेली आहे. नामदेवानं अन्न वाढून द्यावं. त्यांनी जेवण करावं असं आपण ऐकतो.

आत्ताच्या बुद्धिवादामधे याला काहीही स्थान नाही. 'हे सगळं खोट आहे!,' 'कुठला ईश्वर?', 'कुठला स्वर्ग?', 'कुठला नरक?', 'कुठला धर्म?', 'कुठला अधर्म?' हेच सगळे संस्कार बुद्धीमधे! कितीही ठिकाणी शासकीय यंत्रणांच्या खात्यांनी प्रयत्न केला तरी खरा अपराधी सापडणं शक्य नाही! कारण त्याच्याच घरी निरोप जातो, 'उद्या दुकानात नऊ वाजता तपासणी करण्याकरता येणार आहोत.' अगोदरच त्याला निरोप जातो, कसं मिळणार कसं ? सी.आय.डी. नेमल्यावर ते त्याच्यावर दुसरा

सी.आय.डी. नेमावा सांगीतलेलं आहे, राजनितीज्ञांनी विश्वास ठेवला तरी त्याच्यावर दुसरा सी.आय.डी नेमावा! औरंगजेब नेमत होता. त्याचं राजकारण उत्तम होतं. परंतु किती नेमणार? सगळ्याच सीआयडीची बुद्धी अशी झाल्यानंतर प्रत्येकाला किती सीआयडी नेमणार तुम्ही ? सगळं राष्ट्र सीआयडी खात्यातच जाईल. म्हणून प्रत्येकाच्या मनाची तयारी झाली पाहीजे. आपण करतो हा दोष आहे. पाप आहे पुढं त्याचा जाब द्यावा लागेल. आपल्या मनाला ते पटल्यानंतर काहीतरी पापापासून निवृत्त होण्याची बुद्धी होईल, एखाद्या वेळेला ! सुधारणा हळूहळू होण्याची शक्यता आहे. ती सुधारणा होण्याकरता ईश्वराची उपासना करावी. ईश्वराकडं लक्ष द्यावं, हा मार्ग संतमहात्म्यांनी दाखवून दिलेला आहे. स्वत: आपण करू शकत नाही, कारण संगतीमधे सगळं तसंच दिसतं. अर्थार्जन चाललेलं आहे, अर्थ कामाकरता किती लोक प्रयत्न करत आहेत? किती वेगळे होत आहेत ! किती मोटरगाड्या होत आहेत आणि आपण तसंच कसं होऊ असं वाटलं की याची प्रवृत्ती बदलते म्हणून केवळ अर्थ-कामाकरता प्रयत्न करायचा नाही असं नाही. ते ही पुरुषार्थ, पण त्याच्यामधे सुद्धा काही अंश आहे. या आपल्या अर्थार्जनामधे सुद्धा काहीतरी इतरांचा-समाजाचाही, काही भाग आहे हे लक्षात ठेवू न जर ते अर्थार्जन केलं गेलं, त्यागंबुद्धीनं, तर साम्यवाद कधीच उत्पन्न होत नाही.

'मी एकटयानं मिळवलेलं आहे. सगळी संपत्ती माझ्रा मी एकटाच मालक आहे. मी एकटाच माझ्या इच्छेनं काहीतरी विनियोग करणार !' असं म्हटलं की, साम्यवादाचा उद्भव निश्चीत आहे. तो काय चीननी, रशियानी काढला आहे असा अर्थ नाही. पूर्वीपासून मनाचे धर्म आहेत. ज्या मनामधे भोगाची इच्छा आहे. 'एकटाच मी ! माझं काय ते,'अशी इच्छा ज्या मनामधे, त्याला विरोधी सगळे लोक असणारंच. होणार सगळं ते! त्याला काही प्रचार करण्याची गरज नाही. म्हणून त्यागाची इच्छा जर

मनामधे असेल तर कितीही संग्रह केला तरी त्याग उरतो. ‘ **त्यागाय संभृतार्थानां** ’ कालिदासानं रघुवंशातील राजांचे वर्णन केलयं. पूर्वीचे राजे संग्रह करत होते, पण त्याग करत होते. त्यागाकरता संग्रह करत होते. ही बुद्धि जर असेल तर साम्यवाद कधीच येणार नाही. साम्यवाद येऊ नये अशाकरता प्रयत्नही करण्याची जरूरी नाही. साम्यवाद म्हणजे समाजवाद ! ही ही कल्पना बरोबर नाही. केवळ अर्थसाम्य कुणालाही करता येण शक्य नाही. ते सुद्धा साम्यवादी लोक सुद्धा आत्ता सांगत आहेत.

‘ज्या दिवशी एकाही मनुष्याची वैयक्तीक संपत्ती, थोडी सुद्धा रहाणार नाही त्यावेळी आमचा हा प्रयोग यशस्वी झाला असं आम्ही समजतो.’

प्रयोग चालला आहे म्हणे ! ते काम पूर्ण झाले असें समजत नाहीत. आम्हाला कोणीही प्रतिस्पर्धी निर्माण होऊ नये, आम्हाला वाटेल तसे आम्ही वागू. कोणाचीही स्त्री असो, आम्ही वाटेल त्यांना नेऊत. अशी ही संस्कृती निर्माण होऊ नये. याकरता काहीतरी प्रयत्न व्हावे. तो प्रयत्न नवीन करण्याची जरूर नाही. आमच्या सगळ्याही शास्त्रकारांनी प्रत्येकाची कर्तव्ये नेमून सांगून ठेवलं आहे. आपल्या कर्तव्याचं पालन करायच आहे. आणखी दुसऱ्यालाही सहाय्य करायचं आहे.

पेशव्यांच्या सैन्यामधे सुद्धा तोफखान्यामध्ये पुष्कळ मुसलमान लोक ठेवलेले होते. जे काही अशा प्रकारचे असतील, आत्मीयपणाने वागणारे ज्यांच्या मनामधे चांगले संस्कार आहेत. असे सगळेच आपले ! त्यांना दूर लोटायचं असा अर्थ नाही. परंतू ज्यांच्या ठिकाणी रावणासारखी बुद्धि असेल त्यांना शासन करायला पाहिजे. शिवाजीराजांनी जो प्रयत्न केला तो याकरता केला. स्वराज्याकरता केला. स्वराज्य म्हणजे त्यांना स्वत:ला राजा व्हायचं होतं असं नाही. पण ही बुद्धी वाढली पाहिजे. सर्व लोकामधे ही राष्ट्रभक्ती निर्माण झाली पाहीजे. स्वत:च्या धर्माचं संरक्षण झालं पाहिजे.

गोरक्षण झालं पाहीजे. आता गोरक्षण कुठं आहे! त्या मुंबईला ते कारखाने पाहीले गायींचे. किती गायी आणत आहेत? बिचाऱ्या चालल्या आहे! केवळ अर्थार्जन पाहीजे. गोमांस किंमती, त्याला पुष्कळ पैसा मिळतो म्हणे. त्याकरता हे चाललं आहे. अर्थशास्त्राच्या पुढे दुसरं धर्मशास्त्र सगळं बाजूला केलेलं आहे. याकरता काहीतरी माणसाची बुद्धि धर्मानुकूल झाली पाहिजे. 'धर्मानुकूल' याचा अर्थ काही दुसऱ्याची परतंत्रता असा अर्थ नाही. आपलंच कल्याण आहे.

त्याकरता भगवंतांनी गीतेमध्ये हाच उपदेश केलेला आहे. 'कर्मयोग' पहिला म्हणून सांगीतलं आहे. कर्तव्यकर्म प्रत्येकांनी समजून घेऊन त्याप्रमाणे वागल्यानंतर

**देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः।**
**परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ॥** ३:११॥

देवांनी माणसांना सहाय्य करावं माणसांनी देवांना साहय्य करावं 'देव' म्हणजे अशा प्रकारची चांगली बुद्धी ज्यांना असेल त्यांनी सर्वांना सहाय्य करून आपले कार्य चालू ठेवावं

इहलोकामधे असे पर्यंत केवळ आपण एकट्यानेच सुखी व्हावं ही ज्याला इच्छा आहे त्याला असूर म्हटलेलं आहे. तो दैत्य आहे. तो मनुष्यसुद्धा नाही. देव तर नाहीच नाही. त्याकरता ही आसुरीवृत्ती गेली पाहीजे आणि देवबुद्धी उत्पन्न झाली पाहिजे. निदान मनुष्यबुद्धी तरी निर्माण झाली पाहिजे.

दैत्यबुद्धी जाऊ देत! त्याकरता संतमहात्म्यांचे प्रयत्न झालेले आहेत, चालू आहेत. ईश्वरसुद्धा त्याकरताच अवतार घेऊन येत असतात हे लक्षात ठेवून आपण वागायचं. आपलं जे धर्माचरण आहे. विहित धर्म जो आहे, त्या विहित धर्मामधे काहीही वावगं नाही. विरोध नाही.

'जातीयता'- 'जातीयता' हा जो शब्द चालू आहे, स्वराज्य मिळाल्यापासून, त्याचा अर्थ काय आहे ! प्रत्येकाचे पक्ष मात्र वेगळे वेगळे होऊ शकतात आणि काही थोडसं झालं देवाचं, धर्माचं, कोणता उत्सव झाला की जातीयता ! तेव्हा ही जी आसुरी बुद्धि वाढत चालली आहे ती आपल्या कर्तव्य कर्मापासून परावृत्त करणारी आहे.ती जाऊन कर्तव्यकर्म यशस्वी रीतीनं पार पडलं पाहिजे. याकरता सगळ्यांनी मिळून प्रयत्न करायचा आहे.

सामुदायिक शक्ती कलीयुगामधे जास्ती मानली गेलेली आहे. एका व्यक्तीची तितकी शक्ती नसते. कारण एका व्यक्तीजवळ इतकं तप नाही किंवा ईश्वराची कृपा नाही.

संत महात्मे एकटेच होते. मारुतीराय एकटेच गेले लंकेला. सीतेचा शोध लावला. सीतेलाही धैर्य दिलं. आणि रावणाची शक्ती कशी आहे ते पाहून आले. लंका जाळून परत आले. एकटेच, सुरक्षित !

पण एकट्यामध्ये ही शक्ती उत्पन्न होणं हे सध्याच्या काळामध्ये कठीण आहे. म्हणून सामुदायिक शक्ती ही जर एकत्र आली तर त्याचा पुष्कळ उपयोग होईल. त्याचा कितीतरी परिणामकारक उपयोग होतो आहे. म्हणून सामुदायिक शक्ती ही उत्पन्न व्हावी. लोकमान्यानी सुद्धा गणेश उत्सव पुण्याला त्याकरता सुरू केले. सामुदायिक शक्ती निर्माण झाली. गणेशाच्या उत्सवाच्या निमित्ताने का होईना लोक एकत्र येऊ लागले. हा त्यांचा उद्देश होता. मराठवाडा, विदर्भ वगैरे भागात जोपासलेली आपली संस्कृती चांगलीच आहे.

आधुनिक बुद्धीवादामधे सगळा दोष आहे असा अर्थ नाही. पण बुद्धीवरती काहीतरी परमार्थ दृष्टीनं, पारलौकीक दृष्टीनं विचार केला गेला पाहीजे. आपल्याला किती लांब जायचंय, किती मोठा प्रवास आहे. याची जाणीव ठेवली पाहिजे. त्याकरता कसं वागलं पाहिजे ? आपण हे वागणं

पारमार्थिक दृष्टीनंही आपल्याला उपयोगी पडतं, ते सामाजिक दृष्टीनही समाजाला उपयोगी पडणारं आहे. हाच आमचा धर्म आहे ! भारतीय धर्म, जो समाजाला, सर्वांना उपकारक ठरतो आहे. त्यात कुणाचाही द्वेष नाही. विरोध नाही. हे समजून घेतलं पाहिजे. समजून दिले पाहिजे. त्याचप्रमाणे कार्य जर झाले तर समाजाचाही उत्कर्ष होणार आहे. राष्ट्राचाही उत्कर्ष होणार आहे.

आज या ठिकाणी तुम्ही सर्व मंडळींनी हा जो सत्कार समारंभ घडवून आणलेला आहे, सगळ्यांच प्रेम आहे. या वैदिक संस्कृतीवरचे असलेलं प्रेम, त्या प्रेमाचं हे प्रदर्शन आहे. एवढच म्हणायला हरकत नाही 'एक व्यक्ती' हे निमित्तमात्र होत असते. पण अंत:करणामधे जे प्रेम आहे, त्या प्रेमामुळेच ही अशाप्रकारची कार्ये होतात.

त्यामुळे सगळ्याचीच संस्कृत बुद्धी झाली पाहिजे. संस्कार बुद्धीवरती होतात आणि सर्वांनाही पुढे त्याचा उपयोग होतो आहे. तेव्हा आपले वैदिक राष्ट्र जे आहे, भारतीय राष्ट्र, त्या राष्ट्राचा उत्कर्ष होण्याकरता सर्वांची बुद्धी चांगली झाली पाहिजे. चांगले संस्कार बुद्धीमधे झाले पाहिजेत त्याकरता प्रयत्न झाला पाहिजे.

सर्वांच्या बुद्धीला - अंतर्यामी जो बुद्धीला प्रेरणा करणारा परमात्मा आहे, त्यांनी सर्वांच्या बुद्धिला प्रेरणा करून आपल्या वैदीक राष्ट्राचं जे काही महत्त्व आहे ते सर्वांनी समजून घ्यावं, त्याप्रमाणे आचरण करावं. केवळ अर्थकामाचाच उत्कर्ष झाला म्हणजे उत्कर्ष नाही. त्याच्याबरोबर धर्माचीही जरूर आहे. धर्म, काम-अर्थाला सोडून आहे असं नाही. अर्थ-काम यांचा उत्कर्ष करणाराही धर्म आहे.

हे सगळं समजून घेऊन सर्वांची बुद्धी या ईश्वरभक्तीकडं लागावी. धर्माचरणाकडं सर्वांची प्रवृत्ती व्हावी. आणखी सर्वांचेही कल्याण व्हावे ही कृपा अंतर्यामी भगवंतानी, पांडुरंगानी, श्री गणेशानी, करावी. एवढीच

प्रार्थना करून आपण केलेलं हे जे प्रेम आहे, या प्रेमाशी मी कृतज्ञ आहे. हे प्रेम आमच्या संस्कृतीवरचं आहे. ते पाहून आणखी समाधान व्यक्त करून हे भाषण संपवितो !

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा.

* * *

# यदु - अवधूत संवाद

## प.पू. श्रीमत् दत्तमहाराज कवीश्वरांचे बीड मुक्कामी झालेले "दत्तगुरु आख्यान"

उद्धवजींनी नमस्कार केला. भगवंताच्या चरणावरती मस्तक ठेवलं आहे. हात जोडून उद्धवजी म्हणतात - "देवाधिदेवा! परमेश्वरा, श्रीहरी, या कुलाचा संहार करून आणि या लोकाचा त्याग करून आपण जाण्याची इच्छा करता आहात, हे खरं आहे ना? विप्रशाप दूर करण्याचं सामर्थ्य आपल्याला नाही काय महाराज ! पण आपण तिकडे लक्ष देत नाहीत."

-'पुढं चला, गाव सोडून आपण जाऊ या प्रभास तिर्थाला जाऊ या,' असच आपण सांगायला लागलात म्हणजे बहूतेक त्या विप्रशापाकडे दुर्लक्ष केलेलं आहे. पण मी मात्र आपल्या चरणांला आता सोडून रहाणार नाही."

"मलाही आपल्याबरोबर आपल्या निजधामाला घेऊन चला. आजपर्यंत आपला समागम मला घडलेला आहे - आपल्या दिव्य लीला मला पाहायला मिळालेल्या आहेत. नेहमी आपलं सान्निध्य आहे. आपली वस्त्रं मला परिधान करायला मिळत आहेत.आपलं उच्छिष्ट मला खातां येतं. असे आम्ही आपले दास हे आपल्या मायेतून मुक्त झालेलो आहोत."

"आम्ही या कर्ममार्गामधे फिरतो आहोत सारखं. परंतु आपल्या लीला वर्णन करणं, ऐकणं या साधनानी आम्ही मुक्त झालेलो आहोत. आम्हाला मायाबंधन वगैरे काही नाही." याप्रकारे उद्धवजींनी आपले मनोगत व्यक्त केल्यानंतर, मोठा भक्त आहे. हा प्रिय भक्त आहे. त्या भक्ताला -उद्धवाला, भगवंतानी उपदेश करायला आरंभ केलेला आहे.

भगवान सांगताहेत की, ''उद्धवा! खरी गोष्ट आहे. तू म्हणालास ना, या कुळाचा संहार करून आपण निजधामाला जाणार आहात. होय ! आता जायचंय.'' म्हणाले, ''वैकुंठाला जायचंय. आत्तांच हे सगळे ब्रह्मदेवादिक देव येऊन गेलेले आहेत. त्यांनीही प्रार्थना केलेली आहे. तेही वाट पाहात आहेत. इथं आता सगळं देवांचं कार्य आटोपलंय,'' म्हणाले,

''ज्या करतां मी अवतार घेतला. ब्रह्मदेवाच्या इच्छेनं ते सगळं कार्य आता संपलयं. आता इथं कशाकरता रहायचं मनुष्यरूपानी? कुळालाही शाप झालाय. ते आता जवळ जवळ नष्ट होणारच.''

''हा समुद्र, ही द्वारका नगरी सातव्या दिवशी बुडवून टाकणार आहे. म्हणून मी ज्या वेळेला या लोकातून जाईन, वैकुंठ लोकाला, त्याच वेळेला कलीचा अधिकारही या ठिकाणी सुरू होणार आहे.''

''तू मात्र आता इथे राहू नकोस'' म्हणाले, ''अधर्मवृद्धि, अधर्माचीच जास्तीत जास्त आवड असणारी मंडळी या कलीयुगांमधे होणार आहेत. तू सर्व स्नेहपाश सोडून जा आणि माझं चिंतन करीत समदृष्टीनं पृथ्वीवर तू संचार करीत रहा.''

मनानी, वाणीनं, इंद्रियांनी जे जे आपल्याला समजून येत आहे, दिसत आहे, ते सर्वही मायामनोमय - मनोमय म्हणा - मायामय म्हणा अशा प्रकारचं आहे, हे तू समजून घ्यावं.

'' तेव्हा इंद्रियांचा - मनाचा निग्रह करून हे सर्व विश्व म्हणजे वस्तुत: आत्मरूप आहे असे चिंतन कर. नामरूपात्मक विश्व मनातून काढून टाक. सच्चिदानंदघन जे परमात्मस्वरूप आहे त्याचं चिंतन करीत पृथ्वीवर तू संचार कर. म्हणजे तुला कोणतंही विघ्न होणार नाही, आणखी पूर्ण शांती प्राप्त होईल.'' असं भगवंतानी सांगितल्यानंतर ते उद्धवजी म्हणतात, ''महाराज ! सर्व त्याग करायला आपण सांगताहात पण ही किती कठीण गोष्ट आहे.त्या बरोबर.''

**त्यागोऽयं दुष्करो भूमन् कामानां विषयात्मभिः।**
**सुतरां त्वयि सर्वात्मन् भक्तैरिति मे मतिः ॥१५॥**

मनातल्या सगळ्यांही विषय वासनांचा त्याग झाला पाहीजे. नुसत्या विषयांचा त्याग बाहेरून करणे त्याला त्याग म्हणत नाहीत. मनातील वासना सगळ्या त्याजल्या पाहीजे आणि हे तर कठीण आहे. आपली भक्ती ज्यांना नाही त्यांना तर फारच कठीण आहे. तेव्हा देहाच्या ठिकाणी अहंकार, सर्व स्त्री-पुरुष वगैरे यांच्या ठिकाणी ममता, हे सगळे दोष वाढलेले आहेत. आणि ही अहंता, ममता सगळी कशी सोडून द्यावी ? यातून कसं बाजूला व्हायचं हेच मला कळत नाही. मी आपल्याला शरण आलेलो आहे .आपण सर्वज्ञ आहात सर्व नियामक आहात करवून घेणारे आहात. भक्तांचे कल्याण करणारे आहेत, मला आपण मार्गदर्शन करा, अशी प्रार्थना उद्धवजींनी केल्यानंतर भगवान सांगताहेत -

"आपला आपणच उद्धार करून घ्यायचा बाबा!" "मन आहे ना आपल्याला?" विचार करू शकणारे जे आहेत लोक ते स्वतःचा उद्धार स्वतःच करून घेतात. मनानीच हे सगळं विचार करून ठरवायचंय खरं खोटं.

मनुष्य जन्म मिळाल्यानंतर ही विचारशक्ती वाढविता येते. वाढती आहे आणि त्याचं अंतःकरण, बुद्धी, चक्षु जे आहे, ते विकसीत होऊ शकत आहे. सांख्यमार्ग आहे. योगमार्ग आहे-

'या मार्गाने जाऊन माझा जास्ती प्रभाव म्हणा - आविर्भाव, कुठं कुठं अधिक आहे. कुठं कुठं ईश्वर भाव जास्ती आहे. वगैरे ते सगळं ते पाहू शकतात. या सर्व शरीरामधे एक अंश शरीर मनुष्य शरीर मला अत्यंत प्रिय आहे. या मनुष्य शरीरामधेच माझं मार्गदर्शन होऊ शकतं आणखी माझी प्राप्ती होऊ शकते.' म्हणून आपल्या मनाशीच आपण विचार करून आपली बुद्धी शुद्ध करायची आहे. जगामधे काय घ्यावं आणि काय सोडावं हे बुद्धीनं

ठरवायचं म्हणाले. एकदा बुद्धी तशी स्थिर झाली, अमुक ग्राह्य आहे, अमुक त्याज्य आहे. परमात्मरूप जो आहे, आनंदघन, तो आनंद. जो आहे, अविनाशी स्वरूप आनंद स्वरूप,तो ग्राह्य आहे. बाकी सगळं त्याज्य आहे - हे जर बुद्धीला पटलं तर शांतता प्राप्त होते.

"या करता उद्धवजी - तुम्हाला एक पूर्वीचा संवाद सांगणार आहे."

अवधूत दत्तात्रेय आणखी यादव राजांच्या कुळांचा पूर्वज त्या दोघांचा संवाद आहे. यदुराजा पृथ्वीवर फिरत असताना अवधूत दत्तात्रेयांची भेट त्याला झालेली आहे. दत्तात्रेय तरुण वयामधे आहेत. उत्कृष्ट ज्ञानी आहेत. पाहिल्या बरोबर अगदी तेज:पुंज स्वरूप आहे. यदुराजाही मोठा धर्मशील होता. त्यांनी त्यांना विचारलं

**कुतो बुद्धिरियं ब्रह्मनकर्तु: सुविशारदा ।**
**यामासाद्य भवाँल्लोकं विद्वांश्चरति बालवत् ॥१९॥**

"महाराज, - काय आपलं गांभीर्य आहे! आपल्याला पाहील्याबरोबर आमचं सुद्धा मन स्थिर होत आहे. आपल्याजवळ इतका आनंद आहे - शांत अंत:करण असलं म्हणजे आनंद आहे. हा इतका आनंद आपण कसा मिळविला आपल्या बुद्धीनं? सर्वही लोकांकडे पाहिलं असतांना धर्म, अर्थ, काम याची प्राप्ती होण्याकरिता प्रयत्न सर्वही जीव करतात. कोणचंही काम हेतू शिवाय नाही. सहेतुक सगळी कर्म चाललेली आहेत. आयुष्य पाहीजे ! यश पाहीजे ! संपत्ती पाहीजे ! सत्ता पाहीजे ! पाहिजेच काहीतरी. आपण समर्थ आहात उत्कृष्ट विद्वान दिसतां, आपण सर्वही करू शकता पण -

**न कर्ता नेहसे किंचित् जडोन्मत्त पिशाचवत् ॥२८॥**

काहीही आपण करत नाही. स्वस्थ पडून राहीला म्हणजे काय? काय हे सगळे चुकलेत का लोक सगळे ? प्रयत्नवाद आहे. सगळे कर्म करताहेत व्यवहारातही कर्माची आवश्यकता आहे. आणखी शास्त्रांनीही कर्म करायला सांगितलेली आहेत. पण आपण तर काहीही करत नाहीत. बरं ! इतकी

कर्म करणारे सगळे लोक -

**जनेषु दह्यमानेषु कामलोभदवाग्निना।**

**न तप्यसेऽग्निना मुक्तो गड्.गाभ:स्थ इव द्विप: ॥२९॥**

सर्वही लोक - आणखी अंत:करण त्यांच दग्ध होत आहे. चिंताशील आहेत, काम, क्रोध, लोभ हा दावाग्नी सगळा पेटलेला आहे. सगळे विकार मनामध्ये उत्पन्न होत आहेत आणि त्यामुळे तो दग्ध होत आहे. पण आपल्याकडे पाहीलं तर आपल्याला कोणचाही विकारच नाही! काम नाही, क्रोध नाही, लोभ नाही, द्वेष नाही, काही नाही! इतका आनंद आपल्याला मिळाला कसा? यदुराजा विचारतो आहे. 'काही न करता आनंद मिळतो काय महाराज?'

**त्वं हि न: पृच्छतां ब्रह्मन्नात्मन्यानंद कारणम्।**

**ब्रूहि स्पर्शविहीनस्य भवत: केवलात्मन: ॥३०॥**

विषयाचा संबंध सुद्धा नाही आपल्याला आणि आनंद आहे पुन्हा? 'आम्ही विषयाचा संबंध मिळावा - विषयापासूनच आनंद मिळतो अशा समजुतीनं विषय संग्रह करण्याच्या मागे लागलो आणि त्या वेळेला आनंद गेला आमचा!'

याप्रमाणे यदुराजाने विचारल्यानंतर त्याची जिज्ञासा पाहिली यदुराजाची आणि यदुराजाला हा सगळा आत्मानात्म विचार म्हणा हेयोपादेय विवेक हा सांगायला त्यांनी आरंभ केला.

अवधूत सांगताहेत, 'राजा'-

**सन्ति मे गुरवो राजन् बहवो बुद्ध्युपाश्रिता:।**

**यतो बुद्धिमुपादाय मुक्तोऽटामीह तच्छृणु॥ ३२॥**

'मी म्हणाले, पुष्कळ गुरु केलेले आहेत. जो जो जयाचा घेतला गुण' - ज्याच्या पासून जो गुण मी घेतला तो मी गुरु केला म्हणाले, गुण घेण्याकरता गुरु आणि दोष टाकण्याकरता गुरु - कसं वागावं हे ही मी

शिकलो. कसं वागू नये हे ही शिकण्याकरता गुरु केला.

जगामधे ग्राह्य काय आहे आणि त्याज्य काय आहे हा निर्णयच आमचा होत नाही जीवांचा! त्यामुळे गोंधळ आहे. हे करून पहावं, ते करून पहावं हे अगोदर निधितच नाही म्हणाले, त्यामुळे सगळं मनाच चांचल्य जे आहे - मनाची स्थिरताबुद्धि नाही, त्यामुळे दुःख आहे. मी ती बुद्धि स्थिर केली म्हणाले -

**पृथ्वी**

तर पहिली गुरु म्हणजे ही 'पृथ्वी' आहे. त्या गुरूमधे सुद्धा चेतन,अचेतन सगळे गुरु आहेत. पक्षी गुरु आहेत.पशू गुरु आहेत. पंचमहाभूतं गुरु आहेत. पिंगला वेश्या गुरु आहे. घरातली उपवर झालेली कन्याही गुरु आहे.

म्हणजे विचार करणारी बुद्धी जी आहे त्या बुद्धीला गुरुतत्त्व व्यापक असल्याने, मार्गदर्शन हे कुठूनही मिळू शकतं म्हणाले. आपल्या बुद्धीला मात्र जिज्ञासा पाहिजे. उत्कंठा पाहिजे. गुरूचा शोध करणं - निष्णात गुरु मिळतील म्हणाले परंतु त्याच्याकडून विचारशील बुद्धी प्राप्त झाली तर त्या बुद्धीला हे गुरूंच मार्गदर्शन कोणाकडूनही मिळू शकेल. ते सांगताहेत अवधूत -

**भूतैराक्रम्यमाणोऽपि धीरो, दैववशानुगैः।**
**तद्विद्वान्न चलेन्मार्गादन्वशिक्षं क्षितेर्व्रतम्॥३७॥**

पहिले आणखी शिक्षण या भुमीपासून घेतले. आता परमार्थ मार्गाला जायचयं आपल्याला. पण त्यावेळेला क्षमा. तितिक्षा हे पहिलं व्रत नेमलेले आहे. पहिला गुरु आहे - क्षमा, शांती.

गीता ज्ञानाचा उपदेश सुरू असताना आरंभालाच भगवान या तितिक्षेचा उपदेश करताहेत -

**मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदु:खदा: ।**

**आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत।।**भ.गीता२:१४।।

मोक्षाचा तो अधिकारी आहे. ही तितिक्षा म्हणाले, पृथ्वीपासून मी शिकलो. कुणी कितीही काही केलं -

लोकांच्या पासुन पुष्कळ उपसर्ग आपल्याला होतो. सगळेच काही मान देणारे नसतात. मान देणारे,तो ही त्रासच आहे म्हणाले. अपमानाचाही त्रास आहे. मानाचाही त्रास आहे. तेव्हा जरी कुणाकडूनही आपल्याला उपसर्ग झाला तरी सुद्धा धैर्य अंत:करणामधे धारण करून आपला मार्ग मात्र त्या साधकांनी सोडू नये. साधकाला हा उपदेश आहे. सगळे गुरु साधकाच्या करता आहेत. ही जी पृथ्वी आहे ती पृथ्वी अशी तितिक्षा वृत्तीची आहे. किती जमीन जाळताहेत - त्याच्यामधे कितीतरी घाण करताहेत - वाटेल ते करताहेत पण 'सर्वसहा' - तिला नाव आहे, पृथ्वीला सर्व सहन करणारी आहे. हा तिचा गुण अवधूत म्हणताहेत,मी घेतला. त्यामुळे समाधान मला आहे.

वृक्षरूपी पृथ्वी आहे. पर्वतरूपी पृथ्वी आहे - सर्वस्व देऊन टाकतात ते वृक्ष ! काही ठेवतात का? फळं, फुलं, तोडून सगळाच्या सगळा नेला तरी काही बोलत नाहीत. तशी वृत्ती पाहिजे. हे पूर्वीपासून मी शिकलेलो आहे. तितिक्षेचा अभ्यास!.

**वायु**

त्याच्यानंतर वायु - वायूपैकी प्राणवायु म्हणून जो आहे शरिरात आणखी सारखा संचार करणारा आतला वायु त्याला प्राणवायु म्हणतात.

**प्राणवृत्त्यैव संतुष्येन्मुनिर्नैवेन्द्रियप्रियै: ।।३९।।**

त्या प्राणाची वृत्ती कशी आहे - मी पाहिली आहे आणि त्याप्रमाणे मी वागतो म्हणाले.

प्राण जसा चालतो आहे त्याप्रमाणे आणखी साधकांनी रहाण्याचा अभ्यास करावा म्हणजे काय! इंद्रिये जे आहेत. त्या इंद्रियांना जे आवडेल त्याच्या करता प्रयत्न करावा. चांगले चांगले खायला पाहिजे - चांगली वस्त्रे पाहिजेत, चांगलं एकंदर सगळं ऐकायला मिळालं पाहिजे. ही सगळे प्रयत्न आहेत.

पण इंद्रियांना जे प्रिय आहे, त्याने संतुष्ट न रहाता जे आपल्याला ज्या वेळेला मिळेल त्याच्यावरती संतुष्ट रहाण्याचा अभ्यास हा प्राणाचा प्राणवृत्तीचा अभ्यास आहे. प्राणवायु याला काहीही चालतं म्हणाले. चोवीस तास कार्य करतोय. कोणचेही इंद्रिय चोवीस तास काम करणार नाही. फक्त प्राणवायूचे मात्र चोवीस तास - काम चालू आहे. सर्वात तो मुख्य आहे. विचार केला असताना बाकीची इंद्रिये काय दमतात सगळी. पण हा सर्वात श्रेष्ठ आहे. सर्व कार्य करतो आहे. चोवीस तास अखंड कार्य चाललेलं असताना अपेक्षा काही नाही. नुसत्या पाण्यावरही राहू शकतो.

इंद्रियाकडे काही आवश्यकता ठेऊ नये हे साधकानी पहिल्या प्रथम लक्षात ठेवावं. प्राणवायूला गुरु करून असं मानल.

बाह्य वायु हा सर्व ठिकाणी फिरतो आहे. कुठंही आसक्त नाही. चांगल्या जागेवरून जातो. देवमंदिरातून जातो. उत्तम तीर्थावरुन, तळ्यावरून, नद्यावरून जातो - सगळीकडे जातो. पण आसक्ती कुठंही नाही.

ही एक वृत्ती - याचा ही अभ्यास करण्यासारखा आहे. जगात तर आहेच आहे. नाना प्रकारच्या वृत्तीचे लोक आहेत. जीव आहेत आणि तिथं राहून जर हे बरं ते बरं, असं वाटायला लागलं तर काही खरं नाही.

**विषयेष्वाविशन् योगी नानाधर्मेषु वर्ततः।**
**गुणदोषव्यपेतात्मा न विषज्जेत वायुवत्॥४०॥**

गुणदोष मनामध्ये येऊन उपयोग नाही. अनेक प्रकारच्या विषयाच्या ठिकाणी जरी असला तो तरी सुद्धा गुणदोष रहीत बुद्धि आहे. तो वायु

जातोय- चांगल्या ठिकाणी. वाईट ठिकाणी, सगळीकडं जातोय. त्याप्रमाणे गुणदोष रहित अशा प्रकारच्या समदृष्टी सहित आपलं अंत:करण ठेवून त्या साधकानी रहावं, याकरीता वायुचं त्यांनी उदाहरण दिलय. त्याच्या नंतर आकाशतत्व आहे.

**आकाश**

**अन्तर्हितश्च स्थिरजंगमेषु ब्रह्मात्म भावेन समन्वयेन।**
**व्याप्त्याव्यवच्छेदमसङ्.गमात्मनो मुनिर्नभस्त्वं विततस्य भावयेत्।४२।**

अनासक्त कस व्हायच ! आसक्ती सुटायची म्हणजे सगळे विषय आहेत. सगळे इथे आहेत, त्यांना सोडून अनासक्त व्हायच कसं?

त्याकरता आकाश तत्त्वाला गुरु केलं, 'आकाश सर्व ठिकाणी आहे. सर्वही घडामोडी आकाशामधेच चाललेल्या आहेत. पण त्याला कशाचा संबंध आहे का?' पावसाच्या धारा सारख्या पडताहेत उन तापत आहे. आकाशातच सर्व चालतंय. तर आकाशतत्त्व हे स्वभावत: असंग आहे त्याला कशाचा संबंधच नाही.

"**पद्मपत्रमिरवांभसि**" - ते सांगताहेत, कमळाच पान पाण्यामधेच आहे. म्हणाले पण पाण्यातून वर काढल्यावर पाण्याचा एक थेंब सुद्धा त्याच्यावर रहात नाही. म्हणजे स्वाभाविक असंगवृत्ती जी आहे, त्याचं चिंतन केल पाहीजे. 'आत्मस्वरूप' - आपल्याला वस्तुत: कशाचाही संबंध नाही, होऊ शकत नाही. आकाशाप्रमाणे आपण आहोत म्हणून आकाशाला गुरु केलं.

संग कशाचाही नाही, कोणाचाही आणखी प्रभाव आपल्यावर पडणार नाही. आपले स्वरूप निर्दोष आहे. आणि निर्गुण आहे हे स्वभावत: अस स्वरूप आपल याच चिंतन जर सुरु केलं तर आसक्ती होती कशाला? वायुप्रमाणे अनासक्त रहावं. परंतु त्याच्याकरता आकाशाप्रमाणे आपण असंग आहोत. आपल्या स्वरूपाच्या अभ्यासाला सहाय्य होणारच म्हणून

आकाशाचही त्यांनी उदाहरण दिलं.

**जल**

जल जे आहे, 'जीवयुक्त' जल आहे. 'पवित्र असतं ' म्हणाले, स्वच्छ आहे, तहान लागल्यानंतर त्याच्या पानाने समाधान होत आहे. तसं साधकांनी त्या जलाप्रमाणे असावं. जलाचा मित्र **'अपांमित्र'** म्हणजे जलाप्रमाणे आपण वागावं. पवित्र आहे. कुणीही आला तरी त्याला प्रतिष्ठेनं, वाणीनं, मनानं तृप्त करावं ...

**सूर्य**

सूर्य आपल्या किरणांनी सर्व जलाचा संग्रह करतात. नद्यांचं पाणी, समुद्राचं पाणी, तलाव आहेत. सगळे आटून जातात. सगळं पाणी सूर्यांनी घेतलं. पण संग्रह केला तरीसुद्धा पावसाळ्यामधे पुन्हा ते पाणी देऊन टाकल म्हणजे संग्रह दोष नाही. संग्रह करणाऱ्याची बुद्धी- तो संग्रह कशाकरता केला आहे ती बुद्धी, सदोष असली म्हणजे संग्रहदोष ठरतो आहे.

अर्थ-साम्य असलं पाहिजे - असा जो एक वाद निघाला आहे सध्या पुष्कळ त्याचे अनुयायी आहेत. सर्वच अर्थ समान असला पाहिजे. एका ठिकाणी अर्थसंग्रह उपयोगी नाही. परंतु संग्रह तर आवश्यक आहे. अर्थसंग्रहाशिवाय राष्ट्र कसं चालणार? संग्रह तर करायचा नाही.

त्याकरता अवधूतांनी आणखी त्यांना सांगितल की, सूर्यनारायण संग्रह करतात - खरं आहे. परंतू त्याचा त्यागही केला पाहिजे. म्हणजे आसक्ती तुटली. उद्देशच तसा ! त्यागाकरताच अर्थसंग्रह आहे.

**टिटवी**

या संग्रहाकरता दोन गुरु सांगितलेले आहेत. सूर्य एक गुरु आहे. एक पक्षी आहे. त्या पक्षालाही त्यांनी गुरु केलं आहे. 'टिटवी' तो पक्षी, त्याला मांसाचा गोळा मिळाल्याबरोबर तो चोचीमधे घेऊन तो पक्षी निघाला म्हणे. आता स्वभाव आहे. ज्याला मांसाचा पिंड मिळाला नाही ते सगळे पाचपन्नास

पक्षी त्याच्या अंगावर धाऊन गेले. आणि मांसाच पिंड हा एकटाच घेऊन निघालाय. साम्यवाद काय आत्ताच नवीन काढलाय काय? ही काही बुद्धिमत्ता नाही. स्वभावच आहे हा - विश्वाचा. स्वभाव, मनाचा,बुद्धिचा स्वभाव आहे म्हणाले आणि असा साम्यवाद होणारच.

तर त्या पक्षाला तो गोळा -मांसाचा, मिळाला. तो निघाल्यावर सगळे पक्षी त्याच्या अंगावर धावून गेले. मग त्याला तो एकटा काय करणार? त्यांनी आपल्या मुखातला तो मांसपिंड टाकून दिला. सगळे पक्षी निघून गेले. याचे प्राण वाचले म्हणाले हा सुखी झाला. सूर्यनारायण संग्रह करतात पण देतात सगळं. हा पक्षी - संग्रह केला पण आपल्याकरता केला म्हणजे संग्रह - अर्थसंग्रह हा दोष नाही. संग्रह करणाऱ्याची बुद्धी! त्या बुद्धीवरून त्याच्यावर दोष लागतो. म्हणून बुद्धी सुधारण्याचा प्रयत्न करायचा नाही असे नाही. प्रयत्न करायचा का संग्रहच नको म्हणायचं? होईल तसं, सुधारणा होईल,कायद्यांनीही.

त्यागाकरता केलेला संग्रह हा गुण आहे. आणि स्वत: भोगाकरता केलेला संग्रह हा दोष आहे. त्यावेळेला इतर सगळे द्वेष करणार आणि त्याला अशांती होणार! त्याला काही कायदा नको काही नको! स्वभावच आहे म्हणाले. साम्यवाद हा वाटेल त्या वेळेला निर्माण होतो. प्रचार करायची जरूरी नाही असे दोन गुरु करून त्या संग्रहाबद्दलच आपली बुद्धी कशी उत्तम ठेवावी हे अवधूतांनी सांगितलं -

**अजगर**

स्वबुद्धीने केलेल्या गुरुंपासून - आपण काय काय गुण घेतले ते अवधूत सांगताहेत - प्रारब्ध ज्याला म्हणतात -

**सुखमैन्द्रियकं राजन् स्वर्गे नरक एव च।**
**देहिनो यद्यथा दु:खं तस्मान्नेच्छेत तद् बुधः ॥११:८:१॥**

अवधूतची पाहे संचीतात नाथ महाराज म्हणतात. जे आपलं संचीत कर्म असेल त्याप्रमाणे सुख दुःख मिळतं ते पहावं, हाच उपदेश अवधूतांनी केलेला आहे. इंद्रियांशी विषयांचा संबंध आला म्हणजे सुख मिळतं अशा समजूतीनं भोग विषयेन्द्रिय संबंधाने मिळणारे सुख, त्या सुखाकरता प्रयत्न चालू आहेत.

ते म्हणाले स्वर्गांत काय किंवा या ठिकाणी काय जे मिळायच ते सुख मिळतं म्हणाले. त्याची इच्छा करायची त्याच्या करता प्रयत्न करायची जरूर नाही. हा फार मोठा सिद्धांत मांडलेला आहे.

'अजगर वृत्ती'- काहीही करायचं नाही तर जे काही मिळायचं असेल ते मिळतं, प्रयत्न करुन पहा म्हणून प्रल्हादजींना उपदेश करताना सांगितलं होतं. यत्नांपासून सुख मिळणारं आहे म्हणाले. सुखाकरता प्रयत्न केला जातो. हे काही बरोबर नाही. आणि याला त्यांनी असा तर्क मांडलेला आहे **-यथा दुःखम्**... दुःखाकरता कोणीही प्रयत्न करत नाही. पण दुःख मिळतं कीं नाही? भोगावं लागत ना, तस सुख ही मिळू शकतं. पण तितकं धैर्य आम्हाला नसल्यामुळे हा प्रारब्धवाद हा त्याज्य ठरलेला आहे. परंतु तो मोठा महत्त्वाचा आहे अवधूत म्हणतात.

मी ही अजगरवृत्ती धारण करून पडून रहातो म्हणाले. 'चांगलं अन्न मिळालं घेतो, नाही मिळालं - नाही घेत. यदृच्छेने मिळेल. मिळालं नाही तर निजून रहातो.' म्हणाले, त्यामुळे असं होत की, इंद्रियांच्या शक्ती कमी होतात. त्या इंद्रियांबरोबर सगळ्याही आणखी वासनाही कमी कमी होतात, म्हणाले, आणि क्रमाक्रमाने अशा प्रकारचं धेर्य - लोकोत्तर धैर्य तितिक्षे बरोबर आपोआप उत्पन्न होत. त्याकरता अजगराप्रमाणे मी वागतो म्हणाले. याबाबतीत प्रयत्न न करणं प्रारब्ध म्हणजे पूर्वीचं कर्म पाहीजे प्रारब्ध याचा अर्थ काय म्हणतात दैव-याचा अर्थ काही पूर्व जन्मात केलेलं कर्म. यालाच प्रारब्ध असं म्हणतात.

जे फलोन्मुख झालेलं असेल आणि ते जर सुखाला अनुकूल असेल तर सुख आपोआप मिळतं. काही घटना घडून येतात. आपण त्याला - प्रयत्नालाच प्राधान्य देतो. प्रयत्न केला म्हणून झालं असं समजतो आपण. पण असा एक अभ्यास करण्याचा प्रकार आहे म्हणून अवधूतांनी सांगितलेलं आहे. माझा अभ्यास असा आहे म्हणाले, समुद्राप्रमाणे गंभीर रहावं गांभिर्याचा अभ्यास आहे म्हणाले.

**समुद्र**

उन्हाळ्यामधे पाणी नद्यांच आटलं म्हणून समुद्र काही आटत नाही. आणि पावसाळ्यामधे अगदी भरपूर प्रवाह, जलप्रवाह, पुष्कळ पाणी मिळालं म्हणून समुद्र वाढत नाही. त्याचप्रमाणे अनुकूल परिस्थिती झाली म्हणून वृद्धि झाली. हर्ष वाढलेला आहे. प्रतिकुल परिस्थिती झाली म्हणून विषाद अंत:करणात वाढला आहे, असं नाही. शांत अंत:करण रहावं तद्रूप रहावं.

**पतंग**

रूप जे आहे, रूपाची आसक्ती आहे ती जाण्याकरता पतंगाला गुरु केलं आहे.

**दृष्ट्वा स्त्रियं देवमायां तद्भावैरजितेंद्रिय: ।**
**प्रलोभित: पतन्त्यधे तमस्यग्नौ पतंगवत् ।।११-८-७।।**

या स्त्रीरूपाच्या आसक्तीमुहे तुम्ही या ठिकाणी रूपाच्या त्या मोहामधे सापडून कसा नाश होतो त्याला पतंगाचा दृष्टांत दिला आहे. अग्नी पेटलेला आहे. दिवा लागलेला आहे आणि तो पतंग त्या अग्नींवर झडप घालतो. रूपाची आसक्ती आहे ही ! पण त्याचे पर्यावसान - शेवट काय होतो म्हणाले, ''त्या पतंगाचा नाश होऊन जातो. तशी स्थिती होते म्हणून मी त्या रूपासक्तीपासून बाजूला आहे.''

एकेक एकेक मोह कसे बाजूला केलेले आहेत, आणि कोणच्या विचारांनी केलेले आहेत हा सांख्यमार्ग आहे. योगमार्ग म्हणजे प्राणायामाने प्राणवायूचा

विरोध केला, कुंभक झाला म्हणजे मन आपोआप बंद पडते. प्राण ही बंद राहीला. मन ही बंद राहीलं, तो योगमार्ग आहे. हा विचारमार्ग आहे. सांख्यमार्ग आहे. प्रत्येक वस्तू पासून त्यांचे एकेक पर्यवसान कसं होतं - तो कसा वागला आणि काय त्याचं फळ त्याला मिळालं, त्याप्रमाणे आपण वागू नये म्हणून पतंगाला गुरु केलं. यानंतर -

**मधुमक्षीका**

संग्रहाचं दुसरं उदाहरण आहे. संग्रह केला त्यांनी, म्हणजे भोगही नाही आणि त्यागही नाही. केवळ संग्रह, नुसता मध संग्रह करून ठेवला तो संग्रहही गेला आणि त्यांचा प्राणही गेला

**सायंतनं त्वा श्वस्तनं वा न संगृह्णीत भिक्षुकः।**
**मक्षिका इव संगृह्णन् सह तेन विनश्यति॥८-१२॥**

म्हणून 'सायंकाळला पाहीजे,' 'उद्याला पाहिजे,' वर्षभर पुरलं पाहिजे, - अशा या सगळ्या आशा मनामध्ये ठेवून मनोरथ करून संग्रह करणारा जो आहे. त्याला हाही एक याप्रमाणे असे अनेक त्यांनी गुरु सांगितले आहेत.

**मत्स्य**

रसासक्ती जाण्याकरता मत्स्याला गुरु केलं म्हणाले.

**जिह्वयातिप्रमाथिन्या जनो रसविमोहितः।**
**मृत्युमृच्छत्यसद्बुद्धिर्मीनस्तु बडिशैर्यथा॥१९॥**

जिह्वा अतिशय विषयाची आसक्त आणि नाशक आहे म्हणाले. निरनिराळ्या रसांचा मोह उत्पन्न झालेला हा जीव त्या जिह्वेच्या ताब्यात गेला कीं शेवटी अनेक रोग उत्पन्न होतात आणि तो मृत्यूच्या पाशात सापडतो. त्या मीनाला खाण्याची इच्छा झाली. ज्या जाळ्यामधे खाण्याचा तो पदार्थ ठेवलेला आहे.त्यांत तोंड घालतो आणि त्याच्या तोंडामधे तो पाश अडकला आहे. त्याचा प्राण जातो. तो केवळ रसाच्या आसक्तीत जातो. इंद्रिये बाकीची जिंकता येतात म्हणाले.

अन्न, आहार सोडली की, बाकीच्या इंद्रियांची शक्ती कमीच होती. कशाला जाताहेत! पण हे रसनेंद्रियच जास्ती वाढतं. ताप थांबलेला आहे आणि थोडं थोडं अन्न द्या, म्हणतात डॉक्टर ? एकदम देऊ नका म्हणतात. याला तर जास्ती इच्छा झालेली आहे.' 'हे खाऊ का? 'ते खाऊ का ?' म्हणजे आहार सुटल्यामुळे बाकीची इंद्रिये - शक्तीच राहीली नाही म्हणून त्यांच सामर्थ्य कमी झालं पण जिव्हेचं सामर्थ्य जास्त वाढतं म्हणाले. म्हणून जितेन्द्रिय, जितेन्द्रिय जे काही सामर्थ्य सांगीतलेलं आहे त्याबद्दल विचार सांगताहेत अवधूत -की,

**तावज्जितेंद्रियो न स्यात् विजितान्येन्द्रियः पुमान ।**
**न जयेद् रसनं यावज्जितं सर्वं जिते रसे ॥८-२१॥**

रसनेंद्रिय जोपर्यंत जिंकल नाही तोपर्यंत त्याला जितेन्द्रीय म्हणता येणार नाही. रस ज्यानी जिंकला त्यांनी सगळ जिंकलं. ही रसासक्ती दूर करण्याकरता मीनाला गुरु केलं. प्राणनाश त्या मीनाचा होतो म्हणून रसाची आसक्ती उपयोगी नाही. त्याचप्रमाणे बाकीचेही मनाचे दोष जाण्याकरता त्यांनी निरनिराळे गुरु केले आहेत.

**वेश्या**

पिंगला वेश्येचेही उदाहरण त्यांनी सांगितले आहे. विदेह नगरामध्ये रहाणारी वेश्या! आतां यांचा संचार सगळीकडेच असायचा. योगीच होते ते. म्हणून त्यांनी सगळी उदाहरणं पाहिली. ते म्हणाले, 'संध्याकाळपासून बसली वेश्या, अन्न नाही, पाणी नाही, येईल कुणीतरी, धन आपल्याला मिळेल. मध्यरात्र झाली तरी तिच्या इच्छेप्रमाणे काही धन मिळालं नाही. तिच्या मनामध्ये वैराग्य उत्पन्न झालं' 'काय म्हणाली, या मोहामधे पडले - धनाची आशा, कामसुखाची आशा. तेव्हा ही आशा करण्यापेक्षा तो जो आत्माराम आहे शरिरस्थ - शरीरात रहाणारा आत्मा, त्याचं जर चिंतन मी केलं असतं - परमेश्वराचं तर मला किती सुख मिळालं असतं!'

असा विचार करून सर्व आशा ज्यावेळेला तिनं टाकून दिल्या त्यावेळेला तिला गाढ झोप लागली म्हणाले अन् मी हे उदाहरण घेतलं-

**आशा हि परमं दु:खं नैराश्य परमं सुखम्।**

**यदा संच्छिद्य कान्ताशां सुखं सुष्वाप पिंगला ॥४४॥**

सर्व आणखी इच्छा सोडून दिल्या. आकांक्षा तिनं मग तिला झोप लागली. म्हणजे -

'आशा' हे मोठं दु:ख आहे, सर्व दु:खाच कारण आशा आहे. 'हे मिळावं, ते मिळावं', 'अशी सोय व्हावी, तशी सोय व्हावी,' संपत्तीच्या बाबतीत, त्याचप्रमाणे संततीच्या बाबतीत, सत्तेच्या बाबतीत आशेला अंत नाही. वाढत रहाते! त्यामुळे दु:ख वाढत रहातं. हा त्याचा अभिप्राय आहे.

अवधूत सांगताहेत - 'राजा परिग्रह दु:खाला कारण होतो आणि असीम सुख देतो तो अपरिग्रह .' साम्यवादाला पर्याय म्हणून अपरिग्रह शास्त्रकारांनी सांगितला आहे. शरीर रहाण्याकरता जेवढं आवश्यक आहे, अन्न, वस्त्र, यापेक्षा जास्ती संग्रह करू नये. हा अपरिग्रह शब्दाचा अर्थ आहे. ब्रह्मज्ञानी माणसांनी सुद्धा दुपारी भिक्षा मागायला जावं म्हणून सांगतात भगवान! नाहीतर शरीर कसं राहणार?

त्यात काही दोष नाही. जे मिळेल माधुकरीमधे तेवढं घेऊन यायच पाणी प्यायचं, झालं! भिक्षा एक औषध आहे, शरिराला, अशा समजुतीनं ती भिक्षा ग्रहण करायची. रसाकडे लक्ष नाही, काही नाही ! माधुकरीमध्ये सगळ एकत्रच होतं. एकत्रच ते खायचं असतं. रसासक्ती जाण्याकरता हे सगळे उपाय आहेत.

**बालक**

यानंतर बालकालाही गुरु केलेलं आहे. लहान मुलगा दोन चार महिन्याचा आहे. काही नाही ! भूक लागली की रडायला येतं.दुध घातलं की आनंदानी खेळतो.

**द्वावेव चिन्मया मुक्तौ परमानन्द आप्लुतौ।**

**यो विमुग्धो जडो बालो यो गुणेभ्य: परं गत: ।।९ .४।।**

हा एकेक अभ्यास करायला कितीतरी काळ घालविला पाहिजे. बालवृत्तीचा अभ्यास करायचा म्हणजे किती कठीण आहे? बालकाला ज्याप्रमाणे कोणाचीही चिंता नाही, मानापमान नाही. घरात कुणी उपाशी आहे, कुणाला ताप आलेला आहे, कुणाला काही वेदना होत आहेत, काही नाही! आनंदामधे खेळतो आहे. भूक लागली की रडलं - दूध मिळालं की झालं!

त्या बालकाप्रमाणे मी अभ्यास केला म्हणाले. माझी बुद्धि मी तशी बनवतो. स्वस्थ पडून रहातो. काही होत नाही. चिंता करून काय करायच! म्हणाले कुणालाही आणखी ताप आला काही दोष व्हायला लागला, काही दुखायला लागलं, पोट दुखायला लागलं- लगेच काही ते दोष दूर होतात का? काही तितिक्षा पाहिजेच की? औषध काही झालं तरी औषध घेतल्याबरोबर दुसऱ्या मिनिटात बरं होतं काय लगेच? कर्म आहे - प्रत्येकाचं कर्म आहे. सुख दुःख ही त्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे मिळाताहेत. हा ही सिद्धांत आहे. अशा सगळ्या गोष्टींचा विचार करून यांनी आपलं मन तयार केलेलं आहे. बुद्धि तयार केली आहे. जो ज्ञानी झालेला आहे. तो एक चिंतारहीत आहे आणि जो अज्ञानपूर्ण - अज्ञानी म्हणजे लहान बालक, त्याला एक चिंता नाही. बाकी सगळे मधे चिंताग्रस्त आहेत.

**कुमारी**

शेवटी एका कुमारीच उदाहरण सांगितलं आहे. एका मुलीला पहाण्याकरता काही मंडळी आली. घरातली मंडळी गेली असतील बाहेर कुठं. त्या मुलीनंच सर्वांना बसायला सांगितलं. आसन दिले. पाणी बिणी प्यायला दिलेलं आहे. येतील म्हणाले, आत्ता कुठं बाहेर गेलेले आहेत. आणि ही साळी कांडण्याकरता बसली. त्यावेळेला सगळी घरात काम धाम

सगळं असायची. घरचं धान्य सगळं स्वत:च कांडायचं.

तिच्या हातामधे काकणं होती. आता कांडायच्या वेळेला कांकणं एकमेकावर आदळू लागली आणि त्याचा आवाज होऊ लागला. आता ही पाहूणे मंडळी आलेली आहेत. तिला वाटलं. कांकणांचा आवाज होतो आहे. एकेक कांकण तिनं काढून ठेवलं. दोन दोन कांकण ठेवली. तरी आवाज व्हायला लागला मग तिन शेवटी एकेक कांकण ठेवलं म्हणे. हे अवधूत दत्तात्रेय सांगताहेत हं! यावरून दत्तात्रेयांच्या मते हातांत एकेकच कांकण ठेवावा असा कुणी अर्थ काढतील. तसा अर्थ नाहीये याचा. ते दत्तात्रेय पुढे त्याचा खुलासा करणार आहेत. एक कांकण ठेवल्यानंतर आवाज बंद झाला. दत्तात्रेय म्हणाले - 'मी असा बोध घेतला म्हणाले-'

**वासो बहुनां कलहो भवेद्वार्ता द्वयोरपि।**
**एक एव चरेत् तस्मात् कुमार्या इव कंकण: ॥८:१०॥**

अनेक कांकणं कुमारीच्या हातात होती त्यावेळेला आवाज होत होता. अनेक साधक मंडळी जर एका ठिकाणी राहीली आणि साधन करू लागली तर त्यांच्यामधे कलह निश्चीत होणार. प्रत्येकाचे विचार निरनिराळे असतात. 'माझा असा अनुभव आहे.' 'माझ बरोबर आहे, तुझं चुकीचं आहे' हे चाललंय. साधन बाजूला रहातं बर! दोघे परस्पर मित्र राहीलेत एका ठिकाणी तर साधन चालेल की नाही? नाही म्हणाले. 'नुसत्या गोष्टी बोलण्यामधेच वेळ जाणार' म्हणाले, साधन होणार नाही. तेव्हा एकानीच काय ते साधन करायचं, आचरण करायचं ते एकट्यानीच केल पाहीजे.

**एवं संजातवैराग्यो विज्ञानालोक आत्मनि।**
**विचरामि महीमेतां मुक्तसंगोऽनहंकृति: ॥९.३०॥**

हा त्यांचा अभिप्राय आहे. अवधूत म्हणाले मी कुणाशी संगत करत नाही. कुणाला काय करायचे असेल ते तुमचं तुम्ही करा म्हणाले. माझं मी साधन करतो. तेव्हा असे प्रत्येक गुरूचं विवरण म्हणजे फार मोठं आहे.

विवेक ज्याला म्हणतात. नित्यानित्य विवेक  क्षेत्र-क्षेत्रज्ञ विवेक, तशा विवेकाने, विचाराने फक्त आपल्या बुद्धीनं विचार करूनच आपली बुद्धी तयार केलेली आहे. बुद्धी तयार झाली की संपल टाकायच ते टाकून दिल. बुद्धीतलं सगळ्या वासूना दूर झाल्या की संपलं. रसासक्ती गेली कोणचीही आसक्ती राहीलेली नाही, चिंता नाही, बालवृत्तींना तर काहीच आसक्ती नाही. स्वार्थ नाहीये. आत्मज्ञानी माणसं स्वार्थी असतात. त्यांचं जगाकडे लक्ष नसतं ! आक्षेप घेतात लोक ! ज्ञानेश्वर महाराज इतक्या लवकर समाधीत जाऊन बसले. आणखी त्यांनी काही दिवस काम करायला काय हरकत होती? पण तुम्ही कोण सांगणार ज्ञानेश्वर महाराजांना ? तुम्हाला काय सांगण्याचा अधिकार आहे? लवकर गेले किंवा त्यांनी करून ठेवले ते कुठे घेण्याची आम्हाला बुद्धी आहे? कितीतरी करून ठेवलय त्यांनी ! ''एक तरी ओवी अनुभवावी ''ज्ञानेश्वरीतली - नामदेच सांगताहेत ! तर असे निष्कारण आक्षेप वगैरे काही उपयोग नाही. आपली बुद्धी शांत, स्थिर झाली पाहिजे.

तो ब्रह्मज्ञानी, ज्ञानी महात्मा, स्थिर बुद्धी झाली ! त्याला पूर्ण आनंद मिळतो आहे.भगवान श्रीहरी सांगतात - 'उद्धवजी ! यदुराजाला अवधूतांनी उपदेश केलेला आहे. आणखी त्यांनी श्रवण केलेलं आहे. त्याचं मनन केलेलं आहे. यदुराजाच्या मनामधे, असलेली सर्व अशांती दूर झाली म्हणाले - दत्तात्रेयांच्या कृपेनं!' 'त्याकरता स्वत: आपणच विचार करायचा बाबा !'

**अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त**

## प.पू.श्रीदत्तमहाराज यांचे

# ‘अनुग्रह’

**या विषयावरील प्रवचन** दिनांक : २.११.१९९३

## ईश्वर शक्तीचे स्वरूप

**यस्याहुरागम इद: परिपूर्णशक्तेरंश: कित्यपि निविष्टमिमं प्रपंचं**
**तस्तै तमालरुचिभासुरकंधराय नारायणीसहचराय नम: शिवाय ।।**

**अहं सर्स्वस्य प्रभव:सर्व मत्त: प्रवर्तते ।**

भगवद्गीतेमध्ये भगवान ईश्वरभाव रूपाने गीतेचा उपदेश अर्जुनाला करतायंत. त्या वेळेला आपण कोण आहोत हे त्यांनी सांगितले आहे. सर्व विश्वाला उत्पन्न करणारा मी आहे आणि सर्व ही कार्ये माझ्यापासून प्रवृत्त होतात. सर्वांचा प्रवर्तक मी आहे हे, स्वत: भगवान सांगतात. जीवाच्या करता सांगतात. जीवाची बुद्धी अशी असली पाहिजे की कोणी तरी एक कर्ता-पूर्णशक्ती संपन्न. असा, आहे. ही भावना जीवाच्या अंत:करणामध्ये उत्पन्न व्हावी म्हणून हे सांगितलं. त्यात काही स्वत:च्या शक्तीचा अभिमान नाही. वस्तुस्थिती आहे.

तर ही ईश्वरशक्ती ईश्वरानेच प्रगट केलेली आहे. अधिकारी व्यक्तीला उपदेश करत असताना त्या शक्तीचं स्वरुप काय आहे, ईश्वर शक्ती सर्वप्रवर्तक आहे असे ईश्वरानेच सांगितलेलं आहे. ईश्वररूप होणारे महात्मे हे अर्थात ईश्वररूप असल्याने त्यांची शक्ती म्हणजे ईश्वरशक्तीच आहे.

**ज्ञानी तु आत्मैव मे मतम् ।**

म्हणून महाराज सांगतायत. ज्ञानी आणि माझ्यामध्ये काही फरक

रहात नाही. भेदबुद्धी ही देहदृष्टी आहे. हा निराळा, तो निराळा, उपाधिक भेद आहे. वस्तुत: भेद नाही आहे. निरुपाधिक स्वरुपामध्ये **'साधु दिसती वेगळाले परि ते स्वरुपी मिळाले। अवघे मिळूनी एकचि जाहले। देहातीत वस्तु ॥'**

समर्थांचा सिद्धांत आहे. सर्वही ब्रह्मज्ञानी महात्मे एकरुप आहेत. देहातीत वस्तुरुप झालेले आहेत. अर्थात त्यांचाही संकल्प म्हणजे ईश्वरसंकल्पच आहे. संकल्पशक्ती ही व्यवहारातही आपण मानतो. अनेक प्रकारच्या शक्ती आहेत.

**यस्यानुभवपर्यंता तत्त्वे बुद्धि:प्रवर्तते।**
**तस्य दृष्टिगता: सर्वे मुच्यन्ते सर्वपापभि :।**

हेही शास्त्रकार सांगतात. अनुभवापर्यंत तत्वज्ञान झालं पाहिजे. शब्दानं तत्वज्ञान होतं. नाही असं नाही. शब्दप्रमाण त्या करताच आहे. तत्त्व, अतत्त्व विचार करण्याकरता शब्दप्रमाण आहे. बुद्धीही त्याला अनुरुप असावी एवढंच शास्त्रज्ञांचं सांगणं आहे. **श्रुतिमतस्तर्कोऽनुसंधीयता** आचार्य महाराज सांगतायत. बुद्धी प्रमाण आहे. सर्व शास्त्रज्ञांनी सर्व महर्षिंनी बुद्धी प्रमाण मानलेली आहे. परंतु ती शास्त्रप्रमाणानुसार असावी. शास्त्र प्रमाण म्हणजे संस्कृत असावी असं त्यांचं म्हणणं आहे. केवळ बुद्धीनं पूर्ण निर्णय करता येत नाही. पूर्ण बुद्धीचे महात्मे म्हणजे साक्षात् ईश्वररूपच झालेले असतात. तेव्हा अभ्यास करता करता ज्याची बुद्धी अत्यंत स्थिर झाली, आत्मस्वरूपाकार झाली, आत्मभाव ज्या बुद्धीमध्ये आणखी बाणलेला आहे अशा महात्म्यांचा जो संकल्प आहे किंवा ज्याची दृष्टीसुध्दा इतकी शक्ती संपन्न असते त्यांची दृष्टी जाच्यावर पडेल त्याचा सर्वही पापक्षय होत आहे.

## मोक्षाचे स्वरूप

सत्पुरुष किंवा ज्ञानी महात्मा याला मोक्ष कसा मिळतो हा एक विचार उपनिषदामध्ये आलेला आहे. ज्ञानी महात्मा जरी झाला तरी, या जन्मामध्ये ज्ञान झालं असेल त्याला. मागच्या अनेक जन्मामध्ये पुष्कळ कर्म त्यांनी केलेली आहेत. **मुक्त होणं याचा अर्थ कर्म संपणं**. म्हणजे मुक्त होणं. तर ती सगळी कर्म संपल्यानंतर देह संबंध संपला. जन्म मृत्यू हे बंद झाले. नवीन देहाचा संबंध म्हणजे जन्म. या देहाचा संबंध सुटणं म्हणजे मृत्यू. अशी जन्ममृत्यूची व्याख्या शास्त्रकार सांगतात.

जन्ममृत्यूचं म्हणजे नवीन देहाच्या संबधाचं कारण काय ? तर त्याने केलेली जी कर्मे आहेत, त्या कर्मामुळे देह संबंध येतो. अनेक देह आहेत त्या त्या देहाचा संबंध त्याच्या कर्माप्रमाणे येतो, हा एक सिद्धांत त्यांनी मांडला आहे. ही कर्मंच संपली, कारण नाहीसे झाल्यानंतर देहरूपी कार्य होणार नाही, अर्थात देह संबंध संपला आणि देह संबंध असे पर्यंत सुख दुःख द्वंद्वाची जाणीव राहणार तीही संपली, देहाचा संबंधच संपल्यामुळे हे मुक्त पुरुषाचे स्वरुप आहे. देह संबंध सुटणं देहालाही कारण असलेली सर्वकर्म संपून जाणं. ही सर्व कर्म कशी संपणार हा एक मोठा प्रश्न आहे. तर त्याचं मुख्य साधन म्हणजे आत्मज्ञान जे आहे, परमात्म स्वरूपाच प्रत्यक्ष ज्ञान, नुसतं शब्द ज्ञान नाही. ते प्रत्यक्ष ज्ञान हे सर्व कर्मक्षयाला कारण आहे.

## बुद्धिस्थैर्याची आवश्यकता

**ज्ञानाग्निः सर्वकर्माणि** सर्व कर्मांचा दाह ज्ञानाग्नीनें होतो असे सांगतात भगवान. तर ती सर्वहि कर्म संपायची. आत्मज्ञान त्याला त्या करता प्राप्त करुन घ्याव लागतं. तें आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्याकरता साधन म्हणजे बुद्धीची स्थिरता ही पाहिजे. बुद्धीची जरुरी व्यवहारा करीता जशी सांगितले

जाते त्याचप्रमाणे मोक्षाकरिता सुद्धा बुद्धीची जरुरी आहे. परमार्थामध्ये बुद्धी पाहिजे आणि व्यवहारामध्येही बुद्धी पाहिजे. म्हणुन बुद्धीला जास्ती श्रेष्ठत्व सर्वांच्या मतांने आहे. बुद्धीवाद बुद्धीवाद म्हणजे बुद्धीप्रधान वाद ज्याला आपण म्हणतो. बुद्धी प्रधानवाद सर्व शास्त्रकारांना मान्य आहे.

**न खलु कश्चिद्धीमतां अविषयो नाम** धीमान् जो आहे खरा त्याला कोणीताही जगामध्ये अविषय नाही सर्व विषयाचे ज्ञान तो संपादन करु शकतो हे बुद्धीचे महत्व कालीदासानेही सांगितले आहे. तर त्या बुद्धीमध्ये, त्या मनामध्ये जो काही चांचल्य म्हणून दोष आहे त्याच्यापुढे अर्जुनासारख्याला हात टेकावे लागले त्याने कबुल केले की 'माझं मन मी आवरू शकत नाही केवढी सर्व देवांची कृपा झाली. सर्व देवतांपासून शंकरापासून सर्व विद्या त्याला मिळाल्या होत्या, संगीत विद्याही अर्जुन शिकला. त्याला इंद्राने मुद्दाम सांगितले तूं शिकून घे.'

समर्थांनी जे श्रवण भक्तीचं निरुपण करताना सांगितलेले आहे 'ऐकत जावे, ऐकत जावे,' किती वर्णन केलेले आहे. म्हणजे वैराग्य पाहिजे त्याग केला पाहिजे, पण ज्या काही आवश्यक गोष्टी आहेत पूर्वभूमिकेमध्ये ज्ञानाच्या पूर्वी, त्याच्या संबंधी वैराग्य उपयोगी नाही हे समर्थांचे फार महत्वाचे सांगणे आहे. किती शास्त्रं आहेत. किती विषय आहेत.

त्या प्रमाणे अर्जुनाला सगळ्या विद्या मिळाल्या आहेत. संगीत विद्या आहे. अस्त्र विद्या आहे त्याचप्रमाणे ईश्वरावर अत्यंत श्रद्धा आहे. भक्ति आहे, गुरुभक्ति, गुरुकृपा आहे. सगळे आहे अशा अवस्थेमध्ये असणारा अर्जुन मनाचा निग्रह फार कठीण आहे. **'तस्याहं निग्रह मन्ये वायोरिव सुदुष्करम्'**, हे अर्जुनाचे उद्गार! हे मान्य आहे.

# बुद्धिस्थैर्याचे उपाय

भगवान म्हणाले खरं आहे मन हे निग्रह करण्याला फार कठीण आहे म्हणाले पण निग्रह करता येणार नाही अस नाहिये भारतीय संस्कृतीमध्ये आशावाद फार आहे. अनेक प्रकारची साधन सांगितली आहेत त्या निरनिराळ्या साधनांचा अभ्यास करून आपल्या मनाची, बुद्धीची स्थिरता संपादन करणे हे मुख्य कर्तव्य सांगितले आहे. बुद्धीस्थैर्य हे आत्मज्ञानाला अत्यंत उपयोगी आहे.**अभ्यासवैराग्येण तन्निरोधः** (पातंजल योगसूत्र), **अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते** (भगवद्गीता). तीच दोन साधन त्यांनी सांगितली आहेत. तर मनाला स्थिर करण्याचे दोन उपाय योग शास्त्रकारांनी सांगितले, भगवानांनी सांगितले आहेत. अभ्यास करणे, मन स्थिर करण्याचा प्रयत्न करणे.

**यतो यतो निश्चरति सनश्चंचलमस्थिरम् ।**
**ततस्ततो नियम्यं च आत्मन्येव वशं नयेत् ।**

स्वरूपानुसंधान व्हायला पाहिजे आत्मस्वरूप खर काय आहे हे शास्त्रानी, आचार्यांनी, जसं सांगितलं असेल ते मनामध्ये आणून आणि त्याचं अनुसंधान त्या बुद्धीनं, मनानं जर झालं तर पुढे साक्षात्कार होतो. समाधी आणि साक्षात्कार आहे. आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर सगळं सपलं सर्व कर्मक्षय होतो. सर्व कर्मक्षय झाल्यानंतर देह सबंध संपतो. देह संबंध संपल्यानंतर सुखदुःख हया संवेदना बंद होतात. सगळी स्थितप्रज्ञाची लक्षणे त्याकरताच सांगितली आहेत. आचार्यांनी स्थितप्रज्ञाची लक्षणे विवरण करत असताना सांगितले आहे. की ज्ञानाभ्यास करून त्या भूमिकेवर गेलेल्या ज्ञानी मनुष्याला ही लक्षण नैसर्गिक असतात, म्हणाले. त्याला प्रयत्न काही करावा लागत नाही. दुःखे षु अनुद्विग्रमनः। सुखेषु विगत स्पृहः।। हे मात्र आमच्या सारख्या संसारी, अज्ञानी मनुष्याला अशक्य वाटतं. प्रयत्न

करावा लागतो. पण ज्ञानी महात्म्यांना काही नाही. त्यांची ही नैसर्गिक लक्षणं आहेत.साधकांची ही सर्व साधनं आहेत म्हणून सांगतात भगवान भगवद्गीतेमध्ये. त्याचप्रमाणे भगवद्भक्तांची लक्षणे **अद्वेष्टा सर्व भुतांना** हे जी भगवद् भक्ताची लक्षण आहेत, पुढे गुणातीताची लक्षणं आहेत. ती सर्व साधकांची साधनं आहेत बुद्धी स्थिर व्हावी आत्मस्वरूपाचे अनुसंधान करता यावं त्या बुद्धीला, स्थिरता झाल्याशिवाय आत्मस्वरुपनुसंधान होणार नाही. तर त्या मनाची, बुद्धीची स्थिरता हे एक प्रमुख साधन मानलेले आहे. स्वरूपानुसंधान, ज्ञान, व मोक्ष याचं साधन मानलेले आहे.

## संकल्पशक्ती

तर बुद्धीचं, मनाचं, स्थिरत्व हे त्याचे अनेक उपाय योगशास्त्रकारांनीही पुष्कळ सांगितलेले आहेत. योगाभ्यास त्या करता आहे. प्राणायामादिक अभ्यास फार कठीण आहे. साधनं सांगता सांगता एक साधन त्यांनी असं सांगीतलेलं आहे. 'वीतराग विषयं वा चित्तम।' हे एक योग सुत्र आहे. वीतराग जो ज्ञानी महात्मा, त्याच्या चित्तामध्ये जे चित्त विषय होईल, म्हणजे एखाद्या जीवावर कृपा करावी, त्याचं कल्याण व्हावं, असं त्या ज्ञानी महात्म्याला वाटेल, त्याचं चित्त स्थिर होईल.हे एक संकल्प शक्तीचं उदाहरण आहे. योगशास्त्रकार संकल्प शक्ती मान्य करणारे आहेत आणि अशा योगी पुरुषाची संकल्पशक्ती फार मोठी असते. सर्व सिद्धी ज्या वर्णन केलेल्या आहेत त्या संकल्पशक्तीरूपच आहेत. मानसिक शक्तीचा विकास म्हणजेच सिद्धी आहेत सगळ्या. तर त्या संकल्प शक्तीचा प्रभाव हा त्यांना मान्य आहे. प्रयत्नांनी तशी संकल्प शक्ती प्राप्त करुन घेता येते. ती संकल्पशक्ती व्यवहारामध्ये ही आपल्याला मान्य आहे. राष्ट्रपतींनी वटहुकूम काढल्यानंतर फाशीची शिक्षा झालेल्याला सुद्धा दया होऊ शकते. सोडून देतात. सर्वोच्च न्यायालयाने जरी निर्णय

दिला असला तरी त्या राष्ट्रपतींची वटहुकूमाने म्हणा, त्याच्या दयेने त्यांच्या संकल्पाने तो त्या दोषांतून मुक्त झाला. अशी अनेक संकल्पशक्ती ची उदाहरणे व्यवहारामध्येही पुष्कळ आहेत.

पण ह्या सगळ्या संकल्पशक्ती सत्य संकल्प नाहीत. सर्व शक्ती त्या संकल्पस्वरूप होत नाहीत. जीवात्म्याची कोणाचीही शक्ती सत्य संकल्पशक्ती नाही. ईश्वरस्वरूप झालेले महात्मे, त्यांची संकल्पशक्ती मात्र प्रभावी आहे. तो संकल्प, 'या जीवाचा उद्धार व्हावा', असं त्या महात्म्यांच्या मनामध्ये उत्पन्न होईल, त्या जीवात्म्याचं मन स्थिर लगेच होतं. कितीतरी विकार मनामध्ये, बुद्धीमध्ये आहेत. अनेक विकार बुद्धीमध्ये असताना ती बुद्धी कोणत्याही विषयाचा संपूर्ण निर्णय करू शकत नाही. हे मान्यच करावं लागतं आपल्याला. न्यायाधीशाचं एक उदाहरण दिलं होतं. स्वामी महाराजांनी सांगितलं. न्यायाधीशांनी खून करणाऱ्या माणसाला फाशी दिली, म्हणाले. पण ज्यांनी ८/१० खुन केले असतील त्या बाकीच्या खुनाची शिक्षा न्यायाधीश देऊ शकतो का? एका खूनाबद्दल फाशी झाली की संपलं त्याचं, प्राण गेला. प्राण गेल्यानंतर बाकीची जी पापकर्म, दोष आहेत ते तसेच राहिले ना ! पूर्ण शक्ती ही माणसांच्या जीवात्म्याच्या बुद्धीमध्ये नाही आहे. म्हणून त्याला सत्य संकल्प म्हणता येत नाही. ईश्वराचे किंवा ईश्वररुप झालेले महात्मे यांची संकल्प शक्ती ही मात्र परिपूर्ण आहे. आपल्या शिष्याचा, किंवा ज्याच्यावर अनुग्रह करायचा आहे त्याचं कल्याण व्हावं असा नुसता मनामध्ये संकल्प झाला की सर्व कार्य होऊ शकतं. त्याला बाकीचं काहीही लागत नाही. हा एक मोठा विशेष ईश्वराच्या संकल्पामध्ये सांगितलेला आहे. किंवा ईश्वरसंकल्प शक्तीमध्ये तो सांगिततेला आहे.

अर्जुनाला विश्वरूप पहाण्याची इच्छा झाली, विश्वरूप दाखवा म्हणाला, वस्तुत: विश्वरूप पहाण्याची अर्जुनाची योग्यता नाही आहे, पण

आरंभाला नाही कसं म्हणायचं ? काहीही साधन सामग्री नसताना ती एकदम निर्माण झालेली आहे. ही संकल्पशक्ती आहे. ही सर्वांच्याजवळ नाही आहे. सामान्य शक्ती, बुद्धीची, पुष्कळांजवळ आहे. पण त्या शक्तीपेक्षा ही मोठी शक्ती आहे. बुद्धीची शक्ती आहे.

दुःशासनाची, दुर्योधनाची किंवा हिरण्यकश्यपुची शक्ती ही फक्त देहात्मबुद्धी मनामध्ये आहे. देहात्मभाव धारण करून असलेल्या बुद्धीची शक्ती आहे. शास्त्र संस्कार ज्या बुद्धीवर झालेले आहेत म्हणजे देहापेक्षा आत्मा वेगळा आहे. तो अजरामर आहे, तो असंग आहे, कशाचाही त्याला संबंध नाही. उत्तरोत्तर आत्मस्वरूपाचे जे जे काही भाग दाखवलेले आहेत उपनिषदामध्ये त्याप्रमाणे, ज्याला अनुभव येतो आहे, अभ्यासाने आणि वैराग्याने, अत्यंत स्थिरबुद्धीने ध्यानाने हे अनुभव यायचे आहेत. **हे अनुभव ध्यानाने येण्यासाठी बुद्धीची स्थिरता अत्यंत जरुर आहे. ती स्थिरता वीतराग महात्म्यांच्या संकल्पानेसुद्धा होऊ शकते**. हे योगसूत्रकारांनी सांगितलं आहे. आणि अशा प्रकारची अनेक उदाहरणंही व्यास महर्षींनी मांडलेली आहेत.

शक्तीपात करणं म्हणजे शक्ती नवीन देणं असा नाहीये. गुरुंच्या संकल्पाचा प्रभाव त्याच्या चित्ताची स्थिरता करु शकतो. हे ज्ञानी महात्म्याचं सामर्थ्य त्यांनी दाखवलेलं आहे. आणि असं सामर्थ्य उत्पन्न होणार नाही असा आक्षेप घेणाऱ्याला स्वतःच्या सामर्थ्याचीसुद्धा पूर्ण जाणीव नाही, स्वतःची कर्म चांगली कोणची, वाईट कोणची, किती केलेली आहेत, काल काय केली, आज काय केली हे सुद्धा जो आणखी स्मरण करु शकत नाही त्याला आणखी एकंदर बुद्धीची शक्ती किती आहे याचा निर्णय कसा करता येईल? त्यामुळे ईश्वरस्वरूप झालेल्या महात्म्यांची संकल्पशक्ती ही असं कार्य करु शकते, हे शब्दप्रमाणाने सिद्ध आहे. आणखी त्याप्रमाणे प्रत्यक्ष अनुभवही आलेले आहेत. हे पुराणादिकामध्ये व्यासादिकांनी वर्णन केलेले आहेत.

## भीष्माचार्यांचे उदाहरण

भीष्माचार्यांची संकल्पशक्ती होती की नाही? इच्छामरणी झाले ते. आपल्या पित्याची सेवा केली. पित्याकरता त्याग केलेला आहे. आजन्म ब्रह्मचारी रहायचं आणि राज्य सोडायचं, राज्यत्याग नुसता नाही, ब्रह्मचारी म्हणजे संसारत्यागही, त्यांनी केला. त्याप्रमाणे शेवटपर्यंत राहीले. भीष्माचार्यांना पित्याने अंत:करणापासून दिलेला आशीर्वाद की 'तुला इच्छा जोपर्यंत होणार नाही तो पर्यंत यमधर्म तुला स्पर्श करु शकणार नाही.' त्यामुळे इच्छामरणी झाले ते.

रामराज्याचं महत्व वर्णन करताना शुकाचार्य महाराजांनी परीक्षित राजाला सांगितलेलं आहे की **मृत्युश्चानिच्छतां नासीत** राम राज्य करीत असताना सगळेच इच्छामरणी होते असं सांगतात. मरणाची ज्याला इच्छा नाही त्याला मृत्यु येणार नाही. मरणाची इच्छा कुणाला होती का, कधी होती की नाही. असे पुष्कळ प्रश्न निर्माण होतील. अतिशय दु:खाच्या वेळेला होतील. नको आता पुरे. भीष्माचार्य शेवटी इच्छामरणी जरी होते तरी शरीर सोडायचं त्यांनी ठरवलं आणि शरीर विसर्जन केलेलं आहे. भगवंताचं ध्यान करतायत. भगवान प्रत्यक्ष समोर उभे आहेत. आणि अशा स्थितीमध्ये स्तुती करता करता त्यांचा देहत्याग झालेला आहे. तर अशा रीतीनं मृत्युकरवी सुद्धा विजय मिळवणं इतकी मोठी संकल्पशक्ती अनेक जीवांची सुद्धा आपल्याला उदाहरणावरुन दिसून येते.

## बुद्धीची शक्ती कशी वाढते ?

तेव्हा आपल्या बुद्धीची शक्ती वाढवता येणं शक्य आहे. योगशास्त्रात हे वर्णन केलेलं आहे. आणि त्यांच्यामध्ये ईश्वरतत्त्व त्यांनी मुद्दाम मानलेलं आहे. केवळ आत्मविचार होऊ शकणार नाही. ईश्वराची शक्ती मान्य केली पाहिजे. उपासना केली पाहिजे. त्या उपासनेच्या प्रभावाने

आणखी मानवाच्या मानसिक शक्तीचा विकास सिद्धीरूपाने करायची इच्छा असेल तर तसा होईल. परंतु सिद्धी घेऊ नयेत, असंही भगवंतांनी सांगितलेलं आहे. 'नको माझ्याजवळ ज्यांना यायचय ना त्यांनी सिद्धीच्या पाठीमागे लागू नये.' सामर्थ्य मिळू शकेल वाटेल तशा प्रकारचं. ईश्वराची उपासना ही मुद्दाम त्यांनी बुद्धीस्थैर्य व्हावें यासाठी सांगितली आहे. बुद्धीस्थैर्य झाल्यानंतर सगळ्या संकल्पशक्तीचाही विकास होतो. इतरांकरताही उपयोग त्या संकल्पशक्तीचा करता येतो. त्यांचही कल्याण करता येतं. तर या दृष्टीनं ईश्वर उपासना ही महत्त्वाची. योगशास्त्रकार प्रयत्नवादी आहेत. प्रयत्नांनी सगळं साध्य करता येतं असं त्यांचं म्हणणं आहे. केवळ प्रारब्धावर अवलंबून राहीलेले ते नाही आहेत. संतमहात्म्यांनी जरी प्रारब्धाचा विचार मांडलेला असला तरी ईश्वराची शक्ती मोठी आहे एवढंच त्यांना सांगायचंय. **'ठेविले अनंते तैसेचि रहावे'**। तुकाराम महाराज सांगतात म्हणजे प्रारब्धवाद मानतायत. लोकांचा आणखी बुद्धीभेद करतायत, असा आक्षेप घेण्याचं काही कारण नाही. त्या अनंताची शक्ती इतकी मोठी आहे की त्याला अनुसरावच लागतं. अपरिहार्य आहे. हा त्यांचा अभिप्राय आहे. कारण निरहंकार ते झालेले आहेत. अहंकार ज्या बुद्धीतून पूर्ण निघून गेलेला आहे. **निर्ममो निरहंकार: स शान्तिमधिगच्छति**। त्या शिवाय पूर्ण शक्ती पूर्ण ज्ञान प्राप्त होणं शक्य नाही.

तुकाराम महाराजांच्या सर्व गाथा बुडवून टाकल्या इंद्रायणी नदीमध्ये. आणि तुकाराम महाराज तिथं अन्नपाणी टाकून बसले. पुढे १०/१२ दिवसांनी जशाच्या तशा त्या वह्या मिळाल्या. हे आपण ऐकतो म्हणजे तुकाराम महाराज आपले अभंग गेले, 'आपले अभंग गेले ते मिळावे' म्हणून बसले होते का? अभंग आपण केले आहेत अशी त्यांची भावना होती का? ते गेले, व्यर्थ गेले, फुकट गेले, मिळालं पाहिजे, हे अभिप्रेत नाहीये.

**'आपुलीया बळे नाही मी बोलत। सखा, कृपावंत वाचा त्याची।'** ही ज्यांची बुद्धी आहे. निरहंकारी बुद्धी आहे. कर्तृत्व आपलं नाहीये. 'मत्तः सर्व प्रवर्तते। हा सिद्धांत महात्म्यांच्या मनामध्ये नेहमी असतो. म्हणून त्यांचा अहंकार पूर्ण विलयाला गेलेला असतो. आणि अशी अहंकाररहित असणारी बुद्धी आहे. कधीही संकल्प कशाबद्दलही करायचा नाही. देह जरी जायचा प्रसंग आला तरी नाही. पण अशा वेळेला अशा महात्म्यांच्या मनामध्ये जर त्या शिष्याबद्दल संकल्प निर्माण झाला म्हणजे त्या शिष्याचं भाग्य आहे! महात्म्यांना काय, स्वतःच्या कीर्तीची, मानापानाची काही अपेक्षा नाही. पण त्यांचच प्रारब्ध आहे, त्यांचच सत्कर्म उदयाला आलेलं आहे आणि त्यामुळे त्याची सेवाबुद्धी, शुद्धबुद्धी पाहून त्यांच्या मनामध्ये संकल्प उत्पन्न झाला तो सत्यसंकल्प आहे. **'ऋतंभरा तत्रप्रज्ञा'**। म्हणतात त्याप्रमाणे त्या शिष्याची बुद्धी, कामक्रोधादिक विकार सगळे नाहीसे होतात. आणि बुद्धी स्थिर होते, ध्यानाचा अभ्यास सुरु होतो. स्वरूपानुसंधान करु लागतो. संसारापासून ती बुद्धी निवृत्त झालेली आहे. वैराग्यही उत्पन्न होतं. आणि त्या बुद्धीनं ध्यानाभ्यास सुरु झालेला असताना ध्यानापेक्षा पुढची समाधी अवस्था त्याला प्राप्त होते. आणि तिचं पर्यवसान, म्हणजे प्रत्यक्ष साक्षात्कार, नंतर होतो.

## अभ्यासाचा क्रम

तर अशा दृष्टीनं अभ्यासाचा क्रम शास्त्रज्ञ महात्म्यांनी सांगितला आहे. त्यांचा संकल्प जर झाला तर आपला उद्धार होईल हे त्यांनी महत्त्वाचं सांगितलेलं आहे. आणि त्यामध्ये फायदा काय हेही दाखवलेलं आहे. आत्मस्वरूपाचं ध्यान करायचंय. संसारातून बुद्धी बाजूला करुन आत्मस्वरूपापर्यंत नेऊन त्या आत्मस्वरूपाचें चिंतन करायचं हे मुख्य

कर्तव्य आहे जीवात्म्याचं. मानव जन्माचे हे साध्य आहे .

'इथपर्यंत तू आलेला आहेस.' अहं कोण आहे त्याचा विचार करता करता अन्नमय, प्राणमय, विज्ञानमय, मनोमय, आनंदमय पुरुषाच्याही पलीकडं एक स्वतंत्र 'अहं साक्षी मी' आहे. संसारामध्ये असणारा अहं पुष्कळ आहे. कोणाला अहं म्हणायचं? देहाला अहं म्हणायचं, इंद्रियाला अहं म्हणायचं, मी पहातो, मी पाहिलं, मी ऐकलं म्हणतो म्हणजे श्रोत्रेंद्रिय आत्म्याशी एक झाले आहे. त्या त्या इंद्रियांशी तादात्म्य झाल्याशिवाय अशी भाषा येणार नाही. व्यवहारामध्ये असलेला अहं हा या इंद्रियांमध्ये, देहामध्ये, मनामध्ये, बुद्धीमध्ये, एकरूप होऊन गेलेला आहे. त्याला बाजूला करायचे विवेक अनेक प्रकारचे आहेत. नित्यानित्यविवेक आहे, क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक आहेत. शरीरादिकांपेक्षा मी वेगळा आहे हा विवेक झाला पाहिजे. हेयोपादेय विवेक आहे. काय घ्यायचं जगातलं आणि काय सोडायचं हे समजलं पाहिजे हा ही विवेक आहे. त्यासाठी मी २४ गुरु केले, म्हणून भगवान दत्तात्रेयांनी यदुराजाला उपदेश केला. हेयोपादेय विवेक, कोणता गुण आहे. कोणता दोष आहे. काय घ्यावं कोणचं सोडावं. हे समजण्याकरता मी गुरु केले.

## ज्ञानानंतरचा अभ्यास

तर अशा दृष्टीनं अनेक जन्माच्या अभ्यासाने, ईश्वरकृपेने शरीरादिकांपेक्षा मी वेगळा आहे इथपर्यंत बुद्धी येऊन पोचली. त्याचप्रमाणे आत्मस्वरूप म्हणजे मी असंग आहे. सच्चिदानंदरूप आहे. साक्षी आहे मी. निर्विकार मी आहे. असंग आहे हे समजणं, समजल्यानंतर हे स्थिर झालं पाहिजे. मधे विघ्न उत्पन्न झालं तर काय करायचं? व्याधी आहे, शरीरामध्ये आणखी काही रोग वगैरे निर्माण झाले त्यामुळे ध्यान बंद झालं. मनामध्ये आणखी काही दोष निर्माण झाले, काय याचा उपयोग

आहे? काहीतरी वाटून आणखी अकर्मण्यता निर्माण झाली तरीसुद्धा तो आणखी अभ्यास बंद होणार! स्थिरता, ध्यानापेक्षा जास्ती स्थिर मन होणं म्हणजे समाधी आहे. प्रत्याहारानंतर ध्यानाला सुरुवात आहे. प्रत्याहार झाल्यानंतर सगळ्या इंद्रियापासून मन बाजूला राहू शकतं. म्हणजे ज्या स्वरूपाचं आपण ध्यान करायला लागू त्या ध्यानाने त्या ध्येयाचा साक्षात्कार होतो हा एक सिद्धांत आहे. सगुण स्वरूप असो अथवा निगुर्णात्मक स्वरुप असो. सगुण स्वरूपाचं ध्यान सुद्धा ध्येयाचा साक्षात्कार करुन देणारं आहे.

शंकराचार्य महाराजांचे जे मुख्य शिष्य पद्मपादाचार्य हे नरसिंहाचे उपासक होते म्हणतात. पण ती नरसिंहाची उपासना इतकी मोठी होती त्यांची, की ध्यान करता करता नरसिंहररूप ते होऊन गेले. बीडच्या जवळ नामलगांव म्हणून एक गाव आहे. आशापूरक गणेश म्हणून त्याला म्हणतात. तिथं भ्रूशुंडी ऋषी रहात होते. भ्रूशुंडी ऋषी त्या वाल्मीकी ऋषींच्या उदाहरणाप्रमाणे नामा कोळी म्हणून कोणीतरी वाटमाऱ्याचा धंदा करणारे पूर्वी होते. जंगल होतं तिथं. गणेशांचे शिष्य मुद्‌गल ऋषी तिकडून निघालेले, त्यांना त्यांनी धरलं. काय आहे तुमच्याजवळ? टाका. तुम्हाला मी मारणार आहे. त्यांची कृपा झाली, संकल्प झाला. त्यांना उपदेश करुन मुद्‌गल ऋषी निघून गेले. आणि तो नामा कोळी ध्यान करता करता म्हणजे नामस्मरण करता करता त्यांना सोंड निर्माण झाली. सरूपता मुक्ती ज्याला म्हणतात, गणपतीप्रमाणे. भ्रूशुंडी त्याला म्हणतात. त्यांचं ते स्थान आहे. आशापूरक गणेश.

तर सगुणाच्या ध्यानानेसुद्धा मनुष्य अशा प्रकारचा होऊ शकतो. मग निर्मळ, निर्विकार आत्मस्वरूप मी आहे, असंग आहे हे ध्यान करता करता त्या ध्यानानेच स्थिरता मनामध्ये निर्माण झाल्यानंतर त्याला समाधी अवस्था प्राप्त होते, ज्या समाधी अवस्थेमध्ये देहाचा काही संबंध नाही. काही नाही, आत्माकार बुद्धी झालेली आहे. देह संबंध नाही, काही नाही

आणि अशा स्थितीमध्ये त्या समाधीचं पुढचं पर्यवसान म्हणजे साक्षात्कार हे आहे.

## ध्यानाभ्यासातील विघ्ने

तर या समाधी अवस्थेपर्यंत जाण्याला जर मध्ये विघ्न उत्पन्न झाली तर काय करायचे? कर्म आपण केलेली असतात, अद्यापि कर्मसंबंधाच्या पलीकडे आपण गेलेलो नाही आहे. ध्यानापर्यंत आलो. कसं तरी आलो म्हणा. तिथे पण ते टिकलं पाहिजे. शरीरामध्ये काही रोग उत्पन्न झाले. मानसिक विकृति निर्माण झाल्या. सगळी कामं बंद झाली. हे नको, याची काही जरुरी नाही, असं वाटायला लागलं, कंटाळा आला तर? हे सगळे दोष आहेत. तर योगसूत्रकार मुद्दाम सांगतात,**प्रत्यक् चेतनाधिगमोऽन्तरायाभावश्च ॥१.२९॥** प्रत्यक चेतन जो आहे सर्वांतर्यामी आहे आत्मा, परमात्मा, त्याचा साक्षात्कार म्हणजे त्याचं ज्ञान होतं त्या ध्यानाने. ध्यान करता करता आणखी तोच मी चेतन आहे. निर्विकार मी आहे. असंग मी आहे हे पूर्ण आपल्याला कळल्यानंतर सुखदु:खाचा संबंध संपलाय. विवेक वैराग्याची सीमा झालेली आहे. सर्वांपासून त्याचं मन बाजूला झालेलं आहे. आत्मस्वरूपाचं ज्ञान झालं पण मध्ये येणारी विघ्नं त्याला काय करणार? त्या परमेश्वराच्या ध्यानाने विघ्न सुद्धा दूर होतात. 'योगक्षेमं वहाम्यहम्' म्हणतात ना? त्याला प्राप्त झालेलं नाही. ते त्याला प्राप्त करुन देणं आणि जे मिळालं आहे त्याचं संरक्षण करणं ही दोन्ही जबाबदारी ईश्वराने मान्य केलेली आहे. कबूल केलेले आहे. पण असा अनन्यभूत ध्यान करणारा जो आहे त्या भक्ताचा योगक्षेम मी करतो. पारमार्थिक योगक्षेम, नुसता व्यावहारीक योगक्षेम नाही. व्यवहारामध्ये काय मिळायचे मिळेल, राहील. परंतु पारमार्थिक योगक्षेम महत्त्वाचा आहे. बुद्धीची स्थिरता मिळाली पाहिजे. आणि ती स्थिरता

मिळून ध्यानाला सुरुवात झाल्यानंतर ही आलेली विघ्नं दूर झाल्याशिवाय काय करणार? अखंड ध्यान चालू पाहिजे त्या अखंड ध्यानाचं पर्यवसन समाधी आणि साक्षात्कारामध्ये झाला पाहिजे. आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यानंतर ही अभ्यास आहे. वासनाक्षय सगळा झाला पाहिजे. मनाचा मनोनाश झाला पाहिजे, तत्त्वज्ञान दृढ झालं पाहिजे. त्याकरता अखंड अभ्यास आहे. तो अखंड अभ्यास शेवटपर्यंत चालू रहाण्याकरता ईश्वराची, सद्गुरूंची उपासना ही अत्यंत आवश्यक मानलेली आहे. पूर्ण शक्तीसंपन्न ईश्वर आणि सद्गुरु ईश्वररूप आहेत. म्हणून त्यांच्या शक्तीनं आपली विघ्नंही दूर होतात. प्राप्त झालेलं साधन जे काही आपल्याजवळ आहे, त्या साधनाची दृढता होते. स्थिर होतं ते साधन. आणखी फलसिद्धी होते. या दृष्टीनं हा एक मार्ग योगशास्त्रकारांनी दाखविलेला आहे. वीतराग महात्म्यांचं चिंतन करणं. संतांची चरित्र वाचन केल्याने मनाची स्थिरता होते असं योगसूत्रकार सांगतात, त्या संतमहात्म्यांचा जर संकल्प झाला तर त्या संकल्पाने आणखी सगळं कार्य होऊन जात आहे.

ज्ञानेश्वर महाराज गेले असं मानायची जरुर नाही. समाधी लावून बसले म्हणजे संपलं. काही नाही, आळंदीला कोणी नाही? अजून आळंदीला लोक जातात.अनुष्ठान करतात. त्यांना दृष्टांत होतायत. सगळं चाललेलं आहे. मध्ये काही विचार चालला होता त्यांची समाधी उघडून पहायचा. विज्ञानवाद आहे सध्या. वैज्ञानिकांनी अपारदर्शक पदार्थांच्या पलीकडच्या वस्तूचाही फोटो घ्यायचा कॅमेरा शोधून काढला आहे म्हणे. पुष्कळ विचार झाला सगळ्यांचा. जाणकार लोक म्हणाले, 'बुद्धीभेद होईल. तुमच्या कॅमेऱ्याला आंत ज्ञानेश्वर तिथे दिसले नाहीत तर त्यामुळे किती लोकांचा बुद्धीभेद होईल?' म्हणून शेवटी तो विचार सोडून दिला त्यांनी म्हणजे संतांचे वचन हे श्रेष्ठ मानायला आम्ही तयार नाही. त्या साधनाने पाहिलं म्हणजे ज्ञानेश्वर आहेत की नाहीत हे सिद्ध होतं ही आमची बुद्धी आहे!

विदर्भामध्ये जे गुलाबराव महाराज होऊन गेले. त्यांची गोष्ट नागपूरच्या एकाने सांगितली. महाराज अंध होते. अगदी बालपणीच त्यांची दृष्टी गेली. ते आपली पूजा बिजा करायचे. बसायचे, ध्यान करायचे, नामस्मरण करायचे. एक फोटोग्राफर नेहमी येणारा, तो म्हणाला, ''महाराज तुमचा फोटो काढायचाय,'' महाराज म्हणाले, ''फोटो वगैरे काही काढायचा नाही'' त्या फोटोग्राफरने ते ऐकून घेतले. संध्याकाळी काही मंडळींबरोबर महाराज आपले बाहेर फिरायला निघाले. तेव्हां त्या सगळ्यांचे फोटो घेतले. आणखी दुसऱ्या दिवशी सकाळी तो महाराजांच्याकडे आला. आल्याबरोबर महाराजांनी त्याला विचारले, 'का बाबा फोटो निघाला का?' घाबरला तो म्हणाला, ''तुमचा तेवढा फोटो त्यात आला नाही बाकीच्या तिघांचा त्यात आला.'' म्हणजे महात्म्यांच्या संकल्पाला आम्ही कमी मानणार.

ज्ञानेश्वर महाराज समाधी लावून बसलेले आहेत. हे आम्हाला खरं वाटत नाही. पण ते खरं समजण्यासाठी ज्या वैज्ञानिक साधनांचा उपयोग केला आणि त्याच्यामध्ये जर ते खोटं ठरलं तर किती लोकांचा बुद्धीभेद होईल? किती वारकरी ७०० वर्षांपासून जाणारे त्यांचा बुद्धीभेद करण्याकरता वैज्ञानिक साधनांचा उपयोग केला असं होणार नाही का? मग ते थांबलं नंतर.

तर अशा दृष्टीनं ईश्वराचा संकल्प जो आहे, महात्म्यांचा संकल्प हा श्रेष्ठ मानलेला आहे शास्त्रकारांनी, त्या संकल्पाप्रमाणे आणखी कार्य चालू आहे. महात्मे आजही आहेत. ईश्वराच्या कृपेने आणखी 'धर्मस्थापनेचे नर' समर्थांनी सांगितल्याप्रमाणे आजही आहेत. पुढेही होणारे आहेत. होऊन गेलेले आहेत. ईश्वराच्या आदेशाप्रमाणे धर्मस्थापना ते करत असतात. प्रसंगी आपल्या संकल्प शक्तीचा उपयोगही त्यांना करावा लागतो. आणि नैसर्गिक शक्ती ही त्यांची संकल्पशक्ती असली तरी त्यांना अहंकार निर्माण

होत नाही हे एक मोठं वैशिष्ट्य आहे. शक्ती जवळ असून शक्ती विसरून जाणारे महात्मे ते आहेत.

चांगदेव आले. वाघावर बसून आले. आकाश मार्गाने आले, गुरु म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांना शरण यायला निघालेले असताना सुद्धा अहंकार घेऊन आले. योगाभ्यास पुष्कळ झालेला आहे. आणि ज्ञानेश्वर महाराज आपल्या इतर भावंडांबरोबर भिंतीवर बसले होते. थंडीचे दिवस.कोणी येऊन सांगितले, 'अहो हे योगी आलेले आहेत.' ज्ञानेश्वरमहाराजांनी विचार केला त्यांना सामोरं जायला पाहीजे. ती भिंत चालायला लागली.असं आपण सांगतो, ऐकतो पुष्कळ कथा ही. तर भिंत ज्या वेळेला चालायला लागली हे चांगदेवांनी पाहिले त्यावेळेला त्यांचा अहंकार पूर्ण गेला, वाघाला आणखी वश करणं, वाघावर आज्ञा चालवणं त्याला घेऊन जाणं, वाघ चेतन आहे मीही चेतन आहे त्यामुळे ऐकणं शक्य आहे म्हणाले. पण दगडामातीची भिंत चालवणारे हे, यांची केवढी मोठी शक्ती आहे. पण हा एवढाच विचार केला चांगदेवांनी यापेक्षाही पुढचा विचार आहे की दगडामातीची भिंत आपण चालवतो या शक्तीची आठवणसुद्धा त्यांना राहीलेली नाही. केवढी शक्ती आहे.

पूर्णपणे निरहंकार बुद्धी ज्ञानेश्वर महाराजांची. चांगदेवांच्या पत्राचं उत्तर लिहायला सांगितलं निवृत्तीनाथांनी. चांगदेवांच्या पत्रात तर मजकूर नाही. कोरा कागद आहे. कारण कोरा कागद म्हणजे लिहायला बसल्यावर त्यांच्या बुद्धीमध्ये संशय निर्माण झाला ना। नमस्कार ज्ञानेश्वर महाराजांना लिहायचा का आशीर्वाद लिहायचा? पहिल्या वाक्यामध्येच थांबले ते. आशीर्वाद कसा लिहायचा म्हणाले? गुरु म्हणून आपल्याला जायचय त्यांच्याकडे आशीर्वाद कसा लिहीणार? बरं, नमस्कार लिहायचा म्हणजे केवढा मोठा १४०० वर्षाचा मी आहे हे २०/२१ वर्षाचे आहेत. लहानांना नमस्कार कसा लिहायचा? म्हणून तसाच कोरा कागद पाठवून दिला.

निवृत्तीनाथांनी पाहिलं. काही नाही. कोरा कागद आहे. मुक्ताबाई तर स्पष्ट बोलून गेल्या '१४०० वर्ष राहूनही कोराच आहे.'

पण निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वर महाराजांना उत्तर लिहायला सांगितलं. तिथं काही वेळ नाही. **'स्वस्तिश्री वटेशु जो लपोनि जगताभासु । दावी मज ग्रासु प्रगटिला जगी।'**

वटेश्वर चांगदेवांचं कल्याण असो. लहान मला समजत असला तरी लहानांनी सुद्धा मोठ्याचं कल्याण असो म्हणायला हरकत नाही. मोठा समजत असला तरी मोठ्यांनी लहानांचं कल्याण लिहायला हरकत नाही. हे एवढं चांगदेवाला सुचलं नाही. एवढे योगी, एवढे समाधी लावणारे, आपल्या संकल्प शक्तीनं मृत्यु आलेल्याला जिवंत करणारे, १४ वेळा ज्यांनी स्वत:चा मृत्यु चुकवला, दुसऱ्यालाही जिवंत केलं त्यांना एवढं लक्षात आलं नाही!

ज्ञानेश्वर महाराजांची बुद्धी इतकी पूर्ण शक्तीसंपन्न आहे की चांगदेवांना ते चांगदेव म्हणून समजत नाही आहेत. मी मोठा आणि ज्ञानेश्वर लहान हे समजणं ही जी बुद्धी आहे ती देहापर्यंत आलेली बुद्धी आहे. देहाच्या पलीकडं अजून गेलीच नाही. चांगदेव गेलेच नाहीत. मोठा आणि लहान देहाच्या दृष्टीनं म्हणतात. ज्या देहाला काळाचा संबंध अधिक आहे तो देह मोठा आहे. ज्या देहाला काळाचा संबंध कमी आहे तो देह लहान आहे. आत्म्याला देह, इतकी वर्ष, तितकी वर्ष, पण चांगदेवांनी स्वत:ला मोठे समजून ज्ञानेश्वरांना लहान समजणं हे अद्यापी क्षेत्र क्षेत्रज्ञ विवेकही झाला नाही. ध्यान, समाधी तर फार पुढं आहे. योगाभ्यासाची समाधी वेगळी आणि ही समाधी वेगळी त्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांनी लिहायला सुरुवात करताना चांगदेव म्हणजे आत्मरूपानेच ते समजतात. **'स्वस्तिश्री वटेशु जो लपोनि जगदाभास दावी'** आत्मस्वरूप आच्छादित झाल्यानंतर आणखी जगदाभास दिसतो आहे. आणि आत्मस्वरूप प्रगट झाल्यानंतर

जगदाभास बंद होतो आहे. चांगदेवाला आत्मरूपाने पहातात. केवढी बुद्धी आहे. शास्त्र संस्कृत बुद्धी. पूर्ण ज्ञान आणखी या बुद्धीमध्ये आलेलं आहे. त्यामुळे आणखीही शक्ती निर्माण झाली आहे. संदेह नाही काही नाही. ६६ ओव्या लिहून पाठवून दिल्या. काम झालेलं आहे.

## शास्त्रप्रणीत साधनं

तर अशा दृष्टीनं ही आपली बुद्धी शास्त्रसंस्कारसंपन्न व्हायला पाहिजे. शास्त्र हे सुद्धा ईश्वराच्या बुद्धीतूनच निर्माण झालेलं आहे. ईश्वराची आज्ञा आहे. या शास्त्राने जी जी साधनं सांगितली आहेत त्यापैकी आपल्याला जी होण्यासारखी असतील ती घ्यायची, त्या साधनांचा अभ्यास करायचा. वैराग्यसंपन्न होण्याचा प्रयत्न करायचा. त्याच्यामध्ये काही विघ्न येऊ नये म्हणून ईश्वराची प्रार्थना करायची. श्रेष्ठ जे महात्मे आहेत त्यांची संगती मिळाली तर करायची. नाहीतर त्यांचे जे ग्रंथ आहेत तीसुद्धा संगती च आहे. ग्रंथवाचन करणं, मनन करणं, चिंतन करणं ही सुद्धा त्यांची संगतीच आहे. या दृष्टीनं आपल्या मनाची बुद्धीची स्थिरता जितकी जितकी अधिक वाढवता येईल तितकी वाढवण्याकरता मनुष्यजन्म आहे. या मनुष्यजन्मामध्ये आपल्या बुद्धीमध्ये सांसारिक वासनांचा संग्रह जितका अधिकाधिक होत जाईल तितकं तितकं आपण परमेश्वरापासून दूर दूर जात आहोत. त्या करता महापुरुषांचा संश्रय, महापुरुषांची संगती, वैचारिक असो किंवा प्रत्यक्ष प्रारब्धाने मिळाली तर तशी करून आपल्या मनाची स्थिरता करून घेऊन अभ्यास करायचा आहे. आत्मस्वरूपाचं चिंतन करणं हे मुख्य आहे. स्वरूपानुसंधान हे मुख्य घडलं पाहिजे आणि हे स्वरूपानुसंधान अखंड चालू रहावं याकरंता ईश्वराची उपासना हे आणि सर्वही महात्म्यांचं सांगणं आहे. भगवंतांनी शास्त्ररूपाने ते आपल्यापुढे मांडलेले आहे.

भारतासारखा आणखी श्रेष्ठ देश कुठंही दिसत नाहीये. केवळ अर्थ आणि काम याशिवाय कोणताही विचार मनामध्ये येत नाही असे देश आहेत. धर्म नाही, मोक्ष नाही. पण मोक्षस्वरुप काय समजल्यावर चांगलं आहे असं वाटतं, मात्र आपण करत नाही. सर्व दु:खनिवृत्ती, सर्वही दु:ख संपणं म्हणजे मोक्षपदार्थ आहे. चांगलं आहे की हे! कोणचीही दु:ख, आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक, भूकंप नाही, संप नाही, काही नाही. चांगलं आहे. पगार मिळतो आहे जास्ती, वाढतो आहे. सगळं होतय. सर्वही दु:खाची निवृत्ती म्हणजे मोक्षपदार्थ आहे. हे नको का कुणाला? पण त्याच्याकरता जे काही धर्मानुष्ठान आहे, ईश्वराची आज्ञा, पालन केली पाहिजे. कर्मयोग आहे. उपासना योग आहे. भक्ति योग आहे, योगाभ्यास करण्याची शक्ति असेल तर तो योगमार्गही आहे. अवघड आहे. सांगणारेही भेटणं कठीण आहे. ज्ञानमार्ग तर फारच अवघड आहे. तेव्हां या दृष्टीनं जी जी साधनं आपल्याला करता येतील ती करत रहायचे.

अर्जुनाला फक्त कर्मयोगाचं अनुष्ठान करायला सांगितलं. तुला जे प्राप्तकर्म आहे ते तू करत रहा. पुढचा विचार तुला करायचं कारण नाही. फळ मिळेल की नाही वगैरे संशयही बाळगण्याचं कारण नाही. मिळणार नाही अशा प्रकारचं विरुद्ध मत करुन घेण्याचं कारण नाही. ज्यांनी सांगितले तो फळ देणारा समर्थ आहे. आणि मी करणारा आहे अशी बुद्धी ठेऊ नकोस. एवढंच फक्त सांगितलं. अहं कर्ता, अशी बुद्धी ठेऊन अमुक फळ मला मिळालं पाहिजे, फलाची अभिलाषा बाळगून कर्म करू नकोस एवढं त्याला सांगितलं. ईश्वराचं स्मरण करून तू हे सगळं करत रहा. एवढा त्याला कर्मयोग सांगितला आहे.

त्याच्यापेक्षा कितीतरी पाठीमागे आपण आहोत. किती जन्माच्या बरोबरीने अर्जुनाची अवस्था प्राप्त होईल कुणाला ठाऊक? पण ईश्वराची प्रार्थना तेवढीच करायची! आम्हाला तत्त्वज्ञान होण्याची पात्रता आपण

प्राप्त करुन घ्यायची म्हणजे बुद्धी स्थिर झाली पाहिजे. निर्वासन झाली पाहिजे. म्हणजे आपल्या स्वरुपाचं चिंतन आम्ही करू शकू. आणि त्या चिंतनाने पुन्हा साक्षात्कार प्राप्त होतो एवढंच मागायचं आहे. या ठिकाणी समर्थ वाङ्.मयाचा अभ्यास चालू आहे. प्रत्येक महिन्याला अशा दृष्टीनं २/२ दिवस अशा प्रकारचं चिंतन होत आहे. मनन पाहिजेच ना? चिकित्सा ही जरूर आहे. चांगली चिकित्सा व्हावी.

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन : ।**

भगवंतांनी ज्ञानप्राप्तीची साधनं सांगितली आहेत. प्रणिपात पाहिजे, म्हणजे नम्रता पाहिजे. चिकित्सा करताना अहंकाराने विचारायला जाऊ नये, तत्त्वबोध व्हावा. चांगलं योग्य कळावं, बुद्धीनं विचारायला जावं. त्यानंतर परिप्रश्न म्हणजे चिकित्साच आहे. चिकित्सा नको असं नाही. भगवान सांगतात, चिकित्सा पाहिजे. करा, चांगली योग्य दृष्टीनं करा. राम रावणाचं युद्ध झालंच नाही. कौरव पांडवांचं युद्ध झालंच नाही, कालिदास झालाचं नाही. हे गृहीत धरुन चिकित्सेला सुरुवात करू नको. मग काय निर्णय होईल कुणास ठाऊक. सगळं गृहीत धरून तुम्ही माना. बुद्धी चालवा. पण त्या बुद्धीवर असे संस्कार चांगले घेऊन त्याप्रमाणे त्या बुद्धीनं विचार करा. ही सेवा हे साधन सांगितलेलं आहे. परंतु ही सुद्धा मुख्य साधनं नाहीत. ज्ञानाची मुख्य साधनं पुढे सांगतात भगवान, श्रद्धा पाहिजे मनामध्ये हे सगळं खरं आहे. परमेश्वराची आज्ञा आहे. वेद काय, शास्त्र काय, पुराण काय, इतिहास काय, महात्म्यांचं सांगणं काय सगळे शब्दप्रमाण आपण जरी मानत असलो, शब्द जरी असले तरी, हे सगळं खरं आहे. ही श्रद्धा विश्वास हे मुख्य अंतरंग साधन आहे. **श्रद्धावाँल्लभते ज्ञानम्** आणखी त्या ध्येयाची सिद्धी करुन घेण्याकरता आणखी प्रयत्न करणं इंद्रिय निग्रह करणं ही सगळी साधनं आपल्याला प्राप्त झाली पाहिजेत.

आपल्या जवळ साधनं किती कमी आहेत, किती दोष आहेत आपल्याजवळ, गुण दोष निरीक्षण प्रत्येक दिवशी आपण केलं पाहिजे. आणि त्यापैंकी किती दोष कमी झाले किती दोष वाढले ते सगळं निरीक्षण करून त्या करता आणखी साधनाभ्यास, ईश्वरप्रार्थना करत असावी.

ही सगळी साधनं भारतामध्ये सिद्ध आहेत. काही नवीन असं उसनं घ्यायची जरूर नाही. आणि निराशा होण्याचं कारणचं नाही. आत्मस्वरूप हे अजरामर आहे. जरी त्यांनी वैराग्याचा अभ्यास करायला सांगितला, सर्वसंग परित्याग करायला सांगितला असला तरीसुद्धा जीवात्मा अजरामर आहे हा सिद्धांत मुद्दाम सांगितला आहे. जीवाला नाश नाही, जन्म नाही, नाश नाही. पण मध्ये आपल्या पूर्व पापामुळे बुद्धीमध्ये दोष निर्माण होतात. त्या कर्माचं फल भोगावं लागतं. त्यातून सुटून जाण्याकरता उपायही सांगितले. सगळं सांगून ठेवलेलं आहे. महात्मे लोक निर्माण झालेले आहेत. ईश्वराच्या आज्ञेनं कार्य करतायत. आपल्या शक्तीने जीवाची बुद्धी स्थिर करू शकतात हे शास्त्राप्रमाणेच सांगतात. शास्त्र जसं सांगतं त्याप्रमाणे सांगितलेलं आहे. आणि हे सगळंही आपल्याला प्राप्त व्हावं.

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । भगवद्गीता १८-६१ ॥**

'सर्वांच्या हृदयस्थ परमेश्वर आहे. पूर्ण शक्तीसंपन्न आहे.

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।**
**तत्प्रसादात् परां शान्तिं मोक्षं प्राप्स्यसि दुर्लभम्॥१८-६२॥**

त्याला तू शरण जा.' असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितले. अहंकार त्याग करून 'सर्व कर्तृत्व आपलं आहे. मी कर्ता आहे' ही भावना ठेवू नकोस. प्रार्थना केली म्हणजे सगळं होतं. त्या सर्वांतर्यामी परमेश्वराने आणि तत्स्वरूप महात्म्यांनी आमच्यावर कृपा करावी.

आमच्या बुद्धीमध्ये असलेले जे अनेक दोष आहेत ते गेले असं समजता येत नाही आपल्याला. माझा राग गेला, मला काही वासना नाही.

असे आपण म्हणतो पण किती दिवस, किती वेळ, पाहिलयं का आम्ही? किती दिवस राग गेलेला आहे? १ तास सुद्धा जात नाही. विरुद्ध घटना घडल्याबरोबर लगेच रागावतो आपण. हे विकार किती मनामध्ये भरलेले आहेत. हे सगळे विकार मनातले दूर होणं म्हणजे किती कठीण आहे?

आपले हे जे काय कार्य आहे त्या कार्यामध्येही असंच चिंतन अखंड व्हावं, सर्वही साधनांचा उपदेश योग्य अधिकारी व्यक्तींकडून आपल्या कानावर पडावा त्याप्रमाणे आचरण करावं. ईश्वराची प्रार्थना आपल्याकडून चालू रहावी अशी हृदयस्थ परमेश्वराला प्रार्थना करुन आपल्या सांगण्याप्रमाणे जे काही यथामती विचार आपल्यापुढे मांडलेले आहेत त्यामध्ये हंसक्षीर न्यायाने जे आपल्याला ग्रहण करायचे ते ग्रहण करावं अशी प्रार्थना करुन मी हे भाषण पूर्ण करतो.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ॥**